पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी- ४११ ०१८

मा.महापालिका सभा

कार्यपत्रिका क्रमांक –६५

सभावृत्तांत

दिनांक – १६/१२/२०२१ वेळ –दुपारी २.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची माहे **डिसेंबर-२०२१** ची मासिक मा.महापालिका सभा **गुरूवार** दिनांक **१६/१२/२०२१** रोजी दुपारी २.०० वाजता महानगरपालिका प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात मा. उप सचिव महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग यांचेकडील पत्र क्र.कोरोना-२०२०/प्र.क्र.७६/नवि-१४ दि.२२ ऑक्टोबर २०२१ अन्वये आयोजित करणेत आलेली आहे. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१) मा.उषा उर्फ माई मनोहर ढोरे महापौर

२) मा.घुले नानी ऊर्फ हिराबाई गोवर्धन उपमहापौर

३) मा.कुंदन अंबादास गायकवाड

४) मा.स्वीनल कपिल म्हेत्रे

५) मा.अश्विनी संतोष जाधव

६) मा.सारीका शिवाजी सस्ते

७) मा.बुर्डे सुवर्णा विकास

८) मा.लक्ष्मणशेठ सोपान सस्ते

९) मा.डोळस विकास हरिश्चंद्र

१०) मा.सागर बाळासाहेब गवळी

११) मा.गोफणे अनुराधा देविदास

१२) मा.बारसे प्रियांका प्रविण

१३) मा.लांडगे सारिका संतोष

१४) मा.लांडगे राजेंद्र किसनराव

१५) मा.संतोष (आण्णा) ज्ञानेश्वर लोंढे

१६) मा.प्रा.सोनाली दत्तात्रय गव्हाणे

१७) मा.फुगे भिमाबाई पोपट

१८) मा.ॲड.नितीन ज्ञानेश्वर लांडगे

१९) मा.सावळे सिमा रविंद्र

२०) मा.लोंढे नम्रता योगेश

२१) मा.मडिगेरी विलास हनुमंतराव

२२) मा.गीता सुशिल मंचरकर

२३) मा.राहुल हनुमंतराव भोसले

२४) मा.समीर मोरेश्वर मासुळकर

२५) मा.अनुराधा गणपत गोरखे

२६) मा.मंगला अशोक कदम

२७) मा.अश्विनी भिमा बोबडे

२८) मा.योगीता ज्ञानेश्वर नागरगोजे

२९) मा.एकनाथ रावसाहेब पवार

३०) मा.भालेकर प्रविण महादेव

३१) मा.पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे

३२) मा.संगिता (नानी) प्रभाकर ताम्हाणे

३३) मा.पंकज दत्तात्रय भालेकर

३४) मा.घोलप कमल अनिल

३५) मा.उत्तम प्रकाश केंदळे

३६) मा.चिखले सचिन तुकाराम

३७) मा.यादव मीनल विशाल

३८) मा.वैशाली जालिंदर काळभोर

३९) मा.बाबर शर्मिला राजू

४०) मा.अमित राजेंद्र गावडे

४१) मा.बाळासाहेब नामदेव ओव्हाळ

४२) मा.भोंडवे संगिता राजेंद्र

४३) मा.मोरेश्वर महादू भोंडवे

४४) मा.ढाके नामदेव जनार्दन

४५) मा.भोईर सुरेश शिवाजी

४६) मा.अपर्णा निलेश डोके

४७) मा.अश्विनी गजानन चिंचवडे-पाटील

४८) मा.गावडे राजेंद्र तानाजी

४९) मा.जयश्री वसंत गावडे

५०) मा.कोमल दिपक मेवानी

५१) मा.सुजाता सुनिल पालांडे

५२) मा.कदम निकीता अर्जुन

५३) मा.संदीप बाळकृष्ण वाघेरे

५४) मा.उषा संजोग वाघेरे (पाटील)

५५) मा.नढे विनोद जयवंत

५६) मा.पाडाळे निता विलास

५७) मा.काळे उषा दिलीप

५८) मा.कोकणे संतोष अंकुश

५९) मा.पवार मनिषा प्रमोद

६०) मा.कैलास उर्फ बाबा भालचंद्र बारणे

६१) मा. ॲड.भोसले सचिन सुरेश

६२) मा.बारणे झामाबाई बाळासाहेब

६३) मा.बारणे माया संतोष

६४) मा.कलाटे राहुल तानाजी

६५) मा.कामठे तुषार गजानन

६६) मा.चोंधे आरती सुरेश

६७) मा.कस्पटे संदिप अरुण

६८) मा.बाबासाहेब (बाबा) त्रिभुवन

६९) मा.सविता बाळकृष्ण खुळे

७०) मा.सुनिता हेमंत तापकीर

७१) मा.आंगोळकर सागर सुनिल

७२) मा.बनसोडे राजू विश्वनाथ

७३) मा.आशा धायगुडे-शेंडगे

७४) मा.काटे स्वाती (माई) चंद्रकांत

७५) मा.रोहित (आप्पा) सुदाम काटे

७६) मा.कांबळे अंबरनाथ चंद्रकांत

७७) मा.राजापुरे माधवी राजेंद्र

७८) मा.चौगुले सीमा दत्तात्रय

७९) मा.नवनाथ दत्तू जगताप

८०) मा.सोनवणे शारदा हिरेन

८१) मा.हर्षल मच्छिंद्र ढोरे

८२) मा. संजय मल्हारराव वाबळे

८३) मा.थोरात ज्ञानदेव मुरलीधर

८४) मा.ॲड.मोरेश्वर ज्ञानेश्वर शेडगे

याशिवाय मा.राजेश पाटील-आयुक्त, मा.विकास ढाकणे-अतिरिक्त आयुक्त (१), मा.वाघ जितेंद्र- अतिरिक्त आयुक्त (२), मा.उल्हास जगताप-नगरसचिव तथा अतिरिक्त आयुक्त (३), मा.प्रमोद भोसले-मुख्य लेखापरिक्षक, मा.डॉ.रॉय- आरोग्य वैदयकीय अधिकारी, मा.कोळंबे- मुख्य लेखा व वित्त अधिकारी, मा.नाळे-उपसंचालक नगररचना, मा.इंगळे, मा.खोत, मा.मा.चारठाणकर, मा.झगडे, मा.इंदलकर, मा.दुरगुडे-उपआयुक्त, मा.निकम, मा.सवणे, मा.भालकर - सह शहर अभियंता, मा.बोदडे, मा.देशमुख, मा. खांडेकर, मा.शिंदे -सहाय्यक आयुक्त, मा.खाबडे, मा.गलबले, मा.नरोना-कार्यकारी अभियंता, मा.पाटील-प्राचार्य (आयटीआय) मा.वाबळे- अधिष्ठाता (वायसीएमएच), मा.गोफणे-सहाय्यक आरोग्य वैदयकीय अधिकारी व मा. गायकवाड - जनतासंपर्क अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

**मा.महापौर** – उपस्थित मा.नगरसेवक, मा.नगरसेविका, ऑनलाईन उपस्थित असलेले सर्व सदस्य,मा.आयुक्त, अधिकारी वर्ग, पत्रकार, नागरिक या सर्वांचे स्वागत करुन सभा कामकाजाला सुरुवात करणेत येत आहे.

१) कम्पोस्टिंग यंत्रणा, एसटीपी प्लांट, तसेच झिरो वेस्ट संकल्पना राबविणाऱ्या इमारतींमधील मिळकतधारकांना सामान्य करामध्ये सवलत देणेस मान्यता मिळणेबाबतचा मा.आयुक्त यांचा प्रस्ताव सभा कामकाजात दाखल करुन घेणेबाबतची मा.आयुक्त यांची मागणी मतास टाकणेत आली असता -

अनुकूल - ८१ प्रतिकूल – ०

अशी मते पडली व सदरचा विषय सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आला असल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

२) पिंपरी चिंचवड शहरातील रस्ते, चौक व उद्यानाचे ठिकाणी FRP Sculptures (Photo Booth) उभारणे व मुख्य चौकाचे ठिकाणी माहिती फलक ऊभारून सुशोभीकरण करणे या कामी नविन कामाचा अंदाजपत्रकामध्ये समावेश करणे व त्यास प्रशासकीय मान्यता देणे व सन २०२१-२२ च्या अंदाजपतक्रात वाढ/घट करून तरतुद करणेस मान्यता मिळणेबाबतचा मा.आयुक्त यांचा प्रस्ताव सभा कामकाजात दाखल करुन घेणेबाबत मा.आयुक्त यांची मागणी मतास टाकणेत आली असता -

अनुकूल - ८१ प्रतिकूल – ०

अशी मते पडली व सदरचा विषय सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आला असल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

मा.ॲड.मोरेश्वर शेडगे – मा.महापौर साहेब, जम्मू-काश्मीरमधील श्रीनगर येथे अतिरेक्यांनी पोलिसांच्या बसवर मोठ्या प्रमाणात केलेल्या गोळीबारात २ पोलीस शहिद तसेच जनरल बिपीन रावत (व त्यांच्या पत्नी मधुलिका रावत) – भारताचे पहिले चीफ ऑफ डिफेन्स स्टॉफ (सीडीएस), एल.एस.लिड्डर –ब्रिगेडिअर, हरजिंदर सिंग - लेफ्टनंट कर्नल, गुरुसेवक सिंग- नायक, जितेंद्र कुमार- नायक, विवेक कुमार- लान्स नायक, साई तेजा -लान्स नायक, सत्यपाल- हवालदार, वरुणसिंह- ग्रुप कॅप्टन, पी.एस. चौहान- ग्रुप कॅप्टन, कुलदीप- स्क्वॉड्रन लीडर या लष्करी अधिकाऱ्यांचे हेलिकॉप्टर अपघातात निधन, चंद्रकांत जाधव -कोल्हापूर उत्तर मतदारसंघाचे कॉंग्रेसचे आमदार यांचे निधन, नरहरीअप्पा मार्जने -सांस्कृतिक पुरस्कार प्राप्त जेष्ठ किर्तनकार यांचे निधन, अशोक प्रतापराव गोडसे -श्रीमंत दगडुशेठ हलवाई गणपती ट्रस्टचे अध्यक्ष यांचे निधन, सुरेश जाधव -सिरम इन्स्टिटियूटचे कार्यकारी संचालक यांचे निधन, शिवाजी बळवंत कस्पटे – सामाजिक कार्यकर्ते यांचे निधन, ज्ञानेश्वर मल्हारी बारणे यांचे निधन झालेले असल्याने त्यांना श्रध्दांजली वाहणेत यावी व आजची सभा शुक्रवार दिनांक २४/१२/२०२१ रोजी दुपारी २.०० पर्यंत तहकुब करणेत यावी, अशी सूचना मी मांडतो.

मा. ज्ञानदेव थोरात – मा.महापौर साहेब, सूचनेस अनुमोदन देतो.

मा.महापौर - श्रध्दांजली अर्पण करण्यासाठी सर्वांनी दोन मिनीटे स्तब्ध उभे रहावे.

(सर्वांनी दोन मिनीटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण केली.)

मा.महापौर– सर्व सन्मा.सदस्यांच्या भावना विचारात घेता ही सभा शुक्रवार दि.२४/१२/२०२१ रोजी दुपारी २.०० पर्यंत तहकुब करण्यात येत आहे.

------

**(**उषा उर्फ माई मनोहर ढोरे**)**
**महापौर**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी -४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी- ४११ ०१८

मा.महापालिका सभा

कार्यपत्रिका क्रमांक –६५

सभावृत्तांत
(दि.१६/१२/२०२१ ची तहकूब सभा)

दिनांक – २४/१२/२०२१ वेळ –दुपारी २.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची दि.**१६/१२/२०२१** ची तहकूब मा.महापालिका सभा **शुक्रवार** दिनांक **२४/१२/२०२१** रोजी दुपारी २.०० वाजता महानगरपालिका प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात मा. उप सचिव महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग यांचेकडील पत्र क्र.कोरोना-२०२०/प्र.क्र.७६/नवि-१४ दि.२२ ऑक्टोबर २०२१ अन्वये आयोजित करणेत आलेली आहे. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१) मा.उषा उर्फ माई मनोहर ढोरे महापौर

२) मा.घुले नानी ऊर्फ हिराबाई गोवर्धन उपमहापौर

३) मा.कुंदन अंबादास गायकवाड

४) मा.स्वीनल कपिल म्हेत्रे

५) मा.साधना अंकुश मळेकर

६) मा.अश्विनी संतोष जाधव

७) मा.सारीका शिवाजी सस्ते

८) मा.राहुल गुलाब जाधव

९) मा.डोळस विकास हरिश्चंद्र

१०) मा.गायकवाड निर्मला मनोज

११) मा.गोफणे अनुराधा देविदास

१२) मा.बारसे प्रियांका प्रविण

१३) मा.अजित दामोदर गव्हाणे

१४) मा.लांडगे राजेंद्र किसनराव

१५) मा.संतोष (आण्णा) ज्ञानेश्वर लोंढे

१६) मा.प्रा.सोनाली दत्तात्रय गव्हाणे

१७) मा.फुगे भिमाबाई पोपट

१८) मा.ॲड.नितीन ज्ञानेश्वर लांडगे

१९) मा.सावळे सिमा रविंद्र

२०) मा.गीता सुशिल मंचरकर

२१) मा.राहुल हनुमंतराव भोसले

२२) मा.समीर मोरेश्वर मासुळकर

२३) मा.अनुराधा गणपत गोरखे

२४) मा.मंगला अशोक कदम

२५) मा.अश्विनी भिमा बोबडे

२६) मा.योगीता ज्ञानेश्वर नागरगोजे

२७) मा.एकनाथ रावसाहेब पवार

२८) मा.पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे

२९) मा.संगिता (नानी) प्रभाकर ताम्हाणे

३०) मा.पंकज दत्तात्रय भालेकर

३१) मा.घोलप कमल अनिल

३२) मा.उत्तम प्रकाश केंदळे

३३) मा.चिखले सचिन तुकाराम

३४) मा.यादव मीनल विशाल

३५) मा.वैशाली जालिंदर काळभोर

३६) मा.शैलजा अविनाश मोरे

३७) मा.बाबर शर्मिला राजू

३८) मा.अमित राजेंद्र गावडे

३९) मा.बाळासाहेब नामदेव ओव्हाळ

४०) मा.ढाके नामदेव जनार्दन

४१) मा.करुणा शेखर चिंचवडे

४२) मा.भोईर सुरेश शिवाजी

४३) मा.अपर्णा निलेश डोके

४४) मा.अश्विनी गजानन चिंचवडे-पाटील

४५) मा.गावडे राजेंद्र तानाजी

४६) मा.जयश्री वसंत गावडे

४७) मा.कोमल दिपक मेवानी

४८) मा.सुजाता सुनिल पालांडे

४९) मा.योगेश मंगलसेन बहल

५०) मा.कदम निकीता अर्जुन

५१) मा.संदीप बाळकृष्ण वाघेरे

५२) मा.नढे विनोद जयवंत

५३) मा.पाडाळे निता विलास

५४) मा.काळे उषा दिलीप

५५) मा.कोकणे संतोष अंकुश

५६) मा.पवार मनिषा प्रमोद

५७) मा.अभिषेक गोविंद बारणे

५८) मा.कैलास उर्फ बाबा भालचंद्र बारणे

५९) मा. ॲड.भोसले सचिन सुरेश

६०) मा.बारणे झामाबाई बाळासाहेब

६१) मा.वाघमारे अश्विनी विक्रम

६२) मा.दर्शले रेखा राजेश

६३) मा.कलाटे राहुल तानाजी

६४) मा.ममता विनायक गायकवाड

६५) मा.कामठे तुषार गजानन

६६) मा.चोंधे आरती सुरेश

६७) मा.कस्पटे संदिप अरुण

६८) मा.बाबासाहेब (बाबा) त्रिभुवन

६९) मा.सविता बाळकृष्ण खुळे

७०) मा.कुटे निर्मला संजय

७१) मा.आंगोळकर सागर सुनिल

७२) मा.कदम शशिकांत गणपत

७३) मा.बनसोडे राजू विश्वनाथ

७४) मा.काटे स्वाती (माई) चंद्रकांत

७५) मा.कांबळे अंबरनाथ चंद्रकांत

७६) मा.राजापुरे माधवी राजेंद्र

७७) मा.चौगुले सीमा दत्तात्रय

७८) मा.नवनाथ दत्तू जगताप

७९) मा.संतोष बबन कांबळे

८०) मा.सोनवणे शारदा हिरेन

८१) मा.थोरात ज्ञानदेव मुरलीधर

८२) मा.ॲड.मोरेश्वर ज्ञानेश्वर शेडगे

याशिवाय मा.राजेश पाटील-आयुक्त, मा.विकास ढाकणे-अतिरिक्त आयुक्त (१), मा.वाघ जितेंद्र- अतिरिक्त आयुक्त (२), मा.उल्हास जगताप-नगरसचिव तथा अतिरिक्त आयुक्त (३), मा.प्रमोद भोसले-मुख्य लेखापरिक्षक, मा.डॉ.रॉय- आरोग्य वैदयकीय अधिकारी, मा.कोळंबे- मुख्य लेखा व वित्त अधिकारी, मा.नाळे-उपसंचालक नगररचना, मा.इंगळे, मा.खोत, मा.मा.चारठाणकर, मा.झगडे, मा.इंदलकर, मा.दुरगुडे-उपआयुक्त, मा.निकम, मा.सवणे, मा.भालकर - सह शहर अभियंता, मा.बोदडे, मा.देशमुख, मा. खांडेकर, मा.शिंदे - सहाय्यक आयुक्त, मा.खाबडे, मा.गलबले, मा.नरोना-कार्यकारी अभियंता, मा.पाटील-प्राचार्य (आयटीआय) मा.वाबळे- अधिष्ठाता (वायसीएमएच), मा.गोफणे-सहाय्यक आरोग्य वैदयकीय अधिकारी व मा. गायकवाड - जनतासंपर्क अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

**मा.महापौर** – उपस्थित मा.नगरसेवक, मा.नगरसेविका, ऑनलाईन उपस्थित असलेले सर्व सदस्य, मा.आयुक्त, अधिकारी वर्ग, पत्रकार, नागरिक या सर्वांचे स्वागत करुन सभा कामकाजाला सुरुवात करणेत येत आहे.

मा.नामदेव ढाके – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त, सन्मा.सभागृह आपले शहरात विशेष उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींचा सन्मान करण्यात यावा अशी मी सूचना मांडतो.

(मा.महापौर, मा.उपमहापौर, मा.सत्तारूढ पक्षनेते, मा. विरोधी पक्षनेते, मा.गटनेते, मा.सर्व पदाधिकारी व सन्मा.सदस्य यांचे हस्ते कु.अकांक्षा धनावडे, कु.प्रगती गायकवाड, कु.पुनम महाराना यांचा विशेष कार्याबद्दल सन्मान करण्यात आला).

**मा.मीनल यादव –** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब सन्मा.सभागृह, कालच महाविकास आघाडीतर्फे शक्ती कायदा विधेयक जो मंजूर केलेला आहे. त्या कायद्यामुळे निश्चश्चितच महिलांवर जे अत्याचार होत आहेत त्या अत्याचारावर कडक कारवाई होण्यास या कायद्यामुळे नक्कीच फरक पडेल. त्यामुळे मी विनंती करते की सभागृहाचे वतीने अभिनंदन ठराव करण्यात यावा.

**मा.वैशाली काळभोर-** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब सन्मा.सभागृह, माई, आपल्या सभागृहात आपण कायमच महिलांवरील अत्याचारा बाबतीत आपण आवाज उठवला आणि महाविकास आघडीच जेव्हा सरकार स्थापन झाल आणि आदरणीय अशोक चव्हाण सार्वजनिक बांधकाम मंत्री यांच्या अध्यक्षतेखाली एक उपसमिती नेमण्यात आली आणि या समितीमध्ये

आदरणीय अनिल देशमुखजी, आदरणीय एकनाथ शिंदेजी, आरदणीय रणजीत पाटील, आदरणीय यशोमती ठाकूर अणि वर्षा गायकवाड या मंत्र्यांचा समवेश होता. अंध्रप्रदेशातील दिशा कायद्याचा अभ्यास करून हा विधेयक तयार करण्यात आला आणि हे विधेयक आपल्या विधानसभेत मंजूर झाल, आजच लवकरच ते विधानपरिषदेमध्ये मंजूर होईल. मी महाविकास आघाडीच आपल्या सर्वांतर्फे आपल्या राष्ट्रवादी महिला काँग्रेसच्या वतीने अभिनंदन करते आणि मिनलताईने जो ठराव मांडला त्यास अनुमोदन देते व थांबते, धन्यवाद.

**मा.सिमा सावळे-** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब सन्मा. सभागृह. कालच शक्ती कायद्यासाठी विधीमंळाचे अधिवेशनात मंजूरी मिळाली आणि निश्चीतचपणे मला असे वाटते की आम्हा सगळ्या महिला भगीनींच्या लढण्याची जी ताकद होती त्याला कायद्याच सुध्दा पाठबळ मिळालेले आहे आणि त्यामुळे त्या कायद्यात झालेल्या दूरूस्त्या आणि शिक्षेची जी तरतूद केलेली आहे त्याच निश्चीतपणे स्वागत झालं पाहिजे. आणि ते स्वागत जस सत्ताधारी पक्षाच झाल पाहिजे त्यावेळेस त्याठिकाणी असणाऱ्या विरोधी पक्षात जो असेल त्याच देखील झाल पाहिजे कारण की त्या सगळयांच्या मंजूरीनेच आजचा हा कायदा विधानपरिषदे मध्ये मंजूर होणार आहे आणि निश्चीतपणे मला अस वाटत जो या राज्यात राहतो, जो या देशामध्ये राहतो आणि ज्याच्यावरती संस्कार चांगले आहेत असा कुठलाही व्यक्ती त्या कायद्यामध्ये आलेल्या ज्या काही सूचना आहेत, अंमलबजावणी आहे म्हणजे की ॲसीड हाल्ला झाला असेल तर किती महिन्यामध्ये शिक्षा झाली पाहिजे, जवळच्या नातेवाइकांनी जर का अत्याचार केला असेल तर किती लवकर त्याच्यावरती फास्ट्रॅक कोर्टामध्ये केस चालवणार, त्यावरती शिक्षा झालीच पाहिजे. Rarest of rare केस मध्ये फाशीची शिक्षा कशी झाली पाहिजे. एखाद्या मूलीवरती जर शारीरीक अत्याचार झाले असतील तर असे अनेक जे कायद्यामध्ये बदल केलेले आहेत, निश्चीतपणे खूप स्वागतार्ह आहे आणि त्याच बरोबर एक स्त्री शक्तीला बळकटी देणार आहे आणि म्हणून त्या विधेयकामध्ये अनेक तरतुदी केलेल्या आहेत, सूचना दिलेल्या आहेत. निश्चितपणे त्याची मंजूरी आज मिळेलच आणि जे अत्याचार आपण दररोज पेपर उघडल्यानंतर जे काही वृत्तपत्रांमध्ये वाचतो त्यावर त्याला कुठेतरी आळा घालण्याचे काम यामध्ये होणार आहे. म्हणजे ओळखीच्या व्यक्तीने बलात्कार केल्यास जन्मठेप किंवा मरेपर्यंत जन्मठेप आणि दंडाची तरतूद यामध्ये सुचविलेली आहे आणि अतिशय क्रुर अत्याचार जर झाला असेल तर मृत्यूदंडाची शिक्षा सुनवली आहे. वय वर्षे १६ पेक्षा कमी असलेल्या मुलीवर अत्याचार झाला तर मरेपर्यंत जन्मठेप सुचविलेली आहे. सामुहिक बलात्कारासाठी २० वर्षे कठोर जन्मठेप, शिक्षेची तरतूद किंवा मरेपर्यंत जन्मठेप, १० लाख रु. दंड अशी या मध्ये तरतूद आहे. १६ वर्षा खालील मूलीवर सामुहिक अत्याचार झाला असेल त्या प्रकरणी कठोर जन्मठेप किंवा मरेपर्यंत जन्मठेप, १० लाख रु.दंड ही एक सूचना, या कायद्यामध्ये नवीन बदल झालेला आहे. १२ वर्षाखालील मूलीवर अत्याचार झाला असेल तर मरेपर्यंत कठोर जन्मठेप. पून्हा पुन्हा महिला अत्याचार करणारे गुन्हेगारास मरेपर्यंत कठोर जन्मठेप किंवा शिक्षा. मी तर म्हणेल की अशा लोकांना परत एकदा-दोनदा घडल असेल आणि दुसऱ्यांदा जर घडल असेल तर त्याला डायरेक्ट चौकामध्ये फाशी द्यावी अशी काहीतरी तरतूद निश्चितपणे आज विधानपरिषदेमध्ये झाली पाहिजे तसा तो कायदा पण झाला पाहिजे. ॲसीड अटॅक प्रकरणी ॲसीड अटॅक केल्यास किमान १० वर्षाची किंवा मरेपर्यंत जन्मठेप शिक्षा पीडीत व्यक्तीला दंड रक्कम द्यावी लागणार. ॲसीड फेकण्याचा प्रयत्न केल्यास १० ते १४ वर्षापर्यंतचा तुरुंगवासाची तरतूद या मध्ये केलेली आहे. ॲसीड हल्ला हा अजामीनपात्र गुन्हा केलेला आहे. महिलांचा कोणत्याही पध्दतीने छळ केल्यास

किमान दोन वर्षे तुरुंगवास आणि एक लाख रु.दंड याची सुध्दा तरतूद केलेली आहे. सोशल मिडीया, मेल, मेसेज, इलेक्ट्रॉनिक मिडीया माध्यमातून महिलांवरती कमेंट करणे, धमकी देणे, चुकीची माहिती पसरविणे, अश्लील मेसेज देणे किंवा तीला ब्लॅकमेलींग करणे यासाठी सुध्दा कठोरातील कठोर शिक्षा आजच्या या नवीन कायद्यानुसार आपल्याकडे अंमलात येत आहे. आज निश्चिपणे महिला म्हणून या देशाची मूलगी म्हणून मी या कायद्याच मनापासून स्वागत करते, आणि या सभागृहाने सुध्दा या कायद्याच जोरदार समर्थन केल पाहिजे, आणि याला पाठींबा दिला पाहिजे. कारण की हा तुमच्या माझ्या कुठल्याही पक्षाचा विषय नाही तर हा महिला वर्गाचा आहे, समस्त संस्कृतीचा हा एक होणारा विजय आहे. संस्कृतीला बळकटी देणार आहे. मला असे वाटते कायद्यामध्ये कठोरातील कठोर शिक्षा जोपर्यंत असे करणाऱ्या गुन्हेगाराला होत नाही, त्याची अंमलबजावणी जोपर्यंत होणार नाही, तो पर्यंत अशा गुन्ह्याचे प्रमाण कमी होणार नाही. निर्भयानंतर आपण फास्ट्रॅक कोर्ट आणलं आणि त्यामध्ये निर्भयाची ज्या प्रकारे अत्याचार करून तीची हत्या झाली होती त्यानंतर खर तर संपुर्ण समाज खडबडून जागा झाला होता. त्यामध्ये स्त्रीयाच नाही तर पुरूषांनी देखील खांद्याला खांदा लावून ही लढाई लढलेली आहे. म्हणून समाजामध्ये पॉइंट पॉईंट वन परसेंट असे जे नालायक माणस असतात त्यांचा विरोधातला हा कायदा आहे. त्यामुळे या ठिकाणी जेंडरींग न करता सर्व पुरूष वर्गानी महिला वर्गानी समस्त देशवासीयांनी या कायद्याच या ठिकाणी स्वागत करणे अत्यंत गरजेच आहे. नव्हेतर त्याला पाठींबा दिला पाहिजे आणि अशा या कायद्याच्या संदर्भात ताबडतोब हा कायदा अंमलबजावणीला आल्यास निश्चिपणे आपणाला सर्वांना बळकटी मिळणार आहे. त्यासाठी माजी मुख्यमंत्री असतील, मा.वळसे पाटील असतील मा. अजितदादा पवार असतील मा.निलमताई गोऱ्हे असतील, विरोधी पक्षनेते मा.देवेंद्रजी फडणवीस असतील, मा.यशोमती ठाकूर ताई असतील या सर्वांच मी या ठिकाणी मनापासून अभिनंदन करते आणि माई आपणसुध्दा कुठलाही पक्षभेद न करता निश्चितपणे महिलांसाठी जो आता नवीन कायदा अस्तित्वात आलेला आहे यासाठी खुल्या दिलाने आणि एकमताने या कायद्याच्या अंमलबजावणीला आणि नवीन कायदा केला म्हणून आपण निश्चितपणे अभिनंदन केल पाहिजे, धन्यवाद माई.

**मा.वैशाली घोडेकर-** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब सन्मा.सभागृह. आज या ठिकाणी खरच महिलांसाठी एक सर्वात आनंदाची अशी एक ही गोष्ट घडलेली आहे. आपण जे इतक्या दिवससाची वाट बघत होतो, ते शक्ती विधेयक या ठिकाणी मंजूर झालेल आहे. या निमीत्ताने मी या राज्याचे मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री यांचे या सर्व महिलांच्या वतीने अभिनंदन करते आणि या विधेयकाच मनापासून स्वागत करते. हे स्वागत सर्व पक्षपात विसरून सगळयांनीच केल पाहिजे कारण बऱ्याच दिवसापासून माई आपण या विधेयकाची वाट बघत होतो. कारण महिलांना कुठेतरी न्याय मिळाला पाहिजे, महिलांना होणाऱ्या अत्याचारावर कुठेतरी आळा बसला पाहिजे याच्यासाठी हे विधेयक आहे आणि या राज्यसरकारच मी मनापासून अभिनंदन करते. आदरनीय अजितदादा असतील, आदरनीय मुख्यमंत्री उध्दवजी ठाकरे असतील या दोघांचही मी मनापासून अभिनंदन करते, आणि आज खऱ्या अर्थान पिंपरी चिंचवडमधील असतील महाराष्ट्रातील असतील महीलांना न्याय मिळाला हे मी या ठिकाणी मानते आणि आज ख-या अर्थाने महिलांवर होणाऱ्या अत्याचाराला कुठेतरी आळा बसेल यासाठी या राज्य सरकारने पहिलं पाऊल उचललं आहे. आता हा कायदा लवकरात लवकर अंमलात आला पाहिजे आणि माई आपल्या सर्वांच हे कर्तव्य आहे की त्या कायद्याच्या आधारे पिंपरी चिंचवडमध्ये

देखील महिलांवर होणारा अत्याचार आपण कसा कमी करू शकतो, कसा आळा बसवू शकतो या कायद्याचा आधार घेऊन आपण त्या ठिकाणी सगळ लक्ष दिलं पाहिजे. जास्त वेळ न घेता मी पुन्हा एकदा राज्य सरकारच अभिनंदन करते व या कायद्याच मनापासून स्वागत करते, धन्यवाद.

**मा.एकनाथ पवार-** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब सन्मा.सभागृह. खरंतर कालचा कायदा जो झाला आम्ही खुल्या मनाने या कायद्याच स्वागत करतो. आम्ही कधी पक्षभेद या सभागृहामध्ये बघीतला नाही. परंतु मागच्याच आठवडयामध्ये केंद्र शासनाने सुध्दा महीलांच्या बद्दल मुलीच्या बद्दल एक चांगल्या पध्दतीचा निर्णय केला. मला कधी कधी आस वाटत की माणसाने कधीकधी छोटया मनासारख नसावे. म्हणजे राज्य शासनाने शक्ती कायदा विधीमंडळामध्ये संमत केला विधानपरिषदेमध्ये आज होईल. म्हणजे आजूनही तो संमत व्हायचा किंवा नाही व्हायचा ही परिस्थिती नाही विधीमंडळा मध्ये त्याच मतदान होईल परंतु केंद्र शासनाने मुलीच्या लग्नाच्या संदर्भामध्ये २१ वर्षाची जी मर्यादा घालून दिली खरंतर माझ्या भगीनीना याचही कौतूक करता आल पाहिजे. एकीकडे राज्य शासनाच कौतूक करायच आणि सगळयांनी त्याला पाठींबा द्यायचा अशा प्रकारची भूमिका घेता. आदरनीय नदेंद्रभाई मोदीच्या नेतृत्वामध्ये महीलांच्यासाठी अनेक कायदे चांगल्या पध्दतीचे झाले. कालच तर सगळया पक्षांनी त्याच कौतूकच, केल अभिनंदन केल की मुलीच वय २१ वर्षापर्यंत लग्नाच आसल पाहिजे. आणि ज्या वेळेस आपण सभागृहामध्ये एखादी भूमिका घेतो, त्यावेळेस आम्हाला तर ताठ मानने म्हटल पाहिजे की चला भारतीय जनता पार्टीच्या सरकारने सुध्दा महिलांच्या बद्दलचा एक चांगला मोठा निर्णय केला. खरंतर महिलांच्या सुरक्षिततेच्या संदर्भामध्ये या सभागृहामध्ये अनेक वेळा चर्चा झालेली आहे, आणि सगळयांनी सभागृहामध्ये खरंतर निर्भयाचा विषय असेल आणखी एखादा विषय सभागृहामध्ये चर्चेला आला असेल मला आस वाटतं की त्या मुलींच्या बद्दलचा महिले बद्दलचा अत्याचाराच्या विरोधामध्ये हे सभागृह एकमताने त्याच्या पाठीशी उभं राहीलेल आहे. माझी सभागृहाला मा.महापौर साहेब विनंती आहे, म्हणजे ज्या वेळेस मिनलताई बोलल्या, वैशालीताई बोलल्या माझ्या दोन्ही बहिणी आहेत. त्यांनी थोडंस नरेंदभाई मोदींनी जो मागच्या आठवड्यात एवढ विसरू नका मागच्याच आठवड्यात निर्णय केलेला आहे. मी खरतर एखाद्या सरकारच विधीमंडळामध्ये आमच्याही पक्षाचे नेते आहेत, कदाचित सगळयात जास्त आमदार हे माझ्या पक्षाचे आमदार आहेत आणि खरतर त्याच सभागृहामध्ये एखादा विषय येत असतांना मला अस वाटतय की भारतीय जनता पार्टी निश्चितच शक्ती कायद्याच्या बाजून १०० टक्के अनुकूल होती आणि या सभगृहामध्ये आम्ही तसच करू. ज्या पध्दतीन तुम्ही राज्य शासनाच कौतूक करता मा.महापौर साहेब मी विनंती करू इच्छितो मा.नरेंद्रभाई मोदींच्या सरकारने खूप मोठा निर्णय घेतलेला आहे व तो देशभरामध्ये घेतलेला आहे. याही निर्णयाचे आपण ताठ मानाने आणि मोकळया मनाने आपण स्वागत केलं पाहिजे. त्याचं अभिनंदनही केल पाहिजे, आणि महिलांच्या संदर्भामध्ये जे जे निर्णय होतील मग केंद्र शासनाच्या माध्यमातून असतील किंवा राज्य शासनाच्या माध्यमातून असतील. जे निर्णय केले त्याच समर्थपणे आपण सगळयांनी त्याला पाठींबा दिला पाहिजे त्याचं समर्थन केल पाहिजे. मा.महापौर साहेब ज्या वेळेस राज्य शासनाचा विषय येतो त्यावेळेस केंद्र शासनाचाही सरळ मनाने व ताठ मानेन आपण या ठिकाणी अभिनंदनाचा ठराव आपण मांडत असतांना त्याचाही समावेश करावा एवढी विनंती करतो आणि थांबतो, धन्यवाद.

मा.सुजाता पालांडे - मा.महापौर साहेब, आताच एकनाथजी पवार यांनी जो ठराव मांडला त्याला मी अनुमोदन देते.

**मा.योगेश बहल-** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब सन्मा.सभागृह. जगाच्या पाठीवर खरं पाहता आपल्या राज्यघटनेच आपण नेहमीच कौतुक करतो, आणि मातेच म्हणजे आई असेल, स्त्री असेल, पत्नी असेल, भगीनी असेल, कन्या असले, मुलगी असेल, याबद्दलची संस्कृती आपल्या देशाची वेगळीच आहे. परंतु ज्या वेळेला त्या भगिनीवर, मुलीवर अत्याचार होतो आणि अशा घटना आपण वर्तमान पत्रामध्ये वाचतो, त्यावेळेला खरच मनाला वेदना होतात, आणि आपण त्या वेळेला असं म्हणतो की खरच कायद्यामध्ये बदल व्हायला पाहिजे होतं, अशा प्रकारची सगळयांचीच इच्छा होती. त्या अनुषंगाने राज्य शासनाने जो निर्णय घेतला तो खरंच कौतुकास पात्र आहे आणि एकनाथरावांनी जो आत्ता उल्लेख केला की मोदीजींच्या सरकारने सुद्धा 21 वर्षाची मुलीच्या वयाची अट जी टाकलेली आहे ती सुध्दा अभिनंदनास पात्र आहे. वास्तविक पाहता सबंध जगामध्ये आपल्या देशाची संस्कृती आणि त्या संस्कृती विषयीची चर्चा ही सबंध जगामध्ये होत असते आणि म्हणून विशेष आज आम्ही जरी पुरुष असलोतरी आम्हांला हे दोन्ही कायदे २१ वर्षाच्या वयाच्या अटीचा असेल आणि महीलांच्या सुरक्षीततेचा असेल त्याबाबत आघाडी सरकारने जो निर्णय घेतला त्यामध्ये आपला सर्व सन्माननीय आमदार, मंत्री महोदय असतील त्यांच्या या ठिकाणी अभिनंदन करतो, धन्यवाद.

**मा.उषा मुंढे-** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब सन्मा.सभागृह. महिलांसाठी जो कायदा मंजूर झाला त्या कायद्याच मी सर्व महिलांच्या वतीने अभिनंदन करते. परंतु महिलांविषयी चांगला कायदा होत असताना आमच्या शहराच्या प्रथम नागरिक महापौरांवर जे काही आरोप करण्यात आले त्या आरोपाचा मी महीला म्हणून आणि शहराच्या प्रथम नागरिक महापौरांवर जे त्यांनी आरोप केले त्या शब्दाचा मी निषेध करते एवढं बोलुन मी थांबते.

**मा.नामदेव ढाके-** मा मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब सन्मा.सभागृह. काल या राज्यामध्ये स्त्री शक्तीचा कायदा या संदर्भामध्ये जे विधेयक कायद्याचं त्याठिकाणी सभागृहामध्ये मांडलं आणि गेल्या अनेक विशेष करून या दोन वर्षांमध्ये आम्ही सातत्याने ज्या ज्या वेळेला महिलांवर अत्याचार झाले त्यावेळेस या सभागृहांमध्ये महिलांच्यावरती होणाऱ्या अत्याचाराच्या बद्दल या ठिकाणी संपुर्ण सभागृहाची महाचर्चा झाली. सन्मा.महापौर आपल्याला माहिती असेल की आपल्या नेतृत्वामध्ये आपण सर्वजण आपल्या शहरामध्ये कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न ज्या वेळेस विशेष करुन महीलांच्यासाठी आला आणि आपण त्या संदर्भामध्ये आयुक्तांना सुद्धा अशा प्रवृत्ती ज्या महिलांकडे वेगळया नजरेने बघतात, वाईट नजरेने बघणार किंवा वाईट कृत्य करतील आशांवर धाक बसला पाहिजे अशा प्रकारची मागणी ज्यावेळेला सभागृहामध्ये केली आणि आपण आयुक्तांकडे सुद्धा गेलो आणि सातत्याने ही आमची याठिकाणी भूमिका राहिलेली आहे खर म्हणजे या विधिमंडळामध्ये ज्यावेळेला स्त्री शक्तीच्या संदर्भामध्ये सीमाताईने सांगितले की कशा पद्धतीचे कायदे याठिकाणी अमलात येणार आहेत आणि कारवाई कुठली त्या ठिकाणी होणार त्याबद्दल ताईनी याठिकाणी सांगितलं परंतु काल या संदर्भामध्ये आम्ही कुठल्याही प्रकारच हे न करता राज्याचे विरोधी पक्षनेते देवेंद्रजी फडणवीस साहेबांनी सुध्दा याठिकाणी जो काही कायदा अमलात आलेला आहे त्याच याठिकाणी कौतूक केलेल आहे. आज तो विधान परिषदेमध्ये सुध्दा त्याच्या संदर्भात चर्चा होणार आहे. एका बाजूला या राज्यांमध्ये असणाऱ्या

महिलांचे वरती होणाऱ्या अत्याचारांच्या संदर्भामध्ये जो कायदा येतो त्या संदर्भामध्ये आपण समर्थन करतोय आणि मगाशी याठिकाणी एकनाथरावांनी सांगितले की संकुचित दृष्टी आपली असू नये कारण ज्यावेळेला देशांमध्ये सुद्धा आपण सगळयांनी बघितलं राज्यामध्ये सुद्धा मुलीचं लग्नांच वय 18 ऐवजी 21 वय करण्यात आलेल आहे आणि हे करण्यामागे त्याने सांगितलं की हे का परिस्थिती बदलत चालली आहे का आपण करतो ती मुलगी १८ वर्षाची आजची काय परिस्थिती आहे ती बदल चाललेली आहे काळ बदल चाललेला आहे. इंटरनेट किंवा सोशल मीडिया माध्यमातून महीलांना सुद्धा त्यामध्ये प्रौढता आताच्या याच्यामध्ये कशा पध्दतीने नाही येत लग्न झाल्यानंतर १८ च्या नंतर तातडीने ते लग्न कसे घटस्पोट होतात अशा वेगवेगळया कारणांनी त्या ठिकाणी खरं म्हणजे आपल्या देशाच्या नेतृत्वानी बारीक बारीक या ठिकाणी संपूर्ण देशामध्ये राज्यामध्ये परिस्थिती लक्षात घेता त्याठिकाणी देशामध्ये प्रत्येक राज्यामध्ये मुलीचे वय २१ वर्ष असलं पाहिजे अशा प्रकारचे विधेयक या ठिकाणी लोकसभेमध्ये मंजूर केला आहे, आणि मला वाटतं हा सुद्धा महिलांचा सन्मान करण्याच्या संदर्भामध्ये हा कायदा लोकसभेमध्ये आदरणीय नरेंद्रभाई मोदी यांचे माध्यमातून या ठिकाणी केला गेलेला आहे. आणि म्हणून नेहमीच महिलांच्या बद्दल या ठिकाणी केंद्राच नेतृत्व आसेल या ठिकाणी राज्याच नेतृत्व आसेल आम्ही तर म्हटल की केंद्राच्या माध्यमातून महिला ज्या आहेत त्यांच लग्नाच वय २१ झाल पाहिजे, या राज्यामध्ये कायदा सुव्यवस्था विशेष करून महिलांच्या वरती होणारे अत्याचाराची मालिका या राज्यमध्ये दररोज वृत्तपत्र उघडल्यानंतर खरं म्हणजे येत होती, मी या बद्दल राजकीय कुठलीही टिका टिपणी करणार नाही. परंतु आमची मागणी आमच्या आंदोलन महिला आघाडीचे आंदलेन आसतील, आमचे आंदोलन हे सातत्यान या संदर्भामध्ये होते की, कायदा हा कडक झाला पाहिजे. कायदा कडक होत असतांना त्याची अंमलबजावणी झाली पाहिजे, अशा प्रकारची मागणी सातत्याने आमची या ठिकाणी भारतीय जनता पार्टी म्हणून राहिलेली आहे. मा.महापौर आणि म्हणून कुठलाही संकोच न करता या ठिकाणी खर म्हणजे केंद्र सरकारच्या माध्यमामधून मूलीच्या लग्नाचा वय २१ वर्षे पर्यंत करायचा विषय असेल किंवा राज्याच्या सरकारच्या माध्यमातून या ठिकाणी स्त्री शक्तीच्या कायद्यात कठोर कारवाई करण्याचे पाऊल उचलण्याचा निर्णय असेल हा खरं म्हणजे स्वागतार्ह आहे. त्यामूळे या सभागृहामध्ये मा.महापौर केंद्राच्या बरोबरीनं राज्यांमध्ये महीलांच्यासाठी याठिकाणी जो काही कायदा येतोय, स्त्री शक्तीचा कायदा महिलांसाठी येतोय त्या संदर्भामध्ये या सभेमध्ये आपण त्यांच अभिनंदन केलंच पाहिजे परंतु आपण एकाच बाजूला आमच्या ताईनी सांगितल की या महानगरपालिकेमध्ये आपल्या महिला महापौर आहेत, आणि महिला महापौराच्या संदर्भामध्ये आमच्या ताईंनी सांगितल मी त्याच्यावरती चर्चा करणार नाही. परंतु आपणही त्या ठिकाणी कुठंतरी महिलेचा आदर महिलेनी केला पाहिजे. अशा प्रकारची भूमिका महिला असतांना ज्या प्रथम नागरीक आहेत, आणि मातृतूल्य आमच्या महिला महापौर आहेत त्यांचा अवमान करणं एका अर्थान पिंपरी चिंचवड शहराच अपमान केल्या सारखं आहे म्हणून कुठंतरी आपण बोलायला येतंय म्हणून काहीही बोलत बसण्यापेक्षा वास्तविक विषयावरती बोललं गेल पाहिजे. मी त्या संदर्भामध्ये कुठल्याही व्यक्तीच नाव घेत नाही. परंतु महापौरांचा अवमान म्हणजे शहराचा अवमान होतो. आमच्या ताईनं सांगितल त्याचा मात्र मी या ठिकाणी निषेध करतो आणि दोन्ही लोकसभेमधील विधेयक असेल किंवा राज्य शासनाच्या शासनाच्या माध्यमातून स्त्री शक्तीच्या संदर्भामध्ये जे काही विधेयक केल आहे, आपण या ठिकाणी अभिनंदनाचा ठराव केलेला आहे. आपण तो संमत करावा, धन्यवाद.

**मा.महापौर-** सन्मा.पदाधिकारी, सन्मा.नगरसेवक सर्वाच स्वागत केलेल आहे आता या ठिकाणी महिलांच्या संरक्षणाकरता मुंबई येथे विधान सभेमध्ये महिलांच्या संरक्षणाकरता सर्व पक्षीय सदस्यांनी जे काही संरक्षणाकरता कायदे केले आहेत, त्याच सभागृहाचे वतीने मन:पूर्वक अभिनंदन करते. त्याच बरोबर केंद्र शासनाने मुलीचे वय १८ ऐवजी २१ वर्ष असाव हा देखील एक सुवर्ण वर्ष मुलीला एक देण्यात आलेल आहे, त्यामुळे लग्नाच वय झाल्यानंतर लग्न करण्यात याव हाही एक चांगला निर्णय केंद्र शासनाने घेतलेला आहे, म्हणून मी पंतप्रधान नरेंद्रजी मोदी साहेबांच खूप-खूप अभिनंदन करते आणि हा जो कायदा मुंबई येथे विधानभवनात झाला त्याबद्दल सर्वपक्षीय सर्व नेत्यांचे मनपूर्वक अभिनंदन करते, शहराच्या वतीने आपल्या सर्वांच्या वतीने.

मा.तुषार कामठे - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. आज आपल्यापुढे बोलताना थोडा आनंदही होतो आणि थोड दु:खही होत. आज आपण पाच वर्षाचा कालावधी सोबत घालवला आहे. काहीचे मतभेद झाले काही मनभेद झाले असतील पण प्रत्येकजण इथ आलेल्या नगरसदस्यांनी आपल्या प्रभागात कशी काम होतील यासाठी कायम इथ भांडले गेले असतील, वाद घातला असेल पण तो जनतेसाठी घातलेला आहे, वैयक्तिक कोणाच काम नव्हतं, कोणी वैयक्तिकसाठी वाद घातलेला नाही. आज या पाच वर्षामध्ये माई आमची ही पहीली टर्म होती इथ अनुभवी लोक खुप आहेत. पाच वर्षामध्ये फक्त साडेतीन वर्षाचा कालावधी आपल्याला भेटला त्याच्यामध्ये खुप विकास काम आपण केली. आता विकास काम केली असं म्हणण योग्य होणार नाही, विकास कामापेक्षा आपल जे कर्तव्य होत ते आपण पार पाडलेल आहे. ज्या ज्या आपल्या प्रभागात अडचणी होत्या त्या सोडवण्याच प्रामाणिक काम इथ तुम्ही, आम्ही प्रत्येकानी केलेल आहे. तशी ही पाच वर्ष माझ्यासाठी फक्त संघर्षाची झालेली आहेत. हा संघर्ष मी एकटयानी केला काहीनी साथ दिली, काहीनी पाठींबा दिला माझा कोणावर रोष नाही प्रत्येकानी ज्याच्या त्याच्या पध्दतीने मला पाठींबाही दिला मला मदतही केलेली आहे. मी प्रत्येक सदस्यांचे मनापासून अभिनंदन व आभार मानतो. आज जेव्हा भाजपची उमेदवारी आम्ही घेतली तेव्हा भ्रष्टाचारमुक्त या मुद्दयावर आपण इलेक्शन लढली व ती जिंकलीही आणि या महापालिकेत आपण सत्तेतही आलो. त्याच पध्दतीने पारदर्शक कारभार कसा व्हायला पाहीजे याच उदाहरणही मी आपल्याला नेहमी देत आहे व अंमलातही आणल आहे त्याचा मला मनस्वी आनंद होत आहे. जेव्हा जेव्हा भ्रष्टाचाराचे प्रकरण पुढे आले तेव्हा तेव्हा मी न भिता, न डगमगता इथ आवाज उठविला व तो मांडला सुध्दा. आज एकच दु:ख आहे पाच वर्ष मी ज्या विषयामध्ये भांडत आलो, ज्याच्यामध्ये मी संघर्ष केला आहे मी स्वपक्षीय केला विरोधी पक्षासाठीही केलेला आहे हा संघर्ष एका व्यक्तीसाठी नव्हता किंवा काय माझ्या सामान्य जनतेचा जो टॅक्समधुन पैसा येतो त्याची बचत व्हावी हा माझा स्पष्ट हेतू होता व येथून पुढेही माझा तसाच हेतू असणार आहे. आज आयुक्त साहेब व ढाकणे साहेब आपल्या दोघांचही अभिनंदन. आपण आल्यापासून चांगली शिस्त आमच्या महापालिकेला लावली, प्रशासनाला लावली असं आम्ही समजतो आणि तुम्हीही समजता पण तस काही नाही. आज तुम्ही दोघांनीही चांगल काम केल आहे पण तुमच्या खालची जी टिम आहे जे आपण म्हणतो की तुमच ऐकूण फॉलोअप घेते पण ती लोक तुमचीही दिशाभूल करतात याच जीवंत उदाहरण मी तुम्हांला आता सांगणार आहे. आज जाता जाता पुन्हा एकदा झालेला भ्रष्टाचार दाखवायचा आहे आणि मी फक्त आरोप करत नाहीतर त्याचेही पुरावे आणलेले आहेत तेही देत आहे. आयुक्त साहेब आज आपण दक्षता समिती नेमली, खाली आजून आपण काही काही कमिटी नेमता ज्या

निवीदा येतील त्याची तपासणी केली पाहीजे, त्याची चौकशी केली पाहीजे, त्याच्या कागदाची पुर्तता केली पाहीजे हे आपण लोक सांगत असता आम्ही तुमच्याएवढे शिकलेलो नाहीत किंवा अनुभवीही नाही पण जे आम्हांला समजत ते आपल्या अधिका-यांच्या का लक्षात येत नाही ही एक मोठी शोकांतीका आहे, का कोणाच्या दबावाखाली आपले अधिकारी काम करतात तेही समजत नाही. आज माई आपल्याला सांगायला खेद वाटतो की ५५ कोटीचा भ्रष्टाचार या महापालिकेमध्ये केला गेलेला आहे आणि त्याचे पुरावे माझ्या सोबत आहेत ते मी तुमच्याकडेही देतो आणि एक आयुक्त साहेबांनाही देतो. ही ओरीजनल कॉफी आहे आणि बाकीचे डॉक्यूमेंट जोडलेले आहेत. आज अ आणि ब प्रभागामध्ये रस्ते, गटर साफसफाईचे काम होत ते ५५ कोटीच काम होत त्याच्यामध्ये कागदपत्र जोडले गेलेत त्याची पाहणी आपण लोकांनी केलेली आहे. त्याची नस्ती मी मागवली त्याच्यामध्ये १०२ नंबरच पान व १०६ नंबरच पान बघा आज इंदापुर नगरपरिषद यांनी जो डेटा मायना दिलेला आहे त्याच्यावर मुख्याधिका-यांची जी सही आहे ती २०१९ मधील तीच सही २०२१ ला आरोग्य निरीक्षक म्हणून त्यांचीच सही आज दिलेली आहे. म्हणजे मुख्याधिकारी आणि आरोग्य निरीक्षक यांच्यामध्ये काही बदल आहे का नाही हे आपण मला सांगावे. काल मी स्वत: तीथ जावून तीन तास त्याची माहीती घेतली. तीथ जे बाबूसे म्हणून आरोग्य निरीक्षक आता कामाला आहेत त्यांची ती सही नसून २०१९ ला जे जवस साहेब म्हणून मुख्याधिकारी होते त्यांची सही कॉफी पेस्ट केलेली आहे त्याचा जो डेटा आहे तो तुम्हीही पाहू शकता तुमचा जो जी-मेल आयडी किंवा काही तुम्ही जे देता, आपल्या महापालिकेकडून आपण देतो कुठल्याही स्थानिक स्वराज्य संस्थेचा असेल त्याचा इन्डीज्यूअल हा ई-मेल आयडी नसतो तो gov.in अशा पध्दतीने असतो किंवा नगरपरिषद असतात त्याला www.org अशा पध्दतीने असतात. पण जे डॉक्युमेंट त्यांनी जोडले ते ई-मेलच्या नावाने केले आणि त्यामधल जी-मेलच स्पेलींग सुध्दा त्यांना लिहीता आल नाही. Gemil असं जी मेलच स्पेलींग त्यांनी लिहीलेल आहे काही इंग्लीशमध्ये लिहील काही मराठीत लिहीलेत. हे डॉक्युमेंटस आपले लोक तपासत नाहीत का. अशा पध्दतीने काम आपले प्रशासन करत असेलतर महापालिकेमध्ये आमच्यासारख्यानी कोणावर विश्वास ठेवून इथ यायच. त्याच पध्दतीने अजून एक या लोकांनी यामध्ये हुशारी केलेली आहे. तुळजापुर जि. उस्मानाबाद तीथलेही डॉक्युमेंट जोडलेले आहेत. एकाही डॉक्यूमेंटसला सही केलेली नाही. नवीन एखादा ठेकेदार आला की त्याच्या मागे आम्ही १२८ जण लागतो. जे स्थानिक ठेकेदार आहेत त्यांच्याकडे दुर्लक्ष केल जातं. त्यांनी काहीही डॉक्यूमेंट दिले की ते आपण सांमावून घेतो त्यांना काम दिले जातात. एवढ आमच्या सारख्या लोकांच्या लक्षात येतं मग आपल्या लक्षात का येत नाही. माई याच्यामध्ये सांगतो आपल्याच या सभागृहातील एका ज्येष्ठ नेत्यांनी काल मी तीन तास घालवले इंदापूरमध्ये. विरोधी पक्षनेते असतील, नवीन अध्यक्ष असतील त्यांनी तीन तास माझ्यावर दबाव आणला, हे देवू नका, ते देवू नका. मी पुराव्याशिवाय काहीच बोलत नाही. आयुक्त साहेब तीथ सुध्दा सीसीटीव्ही फुटेज आहेत ते चेक करा आपल्या येथील कोण लोक गेलेत कोण आलेत. कोणी ते बनवलय, आज हे डॉक्यूमेंटस देवू नका म्हणून मला तीन तास तीथ कन्व्हेन्स चालल होतं त्यांच, मला याच्यामध्ये आज सकाळी एकानी धमकी पण दिलेली आहे. या सभागृहालाही माहीती आहे जे ज्येष्ठ म्हणतात, ज्येष्ठ म्हणतात. जे चुकीच आहे ते चुकीच कुणीही असो मी भीत नाही कुणाला. जे स्वत:ला ज्येष्ठ सांगतात, अनुभवी सांगतात असे लोक सुध्दा या कामामध्ये आहेत. पाच वर्षात इथल्या आम्ही लोकांनी कोणीही भ्रष्टाचाराला पाठींबा दिलेला नाही. आपण लोकांनी कायमच भ्रष्टाचाराला विरोध केलेला आहे. मी कुठल्याही पक्षाच्या वतीने बोलत नाही

तर आपण जे १२८ जण बसलेलो आहोत त्यांच्या वतीने बोलतो. इथे जे बसले ते फक्त लोकांच्या सेवेसाठी बसलेलो आहेत. आयुक्त साहेब याच्यामध्ये आपलेही लोक सामिल आहेत. ज्यांना आपण लाच घेताना पकडल त्यांनाही तीच काम दिलेली आहेत जे त्यांच्याच खात्यातल काम आहे. त्यांनी काम केलेले नाही, त्यांनी हे डॉक्यूमेंटस तपासले नाहीत अशी लोक आपण अजून का ठेवतो. आम्ही पुरावे दिलेत तुम्हांला आहे तेवढ सांगीतल तरी तुम्ही लोक काहीच ॲक्शन घेत नाहीत. आम्ही फक्त दाखवतो तुम्ही लोकांनी ॲक्शन घेतली पाहीजेनां. मी सिध्द केलेल आहे मागे सुध्दा मी सिध्दच केलेल होतं तेव्हाही अकौंटला पैसे घेतले हे तुम्हांला दाखवल होतं मी मोघम काहीच बोलत नाही. काय होतय, एक दोन जणांनी याच्यात पैसे खाल्ले, त्याच्यात पैसे खाल्ले उगाच पक्ष बदनाम होतात, कुठलाही पक्ष असु दयात. पक्ष कधीही खतपाणी घालत नाही, यामुळे आख्खी महापालिका बदनाम होते. आयुक्त साहेब याच्यामध्ये आपण काय ॲक्शन घेणार हे तुम्ही मला सांगायच आहे. माई आपल्यालाही विनंती आहे जर आठ दिवसात याच्यामध्ये ॲक्शन नाही घेतलीतर मी माझ्या पदाचा राजीनामा देणार आहे. या सभागृहामध्ये सिध्द होवून पण काही ॲक्शन होत नसेलतर या सभागृहामध्ये थांबायची माझी अजीबात इच्छा नाही. ज्या लोकांनी मला इथ पाठवल आहे त्या लोकांना मी न्याय देवू शकत नसेलतर माझा राजीनामा मी शंभर टक्के आठ दिवसात देणार, तुम्ही लोकांनी ॲक्शन नाही घेतलीतर माझा राजीनामा मी आता पण लेटरहेडवर आणल ते तुमच्यापशी मी पोहच करतो. जर तुम्ही याच्यामध्ये आठ दिवसात ॲक्शन नाही घेतलीतर माझा राजीनामा मी देईल आणि मी सभात्याग पण करेल. माई, आपण आयुक्त साहेबांना आदेश दयावेत. आयुक्तांनी जे ठेकेदार असतील, जे चुकीचे लोक असतील त्यांच्यावर ॲक्शन घ्यावी. मा.महापौर साहेब, याच्यामध्ये तुम्ही आता आदेश दयायचेत व आयुक्त साहेबांनी खुलासा दयायचा. ज्या अधिका-यांनी डॉक्यूमेंटस चेक केले त्यांचा पण तुम्ही खुलासा दया. मा.महापौर साहेब, यांना फर्मच नाव पाहीजे होत ते  सिक्यूर आयटी फॅसिलीटी मॅनेजमेंट या कंपनीला अ आणि ब प्रभागाच काम दिलेलं आहे आणि स्टॅण्डींगला पण तुम्ही ऐनवेळचा विषय आणलेला आहे. बाकीचे विषय अजेंन्डयावर घेतले आणि हा विषय ऐनवेळचा आणलेला आहे. कशाला चुकीच्या कामाला खतपाणी घालता आयुक्त साहेब तुम्ही हे सांगावे.

मा.महापौर - जे काही आपल्याकडे आरोग्याच्या अडचणी निर्माण झालेल्या आहेत आणि ज्यावर तुषार कामठे साहेबांनी काही माहीती, काही पत्रक दिले तरी कामठे साहेबांच्या भावना लक्षात घेवून त्यांनी मांडलेल्या प्रश्नांच उत्तर आयुक्त साहेब आपण त्याचा खुलासा हा त्यांना मिळाला  पाहीजे त्यासाठी दहा दिवस मी आपल्याला देत आहे. त्या दहा दिवसामध्ये त्यांनी मांडलेल्या प्रश्नाच उत्तर आपण त्यांना दयाव असे सभागृहाच्या वतीने आपल्याला आदेश देत आहे.

**मा.एकनाथ पवार-** सन्मा. महापौर सन्मा. आयुक्त, खरं तर सभागृहाचे कामकाज चालू आहे काँग्रेसची सगळी माजी नेतेमंडळी या ठिकाणी आंदोलन करत आहेत.  निवडणुका जवळ आलेले आहेत संदीप भाऊ, सगळयांनी काम तर करावाच लागणार आहे.  खरं तर त्यांनी जे भोसरी रुग्णालयाचा विषय खाजगी करणार संदर्भात जे आंदोलन करत आहेत,  माझी कैलासजींना विनंती आहे, माझे खूप जवळचे जुने मित्र आहेत. माननीय आयुक्त बरोबर ही सभा संपल्यानंतर या संदर्भामध्ये नीट माहिती घ्यावी, आणि भोसरी रुग्णालयाच्या कुठल्याही पध्दतीचा खाजगीकरणाचा विषय या सभागृहाच्या पटलावर नाही, किंवा आम्ही हा निर्णय  घेणार नाही.

यामुळे माझी विनंती आहे की, एखाद्या गोष्टीचा आंदोलन करत असताना आपण त्या विषयी पूर्ण माहिती घेतली असतीतर मला वाटतं त्यांना सभागृहाबाहेर जाऊन आंदोलन करण्याची वेळ आली नसती. मी त्यांना सभागृहाच्या वतीने एवढच सांगेन प्रेषक गॅलरीमध्ये मला असं वाटतंय की काँग्रेसचे सभागृहामध्ये जर काही नेते मंडळी असतील तर त्यांनाही या गोष्टीबाबत समजल असेल की माननीय आयुक्त साहेबांना विनंती आहे कि अशा प्रकारे प्रेक्षक गॅलरीमध्ये येऊन आंदोलन करत आहेत. मला असं वाटतं की त्यांनी पत्रक वगैरे आणले होते त्यांना नीट वेळ दिली आसती तर सभागृहाचे ध्यान विचलीत झाल नसतं आणि त्यांनाही आंदोलना करता जो विषय आहे, तो विषयच कोणाच्याही ध्यानी मनी नाही, अशा पध्दतीच आंदोलन करण्याची वेळ आली नसती. सुरक्षा अधिकाऱ्यांनाही माननीय आयुक्त साहेब आपण सूचना दयाव्यात की एखादे आंदोलन होत असताना त्या आंदोलनाची माहिती, माहीत आहे ते कार्यकर्ते हातात पत्रके घेऊन येतात त्यांचं म्हणणं ऐकायचं. त्याच्यासाठी एखाद डेलीगेशन घेवून एखाद्या वरिष्ठ अधिकारीबरोबर चर्चा झाली असतीतर मला वाटत त्यांचाही वेळ गेला नसता. मा.महापौर आपण सभा सुरूवात करावी धन्यवाद.

मा.राजेंद्र गावडे – मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

विषय क्रमांक – १

दिनांक – २४/१२/२०२१ विभाग – मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.कदम शशिकांत व मा.भोईर सुरेश यांचा प्रस्ताव.

२) मा.स्थायी समितीकडील ठ.क्र.१०७५२ दि.२५/११/२०२१

कोरोना महामारीमुळे मोठ्या प्रमाणावर मनपा हद्दीतील नागरीकांच्या उत्पान्नावर परिणाम झालेला आहे. सध्या कोरोनाचा प्रादुर्भाव कमी झालेला आहे. अर्थव्यवस्था पुर्व पदावर येत आहे. त्यामुळे मिळकतकर धारकांना कर भरण्यास प्रोत्साहन देणे कामी थकबाकीच्या दंड रक्कमेवर सवलत देऊन दिलासा देणे आवश्यक आहे. मिळकत करधारकांकडून थकाबाकी ची रक्कम वसुल होणे कामी मिळकत करांची थकबाकी एक रक्कमी भरल्यास मनपा अधिनियम अनुसूची ड प्रकरण ८ नियम ५१ अन्वये शास्ती /दंडाच्या रक्कमेत खालील प्रमाणे सवलत देण्यास मान्यता देण्यात यावी.

| | | |
|---|---|---|
| थकबाकी सह मिळकत कराची रक्कम एकरक्कमी भरल्यास | कालावधी जानेवारी २०२२ अखेर | मनपाकर शास्ती/ दंड रक्कमेच्या ९०% सवलत |
| थकबाकी सह मिळकत कराची रक्कम एकरक्कमी भरल्यास | कालावधी फेब्रुवारी २०२२ अखेर | मनपाकर शास्ती /दंड रक्कमेच्या ८०% सवलत |
| थकबाकी सह मिळकत कराची रक्कम एकरक्कमी भरल्यास | कालावधी मार्च २०२१ अखेर | मनपाकर शास्ती/ दंड रक्कमेच्या ७०% सवलत |

वरील प्रमाणे मिळकत कर थकबाकी रकमेसह एकरकमी भरल्यास मनपाकर रक्कमेवरील शास्ती / दंड रक्कमेवर सवलत देणेस मान्यता देणेत यावी.

मा. ॲड.मोरेश्वर शेडगे – मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

मा.उत्तम केंदळे – मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो- सन २०२०-२१ व २०२१-२२ या कालावधीत मनपा हद्दीमधील ज्या निवासी मिळकतकर धारकांचे कोरोना या महामारीने मृत्यु झालेला आहे. व त्यांच्या नावावर मिळकत आहे. आशा कुटुंबाला दिलासा देणे कामी सन २०२२-२३ या सरकारी वर्षाकरीता कराचे व करेत्तर बाबीचे दर निश्चित करताना आशा मिळकतींना चालु सरकारी वर्षाचे चालु मागणीतील सन २०२२-२३ या आर्थिक वर्षाच्या देय सामान्य कर रक्कमेच्या १०० % सुट तसेच मिळकत कर हस्तांतरण नोंद नोटीस फी मिळकतकर धारकांच्या कुंटुंबियाना माफ करण्यास मान्यता देणेत यावी. तसेच कोरोना मुळे मृत्यु झालेल्या मिळकतकर धारकांच्या मिळकती हस्तांतरण करण्याची मोहीम ३१ जानेवारी २०२२ पर्यंत राबविणेस मान्यता देणेत यावी. तसेच १) पिंपरी चिंचवड महानगरपालिका “सर्वोत्कृष्ट क्रीडा पुरस्कार” (खेळाडू, दिव्यांग खेळाडू व मार्गदर्शक), “आंतरराष्ट्रीय खेळाडू पुरस्कार धोरण” तयार करणेस मान्यता देणेत यावी. २) महानगरपालिकेच्या अ,ब,क, वर्ग व्यायाम शाळा धोरण तयार करणेस मान्यता देणेत यावी. ३) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने, कबड्डी खेळाचे खेळाडू दत्तक घेऊन, पिंपरी चिंचवड महानपगरपालिका व्यावसायिक कबड्डी संघ (महिला व पुरुष) तयार करणेबाबतचे धोरण तयार करणेस मान्यता देणेत यावी. या ३ क्रीडा विषयक बाबींची धोरणे तयार करुन त्या बाबतचे अधिकार मा.आयुक्त यांना देणेस मान्यता देणेत यावी.

मा.कुंदन गायकवाड – मा.महापौर साहेब, उपसूचनेस अनुमोदन देतो.

मा.राजेंद्र गावडे – मा.महापौर साहेब, उपसूचना स्विकारली आहे.

**मा.वैशाली घोडेकर-** सन्मा.महापौर सन्मा.आयुक्त सन्मा. सभागृह. या ठिकाणी मला एकच शब्द सुचतय, उशिरा सूचलेल शहाणपण. अतिशय चांगला निर्णय तुम्ही घेतलाय, तुमचंही आम्ही अभिनंदन करू पण थोडा लवकर घेतला असता तर बर झाल असतं. दोन वर्ष करोना मध्ये गेले सगळे गेले आणि आता यांना सुचले आहे, चला इलेक्शन आलय, मघाशीच नेते म्हणले तुमचे की आता निवडणुका आल्या आहेत. त्याच्यामुळे ह्या गोष्टी घडणार, पण निदान निवडणुकांमुळे तरी लोकांना चांगले निर्णय मिळतील अशी अपेक्षा आम्ही बाळगतो आणि अतिशय या निर्णयाचं त्यांच स्वागत करतो. पण मला एकच प्रश्न या ठिकाणी पडलाय की, या ठिकाणी अनधिकृत बांधकामाचा शास्तीकर पण आला ना? मनपा शास्ती मग अनधिकृत बांधकामाच्या जो शास्ती कर आहे त्याचा प्रश्न तसाच राहिला. शासना कडन नाही, तुम्ही काय करताय, तो पण दंड माफ करा ना? इलेक्शन आले त्यामुळे देऊन टाका लोकांना तेवढा तुम्ही शास्तीकर माफ करू शकता ना अनधिकृतचा, तेवढही करा. ऐवढेच मला या ठिकाणी सांगायचय की अतिशय चांगला निर्णय घेतला, त्याला मनपाचा शास्तीकर तो जरी तुम्ही माफ केला तर या पध्दतीने निदान उशिरा शहानपण तुम्हाला सुचूदे आणि अनधिकृत बांधकामाचा निर्णय पण होऊ दे, कारण गेल्या वेळेस तुम्ही राज्यातही होता केंद्रातही होता. हे पाच वर्षे तुम्ही पिंपरी-चिंचवडमध्ये आहात तरी देखील तुमच्याच्याने ना कधी शेतकऱ्यांचा प्रश्न सुटला ना प्राधिकरणचा सुटला, ना तुमच्याने हा शास्तीकराचा प्रश्न देखील तसाच. मला फार आनंद झाला होता की यात निदान अनधिकृत बांधकामाचा शास्तीकर तरी येईल, पण तोही आलेला नाहीये. पण त्याच्यामुळे चला, फुल ना फुलाची पाकळी चांगली जाता जाता या पिंपरी-चिंचवड करांना मिळावी त्याबद्दल मी अभिनंदन करते, धन्यवाद.

**मा.अभिषेक बारणे-** सन्मा.महापौर सन्मा.आयुक्त सन्मा. सभागृह. माई हा जो विषय आहे कोरोना महामारी मुळे मोठया प्रमाणावर मनपा हद्दीतील नागरिकांच्या उत्पन्नावरती परिणाम झालेला आहे. मग मनपा हद्दीतील्या नागरिकांवर आता जी परिस्थिती ओढवलेली आहे, आणि गेल्या दोन वर्षापासून आपल्या भागामध्ये कारवाया बंद होत्या आता कारवाईचा सपाटा चालू झालेला आहे या शहरांमध्ये. पण कारवाया होतात कुठं? हे फक्त गोरगरिबांना टारगेट करायचं का? आज या सभागृहांमध्ये ठराव झाला होता की प्राधिकरण बाधित जे क्षेत्र आहे, महापालिकेला पीएमआरडीए ने जे दिलल आहे. तिथ जी अनधिकृत बांधकामे होतील, त्यावेळेस माई आपण एक ठराव केला होता, की जो जिथे राहतो जो टॅक्स पावती भरतो त्याचं एक रूपयात घर त्याच्या नावे करून द्यायचं, याचा फालोप आपल्या आयुक्त साहेबांनी काय घेतला? याचा फालेप घेतलाय का? तर त्यांनी आमच्या भागात कारवाई करायला पाहिजे होत्या. आज आमचं परिसर 80% प्राधिकरण आरक्षित आहे, आणि ह्या परिसरामध्ये अर्धा गुंठा एक गुंठा मध्ये ज्याची घरे आहेत, तुम्ही त्यांच्या घरावर जाऊन कारवाई करत आहेत. कारवाईचा क्रम ठरला पाहिजे की कारवाई कुठे करायची? रस्त्यात येणारी बांधकाम आहे ते घर पाडा, जे चार चार मजले बांधतो पाच-पाच मजले बांधतो आहे त्यांचे पाडा, जे व्यवसायिक दृष्टीने बांधला आहे पाडा. आमच्याकडे जर प्लॅन पास होतच नाही तर का तो अनधिकृत बांधणार नाही? आणि बांधतोय म्हणेजे काय करतोय तो? की बाबा घर दूरूस्ती करतोय, अशा किरकोळ गोष्टी आहेत अन त्याचा ताबा घेऊन काय करणार तुम्ही? अर्ध्या गुंठ्यात गार्डन बनवणार आहे का प्ले ग्राउंड बनवणार आहेत. ह्या छोट्या छोट्या गोष्टी आहेत माई, आज त्या हॉकर्स वरती रोज कारवाई चालू आहे. निश्चित कारवाई करून जर रस्त्याला फायदा होत असेल तर झालच पाहिजे, परतु हॉकर्सला आपण जागा दिली का? आज हॉकर्सची जी पॉलीसी आपल्याला करायची होती त्या लोकांना सातत्याने सूचना देत होतो की बाबा जे प्ले ग्राउंड असतील, गार्डन असतील, काही १० टक्कयांनी साईड मार्जिन असतील, काही आरक्षणे असतील जी विकसित नाही झालेली त्या ठिकाणी हॉकर्स बसवा. आज तीस-पसतीस हजार आपल्या शहरांमध्ये हॉकर्स बसू शकतात. तेवढे बसले तर महापालिकेला दहा-बारा कोटीचे उत्पन्न चालू होईल वर्षभरातून. तीस रूपये जर चार्ज घेतला अपण त्यांच्याकून. आज त्या बिचाऱ्याकडून कोरोना महामारीमुळे हे मागताहेत गोरगरीबांवरच अन्याय चालू आहे. इंदोर दौऱ्यामधी तुम्हला स्वच्छता दिसली तुम्ही स्वच्छता करताय आणि एका साईडला काय, शिक्षणांच काय, आरोग्याचं काय आम्ही तुम्हाला वारंवार सूचना देतोय की साहेब दिल्लीला बघा, तिथे टॅब दिलेले आहेत, तीथ मुलांच रिअल टॅब म्हणजे कोरोना साठी नव्हते देत त्यांना, टॅब का दिले मुलांना, की बाबा त्यांचे दप्तराचे वजन कमी व्हाव. शिक्षणपद्धती सुधाराव्या. त्याचं काय माई आज शिक्षण पद्धतीवर तुमचं लक्षच नाही, तिथेसुद्धा अन्याय होतोय मुलांवरती, आपल्या महापालिकेच्या विद्यार्थ्यावरती. ते कुठले विद्यार्थी आहेत गरीब, म्हणजे आयुक्तांनी पूर्णपणे आयुक्त साहेब असे दिसते की गरीबांवर तुमच्याकडून पुर्ण अन्याय होत आहे. जर तुम्हाला हॉस्पिटलचा, आता माई आपल थेरगावचे हॉस्पीटल बांधून हॉस्पिटलचे उद्घाटन करून किती दिवस झाले? आज प्रॉपर तिथ ओपीडी चालू नाही. सत्तर कोटी रुपये खर्च करुन थेरगाव हॉस्पिटल बांधले. आकुर्डी हॉस्पिटल आहे, भोसरी हॉस्पिटल आहे याठिकाणी फक्त कोवीडची व्यवस्था, कोवीडची व्यवस्था आणि फक्त व्यवस्था करून ठेवली आहे. जर त्या हॉस्पिटलच्या

बाहेरून एखादा गाडीवाला चालला आणि त्याचा अक्सिडेंट झाला तर त्याला आत नेऊन त्याची व्यवस्था करण्याची व्यवस्था नाहीये. स्टॅंडिंगला सदस्य असल्याने मी दर आठवड्याला या विषयावर आयुक्त साहेबांशी चर्चा करतोय, परंतु ते पॉझिटिव्हली सांगतात की मी हे करतोय, मी ते करतोय पण त्याला गतीच नाहीना! आता सहा सहा महिन्यात जर तुम्हाला एखाद्या कामाला गती भेटत नाही, आणि जी कामे तुम्ही तुमच्या डोक्यामध्ये टार्गेट ठेवलं की हे करायचेच आहे, त्याला कशी काय गती भेटते मग? आज पॉलिसी करायची हॉकर्सची, हॉकर्सची पॉलिसी करायची, हॉकर्सची पॉलीसी होत नाही, लोकांना बसायला जागा देत नाही, त्याच्याशिवाय तुम्ही का कारवाई करताय? ते आमचे राजू बनसोडे साहेब दर स्टँडींगला ओरडतायत या विषयावरती. की माझ्या वॉर्डातील गोरगरिबांवर तुम्ही मला टारगेट करताय का? गोरगरिबांवर टारगेट करताय का? म्हणजे तेच झालं ना? आता राखीव दलाचे पैसे तुम्ही भरले आणि राखीव दल तुम्ही लगेच मागून घेतले, ते कसं काय तातडीने झाल? राखीव दल बोलावले, टेंडर झाले, यंत्रणा बोलवली, ठेकेदार आले, कामाला माणस आली मग हे कसं काय टार्गेट लवकर पूर्ण होतय? माई माझे हे प्रमुख मूळ मुद्दे आहेत, याचा मला खुलासा पाहिजे की प्राधिकरण हद्दीतील जी बांधकामे आहेत, तो जो आपण या सभागृहामध्ये ठराव केला होता, त्याचा आयुक्त साहेब काय फालेअप घेत आहेत. ते महाराष्ट्र सरकारला त्यांनी पाठवल असेलना ते काय स्टेजला आहे? किती लोकांना घर देणार का? माझा दुसरा प्रमुख मुद्दा आहे की सगळे हॉस्पीटल किती दिवसांमध्ये चालू होणार? आणि तिसरा मुद्दा आहे की बाबा तुमची जे हॉकर्स झोन आहेत हे कधीपर्यंत फायनल होणार? आणि हे जो पर्यंत फायनल होत नाही, तोपर्यंत त्यांच्यावर कारवाई का? धन्यवाद.

**मा. सुजाता पालांडे-** सन्मा.महापौर सन्मा.आयुक्त सन्मा. सभागृह. आता अभिषेकने जो मुद्दा मांडला आहे, त्या मुद्यावरच मला बोलायचं आहे. अतिक्रमण ची कारवाई- आयुक्तसाहेब अतिक्रमण ची कारवाई म्हणजे नेमकी कसली कारवाई तुम्ही करता? अतिक्रमणची कारवाई म्हणजे माझ्या वॉर्डात माई माझ्या प्रभागांमध्ये फक्त आणि फक्त कोणी बॅनर लावला की तो बॅनर काढायला अर्ध्या तासा मध्ये किंवा एक तासा मध्ये येऊन तो बॅनर काढायचा. हॉकर्स म्हणजे जे बिचारे गोर गरीब दोन वर्षानंतर रस्त्यावर पहिल्यापासून बसत होते, ते माझे हारवाले असतील, माझे बारा महिने सिझनमध्ये बसणारे सिझनल धंदे करणारी लोक असतील, त्या लोकांना प्रत्येक वेळेला उचलायचं आणि त्यांचं सगळ सामान भरायचं आणि निघुन जायच. माझ्या मुळा मध्ये आयुक्त साहेब तुम्हाला प्रश्न आहे, अतिक्रमण हा विषय होतोच का? आज जर तुम्ही माझेकडे अतिक्रमणच्या कारवाईस येत असाल, कोणी बांधकाम करत असेल आणि ते बांधकाम पाडण्यासाठी तुम्ही अतिक्रमणची कारवाई करताय, साहेब ते काम जेव्हा पहिल्यापासून सूरू होतं ज्यावेळेला एखाद बांधकाम पाडलेले असतं आणि ते दोन मजली होत असत त्यावेळेला आयुक्त साहेब आपला बीट निरीक्षक काय करीत असतो. त्याच वेळेला ते काम थांबवल का नाही जात? माझ्याकडे हा कामगार वर्ग आहे, आणि कामगार वर्ग हा कुठेतरी एखाद लोन घेत असतो, स्वत:च दाग दागीन गहान टाकत असतो, आणि तो एखादा मजला व्यवस्थीत करण्याचा प्रयत्न करीत असतो. मग त्याच वेळेला नंतर तुम्हाला ते बांधकाम

पाठायचंय तेव्हा तुम्ही आगोदरच येऊन ते बांधकाम पाडता, तेव्हा तुमचे बीट निरीक्षक त्यांना व्यवस्थित समजून का सांगत नाही? की तुम्ही परमीशन घेतल्याशिवाय बांधू नका म्हणून? मग ही अतिक्रमणची कारवाई का होते नंतर? आज माझ्याकडे नवरात्रीमध्ये साहेब एक बॅनर लागला गेला, बॅनर कोयत्याने लगेच कापून काढले गेले. त्याच वेळेला माझे हारवाले बाजूला बसले होते त्यांच्याकडून तुम्ही नऊ दिवसाचे पैसे भरून घेतले. आज ऊसाची गुऱ्हाळ आली आहेत त्यांचेकडूनही तीन महीन्याचे पैसे भरून घेतात, मग साहेब त्यापेक्षा माझ्या लोकांना व्यवस्थित हॉकर्स झोन तयार करून दिलेत तर त्यांच्यावर फार मेहरबानी होईल. नेहमी नेहमी अतिक्रमण कारवाईची जी टांगती तलवार आहे ना आयुक्त साहेब, ती होणार नाही. आज मघाशी माझ्या सगळया महिलांनी माझ्या सभागृहांनी शक्ती विधेयकाच मनापासून अभिनंदन केल. त्याचबरोबर केंद्र सरकारच महिलांना मुलीच लग्नाच वय २१ केल त्याबद्दलही अभिनंदन केल. पण साहेब मी तुम्हाला एक प्रश्न विचारते, मागे सुध्दा आपण सुरक्षिततेचा विषय घेतला होता, त्यावेळेला मी तुम्हाला सांगितल होत की तुम्ही म्हणजे दुव्वा आहात आमचे. प्रत्येक जनाला तीथ पर्यंत पोहोचता येत नाही. माझ्या वॉर्डामध्ये काही प्रश्न मी तुम्हाला दिले होते साहेब, त्यामधील एकाही प्रश्नांची उकल आयुक्त साहेब आजूनपर्यंत झालेली नाही. आज मी फक्त माझ्या वॉर्डपुरते बालू शकते, पीसीएमसी मध्ये प्रत्येकाचा /प्रत्येक प्रभागाचा हाच विषय आहे. पण माझ्या वॉर्डामध्ये डीवाय पाटील बाईच कॉलेज आहे, डीवाय पाटील इंजिनिअरींग कॉलेज आहे, वायसीएम रूग्नालय आहे, वायसीएम मध्ये आपण पीजी केलंय, आज माझेकडे वल्लभनगर एसटी स्टँड आहे, आज मेट्रोच स्टेशन झालय, एक मोठा हब तयार झालेला असतांना माझ्याकडे आरटीओच सुध्दा साध ज्या पध्दतीच आमच्याकडे काम व्हायला पाहिजे होत ते काही होत नाहीय. या सगळयाची उत्तरं मला कमीश्नर साहेब तुमच्याकडून का पाहिजेत कारण पीसीएमसीचा सर्वात मोठा दुव्वा जे कर्तव्यतत्पर, कर्तव्यनिष्ट आयुक्त म्हणून जर आम्ही तुमच्याकडे बघत असू तर माझ्या नागरीकांसाठी सुरक्षिततेचा विषय असेल, माझ्या नगरीकांचे बाकीचे सर्व प्रश्न असतील, माझ्या नागरीकाचे अतिक्रमणाचे प्रश्न असतील तर साहेब आपण हे चांगल्या पाध्दतीने सोडवले पाहिजेत. आज मला एक सांगा तुम्ही प्रत्येकाला वाटतय की टॅब का देतोय, कशासाठी देतोय आपण?, सगळे जन हासत आहेत टॅब म्हटल्यानंतर. आज जर आपण शाळेमध्ये मुलांना तुम्ही कार्पोरेशन मध्ये मुलं यायला पहिजे त्यामुळे शिक्षणाच्या माध्यमाने शिक्षणाचा दर्जा उंचावण्यापेक्षा आपण त्यांना सॉक्स देतोय, आपण त्यांना युनिफॉर्म देतोय, आपण त्यांना दप्तर देतोय मग साहेब टॅब म्हणजे काय वेगळी गोष्ट झाली काय? आज एक वर्षाच मूल सुध्दा हातामध्ये मोबाईल घेवून बसतं, आज जर तुम्ही टॅब दिले असतेतर तुम्ही त्या पध्दतीने शिक्षणाचा दर्जा सुध्दा त्यांचा उंचावलाच असता कारण आता आपण ज्या कॉम्पेटेटीव वर्ड मध्ये जातो, अधुनिकीकरणाकडे जातोय त्यामध्ये टॅब देणे ही काही चुकीची गोष्ट नाहीये साहेब. का नाही दिले गेले? आज आपण इंटर पॅनल राबवतोय, आज आपण काय म्हणतोय, कचरा कुंडी विरहीत वॉर्ड झाला पाहिजे. साहेब माझेकडे येवून बघा, माझे डॉक्टर डी.वाय.पाटील इंजीनीअरींग कॉलेजच्या बॅकसाईडचा रस्ता येवून बघा. मला कधी कधी आस वाटते, इंदोर पॅटर्नवाली जी लोक काम करताहेत ती फक्त आणि फक्त कागदोपत्रीच काही गोळा करताहेत का? आज रॅली करण झाल, उद्या स्वच्छागृहाचा कार्यक्रम झाला, परवा टॉयलेट साफ करण झालं, उद्या गार्डनमध्ये एखादा कार्यक्रम घेणार साहेब फक्त कागदोपत्री काम करण्यापेक्षा नागरीकांचे इनव्हॉलमेंट सुध्दा आम्ही तुम्हाला देतोय, आणि त्या पध्दतीने साहेब काम झालं

पाहिजे. मुळामध्ये ह्या पध्दतीच जर काम झाल, आता माझ्या सहकारी वैशालीताईने अभिनंदनही केल. पण पुढचा विषय जो गेलाना तो राज्य सरकार कडून तुम्ही करून आणा. आम्ही पाचच वर्ष काम करतोय, पाच वर्षे काम करतांना आम्ही पण कुठे चुकलो असेल तुम्ही चुकला असाल, विरोधकांच काम होत आम्हाला सुधरावण, ते काम तुम्हाला जमल नसेल. पण त्याबद्दल मी बोलण इष्ट नाही. कमीश्नर साहेब माझे वॉर्डातील काही प्रश्न ज्या पध्दतीने तुम्हांला सोडवायचे आहेत मला त्याच उत्तर मिळाल पाहिजे आणि ते झाले पाहिजे. एवढेच बोलते इथेच थांबते.

मा सागर आंगोळकर– मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. आयुक्त साहेबांना मला या ठिकाणी विचारायचय, आयुक्त साहेब आपण गेल्या चार महिन्यापूर्वी सर्व प्रभागामध्ये फिरून व्हिजीट केल्या, व्हीजीट केल्यानंतर तुम्ही तेथील समस्या जाणून घेतल्या, साहेब आपण तीथे समस्या जाणून घेत असताना आपण पुढच्या पंधरा दिवसात त्या समस्यांच निराकरण करणार आहोत असे तुम्ही आदेश दिले होते आणि परत एक मिटींग घेणार होते. साहेब ड प्रभाग अध्यक्ष म्हणून काम करत असतांना आपण पिंपळे निलखच एक बॉटलनेकचा विषय सांगितला होता. तो पिंपळे निलख पासून बालेवाडीकडे जातांना एक बॉटल नेक तयार होतो तो कोर्टात पेंडींग विषय आहे. आपण त्यावेळेस सांगितले होत आपण कोर्टात हे करतोय, ते करतोय, म्हणजे अशी थातूर-मातूर उत्तरे देऊन आपण ती सभा पुढे मांडली, त्याच सभेत आपण स्वच्छतेवर बोललो, आज मला या ठिकाणी हा विषय काढायच कारण की साहेब पिंपळे गुरव प्रभाग क्र. २९ मध्ये कचरा विरहीत, कुंड्या विरहीत प्रभाग आसे आपण म्हणतो. सर्व कुंड्या उचलल्या साहेब, आणि खेदाची बाब महापौर ताई मी साहेबांना कुंड्याचा जो कचरा खाली पडलेला आहे त्याचे फोटो पाठवतो. साहेब मला रिप्लाय करतात, कोण आहे. मी म्हणतो साहेब मी आपल्या सोबत ज्यावेळेस आपली ही चर्चा झाली होती काही दिवसात. ह्यांना नगरसेवकांचे नंबर यांचेकडे नाहीयेत, कोणाचा हॉट्सएॅप येतो हे यांना माहित नाहीये, साहेब तुमच या शहराकडे बघायचे, नगरसेवकाकडे बघयच दृष्टीकोन काय आहे? का प्रत्येक नगरसेवकांनी पण आयपीएसची प्रीलीमीनरी एक्झाम देऊन तुमच्या समोर याव का? यु आर कॅपेबल वूई कॅन स्पीक यू, आणि तुम्ही आम्हाला अडव्हाइस करू शकता. साहेब ह्या सगळया गोष्टीचा जेव्हा अंदाज येतो, ढाकणे साहेब तुम्हाला पण तो फोटो पाठवतो तोच कमीश्नरांना पाठवतो. तुमच्याकडून रिप्लाय येतो, त्यांचेकडून रिप्लाय येत नाही. म्हणजे नगरसेवक अशिक्षीत आहेत का? नगरसेवकांना तुम्हाला इगो करायच का? तुमच शहराकडे बघयच धोरण काय आहे? साहेब, या शहराची जडण-घडण होतांना, हे शहर औद्योगिक शहर आहे साहेब. शहरात विविध राज्यातून बाहेरची लोक येथे येवून राहतात. कारण महात्वाचा विषय आहे, आता मला आस वाटतय आमच्या सारख्या पहिल्यांदा निवडून आलेल्या नगरसेवकांनी जो पर्यंत सभागृहात तुम्हाला बोलत नाही, तो पर्यंत तुम्ही काम करत नाही. एकतर तो विषय असेल किंवा आम्हाला जे बोलायच ते तुमच्या पर्यंत पोहोचत नसेल किंवा आम्हाला तुम्हाला समजून घ्यायच नाही साहेब. आज पिंपरी चिंचवड शहराची जडण-घडण होत असतांना याचे आधी पण बरेच आयुक्त होऊन गेले पहिल्या आयुक्ता पासून आता पाच वर्ष झाले मी पिंपळे गुरवचा नगरसदस्य म्हणून काम करीत असतांना हार्डिकर असतील, तुमचा थोडा अनुभव आला. साहेब आगोदरचे आयुक्त बंड साहेब असतील, शर्मा साहेब असतील, काय त्यांची ध्येय धोरण होती साहेब! बंड

साहेबांच्या काळात हा पूर्ण हा बॉम्बे पुना हायवे आहे त्याचे अतिक्रमण काढून रस्ते डेव्हलप झाले, साहेब या आठ महिन्यात तुमच्याकडून मला आमचे नगरसेवक असूद्या तुमच या शहराकडे बघण्याच दृष्टीकोनच समजला नाही साहेब. कृपया आपला दृष्टीकोन समजावा की या शहराच्या बद्दल आपण काय देण लागतो साहेब. आपण या शहरात जडण-घडण होत असतांना पिंपरी चिंचवड महानगरपालिका हे खूप या शहराला पुढे नेण्याचे काम पिंपरी चिंचवड महानगरपालिका करते आणि आपण या शहराचे कुटुंब प्रमुख आहात. तीन वर्षे का होईना तुम्हाला आम्ही या शहराचे कुटुंबप्रमुख मानतो. साहेब तुमची ध्येय धोरणं स्पष्ट असावित. पुढे जातांना मला ऐवढेच सांगायचे साहेब मागे कोविडचा काळ गेला. कोविडच्या काळात सत्ताधारी आमच्या पक्षांनी तीन हजार रूपये गोरगरीबांना मदत मिळावी या संदर्भात तुमच्याकडे आम्ही जीबी मध्ये एकमताने ठराव मंजूर केला. साहेब तुम्ही पण एक गरीब कुटुंबातून आलाय. तुम्ही हा विषय फटाळून लावतांना तुम्हाला थोडीशी गय नाही वाटली साहेब आज नगरसेवक म्हणून मला खरंतर तुमचा राग येतो किंवा लाज वाटते की तुम्ही गरीबीतून येऊन गरीबांना मदत करू शकत नाहीत साहेब. हे ध्येय धोरणं राबवितांना तुम्ही कोणाच्या पाठीशी आहेत, की सूड वृत्तीने वागण्यासाठी तुम्ही इथे आलात? याचा पण मी पुढ जावुन अभ्यास घेतला साहेब. खर पाहता आज आयुक्त साहेब ज्या वेळेस तुम्ही इथे आलात, तुमची नियुक्ती होतांना आपण जे शिक्षकाच आहे एकत्रीकरणाच तुमच केडर आहे आय थिंक ओडीसा केडर आहे. दूसर केडर म्हणून आपलेकडे येतांना काही नियमावली आहे त्याचे पेपर माझ्याकडे आहेत आय थिंक मी एवढा अभ्यासू नगरसेवक नसेल पण तुमची ज्या पध्दतीने इथे नियुक्ती झाली, ढाकणेसाहेब तुम्ही पण, तुम्ही रेल्वेमधून आलात, बाहेरचा अधिकारी ज्या वेळेस महाराष्ट्र राज्यात येतोतर त्याची नियमावली आहे, की त्या अधिकाऱ्याच पती-पत्नी एकत्रीकरण असाव किंवा घरातल कुटुंबाच काही मेजर आजारीपणाच कारण असाव, असं एक माझ्याकडे पत्र आहे मे बी हे रॉंग असेल पण तुमची नियुक्ती करतांना ज्या घाईघाईत राज्य शासनाने आपल्याकडे नियुक्ती केली आणि त्यांची ध्येय धोरण राबविण्याचे काम तुम्ही अतिशय इमानईतपणाने करत आहेत हे या ठिकाणी मला खेदाने बोलावस वाटत. साहेब, ही जी काही तुम्ही आमची फसवणूक करताहेत किंवा शहरवासीयांना सुड बुध्दीने वागताय, हे तीन हजार रुपये कोणाचे होते साहेब? ज्या टॅक्सरुपी शहरवासीयांनी भरलेले पैसे आहेत तेच आपण गोरगरीबांना रिटर्न करणार होतो. तो निर्णय घेवून तुम्ही सत्ताधारी भाजपची जिरवायची ठरवली, पण खरं सांगायच साहेब तुमच्या या आडवाजीरवाच्या कार्यक्रमा मध्ये पिंपरी चिंचवडचा नागरीक होरपळून निघतय साहेब. या ठिकाणी अजून बोलतांना मला ऐवढच सांगायचय साहेब तुमच हे सुपारी घेवून वागण हे अजिबात तुमच्या पदाला शोभत नाही. आज पिंपरी चिंचवडकरांनी लोकसभेच्या निवडणूकीत पार्थ दादा पवारांचा पराभव केला त्याची सुपारी घेतली, आणि त्या पध्दतीने तुम्ही वागताहेत. आज काही पद नसतांना ते तुमच्या एंटी चेंबरमध्ये येतात, चर्चा करतात, पण आमच्यासारख्या नगरसेवकांना भेटायला तुम्हाला वेळ नाही साहेब. या ठिकाणी बोलण्यासारख खूप आहे फक्त मला एवढेच सांगायच साहेब, जाता-जाता जे पिंपरी चिंचवडकरा सोबत सूडबुध्दीने वागायच राजकारण जे आता करतात, त्यांना एवढच सांगायचे साहेब तुमच्या माध्यमातून काही दिवसातच आता घोडेमैदान लांब नाहीये, कळणार आहे, परत भाजपचीच सत्ता येणार आहे, एवढ बोलतो आणि थांबतो.

**मा.ॲड.सचिन भोसले-** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. विषय सुरू आहे, मिळकत कर, शास्ती कर मध्येच कुठंतरी डायव्हर्ट होतोय, विषयावर चर्चा केली तर बर होईल, तत्पूर्वी माई मी बराच वेळ हात वर करीत होतो, मला बोलायची संधी द्या म्हणून, त्याच कारण आस होतं, गेल्या काही दिवसापूर्वीच छत्रपती शिवाजी महाराजांची विटंबना कर्नाटक मध्ये झाली. प्रथम त्या गोष्टीचा जाहीर निषेध करण्यासाठी मी बराच वेळापासून हात वरती करत होतो. खरंतर आपल्या सर्वांचच त्या घटनेन अपमान झालेलं आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच नाव वापरुन छत्रपती शिवाजी महाराजांच नाव घेऊन जे सत्तेत आले, त्यांना विसर पडला, विटंबना झाल्यानंतर ते देखील गप्प आहेत. या ठिकाणी शक्ती कायद्याच स्वागत करण्यात आल, २१ वर्ष लग्नाच वय केंद्र सरकारन मुलीच केले त्याचही स्वागत करण्यात आल. सर्वांच या ठिकाणी अभिनंदन करतो, परंतु हे होत असतांना नरेंद्र मोदी, ज्यांनी हा कायदा केला मुलींच्या लग्नाच वय २१ वर्ष त्याच केंद्र सरकारने कर्नाटकमध्ये झालेल्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या विटंबनेबदल कर्नाटकचे मुख्यमंत्री त्यांच्यावर काय कारवाई केली हे देखील पाहिजे तेवढं महत्वाच ठरणार आहे. नुसतं जर आपण संपूर्ण महाराष्ट्राचा आराध्य दैवत आहे, फक्त महाराष्ट्रातच नाही तर पूर्ण जगात, पूर्ण जगाला ना असा राजा पहायला मिळालेला आहे ना भविष्यात पहायला मिळेल. अशा महाराजांची विटंबना झाल्यानंतर केंद्र सरकारची भूमिका काय? माई या सभागृहाच्या वतीने मी आपणास एक विनंती करू इच्छितो की तसा जाहीर निषेध आणि त्याच्या कर्नाटकच्या मुख्यमंत्र्यावरती कडक कारवाई जो पर्यंत होत नाही तो पर्यंत ज्या पध्दतीने तुम्ही सांगताय की नरेंद्रजी मोदींनी महिलांसाठी जो कायदा केलेला आहे त्याच अभिनंदन केले पाहिजे, निश्चितपणे अभिनंदन केल पाहिजे परंतु माझ्या या महिला भगीनी, माता भगीनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्यामध्ये एकाही महीला भगीनीकडे कुठल्याही मूलीकडे चुकीच्या नजरेने पाहणाऱ्याला क्षमा केली जात नव्हती. त्याला भर चौकात शासन केल जात होत. तर येणाऱ्या काळामध्ये आपल्याला पहायचय की हा जो कायदा करण्यात आलाय हा कायदा निश्चिपणे स्वागतार्ह आहे. याच स्वागत झाल पाहिजे, सर्वाच अभिनंदन झाल पाहिजे. परंतु या कायद्याची दूसरी बाजू त्या कायदयामध्ये महिला असतील, पुरूष असतील आणि तृतीय पंथी असतील या सर्वाना त्यामध्ये संरक्षण देण्यात आलेल आहे. हा माझा प्रथम मी त्याचा जाहीर निषध करतो आणि या सभागृहाच्या माध्यमातून तसा ठराव जावा अशी आपणास विनंती करतो. दूसरी गोष्ट शहरामधील अनधिकृत बांधकामं. अभिषेक बारणेने माझ्या मित्रान सांगितल की हॉकर्स झोन अजून निश्चित झालेल नाहीत त्यामुळे त्या कारवाया सुरु आहेत. माझी या सभागृहाच्या माध्यमातून मा.आयुक्त महोदयांना नम्र विनंती आहे, की या शहरामध्ये किती अनधिकृत बांधकामे आहेत. माझ्या माहिती प्रमाणे आकडा मागे-पुढे होत असेल ८७ ते ८८ हजार अनधिकृत बांधकामे आहेत. कदाचित त्यापेक्षा जास्तही झाले असतील याचा खुलासा करण्यात यावा की आजपर्यंत महापालिकेने जे सांगताहेत, हायकोर्टामध्ये पीटीशन आता दाखल आहे. त्या हायकोर्टात आपल्या महापालिकेच्या वतीने जे ॲडव्होकेट ॲपीअर झालेले आहेत त्यांनी तसा खुलासा करणे गरजेच आहे की त्यांनी जे सांगतात हायकोर्टला की आम्ही अमुक अमुक दहा हजार बांधकामावर या महीन्यामध्ये कारवाई केली. तर त्याचा खुलासा या सभागृहाच्या माध्यमातून होणे फार गरजेच आहे, कारण की अनधिकृत बांधकामावर कारवाई करत असतांना जो होणारा खर्च आहे, त्याचा देखील विचार झाला पाहिजे. संपुर्ण शहरामध्ये ऐंशी ते एक लाखाच्या आसपास बांधकाम असतीलतर त्या बांधकामावरती तुम्हांला कारवाई जर करायची असेलतर त्याच्यावरती होणारा खर्च किती

आहे त्याचा देखील विचार झाला पाहीजे. दुसरी गोष्ट हायकोर्टामध्ये तुम्ही जे प्रतिज्ञा पत्र दिलय ते खरं आहे का हो ? आपले या ठिकाणी जे लिगलचे काम पाहतात आयुक्त साहेब आपल्याला विनंती करतो, त्यांनी थोडासा खुलासा करावा की ते वेळोवेळी हायकोर्टाला सांगतात प्रतिज्ञा पत्रावरती की आम्ही इतक्या कारवाया केल्या, आम्ही इतक्या कारवाया केल्या. तरी मी सभागृहाच्या माध्यमातून सांगतो की सत्य माहिती महापालिका हायकोर्टलाही देत नाही आणि या शहरामध्ये जे गोरगरीब नागरीकांनी आपल्या कष्टाचा पैसा जमवून आर्ध्या गुंठयात, एक गुंठयात जी काही घरे बांधलेली आहेत त्याच्यावरती कारवाई करण्याच काम या ठिकाणी सूरू आहे. पहीली गोष्ट अशी की प्रशासनाने आपली बाजू क्लीअर केली पाहिजे दुसऱ्या बाजूला जेव्हा अनधिकृत बांधकामे होतात जस ताईंनी सांगतिले की अनधिकृत बांधकामे होत असतांना बांधकाम ज्या वेळेस सूरू केले जातं, जुन घर पाडल जात त्यावेळेस त्याला महापालिकेच्या वतीने आपण सूचना देतो का ? त्यानंतर त्याच्यावरती काय कारवाई करतो. जेव्हा एखादा व्यक्ती किमान एक स्लॅब टाकतो, त्याच्यावरती आपण जर विचार केला जर ते एक हजार स्क्वअर फूट असेल पाचशे स्क्वेअर फूट असेल, पाचेसे स्क्वेआर फुट बांधकाम करत असतांना तो व्यक्ती स्लॅबच्या जवळ-जवळ आला असेल तर त्या व्यक्तीनी तीन ते चार लाख रूपये खर्च केलेले असतात. मग तुमचे बीट निरीक्षक असतील, तुमचे बाकीचे अधिकारी असतील ते काय करत असतात हो. तुम्ही एकाच बाजूनी ढोल वाजवून चालणार नाही. खर तर अनधिकृत बांधकामाचा हा जो प्रश्न आहे हा आपल्या शहराचा नाहीये. हा पूर्ण देशाचा आणि पूर्ण जगाचा आहे. पुर्ण ही ग्लोबल समस्या आहे, अनधिकृत बांधकाम. त्याच्यामध्ये तुम्ही शेवटच्या मीनीटाला सांगता आम्ही मनपा कर शास्तीकरमध्ये ९० टक्के सवलत देतो. मनपा कर, शास्तीकर दंड रक्कमेच्या ८० टक्के सवलत २०२२ अखेर आणि कालावधी २०२१ अखेर मनपा शास्तीकर सरसकट सवलत देत आहेत. तर आयुक्त महोदय या गोष्टीचा आपण थोडा खुलासा करावा की आपण नेमकी किती सवलत देणार आहोत. आता निवडणूका समोर आल्यात, निवडणुका जवळ येत आहेत म्हणून काय तुम्ही लोकांना दिशाभूल करण्याचा प्रयत्न करत आहेत अस मला वाटतय. तुम्ही याच्यावरती स्पेसीफिक आसल पाहिजे, याच स्पष्टीकरण तुम्ही दिल पाहिजे, त्यानंतरच माई खरतर आपल्या सर्वांना समजेल की नेमकं काय चालू आहे ते. निश्चतपणे या शहरातील अनधिकृत बांधकामे नियमीतच झाली पाहिजेत. त्यांच्यावरचा शास्तीकर हा माफच झाला पाहिजे या मताचे आम्ही आहोत. तरी आपणास विनंती आहे की, हा जो काही आपण माफ करणार आहात, या सवलती जे काही देतो आपण त्याचा खुलासा करावा त्यानंतर मला पुन्हा बोलण्याची संधी द्यावी ही विनंती आहे.

मा.राजू बनसोडे – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. मला एक मीनीट बोलूद्या, जो विषय चालू आहे माई त्या विषयाला धरून बोलायला लावा. विषय कुठेतरी भरकटायच काम करू नका. यांनी पार्थ पवारच नाव घ्यायची काय गरज होती ? काय गरज होती पार्थ पवारचे नाव घ्यायची ? पार्थ पवार काय, कोणीही येऊन बसू शकतात ना इथं. माई विषय कुठेही भरकटायला लावू नका, नाहीतर आम्हालाही भरकटता येतं. भरकटायला लाऊ नका, नाहीतर आम्हालाही बोलता येत.

**मा.एकनाथ पवार-** सन्मा.महापौर, सन्मा.आयुक्त, सन्मा.सभागृह. खरं तर आजून जनरल बॉडी भरकटलेली नाही. मलाही तेच म्हणायच होत, म्हणजे ज्या वेळेस शास्तीकराच्या संदर्भात हा

विषय आला आणि पिंपरी चिंचवड शहराच्या लोकाला हे तर माहित आहे की शास्तीकराचा बोजा, शास्तीकरा सारखा जिजीया असेल या शहरवाशीयावर कोणी लादला? हे खरं तर ताई खर तर हे सगळयांना माहित आहे शहरवासीयांना. म्हणजे शास्तीकर लादण्याच काम मागच्या अनेक वर्षापूर्वी आपण जर बघीतल की या दहा वर्षा पुर्वीपासून हे तर काम खर तर राष्ट्रवादी काँग्रेसने केल आम्ही त्यामध्ये कधीच म्हटल नाही. आणि मागच्या वेळेस ज्यावेळी शास्तीकराच्या संदर्भामधला ज्यावेळेलस विषय या सभगृहामध्ये आला, त्यावेळेला मला माहिती आहे की, भारतीय जनता पार्टी आणि शिवसेनेच सरकार होत. मगाशी सांगत होते की निवडणुका आल्यामुळं फार मोठ्या घोषणा या ठिकाणी केल्या जात आहेत, मला माहित आहे की भारतीय जनता पार्टीच्या सरकारच्या काळामध्येच या शहरवासीयांचं शास्तीकराच ओझं हे कमी झालं. मारुती भापकर येथे प्रेक्षक गॅलरीमध्ये बसलेले आहेत, मला आठवतय की अनधिकृत बांधकामाच्या संदर्भामध्ये अंदोलनामध्ये आम्ही होतोना, याचा शास्तीकर कमी झाला पाहिजे, बांधकाम नियमित झाले पाहिजे आणि वैशालीताई पाच वर्षानंतर म्हणताहेत की भाजपला उशिरा शहानपण आलं. मागच्या पाच वर्षाच्या काळा मध्ये या शहरवासीयांच्या विकासाच दृष्टिने या शहरवासीयांच्या सर्वसामान्य माणसाला न्याय देण्यच काम भारतीय जनता पार्टीच्या माध्यमातून या सभागृहात केलेलं आहे. खरंतर सचिन दादा मी तुमचा खूप आदर करतो, छत्रपती शिवाजी महाराज हे आमच आराध्य दैवत आहे, महाराजांच्या आराध्य दैवताच्या संदर्भामध्ये मा.पंतप्रधान साहेबांबद्दल आपण बोलण खर तर मला कधी-कधी आपण म्हणतो की या सभागृहामध्ये आपण देशाच्या राजकरणावर बोलतो, राज्यच राजकारण करतो. खर तर महाराजांच्या बद्दलची निष्ठातर कुणीच आम्हाला सांगू नये. भारतीय जनता पार्टीच्या स्थापनेच्या आधीपासून छात्रपती शिवाजी महाराज हे आमचे आराध्य दैवत आहेत, आम्ही त्यांच पूजन करतो हे लक्षात ठेवा. त्यामुळे महाराजांच्या बद्दलच खरं तर मला कधी कधी प्रश्न पडतो या सभागृहामध्ये सांगायचय आणि सचिन दादा तुम्ही म्हणलात की बैंगलोरच्या संदर्भामध्ये जी विटंबना झाली, मला माहीती आहे की त्या अटक कार्यकर्त्याला अटक झाली तो कोणाचा कार्यकर्ता होता सगळयांना माहीत आहे, आणि मला कधी कधी तुम्हालाही विनंती करायची की महाराजांच्या संदर्भामध्ये आपण किंवा मा.पंतप्रधानांच्या संदर्भामध्ये अशा पध्दतीच वक्तव्य भास्कर जाधवांनी केलंना काल सभागृहामध्ये त्यानांही माफी मागावी लागली ना, त्यामुळे आपण कधी-कधी मा.प्रंतप्रधान असतील मा.मुख्यमंत्री असतील त्या त्या पोझीशनचा कृपा करून आदर राखायला पाहिजे, या सभगृहाच्या माध्यमातून. आणि मी आसंही जरी म्हटल आसत की छत्रपती शिवाजी महाराजांचा झेंडा घेवून त्यांच नाव घेवून आपण गेली ४० वर्षे आपण राज्यामध्ये काम करतोय, आज आपण कोणाच्या बरोबर बसलोय, राज्यामध्ये सत्तेत? पाचशे वर्षे तर मुगलांचा काळ होता सोडून द्या, आता, मी आत्ताच म्हणतोय आत्ताच, एक लक्षात ठेवा मला वाद करायचा नाही. परंतु कधी कधी आपण जबाबदार नेते आहोत. आपण जबाबदारीन म्हणजे वैशालीताई महापौर होत्या, जबाबदार पदाधिकारी आहेत. म्हणजे ज्या सगळया चांगल्या गोष्टी, शास्ती कर खरतर आम्ही काढला, याच सभागृहाच्या माध्यमातून काढला मागच्या सरकारच्या काळामध्ये याचही कधीकधी आपण भान ठेवलं पाहिजे आणि आज कोरोना वासीयांच्या माध्यमातून, आज शहरवासीयां मध्ये जी परिस्थीती निर्माण झाली आहे, त्यांचे पगार नाही, ते स्वत:चा कर भरू शकत नाही, त्यांना जर मदत करत असतांना तुमच्या पोटात पोटसूळ उठत असेल तर मला वाटत तुम्ही गरीबाच्या टाळूवरील लोणी खाणारे आहात की काय. माझी मा.महापौर साहेब आपल्याला

विंनती आहे की, ऐवढा चांगला विषय अहे, या शहराच्या गरीबाच्या साठी शास्ती कर कमी व्हावा या मध्ये स्वागत केले पाहिजे, मोठया मनाने स्वागत केले पाहिजे ताई. आपण काय करतोय उपरोधीकपणे म्हणायच की उशिरा सुचलेलं शहाणपण, मला माहीत आहे या शहरवासीयाच हा सागर बोलत होता थोडस सागरच एखाद्या विषयामध्ये १०० टक्के विषयांतर झालं असेल पण एक गोष्ट निश्चित आहे, मी तुम्हाला आजही सांगतो या सभागृहामध्ये आम्ही बहुमताने आहोत, मी आज ठामपण सांगतो पुढच्या महापालिकेमध्ये सुध्दा या भारतीय जनता पार्टीच सत्तेमध्ये येणार आहे. आणि मी तुम्हांला सांगतो की ज्या पध्दतीने गेल्या पाच वर्षाच्या काळामध्ये राज्यामध्ये असेल, गेल्या सात-आठ वर्षाच्या काळामध्ये देशामध्ये असेल आणि या पाच वर्षाच्या काळामध्ये महापालिकेमध्ये भारतीय जनता पार्टीच्या माध्यमातून जी काम केली मला माहित आहे.....

मा.महापौर - वैशालीताई तुम्ही शांत राहा एकनाथ पवार बोलतात.

मा.एकनाथ पवार – मा.महापौर साहेब, शास्तीकराच्या संदर्भामध्ये विषय सभागृहामध्ये आला या शहरवासीयांना न्याय देण्यासाठी हा विषय आणला, खर तर ह्या विषयाचा मी जाहीरपणे समर्थन करतो, आणि ज्यांना ज्यांना उपरोधीकपणे या विषयावर बोलायच आहे मला आस वाटतं की शाब्दीक जुगडबंदी तर आपण कधीही करू शकतो परंतु जो चांगला विषय आहे, शहरवासीयांच्या भल्याचा विषय आहे, त्याच जाहीरपण समर्थन करण्याची भूमिका घेतली पाहिजे. मा.सभागृहाला विनंती करतो की छात्रपती शिवरायांच्या बद्दलच खरं तर मा.पंतप्रधान काय म्हणले, मा.मुख्यमंत्री काय म्हणले याच्या संदर्भामध्ये खर तर या गोष्टीचे मी पण नाही ये हे लक्षात ठेवा अशा पध्दतीचा विचार या सभागृहाच्या माध्यमातून आपल्या सगळयांच्या मनामध्ये घ्यावा, ऐवढीच कळकळीची विनंती करतो आणि थांबतो, धन्यवाद.

**मा.संदीप वाघेरे-** मा.महापौर, मा.आयुक्त, सन्मा.सभागृह. आता माझे मित्र सचिन भोसले यांनी जो विषय मांडला बेळगाव मध्ये छत्रपती शिवाजी महाराजांच्या पूतळयाची विटंबना झाली, छत्रपती शिवाजी महाराज नुसत्या महाराष्ट्राचे आराध्य दैवत नाहीयेत उभ्या हिंदूस्थानचे आहेत आणि मला वाटत नाही की छत्रपतीपेक्षा या भारतामध्ये किंवा या महाराष्ट्रामध्ये कुणी मोठा आसेल. म्हणजे मी तर म्हणलो होतो मागच्या वेळेला एक आमच्या इथं आसच झाल होतं की, पिताश्री मोठे आहेत का छत्रपती मोठे?, तर मी म्हणतो माझ्या बापापेक्षाही छत्रपती शिवाजी महाराज मोठे आहेत, त्यांच्या व्यतीरिक्त कोणीही मोठ नाही. ते होते म्हणून आपण सगळे राहिलेलो आहेत. शक्ती कायदा राज्यांनी केला, मोदी साहेबानी, केंद्रानी पण मुलीच्या लग्नाच वय २१ केल, दोन्ही कायदे चांगले केले त्याच वेळेला मी महापौर साहेब आपल्याला म्हणल होतं की बेळगावमध्ये जी छत्रपती शिवाजी महाराजांच्या पूतळयाची जी विटंबना झाली, त्याचा निषेध करा. पण आपल्या सभागृहात काही निषेध करण्यात आला नाही. ज्यांच नाव घेवून आपल पोटपाणी चाललय किंवा आपण सत्ता भागतोय किंवा विरोधात बसलेत हे सगळ छत्रपती शिवाजी महाराज यांचेच नाव घेवून चालेले आहे. म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जेव्हा संविधान लिहील तेव्हा ते पण म्हटले होते की छत्रपती शिवाजी महाराजांच स्वराज्य माझ्या डोळयापुढं होतं, आणि त्या पध्दतीने मी ही राज्यघटना बनविलेली आहे, आणि आपण साधा सभागृहात जी विटंबना झाली त्याचा निषेधही करु शकत नाही. आता निवडणूका आल्या की छत्रपती शिवाजी महाराज म्हटलं की जय म्हणायला मोकळे झाले. महापौर साहेब

माझी विनंती आहे आपल्याला की आपल्या सभागृहाच्या वतीन जाहीर निषेध करा आणि तो निषेध राज्य सरकारच्या माध्यमातून केंद्रसरकार पर्यंत तो गेला पाहिजे. कोणीही येणार आणि कोणीही उपसूचना काही करणार त्याचे व्हीडीओ रेकॉर्डींग, सीसीटीव्ही फुटेज वगैरे सगळ आलेलं आहे, हे चालणार नाही.

**मा.राहुल कलाटे-** संदिप वाघेरे यांनी जो ठराव मांडला त्या ठरावाल माझं अनुमोदन देतो आणि माई माझीही विनंती आहे  हा ठराव एकमताने करा, सर्वपक्षीय करा.

**मा.संदिप वाघेरे-** महापौर साहेब आता अभिषेकनी जो अनाधिकृत बांधकामाचा विषय घेतला, वास्तविक पाहता पिंपरी चिंचवड शहरामध्ये जे मारुती भापकर सुध्दा फाइट करतात एक लाख पासस्ट हजार अनाधिकृत बांधकाम बाकीच्या गोष्टी आहेत. ते पाडायचे हायकोर्टान आदेश दिलेत, बाकीच्या गोष्टी झाल्यात, बरच पुलाखालन पाणी वाहून गेलेल आहे. प्राधिकरणाचा विषय असेल, रेड झोनचा विषय आसेल, बफर झोनच्या इथ अनधिकृत बांधकामे झालेली आहेत. आयुक्त साहेब माझी आपल्याला विनंती आहे की अनधिकृत बांधकामं जी झालेली आहेत, म्हणजे मोजणी जरी करायची म्हणल तरी संपूर्ण गटातील सर्व्हे नंबरची मोजणी करावी लागते.  मोजणीचे दोन ते तीन लाख रूपये चलन येत, नंतर बाकीच आल, लेबर, बाकीची व्यवस्था म्हणजे  त्या माणसाने जर एक गुंठा जागा घेतली असेल किंवा दीड गुंठा घेतली असेल, पाचशे फूट घेतली असेल त्याला तो खर्च झेपत नाही. परत महापालिकेडून आपल प्लॅन समीतीच डीपी ओपेनीयन बाकीच्या गोष्टी घ्यायच्यात त्याच्यासाठी वेगळा खर्च. म्हणजे  इन ऍन अव्हरेज त्याला एक गुंठ्याचा प्लॅन पास करायला त्याला डेव्हलपमेंट चार्जेस त्याच्या नंतर वेगळे आहे. आता नवीन युनीफाइड आलेले आहे. त्याच्यामध्ये आपण तीन एफएसआय केला म्हणजे स्लम एरीया त्याच्यानंतर पेड एफएसआय, टीडीआर हे सर्व उद्योग करून तीन एफएसआय पर्यंत जात आहेत, याला तुमच्या अधिकारामध्ये  राज्य शासनाकडे पाठवल की ही जी एक-एक, दोन-दोन गुंठयाची घर केलेली आहेत ही जर  तीन एफएसआयची केलेली आहेत युनीफाइड मध्ये, तेच  आपण  एक गुंठा-दोन गुंठा घरांना जर लागू केले तर ह्या गरीब लोकांची घर रेग्यूलर होतील अणि त्याच्यामध्ये एक अशी सुधारणा करा सरकारी मोजणीं न आणता प्रायव्हेट सर्व्हेअर कडनं म्हणजे डीपी ओपेनियन घेण्यात आल म्हणजे त्याचा खर्च तो मोजणीचा वाचेल तो ओपेनियन त्याला भेटेल, आणि ते कागदपत्र ऑथोन्टीक करण्यासाठी ठराविक लोकांना हे करा, की बाबा याच्याकडून हे आल आहे आणि नगररचने कडन त्यांचा अभिप्राय प्रायव्हेट मोजणीचा घेतला म्हणजे त्याचा रोड असेल, रिझर्वेशन असेल कशाने बाधित न होता त्याच परमीशन होत असेल आणि मार्जीनला त्याला रिलॅक्शेशन दिल, साइड मार्जीन ब-यापैकी सगळयानी एक एक, दोन दोन गुंठे जागा घेवून सूरू केलेले आहे, मग त्या साईड मार्जीनमध्ये जर इन्क्लूडींग त्याला कॉम्पेन्शेशन मध्ये किंवा दंडात्मक कारवाई करून जर केलतर महापालिकेत अनधिकृत बांधकामाचा विषय राहणार नाही. म्हणजे ज्यांनी तीन मजले, चार मजले आज बांधकामं केलेली आहेत, म्हणजे एक गुंठ्यामध्ये तीन एफएसआय आस साध जर गणीत धरलं तर साडे सातशे फुटाचे चार स्लॅब चार मजल्या पर्यंत  आपल्याला रेग्यूलर करता येईल.  महापौर साहेब छत्रपती शिवाजी महाराजांची जी विटंबना झाली तो ठराव मंजूर करा. नंतर मी परत बोलतो, निषेधाचा ठराव मंजूर करा.

**मा.नामदेव ढाके-** मा.महापौर, मा.आयुक्त, सन्मा.सभागृह. खरं म्हणजे विषय क्र. एक आपण या ठिकाणी मांडला आणि हा जो काही विषय क्र.आहे आपण खर म्हणजे जे एक रकमी मिळकत कर भरतील अशांना ९० टक्के, ८० टक्के आणि ७० टक्के सवलत देण्याबाबत हा विषय पत्रीकेवरती विषय आहे. खरं म्हणजे महापौर साहेब आपल्या सगळयांना माहिती आहे की गेल्या दीड दोन वर्षामध्ये या सन्मा.महापौर या संदर्भामध्ये गेल्या दीड दोन वर्षामध्ये कोरोनाच्या महामारीमुळे नागरीकांना मिळकत कर भारण्यासंदर्भात आपण ही योजना आणलेली आहे आणि याच संदर्भामध्ये सभागृहात माजी महापौर ताईंनी उल्लेख केला, उशीरा सूचलेल शहानपण. खरं म्हणजे सन्मा.महापौर आपल्याला माहीती आहे.

(सभागृहात गोंधळ)

मा.महापौर – पक्षनेते तुम्ही बोला, बाकीच्यांनी खाली बसावे.

मा.नागदेव ढाके – मा.महापौर साहेब, या सभागृहामध्ये माजी महापौरांनी म्हणाल्या उशिरा सुचलेल शहाणपण. या कोरोनाच्या महामारीमुळे ज्यांचे पती वारले आणि त्या विधवा झाल्या अशा महिलांना २५ हजार देणारी पहिली महापालिका या राज्यामध्ये आहे, किंबहूना देशामध्ये ही महानगरपालिका आहे. त्यांना विसर पडला असेल. परंतु आणि त्याच्यानंतर राज्य सरकारने विधवांना ५० हजार रूपये देण्याच काम केलं मग राज्य शासनाला उशिरा शहानपण आल, आम्ही पण मान्य करतो, ठीक आहेना त्याच्यामध्ये फायदा तरी आहे ना लोकांचा नागरीकांचा व विधवा महिलांचा. आणि त्या संदर्भामध्ये सन्मा.महापौर हा विषय आपण याठिकाणी केला. आणि मला आनंद वाटतो की आपण कोरोनाच्या मध्ये ज्या विधवा झाल्या महिला त्यांना स्वावलंबी करण्यासाठी, आत्मनिर्भर करण्यासाठी या महानगरपालिकेच्या माध्यमामधून, नागरवस्तीच्या माध्यमामधून आपण त्या सिंबायोसिस कॉलेजच्या माध्यमामधून या महिलांना स्वत:च्या पायावर उभं राहता आल पाहिजे, त्यांना प्रशिक्षीत केलं, त्यांना स्वत:चा रोजगार करता आला पाहिजे. नुसते २५ हजार रुपये देऊन सोडले नाही तर त्यांना स्वावलंबी करण्याच काम आपण या महानगरपालिकेच्या नागरवस्तीच्या विभागाच्या माध्यमामधून केल आणि कुठंतरी खरं म्हणजे त्यांना सुध्दा विरोधकांना किंवा माजी महापौरांना वाटल पाहिजे की महिलांच्या बद्दलचा हा विषय आहे आणि विशेष करून ज्या विधवा आहेत, ज्यांचे पती कोरोनाने गेले अशांचा हा विषय आहे. कोरोना अजूनही आत्ता आत्ता संपलेला आहे दोन महिन्यापासून आणि त्या विधवा महिलांना आपण या वेगवेगळया माध्यमातून योजना देतोय, आपण खरं म्हणजे त्याच कौतुक करायला पाहिजे की या महिला विधवा झाल्या त्यांच्यावरती खरं म्हणजे आता आर्थीक परिस्थिती त्यांची बीकट झालेली असतांना त्यांना आपण स्वत:च स्वावलंबन व आत्मनिर्भर करण्यासाठी आपण त्यांना कुठंतरी बुडत्याला काठीचा आधार म्हणून त्याला एक मदत म्हणून घोषित करतोय, त्यांचा कर माफ करायचा, म्हणजे विधवा झाल्या महिला त्यांच्या कडे उत्पन्नाच स्त्रोत नसल्यामुळे त्यांना कुठतरी आपण महानगरपालिकाची आपली सगळयांची जबाबदारी म्हणून आपण सन्मा.महापौर तो विषय या ठिकाणी आणलेला आहे. खरं म्हणजे प्रत्येक विषयाच राजकारण करायच आणि प्रत्येक विषयाला पक्षाची मिटींग आहे का म्हणायचं, परंतु ही एक भावनाच आहे ती पक्षाच्या माध्यमातून मा.महापौर साहेब. ते असते ना अन्त्योदयाची विचारधारा आमची आहे आणि अन्त्योदय हेच सांगतो आम्हाला की वंचीत पीढीत आणि शेवटचा घटक त्याच्यासाठी सातत्यान मदत करायच, ही आमची भूमिका

आहे भारतीय जनता पार्टीची आणि ती आम्ही करत राहतो. म्हणून करतो आम्ही खरं तर या संदर्भामध्ये आस जेष्ठ नगरसेविकांनी उल्लेख करण हे आता एकनाथरावांनी सांगितल की अनधिकृत बांधकाम, शास्ती कर, कुणी लावला, कधी काढला परत आपण या महासभेमध्ये ठराव करून दिले दोन वर्ष झाले.  ज्यावेळेस २०१९ ला सत्तांतर झालं त्या वेळेला या जिल्ह्याच्या पालक मंत्र्यांनी सांगितल आम्ही लगेच करू, त्यांनीच लावलेला शास्तीकर होता, राष्ट्रवादीच्या काळात लावलेला शास्तीकर होता, तो करायला आम्ही थांबवल कुठं? सन्मा.महापौर आपण या महासभेमध्ये ठराव करून दिलेला आहे, मी परत उल्लेख करणार आहे एकनाथरावांनी जे म्हटलं ते, एक हजार पर्यंतचा शास्तीकर माफ केला जो आम्ही लावलेला नव्हता.  2000 पर्यंतचा 0.5 आता केला तो आम्ही लावलेला नव्हता.

(सभागृहात गोंधळ)

मा.महापौर -  पक्षनेते बोलतात त्यांच बोलणं होवू दया, वैशालीताई आपण खाली बसानां. सचिन भोसले आपण खाली बसा.

मा.नामदेव ढाके -  सन्मा.महापौर अशा प्रकारे गरीबांना मदत करण्याचा विषय आणत असतांना त्याला कुठं तरी राजकीय वळण देण्याचा प्रकार याठिकाणी  विरोधकांच्या माध्यमातून केला जात आहे. जस एकनाथरावांनी सांगीतल शिव छत्रपतींच्या संदर्भामध्ये.....

(सभागृहात गोंधळ)

मा.महापौर -  सभागृहामध्ये असं काही करायच नाही, सभागृहाबाहेर जावुन घोषणा दया.

मा.नामदेव ढाके -  सचिन भोसलेनी याठिकाणी सांगीतल सन्मा.छत्रपती शिवाजी महाराज यांच्या बद्दल त्याठिकाणी पुतळयाची विटंबना केली आम्ही त्या छत्रपती शिवाजी महाराजांचा सन्मान करणारे कार्यकर्ते आहोत......

(सभागृहात गोंधळ)

मा.नामदेव ढाके-  मा.महापौर साहेब या सभागृहामध्ये उल्लेख केला की महीलांच्या वरती अत्याचार होतो त्या संदर्भामध्ये कायदा केला आम्ही त्याच अभिनंदन केलं. परंतु ज्या प्रवृत्ती आहेत त्या प्रवृत्तीन अशाप्रकारची घटना केलेली आहे त्यांच्यावरती कारवाई झाली पाहीजे, त्यांना शासन झाल पाहीजे, त्या वृत्तीचा विरोध केला पाहीजे. सन्मा.महापौर साहेब, हा विषय उपसूचनेसह मंजूर करावा. छत्रपती शिवाजी महाराजांचा आदर करणारे आम्ही आहेत, छत्रपती शिवाजी महाराजांचा आदर करतो व त्या प्रवृत्तीचा मी निषेध करतो.

(सभागृहात गोंधळ)

मा.महापौर- विषय  क्र.१ हा उपसूचनेसह मंजूर करणेत येत आहे.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा दुरुस्त ठराव मतास टाकणेत आला असता—

ठराव क्रमांक - ७४२ विषय क्रमांक – १

दिनांक – २४/१२/२०२१ विभाग – मा.आयुक्त

संदर्भ- १) मा.कदम शशिकांत व मा.भोईर सुरेश यांचा प्रस्ताव.

२) मा.स्थायी समितीकडील ठ.क्र.१०७५२ दि.२५/११/२०२१

कोरोना महामारीमुळे मोठ्या प्रमाणावर मनपा हद्दीतील नागरीकांच्या उत्पान्नावर परिणाम झालेला आहे. सध्या कोरोनाचा प्रादुर्भाव कमी झालेला आहे. अर्थव्यवस्था पुर्व पदावर येत आहे. त्यामुळे मिळकतकर धारकांना कर भरण्यास प्रोत्साहन देणे कामी थकबाकीच्या दंड रक्कमेवर सवलत देऊन दिलासा देणे आवश्यक आहे. मिळकत करधारकांकडून थकाबाकी ची रक्कम वसुल होणे कामी मिळकत करांची थकबाकी एक रक्कमी भरल्यास मनपा अधिनियम अनुसूची ड प्रकरण ८ नियम ५१ अन्वये शास्ती /दंडाच्या रक्कमेत खालील प्रमाणे सवलत देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

| | | |
|---|---|---|
| थकबाकी सह मिळकत कराची रक्कम एकरक्कमी भरल्यास | कालावधी जानेवारी २०२२ अखेर | मनपाकर शास्ती /दंड रक्कमेच्या ९०% सवलत |
| थकबाकी सह मिळकत कराची रक्कम एकरक्कमी भरल्यास | कालावधी फेब्रुवारी २०२२ अखेर | मनपाकर शास्ती/ दंड रक्कमेच्या ८०% सवलत |
| थकबाकी सह मिळकत कराची रक्कम एकरक्कमी भरल्यास | कालावधी मार्च २०२१ अखेर | मनपाकर शास्ती /दंड रक्कमेच्या ७०% सवलत |

वरील प्रमाणे मिळकत कर थकबाकी रकमेसह एकरकमी भरल्यास मनपाकर रक्कमेवरील शास्ती / दंड रक्कमेवर सवलत देणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच सन २०२०-२१ व २०२१-२२ या कालावधीत मनपा हद्दीमधील ज्या निवासी मिळकतकर धारकांचे कोरोना या महामारीने मृत्यु झालेला आहे. व त्यांच्या नावावर मिळकत आहे. आशा कुटुंबाला दिलासा देणे कामी सन २०२२-२३ या सरकारी वर्षाकरीता कराचे व करेत्तर बाबीचे दर निश्चित करताना आशा मिळकतींना चालु सरकारी वर्षाचे चालु मागणीतील सन २०२२-२३ या आर्थिक वर्षाच्या देय सामान्य कर रक्कमेच्या १०० % सुट तसेच मिळकत कर हस्तांतरण नोंद नोटीस फी मिळकतकर धारकांच्या कुंटुंबियाना माफ करण्यास मान्यता देणेत येत आहे. तसेच कोरोना मुळे मृत्यु झालेल्या मिळकतकर धारकांच्या मिळकती हस्तांतरण करण्याची मोहीम ३१ जानेवारी २०२२ पर्यंत राबविणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच १) पिंपरी चिंचवड महानगरपालिका “सर्वोत्कृष्ट क्रीडा पुरस्कार” (खेळाडू, दिव्यांग खेळाडू व मार्गदर्शक), “आंतरराष्ट्रीय खेळाडू पुरस्कार धोरण” तयार करणेस मान्यता देणेत येत आहे. २) महानगरपालिकेच्या अ,ब,क, वर्ग व्यायाम शाळा धोरण तयार करणेस मान्यता देणेत येत आहे. ३) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने, कबड्डी खेळाचे खेळाडू दत्तक घेऊन, पिंपरी चिंचवड महानपगरपालिका व्यावसायिक कबड्डी संघ (महिला व पुरुष) तयार करणेबाबतचे धोरण तयार करणेस मान्यता देणेत येत आहे. या ३ क्रीडा विषयक बाबींची धोरणे तयार करुन

त्या बाबतचे अधिकार मा.आयुक्त यांना देणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होण्याची वाट न पाहता ठरावा प्रमाणे अंमलबजावणी करणेस मान्यता देण्यात येत आहे.

अनुकूल -७२ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

(सभागृहात गोंधळ)

मा.महापौर - सर्वांनी खाली बसून घ्या, सर्वांनी बसून घ्या. छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळयाची विटंबना झाली त्याचा मी निषेध करते.

(सभागृहात गोंधळ)

मा.सिमा सावळे – मा.महापौर साहेब, माझी सगळया सदस्यांना विनंती आहे की आपण जागेवर बसाव आणि या सभागृहात नव्हेतर देशात राहणा-या सर्व नागरीकांना छत्रपतींचा तेवढाच अभिमान आहे, छत्रपती शिवाजी महाराज की जय, जय भवानी, जय शिवाजी. धन्यवाद. मा.महापौरांना सुध्दा ठराव मंजूर करायचा आहे तुम्ही इतक्या संख्येनी त्यांच्यासमोर गेल्यामुळे त्यांनी सुध्दा निषेध नोंदवलेला आहे. माझी मा.महापौरांना विनंती आहे की छत्रपतींचा अपमान या देशात राहणा-या कुठलाही व्यक्ती सहन करणार नाही त्यामुळे आपण ठराव मंजूर करावा.

(सभागृहात गोंधळ)

मा.महापौर - सर्वांनी खाली बसून घ्या. कर्नाटकमध्ये झालेल्या शिवाजी महाराजांची विटंबना त्या घटनेचा मी निषेध करते, ठराव मंजूर. विषय क्रमांक २ वाचावा.

मा.राजेंद्र गावडे - मा.महापौर साहेब, विषय क्रमांक २ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

विषय क्रमांक – २

दिनांक – २४/१२/२०२१ विभाग – मा.आयुक्त

संदर्भ-१) मा.कदम शशिकांत व मा.भोईर सुरेश यांचा प्रस्ताव.

२) मा.स्थायी समितीकडील ठ.क्र.१०७५५ दि.२५/११/२०२१

सन २०२१-२२ च्या अंदाजपत्रकात नागरीकांच्या मागणी व विकासाच्या दृष्टीने स्थापत्य भांडवली नविन कामासाठी प्रस्तावात नमूद प्रमाणे नविन तरतुद वर्ग करणेत यावी.

| अ. क्र. | लेखाशिर्ष / कामाचे नाव | पानांक | अनु. क्र. | लेखाशिर्ष | अंदाज पत्रकीय रक्कम | सन २०२१-२०२२ चा मूळ अंदाज | सन २०२१-२०२२ वाढ करावयाची तरतूद | सन २०२१-२०२२ घट करावयाची तरतूद | सन २०२१-२०२२ करावयाची सुधारित तरतूद |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | अग्निशामक विभाग आगसुरक्षा निधी भाग १ महसुली जमा आरंभिची शिल्लक अ.क्र. १ | २९० ते २९१ | १ | अग्निशामक विभाग आगसुरक्षा निधी भाग १ महसुली जमा आरंभिची शिल्लक अ.क्र. १ | | १४६,५६,००००० | | ९६,००,००,००० | |
| १ | अंदाजपत्रक ३ स्थापत्य भांडवली खर्च | ४ व ५ | १ | स्थापत्य अ क्षेत्रिय | | ४२२१७१००० | १२,००,००,००० | | |
| २ | | | २ | स्थापत्य ब क्षेत्रिय | | ६७२६५०००० | १२००,००,००० | | |
| ३ | | | ३ | स्थापत्य क क्षेत्रिय | | ७०९६७६००० | १२००,००,००० | | |
| ४ | | | ४ | स्थापत्य ड क्षेत्रिय | | २५२६७७००० | १२००,००,००० | | |
| ५ | | | ५ | स्थापत्य इ क्षेत्रिय | | ४६०४३४००० | १२००,००,००० | | |
| ६ | | | ६ | स्थापत्य फ क्षेत्रिय | | ३७१९४०५७५ | १२००,००,००० | | |
| ७ | | | ७ | स्थापत्य ह क्षेत्रिय | | २४०७०९००० | १२००,००,००० | | |
| ८ | | | ८ | स्थापत्य ग क्षेत्रिय | | ३८८९१८००० | १२००,००,००० | | |
| | एकुण | | | | | | ९६,००,००,००० | ९६,००,००,००० | |

भांडवली खर्च अंदाजपत्रकीय ३ मधील स्थापत्य विभागवार भांडवली खर्चाच्या क्षेत्रिय कार्यालयाच्या स्थापत्य भांडवली खर्चाच्या अंदाजपत्रकात नविन कामे काढणे साठी तरतुद वर्ग करणेस मान्यता देणेकामी तसेच नविन कामाच्या निविदा काढणेसाठी स्थापत्य भांडवली खर्च मधील कामनिहाय तरतुद वर्ग करणेचे आदेश स्थापत्य विभागाने निर्गत करणेस मान्यता देणेत यावी. (वाढ/ घट र.रु.९६,००,००,०००/- )

मा.ज्ञानदेव थोरात - मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

मा.उत्तम केंदळे - मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो- पिंपरी चिंचवड महानगरपालिका, प्रभाग क्र.१३ मधील विकास कामे करणेची मागणी स्थानिक नागरिक करत आहे. खालील कामाची आवश्यकता असून सदरच्या कामाचा सन २०२१-२२ च्या अंदाजपत्रकात नव्याने समावेश करून प्रशासकीय मान्यता व आवश्यक ती तरतूद वर्गीकरणास मान्यता देणेत यावी.

| अ. क्र | उप लेखाशिर्ष अथवा कामाचे नाव | लेखाशिर्ष | पान क्र | अ.क्र | प्रशासकिय मान्यता र.रु | सन २०२१-२२ मूळ तरतूद | वाढ | घट | सुधारित तरतूद | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | सन २०२२-२३ मध्ये वॉर्ड क्र १३ येथील शिवभुमी विद्यालय परिसरातील उर्वरीत रस्ते डांबरीकरण करणे | डांबरी रस्ते | - | - | १००००००० | ० | ७०००००० | ० | ७०००००० | अ.क्र.१४ वरून वर्ग |

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २ | सन २०२२-२३ मध्ये वॉर्ड क्र १३ येथील विश्वकर्मा उद्यान परिसरातील उर्वरीत रस्ते डांबरीकरण करणे | डांबरी रस्ते | - | - | १००००००० | ० | ७०००००० | ० | ७०००००० | अ.क्र.१४ वरून वर्ग |
| ३ | सन २०२२-२३ मध्ये वॉर्ड क्र १३ येथील स्किम नं ९,१०,११ परिसरातील उर्वरीत रस्ते डांबरीकरण करणे | डांबरी रस्ते | - | - | १००००००० | ० | ७०००००० | ० | ७०००००० | अ.क्र.१४ वरून वर्ग |
| ४ | सन २०२२-२३ मध्ये वॉर्ड क्र १३ येथील मॉर्डन शाळा व सभोवतालच्या परिसरातील उर्वरीत रस्ते डांबरीकरण करणे | डांबरी रस्ते | - | - | १००००००० | ० | ७०००००० | ० | ७०००००० | अ.क्र.१४ वरून वर्ग |
| ५ | सन २०२२-२३ मध्ये वॉर्ड क्र १३ येथील अष्ठविनायक कॉलनी किर्लोस्कर कॉलनी परिसरातील उर्वरीत रस्ते डांबरीकरण करणे | डांबरी रस्ते | - | - | १००००००० | ० | ७०००००० | ० | ७०००००० | अ.क्र.१४ वरून वर्ग |
| ६ | सन २०२२-२३ मध्ये वॉर्ड क्र १३ येथील स्किम नं ५ व ६ परिसरातील उर्वरीत रस्ते डांबरीकरण करणे | डांबरी रस्ते | - | - | १००००००० | ० | ७०००००० | ० | ७०००००० | अ.क्र.१४ वरून वर्ग |

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ७ | भक्ती शक्ती ते त्रिवेणीनगर चौकापर्यंत जॉगिंग ट्रॅक व इतर अनुषंगिक कामे करणे | स्थापत्य उद्यान | - | - | ४०००००० | १००००० | १२००००० | ० | १२१००००० | अ.क्र.१४ वरून वर्ग |
| ८ | प्रभाग क्र.१३ येथील कै.प्रबोधनकार ठाकरे क्रिडा संकुलचे आधुनिकीकरण करणे व इतर स्थापत्य विषयक कामे करणे | स्थापत्य - क्रीडा विषयक कामे | - | - | ३००००००० | ० | १२००००० | ० | १२००००० | अ.क्र.१४ वरून वर्ग |
| ९ | प्रभाग क्र.१३ निगडी यमुनानगर मध्ये नेमबाजी प्रशिक्षण केंद्रासाठी बंदिस्त सभागृह बांधणे | स्थापत्य - क्रीडा विषयक कामे | - | - | १००००००० | ० | ३०००००० | ० | ३०००००० | अ.क्र.१४ वरून वर्ग |
| १० | सन २०२२-२३ मध्ये वॉर्ड क्र १३ येथील स्किम नं १० व ११ परिसरातील स्टॉर्म वॉटर पेव्हींग ब्लॉक व इतर आवश्यकतेनुसार स्थापत्य विषयक कामे करणे | स्थापत्य विषयक कामे करणे | - | - | १००००००० | ० | ५०००००० | ० | ५०००००० | अ.क्र.१४ वरून वर्ग |
| ११ | प्रभाग क्र १३ येथील नाला दुरुस्ती करून नाला ट्रेनिंग करणे | नाला ट्रेनिंग | - | - | १००००००० | ० | ५०००००० | ० | ५०००००० | अ.क्र.१४ वरून वर्ग |
| १२ | प्रभाग क्र.१३ येथील धर्मवीर संभाजी राजे क्रीडांगणाचे आधुनिककरण करणे व स्थापत्य | स्थापत्य क्रीडा विषयक कामे | - | - | २००००००० | ० | ६०००००० | ० | ६०००००० | अ.क्र.१४ वरून वर्ग |

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | विषयक सुधारणांची कामे करणे | | | | | | | | | |
| १३ | फ प्रभागांतर्गत निवडणुकीकरिता मंडप व्यवस्था करणे व इतर अनुषंगिक कामे करणे | स्थापत्य फ क्षेत्रीय कार्यालय | - | - | ३००००००० | ० | १५०००००० | ० | १५०००००० | अ.क्र.१४ वरून वर्ग |
| १४ | अग्निशामक विभाग आग सुरक्षा निधी भाग १ महसुली जमा आरंभीची शिल्लक अ.क्र.१ , अंदाजपत्रक ३ स्थापत्य भांडवली खर्च | स्थापत्य फ क्षेत्रीय | २९० ते २९१ | | | १४६५६००००० | ० | १०००००००० | १३६५६००००० | अ.क्र.१ ते १३ वर वर्ग |
| | एकूण = | | | | २१००००००० | १४६५७००००० | १०००००००० | १०००००००० | १४६५७००००० | |

तरी यास मान्यता देणेत यावी.

तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिका, सन २०२२-२३ मध्ये वॉर्ड क्र १३ से क्र २२ येथील कामे करणेची मागणी स्थानिक नागरिक करत आहे. खालील कामाची आवश्यकता असून सदरच्या कामाचा सन २०२१-२२ च्या अंदाजपत्रकात समावेश करून प्रशासकीय मान्यता व आवश्यक ती तरतूद वर्गीकरणास मान्यता देणेत यावी.

| अ.क्र | उप लेखाशिर्ष अथवा कामाचे नाव | लेखा शिर्ष | पान क्र | अ.क्र | प्रशासकिय मान्यता र.रु | सन २०२१-२२ मूळ तरतूद | वाढ | घट | सुधारित तरतूद | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | सन २०२२-२३ मध्ये वॉर्ड क्र १३ से क्र २२ येथील पी सी एम सी कॉलनी अंकुश चौक आझाद चौक व सभोवतालच्या परिसरातील अंतर्गत रस्ते दुरूस्ती करून डांबरीकरण करणे | महसुली | - | - | २००००००० | ० | १००००००० | ० | १००००००० | अ.क्र.३ वरून वर्ग |

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २ | सन २०२२-२३ मध्ये वॉर्ड क्र १३ से क्र २२ येथील मिलिंदनगर इंदिरानगर राजनगर काळभोर गोठा व सभोवतालच्या परिसरातील अंतर्गत रस्ते दुरूस्ती करून डांबरीकरण करणे | महसुली | - | - | २००००००० | ० | १००००००० | ० | १००००००० | अ.क्र.३ वरून वर्ग |
| ३ | अग्निशामक विभाग आग सुरक्षा निधी भाग १ महसुली जमा आरंभीची शिल्लक अ.क्र.१ , अंदाजपत्रक ३ स्थापत्य भांडवली खर्च | स्थापत्य फ क्षेत्रीय | २९० ते २९१ | | | १३६५६०००००० | ० | २००००००० | १३४५६०००००० | अ.क्र.१ व २ वर वर्ग |
| | एकूण = | | | | ४००००००० | १३६५६०००००० | २००००००० | २००००००० | १३६५६०००००० | |

तरी यास मान्यता देणेत यावी.

तसेच सन २०२१-२२ च्या मूळ अंदाजपत्रकातील कामांना तरतूदस मान्यता देणेत यावी.

| अ.क्र. | लेखा शिर्ष | उपलेखाशिर्ष अथवा कामांचे नाव | पानांक | अ. क्रं. | सन २०२१-२२ ची मुळ अंदाज (उपलब्ध तरतूद) | वाढ करावयाची तरतुद | घट करावयाची तरतुद | सन २०२१-२२ चा सुधारीत अंदाज |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | विशेष योजना | प्रभाग क्र.३१ मधील साई चौक सांगवी पोलिस चौकी रस्ता UTWT पद्धतीने विकसीत करणे. | १७ | ३१ | 3000000 | 41200000 | 0 | 44200000 |
| २ | विशेष योजना | प्रभाग क्र.३१ मध्ये UTWT पध्दतीने विकसित करणे. | १७ | २९ | 6200000 | 57000000 | 0 | 63200000 |
| ३ | विशेष योजना | प्रभाग क्र. ३१ मध्ये रस्त्यांचे डांबरीकरण करणे. | १७ | ३० | 5000000 | 2500000 | 0 | 7500000 |
| ४ | अग्निशमन केंद्र | अग्निशामक विभाग आग सुरक्षा निधी भाग १ महसुली जमा आरंभीची शिल्लक अ.क्र.१ | २९० ते २९१ | १ | 1465600000 | 0 | 100700000 | 1364900000 |
| | | एकुण | | | 1479800000 | 100700000 | 100700000 | 1479800000 |

तसेच स्थापत्य PMAY प्रकल्प विभागाकडील पंतप्रधान आवास योजना (खाते क्र.07230100023167) अंतर्गत मनपा अंदाजपत्रकातून हिस्सा या लेखाशिर्षावर अग्निशामक विभाग (आग सुरक्षा निधी) या विभागाच्या भाग क्र.१ अंतर्गत महसुली जमा अंतर्गत अ.क्र.१ आरंभिची शिल्लक या लेखाशिर्षावरील तरतुद वर्ग करणेस मान्यता देणेत यावी.

मा.महापालिका सभा ठराव क्र.६३२, दि.३१/०३/२०२१ अन्वये सन २०२०-२१ चे सुधारीत व २०२१-२२ च्या मुळ अंदाजपत्रकास मान्यता दिलेली आहे.

सदरच्या अंदाजपत्रकांतर्गत मनपा अंदाजपत्रक पुस्तक क्र.१ मधील पान क्र.१८८ वरील अ.क्र.३ प्रधानमंत्री आवास योजना (खाते क्र.07230100023167) या अंतर्गत अंदाजपत्रकातील पान क्र.१९० वरील अ.क्र.४ नुसार मनपा अंदाजपत्रकातून हिस्सा अंतर्गत सन २०२१-२२ च्या मुळ अंदाजपत्रकासाठी र.रु.४९,००,००,०००/- इतकी तरतुद करणेत आलेली आहे.

सदरची तरतुद करताना केंद्र शासन अनुदान, राज्य शासन अनुदान, लाभार्थी हिस्सा व मनपा हिस्सा हे खालीलप्रमाणे प्राप्त होतील असे गृहित धरण्यात आले होते.

| अ.क्र. | अनुदान व रकमा | केंद्र शासन हिस्सा | राज्य शासन हिस्सा | लाभार्थी हिस्सा | मनपा हिस्सा | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | अंदाजपत्रकानुसार | १४४६.६० | १५४१.२० | १२०६८.३८ | ४९००.०० | १९९५६.१८ |
| २ | प्रत्यक्ष प्राप्त | ०.०० | ८०४.०० | ०.०० | ४९००.०० | ५७०४.०० |
| ३ | तफावत | १४४६.६० | ७३७.२० | १२०६८.३८ | ०.०० | १४२५२.१८ |

सन २०२०-२१ चे सुधारीत व २०२१-२२ च्या मुळ अंदाजपत्रकानुसार केंद्र शासन अनुदान, राज्य शासन अनुदान, लाभार्थी हिस्सा व मनपा हिस्सा यानुसार र.रु.१९९,५६,१८,०००/- इतकी रक्कम या आर्थिक वर्षामध्ये प्राप्त होणे अपेक्षित होते. तथापि, आज अखेर पर्यंत मनपा फंडातून उपलब्ध करुन दिलेले, राज्य शासनाकडून प्राप्त झालेले अनुदान र.रु.५७,०४,००,०००/- प्रधानमंत्री आवास योजनेच्या (खाते क्र.07230100023167) या खात्यावर जमा झालेले होते. तथापि प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत चालु असलेल्या प्रकल्पांवरील देयके अदा केल्यानंतर सदरची रक्कम ही आता संपलेली असून सदर प्रकल्पांच्या पुढील येणाऱ्या देयकांसाठी कोणतेही प्रकारची तरतुद प्रधानमंत्री आवास योजनेच्या (खाते क्र.07230100023167) या खात्यावर उपलब्ध नसल्याने लेखा विभागामार्फत प्रस्तावित केलेली देयके अदा करण्यात आलेली नाहीत.

सद्यस्थितीत प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत चऱ्होली, रावेत, बोऱ्हाडेवाडी, आकुर्डी व पिंपरी येथील प्रकल्पांची कामे प्रगतिपथावर असून सदर प्रकल्पांची कामे विहीत मुदतीत पुर्ण होणेकामी ठेकेदारांची बिले अदायगी करणे आवश्यक आहे. प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत प्रकल्पांसाठी मार्च २०२२ पर्यंत लागणा-या रकमेची माहिती पुढीलप्रमाणे आहे.

| **अ.क्र.** | **प्रकल्पाचे नाव** | **मार्च २०२२ पर्यंत आवश्यक असणारी रक्कम** |
|---|---|---|
| १ | चऱ्होली | २५.०० कोटी |
| २ | रावेत | २.०० कोटी |
| ३ | बोऱ्हाडेवाडी | २५.०० कोटी |
| ४ | आकुर्डी | १८.०० कोटी |
| ५ | पिंपरी | ६.०० कोटी |
| **एकुण** | | **७६.०० कोटी** |

उपरोक्त तक्त्यातील आवश्यक र.रु.७६.०० कोटी पैकी र.रु.६०.०० कोटी लेखाशिर्ष – अग्निशामक विभाग (आग सुरक्षा निधी) भाग क्र.१ महसुली जमा मधून वर्ग करणे आवश्यक आहे. तसेच उर्वरित रक्कम स्थापत्य प्रकल्प विभागांतर्गत BSUP व PMAY लेखाशिर्षावरील इतर कामांच्या अखर्चित निधीमधून वर्ग करणेस मान्यता देणेत यावी.

| अ.क्र | लेखाशिर्ष | सन २०२१-२२ चा मुळ अंदाज | वाढ | घट | सन २०२१-२२ ची सुधारीत तरतुद |
|---|---|---|---|---|---|
| १ | अग्निशामक विभाग (आग सुरक्षा निधी) भाग क्र.१ महसुली जमा | १४६,५६,००,००० | ० | १४०,००,००,००० | ६,५६,००,००० |
| २ | अंदाजपत्रक क्र.३ भांडवली खर्च स्थापत्य (अ, ब, क, ड, इ, फ, ह व ग क्षेत्रीय कार्यालय) | ३५१,९१,७५,५७५ | ६४,००,००,००० (प्रत्येक क्षेत्रीय कार्यालयास र.रु.०८ कोटी प्रमाणे) | ० | क्षेत्रीय कार्यालयातील तरतुदीनुसार |
| ३ | प्रधानमंत्री आवास योजना (खाते क्र.07230100023167) | ४९,००,००,००० | ६०,००,००,००० | ० | १०९,००,००,००० |
| | मोशी पिंपरी चिंचवड येथील से. १४ मधील पिंपरी चिंचवड शहरासाठी न्यायालयीन इमारतीचे बांधकाम करणे | १६००००००० | १६००००००० | ० | १६००००००० |
| | **एकुण** | | **१४०,००,००,०००** | **१४०,००,००,०००** | |

दि.१६/१२/२०२१ च्या महापालिका सभेच्या विषयपत्रातील विषय क्र.२ मधील लेखाशिर्ष – अग्निशामक विभाग (आग सुरक्षा निधी) भाग क्र.१ महसुली जमा आरंभिची शिल्लक अ.क्र.१ पानांक २९० ते २९१ वरील र.रु.१४६,५६,००,०००/- तरतुदीमधून एकुण र.रु.९६,००,००,०००/- सर्व स्थापत्य क्षेत्रीय कार्यालयास स्थापत्य भांडवली खर्च या लेखाशिर्षावर वर्ग करण्यात आलेल्या रकमेमधून प्रत्येक क्षेत्रीय कार्यालयाच्या वर्ग तरतुदीतून र.रु.४,००,००,०००/- कमी करुन वरील तक्त्यानुसार प्रधानमंत्री आवास योजना (खाते क्र.07230100023167) व मोशी पिंपरी चिंचवड येथील से. १४ मधील पिंपरी चिंचवड शहरासाठी न्यायालयीन इमारतीचे बांधकाम करणे यासाठी वर्गीकरण करणेस मान्यता देणेत यावी.

तसेच ब क्षेत्रिय कार्यालया अंतर्गत प्रभाग क्र.१७ मधील स्थापत्य विशेष योजना/ भांडवली मुख्यालय कामांच्या सन २०२१-२२ च्या मुळ अंदाजपत्रकातील तरतुदी मध्ये वाढ/घट करणेस मान्यता देणेत यावी. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सन २०२१-२२ च्या मुळ अंदाजपत्रकामध्ये प्रभाग क्र.१७ मधील काही स्थापत्य विशेष योजना/ भांडवली मुख्यालय चालू कामांना तरतुदी कमी असल्याने न काढता येणा-या कामाच्या अखर्चित तरतुदीतून वाढ/घट करून सदरची कामे पूर्ण करणे आवश्यक आहे.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सन २०२१-२२ च्या मुळ अंदाजपत्रकामध्ये प्रभाग क्र.१७ मधील स्थापत्य विशेष योजना/ भांडवली मुख्यालय या लेखाशिर्षा खालील चालू कामांची लक्षात घेता सदर कामास वाढ/घट व्दारे अखर्चित तरतुदीतुन आवश्यक तरतूद

उपलब्ध करून घ्यावी लागणार आहे. त्या करीता खालील तक्त्यामध्ये नमुद कामाच्या तरतुदी मध्ये वाढ/घट करून मिळणे मान्यता देणेत यावी.

| अनु. क्र | कामाचे नाव | लेखाशीर्ष | पा.क्र | अनु. क्र | अंदाजपत्रकीय रक्कम | सन २०२१-२२ ची तरतूद | वाढ | घट | एकूण आवश्यक तरतूद |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | प्रभाग क्र. १७ बिर्ला हॉस्पिटल पासून वाल्हेकरवाडी पर्यंतचा रस्ता दोन्ही बाजूंनी पदपथ तसेच सायकल ट्रॅक करणे. | स्थापत्य विशेष योजना | २४ | २२ | २००००००००० | ३५००००००० | ५०००००००० | ० | ५०००००००० |
| | अग्निशामक विभाग आग सुरक्षा निधी भाग १ महसुली जमा आरंभीची शिल्लक अ.क्र.१ | अग्निशमन केंद्र | २९० ते २९१ | | | १४६५६०००००० | | ५०००००००० | |
| एकूण | | | | | | | ५०००००००० | ५०००००००० | |

तरी यास मान्यता देणेत यावी.

तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिका अ,ब,क,ड,इ,फ,ग व ह या आठही क्षेत्रिय कार्यालयातील आरोग्य विभागामार्फत घरोघरचा कचरा गोळा करणे, कचरा कुंडीतील कचरा उचलणे, कचरा वाहतुक करणे, रस्ते साफसफाई करणे, डास प्रतिबंधक उपाययोजना करणे, मैला टँकर (सक्शन युनिट) पुरविणे, टॉयलेट व्हॅन पुरविणे इत्यादी कामकाज करणेत येत आहे. पिंपरी चिंचवड, पुणे तसेच आजूबाजूच्या भागातील पालखी सोहळा, विविध सांस्कृतिक व इतर कार्यक्रम, विविध क्रीडा स्पर्धा, झोपडपट्टी परिसर इत्यादी ठिकाणी मोठ्या संख्येने टॉयलेट व्हॅनची मागणी करण्यात येते. सध्या आरोग्य विभागातील वरील सर्व आठही क्षेत्रिय कार्यालयांमधील सुस्थितीतील व उपलब्ध टॉयलेट व्हॅनची संख्या ही अपुरी पडत आहे. टॉयलेट व्हॅनची अपुरी संख्या व वाढती मागणी पाहता १० सीटसचे २० नग टॉयलेट व्हॅन खरेदी करणे आवश्यक आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिका अ,ब,क,ड,इ,फ,ग व ह या आठही क्षेत्रिय कार्यालयातील आरोग्य विभागाकरिता उत्पादित कंपनीकडून GEM Portal / शासकीय दराने टॉयलेट व्हॅन खरेदी करणेकामी सन २०२१-२२ च्या महापालिका मंजूर अंदाजपत्रकामधील वाहन घसारा निधी या लेखाशिर्षातंर्गत “पिंपरी चिंचवड महानगरपालिका अ,ब,क,ड,इ,फ,ग व ह या आठही क्षेत्रिय कार्यालयातील आरोग्य विभागाकरिता १० सीटसचे २० नग टॉयलेट व्हॅन खरेदी करणे” या कामाचा अंतर्भाव करुन प्रति टॉयलेट व्हॅन अंदाजे खर्च एकूण र.रु.९,८२,०००/- (GST सह) किंवा प्रत्यक्ष येणा-या खर्चास तसेच निविदा अटी व शर्तीनुसार १० सीटसचे २० नग टॉयलेट व्हॅन खरेदी करण्यास प्रशासकिय मान्यता देणेत यावी.

तसेच सन २०२१-२२ च्या अंदाजपत्रकात नव्याने काम समाविष्ट करुन त्यास प्रशासकीय मान्यता देणेस व तरतुदीत वाढ/घट करणेस मान्यता देणेत यावी. पिंपरी चिंचवड व झपा शहराची वाढलेली लोकसंख्याव्याने होणारा विकास यामुळे शहरामध्ये होणारी गर्दी, वाहतूक नियमन व नियंत्रण इ. बाबी विचारात घेऊन ऑगस्ट २०१८ साली महाराष्ट्र शासनाने पिंपरी चिंचवड महानगरपालिका व बाजूच्या परिसरासाठी स्वतंत्र पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्त कार्यालय सुरु केलेले आहे. शहरांमध्ये आणि शहरालगतच्या हिंजवडी, चाकण, तळेगाव येथे आयटी कंपनी, ऑटोमोबाईल कंपनी व इतर औद्योगिक वसाहतीमुळे प्रचंड मोठ्या प्रमाणात नागरी वस्ती वाढलेली आहे. त्यासोबतच वाहतूक कोंडी, गुन्हेगारी व चोऱ्या असे प्रकारही वाढत आहे. अशा छोटयामोठया गुन्हेगारावर वचक ठेवण्यासाठी पोलिस पेट्रोलिंगची आवश्यकता असून त्याकरिता मोटर सायकल हे एक प्रभावी साधन आहे. मोटरसायकलने पोलीस कर्मचारी तातडीने कमीत कमी वेळात अरुंद गल्ली बोळ, झोपडपट्टी आदी ठिकाणी पोहोचण्यास मदत होणार आहे. त्यामुळे मा. पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड शहर यांनी पोलिस पेट्रोलिंग करिता १०० Pulsar 150DTSI स्मार्ट बाईक्सच्या सोबत 2 Mike, Siren, Blinkers/Flash lights, Camera, GPS Tracking System, Jammer Holders, Helmet with Helmet Holder etc. Special Fitments ची मागणी दि. ११/०८/२०२१ रोजी मनपाकडे केलेली आहे.

कोविड-१९ या साथ रोगाच्या कालावधीमध्ये मनपा व शहर पोलिस मार्फत मास्क न वापरणा-या विना परवाना अनावश्यक फिरणा-या नागरीकांकडुन वसुल करणेत आलेले दंडात्मक शुल्क मनपा कोषागरात जमा करणेत आलेले आहेत. सदर रक्कमेतुन परताव्यापोटी पोलिस खात्यास स्मार्ट बाईकसह Fitments/ Accessories पुरविणे व बसविणे आवश्यक आहे. त्यानुषंगाने मनपाच्या सन २०२१-२२ चे अंदाजपत्रकामध्ये कामाचे स्वतंत्र लेखाशिर्ष अंतर्भुत नसल्याने सदर उपसुचने द्वारे “पिंपरी चिंचवड शहर पोलिस पेट्रोलिंग करीता स्मार्ट बाईक मोटार सायकलसाठी अत्याधुनिक Fitments/ Accessories पुरविणे व बसविणे.” या लेखाशिर्षाचा समावेश करुन आवश्यक तरतुद वर्गीकरण करणेस मान्यता देणेत यावी.

| अ क्र | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम | लेखा शिर्ष | पान क्र. अ.क्र | सन २०२१-२२ ची तरतूद | वाढ | घट | सन २०२१-२२ चा सुधारित अंदाजपत्रक |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | पिंपरी चिंचवड शहर पोलिस पेट्रोलिंग करीता स्मार्ट बाईक मोटार सायकलसाठी अत्याधुनिक Fitments/ Accessories पुरविणे व बसविणे. | १.५० कोटी | विशेष योजना | - | - | १.१० कोटी | - | १.१० कोटी |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २ | कोविड-१९ महामारीमध्ये विना मुख पट्टी कामी शुल्क वसुल करुन मनपा कोषगारात पोलिस खात्या मार्फत जमा करणेत आलेल्या दंडाच्या रकमेतुन परताव्या पोटी देणे बाबत. | | | - | (जमा रक्कम) २.४७ कोटी | - | १.१० कोटी | १.३७ कोटी |
| | **एकूण** | | | | २.४७ | १.१० | १.१० | २.४७ |

मा.सागर अंगोळकर – मा.महापौर साहेब, उपसूचनेस अनुमोदन देतो.

मा.राजेंद्र गावडे – मा.महापौर साहेब, उपसूचना स्विकारली आहे.

मा.महापौर - विषय क्रमांक २ उपसूचनेसह मंजूर करणेत येत आहे.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा दुरुस्त ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक – ७४३ विषय क्रमांक – २

दिनांक – २४/१२/२०२१ विभाग – मा.आयुक्त

संदर्भ-१) मा.कदम शशिकांत व मा.भोईर सुरेश यांचा प्रस्ताव.
२) मा.स्थायी समितीकडील ठ.क्र.१०७५५ दि.२५/११/२०२१

सन २०२१-२२ च्या अंदाजपत्रकात नागरीकांच्या मागणी व विकासाच्या दृष्टीने स्थापत्य भांडवली नविन कामासाठी प्रस्तावात नमूद प्रमाणे नविन तरतुद वर्ग करणेस मान्यता देणेत येत आहे.

| अ. क्र. | लेखाशिर्ष / कामाचे नाव | पानांक | अनु. क्र. | लेखाशिर्ष | अंदाज पत्रकीय रक्कम | सन २०२१-२०२२ चा मूळ अंदाज | सन २०२१-२०२२ वाढ करावयाची तरतूद | सन २०२१-२०२२ घट करावयाची तरतूद | सन २०२१-२०२२ करावयाची सुधारित तरतूद |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | **अग्निशामक विभाग आगसुरक्षा निधी भाग १ महसुली जमा आरंभिची शिल्लक अ.क्र. १** | **२९० ते २९१** | **१** | **अग्निशामक विभाग आगसुरक्षा निधी भाग १ महसुली जमा आरंभिची शिल्लक अ.क्र. १** | | **१४६,५६,००००० ** | | **९६,००,००,०००** | |
| १ | अंदाजपत्रक ३ स्थापत्य भांडवली खर्च | ४ व ५ | १ | स्थापत्य अ क्षेत्रिय | | ४२२१७१००० | १२,००,००,००० | | |
| २ | | | २ | स्थापत्य ब क्षेत्रिय | | ६७२६५०००० | १२००,००,००० | | |
| ३ | | | ३ | स्थापत्य क क्षेत्रिय | | ७०९६७६००० | १२००,००,००० | | |
| ४ | | | ४ | स्थापत्य ड क्षेत्रिय | | २५२६७७००० | १२००,००,००० | | |
| ५ | | | ५ | स्थापत्य इ क्षेत्रिय | | ४६०४३४००० | १२००,००,००० | | |
| ६ | | | ६ | स्थापत्य फ क्षेत्रिय | | ३७१९४०५७५ | १२००,००,००० | | |
| ७ | | | ७ | स्थापत्य ह क्षेत्रिय | | २४०७०९००० | १२००,००,००० | | |
| ८ | | | ८ | स्थापत्य ग क्षेत्रिय | | ३८८९१८००० | १२००,००,००० | | |
| | **एकुण** | | | | | | **९६,००,००,०००** | **९६,००,००,०००** | |

भांडवली खर्च अंदाजपत्रकीय ३ मधील स्थापत्य विभागवार भांडवली खर्चाच्या क्षेत्रिय कार्यालयाच्या स्थापत्य भांडवली खर्चाच्या अंदाजपत्रकात नविन कामे काढणे साठी तरतुद वर्ग

करणेस मान्यता देणेकामी तसेच नविन कामाच्या निविदा काढणेसाठी स्थापत्य भांडवली खर्च मधील कामनिहाय तरतुद वर्ग करणेचे आदेश स्थापत्य विभागाने निर्गत करणेस मान्यता देणेत येत आहे. (वाढ/ घट र.रु.९६,००,००,०००/-) तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिका, प्रभाग क्र.१३ मधील विकास कामे करणेची मागणी स्थानिक नागरिक करत आहे. खालील कामाची आवश्यकता असून सदरच्या कामाचा सन २०२१-२२ च्या अंदाजपत्रकात नव्याने समावेश करून प्रशासकीय मान्यता व आवश्यक ती तरतूद वर्गीकरणास मान्यता देणेत येत आहे.

| अ. क्र | उप लेखाशिर्ष अथवा कामाचे नाव | लेखाशिर्ष | पान क्र | अ.क्र | प्रशासकिय मान्यता र.रु | सन २०२१-२२ मूळ तरतूद | वाढ | घट | सुधारित तरतूद | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | सन २०२२-२३ मध्ये वॉर्ड क्र १३ येथील शिवभुमी विद्यालय परिसरातील उर्वरीत रस्ते डांबरीकरण करणे | डांबरी रस्ते | - | - | १०००००००० | ० | ७०००००० | ० | ७०००००० | अ.क्र.१४ वरून वर्ग |
| २ | सन २०२२-२३ मध्ये वॉर्ड क्र १३ येथील विश्वकर्मा उद्यान परिसरातील उर्वरीत रस्ते डांबरीकरण करणे | डांबरी रस्ते | - | - | १०००००००० | ० | ७०००००० | ० | ७०००००० | अ.क्र.१४ वरून वर्ग |
| ३ | सन २०२२-२३ मध्ये वॉर्ड क्र १३ येथील स्किम नं ९,१०,११ परिसरातील उर्वरीत रस्ते डांबरीकरण करणे | डांबरी रस्ते | - | - | १०००००००० | ० | ७०००००० | ० | ७०००००० | अ.क्र.१४ वरून वर्ग |
| ४ | सन २०२२-२३ मध्ये वॉर्ड क्र १३ येथील मॉर्डन शाळा व सभोवतालच्या परिसरातील उर्वरीत रस्ते डांबरीकरण करणे | डांबरी रस्ते | - | - | १०००००००० | ० | ७०००००० | ० | ७०००००० | अ.क्र.१४ वरून वर्ग |
| ५ | सन २०२२-२३ मध्ये वॉर्ड क्र १३ येथील अष्ठविनायक कॉलनी किर्लोस्कर कॉलनी परिसरातील उर्वरीत रस्ते डांबरीकरण करणे | डांबरी रस्ते | - | - | १०००००००० | ० | ७०००००० | ० | ७०००००० | अ.क्र.१४ वरून वर्ग |

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ६ | सन २०२२-२३ मध्ये वॉर्ड क्र १३ येथील स्किम नं ५ व ६ परिसरातील उर्वरीत रस्ते डांबरीकरण करणे | डांबरी रस्ते | - | - | १०००००० | ० | ७०००००० | ० | ७०००००० | अ.क्र.१४ वरून वर्ग |
| ७ | भक्ती शक्ती ते त्रिवेणीनगर चौकापर्यंत जॉगिंग ट्रॅक व इतर अनुषंगिक कामे करणे | स्थापत्य उद्यान | - | - | ४०००००० | १००००० | १२०००००० | ० | १२१००००० | अ.क्र.१४ वरून वर्ग |
| ८ | प्रभाग क्र.१३ येथील कै.प्रबोधनकार ठाकरे क्रिडा संकुलचे आधुनिकीकरण करणे व इतर स्थापत्य विषयक कामे करणे | स्थापत्य - क्रीडा विषयक कामे | - | - | ३०००००० | ० | १२०००००० | ० | १२०००००० | अ.क्र.१४ वरून वर्ग |
| ९ | प्रभाग क्र.१३ निगडी यमुनानगर मध्ये नेमबाजी प्रशिक्षण केंद्रासाठी बंदिस्त सभागृह बांधणे | स्थापत्य - क्रीडा विषयक कामे | - | - | १०००००० | ० | ३०००००० | ० | ३०००००० | अ.क्र.१४ वरून वर्ग |
| १० | सन २०२२-२३ मध्ये वॉर्ड क्र १३ येथील स्किम नं १० व ११ परिसरातील स्टॉर्म वॉटर पेव्हींग ब्लॉक व इतर आवश्यकतेनुसार स्थापत्य विषयक कामे करणे | स्थापत्य विषयक कामे करणे | - | - | १०००००० | ० | ५०००००० | ० | ५०००००० | अ.क्र.१४ वरून वर्ग |
| ११ | प्रभाग क्र १३ येथील नाला दुरूस्ती करून नाला ट्रेनिंग करणे | नाला ट्रेनिंग | - | - | १०००००० | ० | ५०००००० | ० | ५०००००० | अ.क्र.१४ वरून वर्ग |
| १२ | प्रभाग क्र.१३ येथील धर्मवीर संभाजी राजे क्रीडांगणाचे आधुनिककरण करणे व स्थापत्य विषयक सुधारणांची कामे करणे | स्थापत्य क्रीडा विषयक कामे | - | - | २०००००० | ० | ६०००००० | ० | ६०००००० | अ.क्र.१४ वरून वर्ग |

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १३ | फ प्रभागांतर्गत निवडणुकीकरिता मंडप व्यवस्था करणे व इतर अनुषंगिक कामे करणे | स्थापत्य फ क्षेत्रीय कार्यालय | - | - | ३००००००० | ० | १५०००००० | ० | १५०००००० | अ.क्र.१४ वरून वर्ग |
| १४ | अग्निशामक विभाग आग सुरक्षा निधी भाग १ महसुली जमा आरंभीची शिल्लक अ.क्र.१ , अंदाजपत्रक ३ स्थापत्य भांडवली खर्च | स्थापत्य फ क्षेत्रीय | २९० ते २९१ | | | १४६५६०००००० | ० | १००००००००० | १३६५६०००००० | अ.क्र.१ ते १३ वर वर्ग |
| | एकूण = | | | | २१०००००००० | १४६५७०००००० | १००००००००० | १००००००००० | १४६५७०००००० | |

तरी यास मान्यता देणेत येत आहे.

तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिका, सन २०२२-२३ मध्ये वॉर्ड क्र १३ से क्र २२ येथील कामे करणेची मागणी स्थानिक नागरिक करत आहे. खालील कामाची आवश्यकता असून सदरच्या कामाचा सन २०२१-२२ च्या अंदाजपत्रकात समावेश करून प्रशासकीय मान्यता व आवश्यक ती तरतूद वर्गीकरणास मान्यता देणेत येत आहे.

| अ.क्र | उप लेखाशिर्ष अथवा कामाचे नाव | लेखा शिर्ष | पान क्र | अ. क्र | प्रशासकिय मान्यता र.रु | सन २०२१-२२ मूळ तरतूद | वाढ | घट | सुधारित तरतूद | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | सन २०२२-२३ मध्ये वॉर्ड क्र १३ से क्र २२ येथील पी सी एम सी कॉलनी अंकुश चौक आझाद चौक व सभोवतालच्या परिसरातील अंतर्गत रस्ते दुरूस्ती करून डांबरीकरण करणे | महसुली | - | - | २०००००००० | ० | १०००००००० | ० | १०००००००० | अ.क्र. ३ वरून वर्ग |

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २ | सन २०२२-२३ मध्ये वॉर्ड क्र १३ से क्र २२ येथील मिलिंदनगर इंदिरानगर राजनगर काळभोर गोठा व सभोवतालच्या परिसरातील अंतर्गत रस्ते दुरूस्ती करून डांबरीकरण करणे | महसुली | - | - | २००००००० | ० | १००००००० | ० | १००००००० | अ.क्र. ३ वरून वर्ग |
| ३ | अग्निशामक विभाग आग सुरक्षा निधी भाग १ महसुली जमा आरंभीची शिल्लक अ.क्र.१ , अंदाजपत्रक ३ स्थापत्य भांडवली खर्च | स्थापत्य फक्षेत्रीय | २९० ते २९१ | | | १३६५६००००० | ० | २००००००० | १३४५६००००० | अ.क्र. १ व २ वर वर्ग |
| | एकूण = | | | | ४००००००० | १३६५६००००० | २००००००० | २००००००० | १३६५६००००० | |

तरी यास मान्यता देणेत येत आहे.

तसेच सन २०२१-२२ च्या मूळ अंदाजपत्रकातील कामांना तरतूद देणेस मान्यता देणेत येत आहे.

| अ.क्र. | लेखा शिर्ष | उपलेखाशिर्ष अथवा कामांचे नाव | पानांक | अ. क्रं. | सन २०२१-२२ ची मुळ अंदाज (उपलब्ध तरतूद) | वाढ करावयाची तरतुद | घट करावयाची तरतुद | सन २०२१-२२ चा सुधारीत अंदाज |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | विशेष योजना | प्रभाग क्र.३१ मधील साई चौक सांगवी पोलिस चौकी रस्ता UTWT पद्धतीने विकसीत करणे. | १७ | ३१ | 3000000 | 41200000 | 0 | 44200000 |
| २ | विशेष योजना | प्रभाग क्र.३१ मध्ये UTWT पध्दतीने विकसित करणे. | १७ | २९ | 6200000 | 57000000 | 0 | 63200000 |
| ३ | विशेष योजना | प्रभाग क्र. ३१ मध्ये रस्त्यांचे डांबरीकरण करणे. | १७ | ३० | 5000000 | 2500000 | 0 | 7500000 |
| ४ | अग्निशमन केंद्र | अग्निशामक विभाग आग सुरक्षा निधी भाग १ महसुली जमा आरंभीची शिल्लक अ.क्र.१ | २९० ते २९१ | १ | 1465600000 | 0 | 100700000 | 1364900000 |
| | | एकुण | | | 1479800000 | 100700000 | 100700000 | 1479800000 |

तसेच स्थापत्य PMAY प्रकल्प विभागाकडील पंतप्रधान आवास योजना (खाते क्र.07230100023167) अंतर्गत मनपा अंदाजपत्रकातून हिस्सा या लेखाशिर्षावर अग्निशामक विभाग (आग सुरक्षा निधी) या विभागाच्या भाग क्र.१ अंतर्गत महसुली जमा अंतर्गत अ.क्र.१ आरंभिची शिल्लक या लेखाशिर्षावरील तरतुद वर्ग करणेस मान्यता देणेत येत आहे.

मा.महापालिका सभा ठराव क्र.६३२, दि.३१/०३/२०२१ अन्वये सन २०२०-२१ चे सुधारीत व २०२१-२२ च्या मुळ अंदाजपत्रकास मान्यता दिलेली आहे.

सदरच्या अंदाजपत्रकांतर्गत मनपा अंदाजपत्रक पुस्तक क्र.१ मधील पान क्र.१८८ वरील अ.क्र.३ प्रधानमंत्री आवास योजना (खाते क्र.07230100023167) या अंतर्गत अंदाजपत्रकातील पान क्र.१९० वरील अ.क्र.४ नुसार मनपा अंदाजपत्रकातून हिस्सा अंतर्गत सन २०२१-२२ च्या मुळ अंदाजपत्रकासाठी र.रु.४९,००,००,०००/- इतकी तरतुद करणेत आलेली आहे.

सदरची तरतुद करताना केंद्र शासन अनुदान, राज्य शासन अनुदान, लाभार्थी हिस्सा व मनपा हिस्सा हे खालीलप्रमाणे प्राप्त होतील असे गृहित धरण्यात आले होते.

| अ.क्र. | अनुदान व रकमा | केंद्र शासन हिस्सा | राज्य शासन हिस्सा | लाभार्थी हिस्सा | मनपा हिस्सा | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | अंदाजपत्रकानुसार | १४४६.६० | १५४१.२० | १२०६८.३८ | ४९००.०० | १९९५६.१८ |
| २ | प्रत्यक्ष प्राप्त | ०.०० | ८०४.०० | ०.०० | ४९००.०० | ५७०४.०० |
| ३ | तफावत | १४४६.६० | ७३७.२० | १२०६८.३८ | ०.०० | १४२५२.१८ |

सन २०२०-२१ चे सुधारीत व २०२१-२२ च्या मुळ अंदाजपत्रकानुसार केंद्र शासन अनुदान, राज्य शासन अनुदान, लाभार्थी हिस्सा व मनपा हिस्सा यानुसार र.रु.१९९,५६,१८,०००/- इतकी रक्कम या आर्थिक वर्षामध्ये प्राप्त होणे अपेक्षित होते. तथापि, आज अखेर पर्यंत मनपा फंडातून उपलब्ध करुन दिलेले, राज्य शासनाकडून प्राप्त झालेले अनुदान र.रु.५७,०४,००,०००/- प्रधानमंत्री आवास योजनेच्या (खाते क्र.07230100023167) या खात्यावर जमा झालेले होते. तथापि प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत चालु असलेल्या प्रकल्पांवरील देयके अदा केल्यानंतर सदरची रक्कम ही आता संपलेली असून सदर प्रकल्पांच्या पुढील येणाऱ्या देयकांसाठी कोणतेही प्रकारची तरतुद प्रधानमंत्री आवास योजनेच्या (खाते क्र.07230100023167) या खात्यावर उपलब्ध नसल्याने लेखा विभागामार्फत प्रस्तावित केलेली देयके अदा करण्यात आलेली नाहीत.

सद्यस्थितीत प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत चऱ्होली, रावेत, बोऱ्हाडेवाडी, आकुर्डी व पिंपरी येथील प्रकल्पांची कामे प्रगतिपथावर असून सदर प्रकल्पांची कामे विहीत मुदतीत पुर्ण होणेकामी ठेकेदारांची बिले अदायगी करणे आवश्यक आहे. प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत प्रकल्पांसाठी मार्च २०२२ पर्यंत लागणा-या रकमेची माहिति पुढीलप्रमाणे आहे.

| **अ.क्र.** | **प्रकल्पाचे नाव** | **मार्च २०२२ पर्यंत आवश्यक असणारी रक्कम** |
|---|---|---|
| १ | चऱ्होली | २५.०० कोटी |
| २ | रावेत | २.०० कोटी |

| | | |
|---|---|---|
| ३ | बोऱ्हाडेवाडी | २५.०० कोटी |
| ४ | आकुर्डी | १८.०० कोटी |
| ५ | पिंपरी | ६.०० कोटी |
| | **एकुण** | **७६.०० कोटी** |

उपरोक्त तक्त्यातील आवश्यक र.रु.७६.०० कोटी पैकी र.रु.६०.०० कोटी लेखाशिर्ष – अग्निशामक विभाग (आग सुरक्षा निधी) भाग क्र.१ महसुली जमा मधून वर्ग करणे आवश्यक आहे. तसेच उर्वरित रक्कम स्थापत्य प्रकल्प विभागांतर्गत BSUP व PMAY लेखाशिर्षावरील इतर कामांच्या अखर्चित निधीमधून वर्ग करणेस मान्यता देणेत येत आहे.

| अ.क्र | लेखाशिर्ष | सन २०२१-२२ चा मुळ अंदाज | वाढ | घट | सन २०२१-२२ ची सुधारीत तरतुद |
|---|---|---|---|---|---|
| १ | अग्निशामक विभाग (आग सुरक्षा निधी) भाग क्र.१ महसुली जमा | १४६,५६,००,००० | ० | १४०,००,००,००० | ६,५६,००,००० |
| २ | अंदाजपत्रक क्र.३ भांडवली खर्च स्थापत्य (अ, ब, क, ड, इ, फ, ह व ग क्षेत्रीय कार्यालय) | ३५१,९१,७५,५७५ | ६४,००,००,००० (प्रत्येक क्षेत्रीय कार्यालयास र.रु.०८ कोटी प्रमाणे) | ० | क्षेत्रीय कार्यालयातील तरतुदीनुसार |
| ३ | प्रधानमंत्री आवास योजना (खाते क्र.07230100023167) | ४९,००,००,००० | ६०,००,००,००० | ० | १०९,००,००,००० |
| | मोशी पिंपरी चिंचवड येथील से. १४ मधील पिंपरी चिंचवड शहरासाठी न्यायालयीन इमारतीचे बांधकाम करणे | १६०००००००० | १६०००००००० | ० | १६०००००००० |
| | **एकुण** | | **१४०,००,००,०००** | **१४०,००,००,०००** | |

दि.१६/१२/२०२१ च्या महापालिका सभेच्या विषयपत्रातील विषय क्र.२ मधील लेखाशिर्ष – अग्निशामक विभाग (आग सुरक्षा निधी) भाग क्र.१ महसुली जमा आरंभिची शिल्लक अ.क्र.१ पानांक २९० ते २९१ वरील र.रु.१४६,५६,००,०००/- तरतुदीमधून एकुण र.रु.९६,००,००,०००/- सर्व स्थापत्य क्षेत्रीय कार्यालयास स्थापत्य भांडवली खर्च या लेखाशिर्षावर वर्ग करण्यात आलेल्या रकमेमधून प्रत्येक क्षेत्रीय कार्यालयाच्या वर्ग तरतुदीतून र.रु.४,००,००,०००/- कमी करुन वरील तक्त्यानुसार प्रधानमंत्री आवास योजना (खाते क्र.07230100023167) व मोशी पिंपरी चिंचवड येथील से. १४ मधील पिंपरी चिंचवड शहरासाठी न्यायालयीन इमारतीचे बांधकाम करणे यासाठी वर्गीकरण करणेस मान्यता देणेत येत आहे.

तसेच ब क्षेत्रिय कार्यालया अंतर्गत प्रभाग क्र.१७ मधील स्थापत्य विशेष योजना/ भांडवली मुख्यालय कामांच्या सन २०२१-२२ च्या मुळ अंदाजपत्रकातील तरतुदी मध्ये वाढ/घट करणेस मान्यता देणेत येत आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सन २०२१-२२ च्या मुळ अंदाजपत्रकामध्ये प्रभाग क्र.१७ मधील काही स्थापत्य विशेष योजना/ भांडवली

मुख्यालय चालू कामांना तरतुदी कमी असल्याने न काढता येणा-या कामाच्या अखर्चित तरतुदीतून वाढ/घट करून सदरची कामे पूर्ण करणे आवश्यक आहे.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सन २०२१-२२ च्या मुळ अंदाजपत्रकामध्ये प्रभाग क्र.१७ मधील स्थापत्य विशेष योजना/ भांडवली मुख्यालय या लेखाशिर्षा खालील चालू कामांची गरज लक्षात घेता सदर कामास वाढ/घट व्दारे अखर्चित तरतुदीतुन आवश्यक तरतूद उपलब्ध करून घ्यावी लागणार आहे. त्या करीता खालील तक्त्यामध्ये नमुद कामाच्या तरतुदी मध्ये वाढ/घट करून मिळणे मान्यता देणेत येत आहे.

| अनु. क्र | कामाचे नाव | लेखाशीर्ष | पा.क्र | अनु. क्र | अंदाजपत्रकीय रक्कम | सन २०२१-२२ ची तरतूद | वाढ | घट | एकूण आवश्यक तरतूद |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | प्रभाग क्र. १७ बिर्ला हॉस्पिटल पासून वाल्हेकरवाडी पर्यंतचा रस्ता दोन्ही बाजूंनी पदपथ तसेच सायकल ट्रँक करणे. | स्थापत्य विशेष योजना | २४ | २२ | २०००००००० | ३५०००००० | ५०००००० | ० | ५०००००० |
| | अग्निशामक विभाग आग सुरक्षा निधी भाग १ महसुली जमा आरंभीची शिल्लक अ.क्र.१ | अग्निशमन केंद्र | २९० ते २९१ | | | १४६५६००००० | | ५०००००० | |
| एकूण | | | | | | | ५०००००० | ५०००००० | |

तरी यास मान्यता देणेत येत आहे.

तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिका अ,ब,क,ड,इ,फ,ग व ह या आठही क्षेत्रिय कार्यालयातील आरोग्य विभागामार्फत घरोघरचा कचरा गोळा करणे, कचरा कुंडीतील कचरा उचलणे, कचरा वाहतुक करणे, रस्ते साफसफाई करणे, डास प्रतिबंधक उपाययोजना करणे, मैला टँकर (सक्शन युनिट) पुरविणे, टॉयलेट व्हॅन पुरविणे इत्यादी कामकाज करणेत येत आहे. पिंपरी चिंचवड, पुणे तसेच आजूबाजूच्या भागातील पालखी सोहळा, विविध सांस्कृतिक व इतर कार्यक्रम, विविध क्रीडा स्पर्धा, झोपडपट्टी परिसर इत्यादी ठिकाणी मोठ्या संख्येने टॉयलेट व्हॅनची मागणी करण्यात येते. सध्या आरोग्य विभागातील वरील सर्व आठही क्षेत्रिय कार्यालयांमधील सुस्थितीतील व उपलब्ध टॉयलेट व्हॅनची संख्या ही अपुरी पडत आहे. टॉयलेट व्हॅनची अपुरी संख्या व वाढती मागणी पाहता १० सीटसचे २० नग टॉयलेट व्हॅन खरेदी करणे आवश्यक आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिका अ,ब,क,ड,इ,फ,ग व ह या आठही क्षेत्रिय कार्यालयातील आरोग्य विभागाकरिता उत्पादित कंपनीकडून GEM Portal / शासकीय दराने टॉयलेट व्हॅन खरेदी करणेकामी सन २०२१-२२ च्या महापालिका मंजूर अंदाजपत्रकामधील वाहन घसारा निधी या लेखाशिर्षातंर्गत “पिंपरी चिंचवड महानगरपालिका अ,ब,क,ड,इ,फ,ग व ह या आठही क्षेत्रिय कार्यालयातील आरोग्य विभागाकरिता १० सीटसचे २० नग टॉयलेट व्हॅन खरेदी करणे” या कामाचा अंतर्भाव करुन प्रति टॉयलेट व्हॅन अंदाजे खर्च एकूण

र.रु.९,८२,०००/- (GST सह) किंवा प्रत्यक्ष येणा-या खर्चास तसेच निविदा अटी व शर्तीनुसार १० सीटसचे २० नग टॉयलेट व्हॅन खरेदी करण्यास प्रशासकिय मान्यता देणेत येत आहे.

तसेच सन २०२१-२२ च्या अंदाजपत्रकात नव्याने काम समाविष्ट करुन त्यास प्रशासकीय मान्यता देणेस व तरतुदीत वाढ/घट करणेस मान्यता देणेत येत आहे. पिंपरी चिंचवड शहराची वाढलेली लोकसंख्या व झपाट्याने होणारा विकास यामुळे शहरामध्ये होणारी गर्दी, वाहतूक नियमन व नियंत्रण इ. बाबी विचारात घेऊन ऑगस्ट २०१८ साली महाराष्ट्र शासनाने पिंपरी चिंचवड महानगरपालिका व बाजूच्या परिसरासाठी स्वतंत्र पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्त कार्यालय सुरु केलेले आहे. शहरांमध्ये आणि शहरालगतच्या हिंजवडी, चाकण, तळेगाव येथे आयटी कंपनी, ऑटोमोबाईल कंपनी व इतर औद्योगिक वसाहतीमुळे प्रचंड मोठ्या प्रमाणात नागरी वस्ती वाढलेली आहे. त्यासोबतच वाहतूक कोंडी, गुन्हेगारी व चोऱ्या असे प्रकारही वाढत आहे. अशा छोटयामोठया गुन्हेगारावर वचक ठेवण्यासाठी पोलिस पेट्रोलिंगची आवश्यकता असून त्याकरिता मोटर सायकल हे एक प्रभावी साधन आहे. मोटरसायकलने पोलीस कर्मचारी तातडीने कमीत कमी वेळात अरुंद गल्ली बोळ, झोपडपट्टी आदी ठिकाणी पोहोचण्यास मदत होणार आहे. त्यामुळे मा. पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड शहर यांनी पोलिस पेट्रोलिंग करिता १०० Pulsar 150DTSI स्मार्ट बाईक्सच्या सोबत 2 Mike, Siren, Blinkers/Flash lights, Camera, GPS Tracking System, Jammer Holders, Helmet with Helmet Holder etc. Special Fitments ची मागणी दि.१८/११/२०२१ रोजी मनपाकडे केलेली आहे.

कोविड-१९ या साथ रोगाच्या कालावीमध्ये मनपा व शहर पोलिस मार्फत मास्क न वापरणा-या विना परवाना अनावश्यक फिरणा-या नागरीकांकडुन वसुल करणेत आलेले दंडात्मक शुल्क मनपा कोषागरात जमा करणेत आलेले आहेत. सदर रक्कमेतुन परताव्यापोटी पोलिस खात्यास स्मार्ट बाईकसह Fitments/ Accessories पुरविणे व बसविणे आवश्यक आहे. त्यानुषंगाने मनपाच्या सन २०२१-२२ चे अंदाजपत्रकामध्ये कामाचे स्वतंत्र लेखाशिर्ष अंतर्भुत नसल्याने सदर उपसुचने द्वारे “पिंपरी चिंचवड शहर पोलिस पेट्रोलिंग करीता स्मार्ट बाईक मोटार सायकलसाठी अत्याधुनिक Fitments/ Accessories पुरविणे व बसविणे.” या लेखाशिर्षाचा समावेश करुन आवश्यक तरतुद वर्गीकरण करणेस मान्यता देणेत येत आहे.

| अ क्र | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम | लेखा शिर्ष | पान क्र. अ.क्र | सन २०२१-२२ ची तरतूद | वाढ | घट | सन २०२१-२२ चा सुधारित अंदाजपत्रक |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | पिंपरी चिंचवड शहर पोलिस पेट्रोलिंग करीता स्मार्ट बाईक मोटार सायकलसाठी अत्याधुनिक Fitments/ Accessories पुरविणे व बसविणे. | १.५० कोटी | विशेष योजना | - | - | १.१० कोटी | - | १.१० कोटी |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २ | कोविड-१९ महामारीमध्ये विना मुख पट्टी कामी शुल्क वसुल करुन मनपा कोषगारात पोलिस खात्या मार्फत जमा करणेत आलेल्या दंडाच्या रकमेतुन परताव्या पोटी देणे बाबत. | | | - | (जमा रक्कम) २.४७ कोटी | - | १.१० कोटी | १.३७ कोटी |
| | **एकूण** | | | | २.४७ | १.१० | १.१० | २.४७ |

अनुकूल-७२ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमे मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------

मा.राजेंद्र गावडे – मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ३ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक – ७४४ विषय क्रमांक – ३

दिनांक – २४/१२/२०२१ विभाग – मा.आयुक्त

संदर्भ – १) मा.आयुक्त यांचेकडील पत्र क्र.आप/३/कावि/६६/२०२१,
दि. १२/११/२०२१.
२) मा.विधी समितीकडील ठराव क्र.५ दि. ३/१२/२०२१

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आकाशचिन्ह परवाना विभागामार्फत शहरामध्ये खाजगी व महानगरपालिकेच्या जागेवर बाह्य जाहिरातीसाठी फलक लावणेस (Outdoor Advertising) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम २४४, २४५ व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम (जाहिरात व फलक नियंत्रण) नियम २००३ नुसार परवानगी दिली जाते. सध्या पिंपरी चिंचवड शहराचा स्मार्ट सिटीत समावेश झाला आहे. महापालिकेचे २०१८ मध्ये जाहिरात फलकासाठी (Outdoor Advertising) बाह्य जाहिरात धोरण (Outdoor Advertising Policy) ठरविणेत आलेले आहे. त्यामध्ये अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा समावेश व शहर सौंदर्यीकरण तसेच महापालिकेचे उत्पन्न वाढविण्यासाठी नव्याने जाहिरात धोरण निश्चित करणे आवश्यक आहे म्हणून नव्याने जाहिरात धोरण (Outdoor Advertising Policy) तयार करणेत आलेले आहे. त्यास कायदा विभागाकडून तपासून घेणेत आलेले आहे. सबब, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आकाशचिन्ह परवाना विभागामार्फत तयार करणेत आलेले बाह्य जाहिरात धोरण (Outdoor Advertising Policy) सोबतच्या प्रपत्र “अ” मध्ये (मराठी व इंग्रजी) यास मान्यता देणेची मा.आयुक्त यांची मागणी असली तरी सदर विषय दप्तरी दाखल करणेस मान्यता देणेत येत आहे.

मा.ज्ञानदेव थोरात – मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

मा.सचिन चिखले – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. आपल्या सर्वांचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांची जी विटंबना झाली त्या घटनेचा मी तीव्र निषेध व्यक्त करतो. हिवाळी अधिवेशन चालू होत आणि त्याच्यामध्ये जो शक्ती कायदा लागू केला खरतर हा महाराष्ट्राच्या सर्व महीलांचा विषय आहे त्या शक्ती कायदयाच मी मनापासून हार्दीक अभिनंदन करतो. माई, खरतर तुमच आमच प्रशासनाच पण हार्दीक अभिनंदन करतो कारण की कोरोनाची महामारी ही चालूच आहे कोराना अजून संपलेला नाही. पिंपरी चिंचवड

शहरामध्ये असे अनेक कुटूंब आहेत जी उध्दवस्त झालीत, ज्यांच्या घरी आता सांभाळण्यासाठी पण कुणी नाही आणि अतीशय सुंदर तुम्ही ठराव आणला आणि त्या सर्व कुटूंबाला एक दिलासा देण्याच काम आपल्या वतीने झाल आहे. मा.महापौर साहेब, आपण हे करत असताना पिंपरी चिंचवड शहराची जर का व्याप्ती पाहीली आणि गेले सलग दोन दिवस ज्या पध्दतीने आम्ही कामगार सेनेमध्ये काम करतो, विदयार्थी सेनेमध्ये काम करत असताना वेगवेगळे अनुभव कोरोनाच्या बाबतीत आलेले आहेत. असंख्य कुटूंब आहेत ते सध्या जागेवरुन उठू सुध्दा शकलेले नाहीत एवढी हालाखीची परिस्थिती आहे. मी सर्वप्रथमत: आपणास विनंती करतो आपण सरसकट हा शास्तीकर आणि त्याचप्रमाणे मनपा शास्तीकर तुम्ही लावलेला आहे त्याच्यात सवलती दिलेल्या आहेत ७०,८०,९० टक्के तर कमीत कमी ही कोवीडची लाट जोपर्यंत संपत नाही तोपर्यंत हे संकट संपत नाही तोपर्यंत या शहरातल्या सर्व नागरीकांना दिलासा दयावा आणि शंभर टक्के हा मनपा शास्तीकर माफ व्हावा अशी मी आपणास विनंती करतो. यानंतर विषय क्रमांक २ कडे येतो मी सर्वप्रथम सन्मा.आयुक्त साहेब आणि माई तुमच मनापासून हार्दीक अभिनंदन करतो. गेले सतत तीन ते चार वर्षापासून या सभागृहामध्ये गदारोळ ऐकायला यायचा आणि ती गोष्ट म्हणजे अशी की शहराच विद्रूपीकरण झालेल आहे. असंख्य होर्डींग्ज लागत होते ती पालीकेची परमीशन न घेता, कोणतेही पालिकेचे अधिकारी त्याची विचारपुस करत नसत डायरेक्ट सरासर शहरामध्ये चार-चार, पाच-पाच, सहा-सहा एकाच ठिकाणी होर्डींग्ज उभे केलेले होते आणि त्यामुळे शहरामध्ये मोठया प्रमाणात यांच्यामार्फत दोन नंबरचा धंदे सुध्दा चालवले आणि त्याचप्रमाणे शहराच विद्रूपीकरण हे खुप मोठया प्रमाणात झालेल आहे. आज आयुक्त साहेबांनी कोणत्याही कार्यवाहीची तमा न बाळगता, कोणत्याही प्रेशरला न जुमानता सरसकट अनाधिकृत बांधकामावर जी कारवाई केली त्याच्यामध्ये हा माझ्या मनात आलेला प्रश्न आहे त्यांना सुध्दा ही कारवाई करत असताना खुप त्रास झालेला असेल परंतु आज आपण पाहीलतर शहरामध्ये ठिकठिकाणी जे होर्डींग्जच विद्रूपीकरण झालेल होत ते आज कुठतरी शहरामध्ये मोकळा श्वास घेताना दिसतो याबद्दल मी प्रशासनाच, आयुक्तांच आणि मा.महापौरांच मनापासून हार्दीक अभिनंदन करतो. मा.आयुक्त साहेब, याच्यामध्ये माझी एक सुचना असेल तुम्हांला स्मार्ट सिटी अंतर्गत आपण ठिकठिकाणी व्हीएमटी उभे केलेले आहेत आणि अजूनही काही नगरसेवकांची मागणी येते किंवा इथ काही नगरसेवकांची मागणी असेलसुध्दा की या या ठिकाणी या स्पॉटला व्हीएमटी उभारा. तर त्याठिकाणी हे उभारत असताना नक्कीच होर्डींग्ज धारक जे आपल्याला अधिकृतरीत्या आता टॅक्स भरतात, ज्यांचे अधिकृतरीत्या होर्डींग्ज चौकाचौकामध्ये आहेत आपण हेही विसरता कामा नये की ते या शहराचे भूमीपुत्र आहेत ज्यांनी कोणत्याही प्रकारचा टॅक्स पालीकेचा बुडवलेला नाही, रीतसर टॅक्स भरतात पालिकेच्या नियमांच पालन करतात अशा लोकांना आपण विश्वासात घेवून ज्या ज्या ठिकाणी आपल्याला व्हीएमटी हे उभा करायचे त्या चौकामध्ये ते उभ कराव आणि जिथ त्यांना त्रास होणार नाही तरी त्यांना सुध्दा त्या सुविधा उपलब्ध करुन दयाव्यात अशी मी आपणास मागणी करतो. जेणेकरुन या महानगरपालिकेच उत्पन्न सुध्दा चालू राहील पाहीजे. नक्कीच आपण शहरामध्ये स्मार्ट सिटी अंतर्गत व्हीएमटी उभा केल्या त्याचा सुध्दा उत्पन्नाचा स्त्रोत हाळूहाळू चालू झालेला आहे. कदाचित आता आपल्याला महीन्याला दोन लाख रुपये, सात लाख रुपये असे व्हीएमटी द्वारे मिळतात. इतर सुध्दा जाहीरातदार जे या शहराचे नागरीक आहेत आणि प्रामाणिकपणे पालिकेचा टॅक्स भरतात तरी त्यांचा सुध्दा आपण विचार करावा. परंतु हा विचार करत असताना तो टॅक्सधारक, तो होर्डींग्जधारक जर एका

होर्डींग्जच्या नावाखाली दहा-दहा होर्डींग्ज उभा करत असेलतर नक्कीच त्याच्यावर कारवाई केल्याशिवाय तुम्ही सुध्दा थांबू नका आमचा पुर्ण पाठींबा आपणास असेल. मा.आयुक्त साहेब, गेले खुप कमी कालावधीमध्ये तुमच्या कामाचा आम्ही झंजावता पाहतो. कदाचित सर्वांना वाटत असेल की आज आयुक्तांच खुपच उदो उदो चाललय. पण जो चांगल काम करतो त्याच्या पाठीशी भक्कमपणे उभ राहील पाहीजे या तत्वाशी आम्ही सुध्दा आणि या सभागृहातील नागरीक सुध्दा आहेत. या शहरामध्ये जर का आपण पाहील ते म्हणजे कोणत्या चौकात जावा, कोणत्या रस्त्यावर जावा, कोणत्या गार्डनमध्ये जावा शहरातील रस्त्यालगत असलेल्या मुतारी बघा सगळीकडे अस्वच्छता आहे. आज आपल्याला टॉयलेटला जायची इच्छा झालीतर आपण पालीकेच्या शौचालयामध्ये जात नाहीत, आपण कुठेतरी हॉटेल बघतो कुठेतरी स्व:तच घर बघतो तीथ जातो पण आपण पालीकेच्या शौचालयामध्ये जावू शकत नाहीत. आपण एकीकडे वाटचाल स्मार्टसिटीकडे करतो पण एकीकडे हा सगळा प्रादुर्भाव आम्हांला दिसतो. आयुक्त साहेब आपण आपल्यानंतर आम्ही थोडीशी आपल्या विषयी माहीती घेतली की आपण ठोस रीत्या आरोग्य विभागावर खुप चांगल्यारीतीने काम करायला सुरवात केलेली आहे. वेळोवेळी तुमच्या आरोग्य विभागाच्या बैठका होतात. आपण आता एक संस्था नेमलेली आहे त्या संस्थेमार्फत सुध्दा काम चालू आहे, पथनाटय चालू आहेत आणि नक्कीच या शहराला एक दिलासा देण्याच काम आपण करताय आणि त्याच्याकड सुध्दा आम्ही सर्व नगरसेवक एक आशेनी, एक दिलासाने बघतो या तुमच्या कामाची आम्ही प्रशंसा केल्या शिवाय राहणार नाहीत. परंतु या कामातून आम्हांला रिझल्ट मिळेल हीच अपेक्षा व्यक्त करतो. मा.महापौर साहेब, एक छोटीशी विनंती आहे कोवीडचा प्रादुर्भाव अजून आपल्याकडचा संपलेला नाही. रोज बातम्या येतात. आदरनीय पंतप्रधान असतील त्यांच मा.मुख्यमंञ्याशी बोलनं झाल नाईट कर्फ्यू आपला चालू झालेला आहे त्याचप्रमाणे प्रशासनाला सूचना देण्यात आलेल्या आहेत की आपण सुध्दा कोवीडच्या आरोग्य सेवेसाठी व्यवस्थितपणे उपाययोजना कराव्यात. मी आपणास नंम्र विनंती करतो की गेले कित्येक वर्षे वायसीएम हॉस्पिटलमध्ये ज्यांनी जीवाच रान केलं, जीवावर उध्दार होवून काम केलं ती आज मुल आजही तुमच्याकडे न्याय मागतात तरी त्या मुलांकडे आपण पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने लक्ष देणं अपेक्षीत आहे अशी मी आशा व्यक्त करतो, थांबतो जयहिंद, जय महाराष्ट्र.

मा.राहूल जाधव - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. एक चांगला विषय शहराच्या चांगल्या सुशोभिकरणासाठी आणि एक चांगल शहर दिसण्यासाठी आज या सभागृहामध्ये आलेला आहे. अनाधिकृत होर्डींग्ज काढणे, किऑक्स काढणे आणि शहराच जे विद्रूपीकरण झालेल आहे तर ते शहर चांगल दिसण्यासाठी एक चांगला निर्णय आहे. अभिनंदन कुणाच कराव, आयुक्तांच कराव का सहा.आयुक्तांच कराव का जे क्लार्क आहेत त्यांच कराव. या शहरामध्ये नातंगोत, चांगले संबंध किंवा मग चेहरे पाहून काम करणे अशा पध्दतीच जे काम या शहरामध्ये चालू आहे त्यामुळे शहर जरी चांगल दिसल तरी अभिनंदन करायच कुणाच. मा.महापौर साहेब, सहा.आयुक्तांना सभागृहामध्ये बसण्याची परवानगी नक्कीच आहे आणि ज्यावेळी सहा.आयुक्तांना काही माहीती लागत असेलतर ते त्यांच्या क्लार्कला सांगून माहीती सभागृहात मागवतात. क्लार्कला सभागृहात बसण्याचा अधिकार आहे का. मा.महापौर साहेब, तुम्ही मलाच नाहीतर नगरसेवकांना विचारा अधिका-यांची भाषा कशी झालेली आहे. काय लँग्वेजमध्ये नगरसेवकाबरोबर बोलतात एकवेळेस बैलगाडा घाटाच सुशोभिकरण कराव म्हणून आयुक्तांना एक पत्र दयायला गेलो होतो, त्यावेळी सुध्दा मी एक शब्द आयुक्त साहेबांना बोललो

तरीही तसेही तुम्ही आमच्या पासून अंग चोरुनच राहता.  आणि एकदा मी सुध्दा गेलो तेव्हा आयुक्त साहेब म्हणाले तुम्ही आता जास्त पालिकेमध्ये येत नाहीत.  आयुक्त साहेब, जनरल बॉडी शिवाय आम्ही आता पालिकेत येतच नाहीत. कारण आम्हांला तुम्ही या पालिकेमध्ये आयुक्तपदी रुजू झाल्यापासून आम्हांला वाटतच नाही की आम्ही या पिंपरी चिंचवड शहराचे विश्वस्त आहोत, नगरसेवक आहोत आणि सागर म्हणतो ते खरय, सुपारी घेतली कातर शंभर टक्के सुपारी घेवूनच याठिकाणी तुम्ही रुजू झाले. आज पर्यंत आम्ही कितीतरी कामे सांगीतली परंतु आमची कामे याठिकाणी होत नाहीत.  आम्ही कधी असा दुजाभाव केला नाही. नितीन अप्पा महापौर झाले, मी झालो आता माई झाल्या आणि आमच्या काळाततर विरोधक सभागृहामध्ये जास्त बोललेत. परंतु ज्या पध्दतीने आयुक्त साहेब तुम्ही आमच्या बरोबर वागतातना, शंभर टक्के चुकीच वागतात. आम्ही काही आमच्या घरच काम सांगत नाहीत किंवा आमच्या नातेवाईकांच काम सांगत नाहीत. आम्ही या पिंपरी चिंचवड शहराचच काम आणि या शहराच्या विकासासाठीच याठिकाणी बोलत असतो परंतु ज्या पध्दतीने होर्डींगजवर आता कारवाई होते आपण गेल्या आठ वर्षापासून याठिकाणी पत्रव्यवहार करतो की याठिकाणी हे होर्डींग्ज लावले त्यामुळे शहराच विद्रूपीकरण होतय हे होर्डींग काढावेत, ते होर्डींग काढावे, ते बॅनर काढावेत पण अशी कारवाई कधी झाली नाही, आता कारवाई होते त्यामुळे आपण आपल्या अधिका-यांना बोलण्याची जरा शिस्त लावावी. आयुक्त साहेब, मी काही रेकॉर्डींग सुध्दा तुम्हांला पाठवल्या की आपले अधिकारी आपण रुजू झाल्यापासून कशा पध्दतीने याठिकाणी बोलतात आणि म्हणून आता तुम्ही याठिकाणी संबंधित आकाशचिन्ह परवान्याच्या अधिका-यांना आदेश दयावेत की आजपर्यंत आपण अनाधिकृत होर्डींग काढले किती आणि अजून अनाधिकृत होर्डींग आहेत किती याची सखोल चौकशी याठिकाणी करावी. परंतु डायसवरुन त्यांनी त्या विषयाचा खुलासा करावा की आपण शंभर टक्के जर आयुक्तांचा आदेश मानत असालतर शहरातले शंभर टक्के अनाधिकृत होर्डींग, फुटपाथवरचे होर्डींग आपण काढलेत का आणि नसेल काढलेतर त्या पध्दतीने आम्हांला याठिकाणी खुलाशामध्ये सांगाव. त्याच कारण पण असं आहे की सर्व तोंड पाहून याठिकाणी काम झालेले आहेत. आज अनधिकृत बांधकामावर अतिक्रमण विभागाकडून कारवाई होते, कारवाई होत असताना दोन दिवसाची जरी मुदत मागीतलीतरी त्याठिकाणी मुदत देत नाहीत. परंतु जर महाराष्ट्राच्या सत्ताधा-याचा एखादा फोन आलातर, (पिंपरी चिंचवडच्या नाही आपण आता नामधारी आहोत) ज्याठिकाणी कारवाई चालू आहे ती कारवाई थांबवली जाते.  परंतु आपण जर फोन केलेतर आपले फोन सुध्दा उचलत नाहीत. आपण ज्याठिकाणी या कारवाया करतो त्याठिकाणी सुध्दा आपल्या अधिका-यांना व्यवस्थित सूचना दयावेत एवढ आपणाला सांगतो होर्डींगजच्या विषयात किती अनाधिकृत होर्डींग्ज काढलेत किती ठेवलेत याचा खुलासा संबंधित अधिका-यांना दयायला सांगावा, धन्यवाद.

मा.संदीप वाघेरे – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. आयुक्तांनी आता जे होर्डींग बाबत धोरण आणल आहे आयुक्त साहेब, पाच वर्ष होत आले साधारण आपण स्मार्ट सिटीमध्ये आपली नोंद झाली आणि ठरावीक भागामध्ये स्मार्ट सिटीची काम चालू झाली. तस बघायला गेलतर पुण्याच्या २७ टक्के आपल क्षेत्रफळ आहे, आपल १८१ स्क्वे.कि.मी. आणि त्यांच आपल्या तीन पट आहे साधारणपणे. आपल उत्पन्न जर बघीतलतर पुण्याच्या खालोखाल हजार दिड हजार कोटीनच कमी आहे म्हणजे आपल सहा ते साडेसहा हजार कोटी वर्षाला आपले सगळे एलबीटीचे पैसे, शासनाचे पैसे आणि इथल बिल्डींग परमीशन, करसंकलन अशा वेगवेगळया माध्यमातले हे सर्व पैसे. आज आपण मोशी पासून भोसरी पर्यंत तो एक हायवे

त्यानंतर आळंदी ते दिघी-कळस तीथला एक हायवे, निगडी पासून दापोडी पर्यंत हायवे, किवळे-रावते-मामुर्डीपासून वाकडपर्यंत आणि औंध पासून रावेत पर्यंत हे असे सहा सात हायवे. आज या रोडला जाताना एवढया अनाधिकृत होर्डींग दिसतात सचिन म्हणला मगाशी की एकाच बोर्डची परमीशन दहावेळेला तोच बोर्ड तेच नंबर प्रत्येक ठिकाणी लावले जात नाहीत ते कम्पलसरी आपल्या महापालिकेच्या हिशोबानी की परमीशन दिलीतर हे इथ लागल पाहीजे. तरी त्याच परमीशनचे दहा दहा प्रमाणे बोर्ड लागलेत. बरं, एकाच होर्डींग वरती पुढे दोन आणि माग दोन असे होर्डींग आणि एकाच होर्डींगचे पैसे भरायचे. दोन वर्षापुर्वी मी आकाश चिन्ह व परवाना विभागाकड माहीती मागीतली की आपल्याकडे किती होर्डींग बाकीच्या गोष्टी आहेत तर त्यांनी मला माहीती दिली की सात ते आठ कोटी आपल्याला वर्षाला इन्कम होतं. माग आपण अनाधिकृत होर्डींग काढायच दोन ते आडीच कोटी रुपयाच टेंडर काढल. किऑक्स काढले आणि बोर्ड काढले म्हणून संबंधित ठेकेदाराला पेमेंट करण्यात आलं. मग तो ठेकेदार काय महापालिकेचा जावाई आहे. बरं हे केल कोणी तीथल्या अधिका-यांनी, ठेकेदारानी आणि इथल्या लोकांनी मिळून केल. हे जनतेच्या कररुपातले पैसे आहेत, पण आज आपण दापोडीमधुन पिंपरीला यायला  निघालो तर पिंपरी चिंचवड महानगरपालिका आपले सहर्ष स्वागत करीत आहे असे लिहील आहे. आज आपल्याला पुण्याचा पार्ट म्हणुन ओळखल जातं म्हणजे पिंपरी चिंचवड जरी शहर असलतरी पिंपरी चिंचवड शहर म्हणून बाहेर कोणी ओळखत नाहीत कुठून आलातर पुण्यातून आला म्हणून सांगतो. पिंपरी चिंचवड शहराची आपल्याला आयडेन्टीटी करावी लागेल ती अजून पर्यंत आपण केलेली नाही. गेली ३५-४० वर्षे आपण फक्त कुठ आहेततर पुण्यात आहेत. आज आपल्या इथ हिंजवडी एमआयडीसी आहे, वाकडसारखा डेव्हलप झालेला ऐरीया आहे, पिंपळे सौदागर आहे. आज चिखली, डुडूळगांव, च-होली, मोशी हे डेव्हलप होतय, चाकण एमआयडीसी आहे त्याच्यानंतर तळेगाव एमआयडीसी आहे, राजंणगाव एमआयडीसी आहे म्हणजे इथ सगळे उदयोगधंदयाच्या निमीत्तान सगळे राहीला येतात. आज जी तुम्ही धोरण आणल, एलईडी बसविल्या, लाईव्ह केल्या म्हणजे  आता जे होर्डींग शहरात लागलेले आहेत ते सगळे काढून टाका दोनची नोंद आहे आणि दोनचे चार हजार अनधिकृत आहेत. महापालिकेच्या वतीने तुम्ही वेगवेगळया चौकामध्ये एलईडी स्क्रीन लावा बाकीच्या गोष्टी करा आणि त्याच टेंडर काढा म्हणजे तो ठेकेदार टेंडर भरेल आणि महापालिकेला त्याच रितसर उत्पन्न येईल. हे सात ते आठ कोटी रु. येतात आणि त्याच्या तीन ते चार पट भ्रष्टाचार आहे. महापालिकेला तीस ते चाळीस कोटी रुपये इन्कम आकाश चिन्ह परवानामधुन येईल. लोकांना वाटत ही महापालिका आशिया खंडात श्रीमंत आहे पण जकात गेली, एलबीटी गेलय आता हे जे चाललय म्हणजे करसंकलन असेल, बिल्डींग परमीशन असेल या ज्या काही तुटपुंजा उत्पन्नाच्या साधाना वरती ही महापालिका चाललेली आहे आणि येथून पुढे चालेल. काही वर्षानी अशी परिस्थिती येईल की इथले पगार पण वळेवरती व्हायचे नाहीत, जर असंच आपण काम चालू ठेवलतर. आयुक्त साहेब इथ ठेकेदारांची किंवा  ठरावीक  राजकारण्याची म्हणा किंवा प्रत्येकाची कुणाबरोबरतरी भागीदारी आहे माझी कुणाबरोबर भागीदारी नाही. पोट भरण्याचे उदयोग सर्रासपणे चाललेले आहेत. मग ते कुठल्याही पक्षाचे असतील, मगाशी आयुक्त साहेब तुमच्या तुमची तुमच्या तोंडावरती स्तूती करत नाहीतर तुम्हांला एक मी जाणीव करुन देतो, आठवण करुन देतो मी चार वर्षे माझ्या प्रभागामध्ये प्रयत्न करत होतो की दोन्ही साईडला गार्डन आणि मध्येच स्मशानभूमी आहे तुम्ही पिंपरीत येवून बघीतलेल आहे. तर एका कोप-यात मला ती स्मशानभूमी शिफ्ट करायची होती आणि एक सलग सात एक्करमध्ये मला गार्डन

करायच होतं. हार्डीकर साहेब होते त्यांच्या मागे लागलो. आहो, सर नियमात, बाकीच्या गोष्टी आहेत रितसर सगळे प्रस्ताव बनवले नगररचनेतून बनवले, सगळे पॉझीटीव्ह रिपोर्ट पण ठरावीक लोकांनी, विरोधी पक्षातल्या लोकांनी मला त्या कामाला विरोध केला. संबंधित त्या पक्षाच्या दोन नगरसेवकांच मी पत्र घेतल, आयुक्तांनी मिटींग लावली, मीटींगला कोणी आल नाही मी पत्र घेतल, माझ पत्र हार्डीकरांनी विषय मंजूर केला नाही, राजेश पाटील साहेब आले एक साठ महीन्यापुर्वी मी त्यावेळेला जीबीला याच्यावर बोललो पण. साहेबांचा मला फोन आला नेमका विषय काय आहे, मी म्हणल साहेब सगळ नियमात आहे, बाकीच्या गोष्टी आहेत चार वर्षे झाले मी प्रयत्न करतो. पिंपरी चिंचवड शहराच्या सौंदर्यामध्ये भर टाकण्याचा प्रयत्न करतो. त्या गार्डनमध्ये दोन एक्कर अजून डेव्हलपच झालेल नाही आणि जे २००५ ला टीडीआर सोबत ताब्यात आलेल आहे. म्हणजे आज सोळा वर्षे झाले. मी तर पाचच वर्षे नगरसेवक आहे. राजेश पाटील साहेबांनी मला फोन केला सांगीतल असं तसं. त्यांनीही वेळ घेतला तीन ते चार महीने माझे घेतले. समोरच्या व्यक्तीना सांगीतल की तुम्ही पत्र घेवून या. त्यांच्याच पक्षातील लोकांनी त्यांना दोघांना पत्र दिल नाही. माझा विषय चांगला होता  समोरच्याला पटला, आयुक्तांना पटला त्यांनी आता मंजूर केला आणि त्याच काम चालू होईल. मला काय म्हणायच आहे आयुक्त साहेब काही सुपारी घेवून आले अस मला तरी काही वाटल नाही मी पण बीजेपीचाच सदस्य आहे आणि विधायेक जर काम घेवून गेलतर आणि जे नियमात बसणार असेल ते आयुक्तांनी केलेलं आहे. चुकीच काम मी आजपर्यंत घेवून गेलो नाही किंवा दुसर कोण घेवून गेलंतर ते चुकीच काम करायला आयएएस ची परीक्षा देवून केंद्राकडन शासनाकड इथ आलेले नाहीत जे योग्य काम असतील तेच ते करणार आहेत. आपण योग्य काम घेवून जा ते हातील. मला आजपर्यंत त्यांचा अनुभव आहे मी पाच सहा वेगवेगळी काम घेवून त्यांच्याकड गेलेलो आहे तर माझी काम त्यांनी केली. आयुक्त साहेब मी स्तुती करत नाही जे आहे ते खर बोलतो मी खोट बोलत नाही. कारण खोट काही बोललतर ते लक्षात ठेवायला परत मेमरी लागते. मा.महापौर साहेब काँग्रेसनी मगाशी भोसरी हॉस्पिटल विषयी आंदोलन केलं मागच्यावेळेला रवी लांडगेनी विरोध केला ते हॉस्पिटल प्रायव्हेट करायच नाही म्हणून. आयुक्त साहेब आपण पी.जी.च्या माध्यमातून डॉक्टर भरले वास्तविक पाहता माझ म्हणण होतं की त्यांना मानधनावरच घ्या. एमपीएससी मार्फत परीक्षा घ्यायच्या होत्या इथल्या इथ सगळ गौडबंगाल झाल परीक्षा घेण्यात आली डॉ.लहाने वगैरे बाकीच्या गोष्टी. तोंडीला ३५ मार्क आणि लेखीला ६५ मार्क. म्हणजे ३५ मध्ये मला ३० देणार तोंडीमध्ये आणि लेखी मध्ये मला २० च मार्क देणार असे झाले ५० मार्क. आणि राहूल कलाटेंना लेखीमध्ये ५० पडले व तोंडीमध्ये ३० मार्क पडले एकूण झाले ८० मार्क म्हणजे मी कॅपेबल असूनही मी जागेवरती आणि जे इथ मानधनावरती पीजे मध्ये भरले होते त्यातले ८० ते ९० टक्के डॉक्टर तेच सिलेक्ट झाले हे कसे काय. बाहेरच्या लोकांन सिलेक्शनला काही क्रायटेरीया होता का, वशीला किंवा बाकीच्या गोष्टी आयुक्त साहेब असं चालणार नाही. हे जर चालवायच असेल, स्मार्ट करायच असेलतर प्रत्येक मायक्रो प्लॅनिंग करुन कराव लागणार आहे. आज भोसरी हॉस्पिटलला हे पीजी चे डॉक्टर भरले प्रत्येकाचे नऊ-नऊ असे ३० स्टूडंट वाढतील. जिजामाता हॉस्पिटला ट्रॉमा सेंटर करा म्हणून मी उपसूचना पण दिली आहे. म्हणजे तीथ सीटी स्कॅन, एमआरआय, टुडे ईको हया सगळया गोष्टी भोसरी हॉस्पिटलला करा, थेरगाव हॉस्पिटलला करा हे असे प्रत्येक ठिकाणी वाटून दया व वायसीएमवरचा लोढ कमी करा. तसे मी आपल्याला पत्र पण दिल आहे आणि इथ उपसूचना पण दिलेली आहे.  मा.महापौर साहेब, आपल्याला शहराचा सर्वांगीण विचार

करुन विकास करावा लागणार आहे. नुसता एका भागापुरता विचार किंवा एका नेत्यांपुरता विचार करुन हे शहर नाही चालणार. इथल्या जनतेचा पहीला विचार झाला पाहीजे जनतेला काय पाहीजे काय नाही. आपण त्यांच्याकडून टॅक्स घेतो, एवढे करोडो रुपये जमा करतो पण त्यांना आपण काय देतो. आयुक्त साहेब, तुम्ही इथ येवून वर्ष होईल तुम्हांला चांगली संधी आहे आणि वेळेत इलेक्शन झालतर ठिक आहे  नाहीतर मग प्रशासन लागलतर सगळ तुमच्याच हातात आहे. नदीसुधार विषय रिसायकलींग पाण्याचा विषय आहे तुम्ही आता मार्गाला लवलाय. बेटरमेन चार्जेस वगैरे म्हणजे या शहरात त्याच उपजत एवढ आहे की हे शहर सगळयांना देवू शकतं  आणि एखादे नगरसेवक काही बोलले असतीलतर त्याचा राग मानुन घेवू नका. त्यांचीही काम करा किंवा कुठ चुकत असतीलतर त्यांनाही समजून सांगा, एवढ बोलून थांबतो जयहिंद जय महाराष्ट्र.

मा.संतोष लोंढे – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. आज ख-या अर्थाने आकाश चिन्ह परवान्याच्या बाबतीत जर बोलायच म्हणलतर होर्डींग प्रत्येक ठिकाणी लावली जातात पण आता स्मार्ट सिटीच्या अंतर्गत आपण त्याठिकाणी त्याची जी परवानगी देतो त्याबाबत आताच संदीप भाऊनी सांगीतल की एका होर्डींगच्या परमीशनच्या अंतर्गत दहा-दहा होर्डींग त्याठिकाणी लावली जातात. पाठीमागे दोन वर्षापुर्वी पुणे स्टेशनला जे होर्डींग्ज कोसळल त्यातून जी मनुष्य हानी झाली त्या अनुषंगाने आपण त्याची दक्षता घ्यायला हवी. कारण की आज प्रत्येक ठेकेदार या चुकीच्या पध्दतीने काम करत आहे. त्या स्टीलची लाईफ कालांतराने ऊन, वारा, पावसामुळे त्याच जीर्ण होतं आणि त्या अनुषंगाने ते कोसळल जातं. तरी अशी घटना आपल्या शहरामध्ये होता कामा नये. त्या अनुषंगाने त्याचीही त्याठिकाणी दक्षता घ्यायला हवी. परवाना विभागाच्या माध्यमातून अनेकवेळा मी पत्रव्यवहार केला की भोसरीमध्ये जे हायवेला अनधिकृत फ्लेक्स आहेत त्याची पुर्तता त्यांनी त्याठिकाणी केलीच नाही. आम्ही त्याठिकाणी परमीशन मागीतली त्याचे चुकीचे नंबर्स देण्यात आले. आपल्या पिंपरी चिंचवड शहरामध्ये आठ प्रभाग आहेत. तरी प्रत्येक प्रभागामध्ये त्या त्या परिसराचा त्या त्या विभागाची जी परवानगी घेतली आहे त्या परवानगीच त्याठिकाणी एक रजिष्ट्रर असाव, आपल्या आठ प्रभागाच्या अंतर्गत त्याची नोंद असणे गरजेचे आहे. अजून मा.आयुक्तांना मी याठिकाणी सांगू इच्छितो की भोसरीतील व्हिजन बाबत आपल्याला गेल्या महीन्यापासुन मी आपल्याला की त्याठिकाणी सिमेंट रोडचे प्रोजेक्ट चालू आहेत त्याच्या बाबत आपण व्हिजीटला या. आयुक्त साहेबांना ख-या अर्थाने त्यांना टाईमच नाही. एक महीन्यापासुन मी त्याठिकाणचा वारंवार पत्रव्यवहार केला की त्याठिकाणी निकृष्ठ दर्जाच काम चालू आहे त्याबाबत आयुक्त साहेब आपण तीथ व्हिजीट करा आणि त्या व्हिजीटच्या अंतर्गत त्याठिकाणी ज्या ज्या समस्या नागरीकांना होतात आज गेल्या दहा महीन्यापासून ते कॉन्ट्रॅक्टर काम करतात पण त्या कामाची क्वालीटी आणि कामाची दिरंगाइ मोठया प्रमाणात होत आहे. नागरीकांना असंख्य प्रमाणात त्रास होत आहे त्याला दुसरे जे रोड असतात त्या रोडच्या सुविधा केलेल्या नाहीत जे काम करतात ते त्या पध्दतीने रोड अर्धवट खोदून तसच ठेवल जातं. भोसरीमध्ये संत ज्ञानेश्वर भाजीमार्केट गेल्या चार वर्षापासून झालेल आहे. चार वर्षापासून ते धुळखात पडलेल आहे त्याठिकाणी तळीरामची संख्या आणि असंख्या घाणीच साम्राज्य निर्माण झालेल आहे.  करोडे रुपये आपण त्याठिकाणी खर्च करुन त्या भाजीमंडईचा त्या लाभार्थ्यांना उपयोग काय. भूमी जिंदगीला आम्ही पत्रव्यवहार करुन त्याची टेंडर प्रोसेस करायला सांगीतली.  पाठीमागच्या काळामध्ये आपले अजीत पवार प्रशासकीय अधिकारी होते त्यांनी ते मनावर घेतल पण पुढे ते

का राहील नंतर ढाकणे साहेब आले त्याच्यानंतर ते राहूनच गेलेल आहे. तरी साहेब आपण ब-याच वेळा सांगून कुठलीच गोष्ट झालेली नाही. त्या भाजीमंडईला आपण व्यापारी गाळे बनवतो. त्या व्यापारी गाळयाची टेंडर प्रक्रीया झाली पण त्याठिकाणी परंतु खालच्या व्यापारी गाळयांना टेंडर प्रक्रीयेत जी किमंत ठेवली तीच वरच्या गाळयाला ठेवलेली आहे. म्हणजे फर्स्ट फ्लोरला, सेकंण्ड फ्लोरला तीच किमंत कशी काय राहू शकते. अशा अनुषंगाने ते गाळे तसेच धुळखात पडून राहीलेले आहेत. तरी आयुक्त साहेब, आपण टेंडर प्रोसेस या शहराच्या भवितव्यासाठी आणि या पिंपरी चिंचवडच्या भवितव्यासाठी करणे गरजेच आहे. आपल्या पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या प्रॉपटर्या असंख्य प्रमाणात याठिकाणी धुळखात पडलेल्या आहेत. त्याची प्रक्रीया लवकरात लवकर जलदगतीने राबविणे गरजेच आहे. भूमी जिंदगीला त्या पध्दतीच्या सुचना देण्यात याव्यात आणि आयुक्त साहेब, भोसरीच्या विकासासाठी आपण याठिकाणी वेळ देवू शकत नाहीत तरी आपल्यावरती कुठल्या व्यक्तीच, कुठल्या पक्षाच काही दडपण आहे का. जर तसं काही असेलतर खुलासा दयावा आम्ही वेळोवेळी सांगून सुध्दा तुम्ही वेळ देवू शकत नाहीत. नागरीकांच्या सोईसाठी आपले अधिकारी त्याठिकाणी काय जबाबदारीने काम करतात, त्याठिकाणचे ठेकेदार काय काम करतात. आम्ही आमच्या स्वत:च घरच काम सांगत नाहीत. आज डीपी रोड असतील, अनधिकृतपणे बांधकाम झालेले असतील अशा अनेक गोष्टी मी वारंवार सांगीतल्या. एका संस्थेच काम त्याठिकाणी चालू आहे त्याच्या बाबत पण आपल्याला पुर्वकल्पना दिली. प्राथमीक शाळेच काम चालू आहे त्याचा डीपी रोड सोडून त्याचा इन्ट्रन्स कुठल्या बाजुला आहे. आपतकालीन परिस्थिती उदभवलीतर त्याठिकाणी त्या विदयार्थ्याला नाहक त्रास होवू शकतो. अशा विवीध समस्यासाठी आयुक्त साहेब तुम्हांला मी बोललो पण आयुक्त साहेब तुम्ही काही वेळ देवू शकले नाहीत. आपल्या वर काही दडपण असेलतर याठिकाणी निश्चित तसा खुलासा करावा एवढच याठिकाणी सांगतो, धन्यवाद.

मा.सिमा सावळे - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. आकाश चिन्ह परवाना विभागातील खाजगी व महानगरपालिकेच्या जागेवर बाह्य जाहिरातीसाठी फलक लावणेसाठी आपल जे धोरण करणार होतो ते खरतर दप्तरी दाखल करण्यास मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत आलेली आहे. याच कारण जे माझ्या नजरेपुढ आहे ते एकच आहे की या शहरामध्ये आपण जर गेलोतर तुम्ही महानगरपालिकेच्या बाहेर जर निघालात आणि डावीकडे उजवीकडे नजर जरी टाकलीतर इथपासून ते दापोडीची हाद्द संपेपर्यंत म्हणजे दापोडीचा पुल क्रॉस करेपर्यंत तुम्ही फक्त मोजत रहा तर एका एका ठिकाणी तुम्हांला दहा, बारा, पंधरा एका बाजुनी आणि दुस-या बाजुनी म्हणजे एकास एक लागून असे तीस-तीस बोर्ड तुम्हांला सापडतील एकाच ठिकाणी आणि तरी पण आकाश चिन्ह परवाना विभागाच जे उत्पन्न आहे ते अत्यंत तुटपुंज आहे. याच्यावरती २०१७ ला मी चेअरमन असताना आम्ही लक्ष केंद्रीत केल होत की हे जे आपले विभाग आहेत ते सक्षम झाले पाहीजेत. नागरीक असतील किंवा कॉन्ट्रॅक्टर असतील जेव्हा होर्डींग्ज लावणारी मोठया संस्था होत्या यांनी महानगरपालिकेचा परवाना काढून आपल्याला टॅक्सरुपी पैसे देण्यात यावेत म्हणून २०१६ ला अति.आयुक्त तानाजी शिंदे होते त्यांनी जाहीरात काढली होती. २०१७ च्या डिसेंबर महीन्यात आमच्याकडे हा विषय आला होता मंजूरी साधारण मार्च, एप्रिल २०१८ च्या दरम्यान असेल. साहेब, आश्चर्य असं वाटत की सर्वात जास्त होर्डींग आणि फ्लेक्स त्यांनी २०१७-१८ लाच काढलेत. मा.देशमुख साहेबांना आम्ही अनेकवेळापासून मागणी करत होतो की आपण ईअरवाईज रक्कमा सांगा आपण किती पैसे दिलेले आहेत. २०१७-१८ ला १०१ फलक काढलेत, रक्कम दिली ७० लाख ७६ हजार २०० रुपये. जर वर्कऑर्डर ५ एप्रिलची

असेलतर २०१८ च्या मार्च एप्रिलमध्ये तर एवढी रक्कम गेली कशी. कारण का कुठलीही परिस्थिती असेलतर आपल्यालाही चांगली माहीती आहे होर्डींग्ज काढण इतक सोप नाही. दुर्दैवाने विषय असा आहे की आयुक्त साहेब तुम्हांलाही खुप चांगल माहीत आहे माग काय घडल याच्या फार खोलात आपण जात नाहीत हेही आमच्या कानावर आहे. परंतु चोरी केल्यानंतर ती पकडली गेली पाहीजे तरच पुढच्या चोराना कुठेतरी चाप बसला जातो. मा.महापौर साहेब, होर्डींग्ज काढलेतर त्याची नोंद ठेवण्याची आणि ते किती किलोच होतं याची अधिका-यांची त्याठिकाणी नोट पुटअप आहे त्याच फाईलमध्ये मी ते वाचून दाखविते तुम्हांला. काढलेल स्ट्रक्चर नेहरुनगर गोडावूनमध्ये व्यवस्थितपणे वेगळया जागेत रचून ठेवण्यात यावेत कोठेही इतरत्र सामानात एकत्र करण्यात येवू नये जेणेकरुन त्याचे वजनामध्ये फरक पडुन रक्कमेमध्ये तफावत येणार नाही. तत्कालीन कमीशनरांची नोट होती. तरीही किती स्ट्रक्चर काढले गेलेत, त्याच वजन किती होतं ते विकल्यानंतर आपल्याला किती पैसे आले याचा कुठेही ताळमेळ नाही. सर्वात महत्वाच म्हणजे यामध्ये खरोखर प्रि आणि पोस्ट फोटोत असायला पाहीजे होतं. की मी त्याठिकाणी कॉन्ट्रॅक्टर आहे मी गेलो महानगरपालिकेच्या डाव्या बाजूचा जो बसस्टॉप आहे त्याठिकाणी मी होर्डींग्ज आहे त्याचा पहीला फोटो काढलेला आणि ते काढल्यानंतरचा पण फोटो काढलेला असं करुन जर बीलाला दिल असतंतर निश्चितपणे त्यामध्ये समजणेस वाव होता, दुर्दैवाने तसं झालेल नाही आणि म्हणून आरोपाना सांभाळून रहाव लागत म्हणून देशमुख साहेब तुमची तयारी नसल्यामुळ सुध्दा हा विषय आम्ही दप्तरी दाखल करतो. तुम्हांला कल्पना नसेल साहेब हा विषय दप्तरी दाखल करुन आम्ही महानगरपालिकेच्या तिजोरीतले आमच्या हातान ते पैसे कमी करतो हा तुमचा नाकर्तेपणा आहे. तुमच्यासारखे अधिकारी आलेले असताना सुध्दा तुमचा अभ्यास कमी पडतो. साहेब आपण सभागृहामध्ये धोरण आणता आणि आपल्याकडे माहीती नाही गेले दोन ते आडीच तास झाले आपण या विषयावरती खेळतो. आपल्याला माहीतच नाही की आपण टेंडर काढल होतं का? आपण किती पैसे दिलेले आहेत? काढलेल स्ट्रक्चर किती किलोच होतं? किती टनाच होतं? कुठे विकल? काहीच माहीती नाही तुम्हांला आणि म्हणून आम्हांला हा विषय दप्तरी दाखल करायला लागतो. मा.महापौर खरतर आपण हा विषय दप्तरी दाखल करुन चोरांच्या पाठीशीच उभ राहतो. नाही केल पाहीजे आपण असं. मा.आयुक्त साहेब, संपुर्ण शहरातले जेवढे होर्डींग्ज आहेत, स्ट्रक्चर आहेत हे सगळे महानगरपालिकेच्या ताब्यात घेतले पाहीजे आणि ते कधी पासून आहेत त्यावेळेस पासूनचा जो काही तुम्हांला योग्य वाटेल तो दंड मारा त्यांना. सगळे स्ट्रक्चर ताब्यात घ्या आणि महानगरपालिकेला कुठलाच कॉन्ट्रॅक्टर ठेवू नका. आपणच कॉन्ट्रॅक्टर झाल पाहीजे जाहीरातीवरचे जे काही फलक आहेत याच्यासाठी पण दंडाची रक्कम पण निश्चित करा आणि जाहीरातीचे दर पण आपण निश्चित करा. साहेब, चाळीस ते पन्नास कोटी रु. उत्पन्न देणारा हा विभाग आहे. आज जावुन बघा तीथ बसलेले आहेत प्रत्येकाचे लागेबांधे आहेत. एवढ मोठ २७ ते २८ लाख लोकसंख्येच शहर, मगाशी संदीप भाऊ म्हणालेत या विभागाचे आठ ते दहा कोटी रु. उत्पन्न येत पण संदिपभाऊ दोनच कोटी रु. उत्पन्न येतं. ज्यांचे बोर्ड आहेत त्यांचे अनेक अशा वरच्या मोठया अधिका-यांचे सगळयांचे लागेबांधे आहेत आणि म्हणून महानगरपालिकेच कुंपणच शेत खायला लागलेल आहे. आपलेच अधिकारी सांगतात राहूदयांना ताई तुमच्याकडे येणार, मग बघुनच घेऊ, तुम्हांला भेटायला लाऊ का. मग तो खुप ताकदवर आहे, मग त्याचा बोर्ड तसा काढता येणार नाही आणि नावासहीत सगळ माहीती आहे साहेब. सरसकट त्या डिपार्टमेंटच्या सगळयावरती पहीली कारवाई करा. त्या डिपार्टमेंटवरती कारवाई केलीना तर सगळे नीट होतील. कॉन्ट्रॅक्टर कोण आहे ते कसे यांना सापडत नाहीत. नियमतीकरण करायला तुम्ही निघालात गोडावूनच तर तो किती वर्षापासून त्याठिकाणी बोर्ड लागलेला आहे. त्याला काही दंडाची रक्कम आहे, आपल्याकडे ॲसेसमेंट केलेल आहे. कधी बोर्ड लावला होता, कधी

आपल्याकडे परवानगी घेतली होती. काहीही माहीती नाही आणि मग आपल उत्पन्न कस वाढणार आहे. काय करतात आपले अधिकारी, काय करतात परवाना निरीक्षक आपले. काय कारवाई केली आपण त्यांच्यावरती आतापर्यंत, किती लोकांना नोटीस दिलेल्या आहेत, किती लोकांना दंड मारलेला आहे. किती कॉन्ट्रॅक्टरवरती तुम्ही कारवाई केलेली आहे आणि ज्यांनी विनापरवाना फलक लावलेले आहेत त्यांच्यावरती किती फौजदारी दाखल केलेल्या आहेत, काय आहे तुमच्याकडे आणि काय म्हणून आम्ही या धोरणाला मंजूरी दयायची. आम्ही करदात्या नागरीकांच्या पैशातून पगार घेतो, काही काम करत नाहीत आपली लोक. बोललतर त्यांना राग येईल परंतु हे खर आहे हेही त्यांना सांगीतल पाहीजे आणि म्हणून आजचा हा विषय आहे ना तो दप्तरी दाखल करण्यासाठी आणलेला आहे. साहेब, आपण परवाना देतांना दहा रुपयाच्या स्टॅम्पपेपरवरती त्या लोकांना परवाना दिला होता. दहा रु. स्टॅम्पपेपरची काय व्हॅल्यू आहे साहेब. तो परत रिन्यूअलसाठी आला असेल त्यावेळेला आपल्या लक्षात नाही आल का? भूईभाड वेगळ आणि जाहीरातीचा दर वेगळा. धोरण आणताना पहील ज्या चो-या केलेल्या आहेत ते पहीले पैसे महानगरपालिकेच्या तिजोरीमध्ये आले पाहीजेत आणि मग धोरण निश्चित करण्यासाठी पुढ गेल पाहीजे. देशमुख साहेब तुम्ही डेटा मांडा. मा.अतिरीक्त आयुक्तांना पण विनंती आहे पाठीमागे बसलात साहेब तुम्ही, तुम्ही पहील याच्यामध्ये ॲसेस्मेंट करा. ॲसेस्मेंट करुन तुम्ही ठरवा मिनीमम दहा वर्षाचा दंड लावा. तुम्ही जर आता इंद्रायणीनगरला आलातना स्पाईन मॉलच्या पुढे मोठा रस्ता आहे त्या चौकामध्ये हॉटेलवाल्यांनी, बिअरबार वाल्यांनी त्या चौकाच्या आतमध्ये फलक लावलेले आहेत. जिथ सुशोभीकरण करतोना आपण तेथे सांगून दमलोत ते काढा. आहो, तो काही पिणा-या लोकांचा आड्डा आहे का? कसल्या जाहीराती करताय तुम्ही, काहीतर भान ठेवानां. वारंवार मी तक्रारी करते आणि एका दिवसात तुम्ही तीथले फलक काढता, तीथले होर्डींग काढता होर्डींग पण किती वजनाचे असावेत. पाऊस आलातर असं वाटत आता अंगावर पडत का. वारंवार आम्ही का सांगायच आम्हांला तेवढच काम आहे का. आम्हांला दुसरे कामच नाहीत का. चौक सुशोभीकरण करता महापालिकेच्या खर्चातून आणि फलक काढायचे पण महापालिकेच्या खर्चातून आणि जे त्याच्यावर धंदा करतात ते सुटतात. आपल्याकडे पॉलीसी आणताना पहील्या चो-या कुठे झाल्यात त्याच्यावरती नियंत्रण आणा ते आपण बघतच नाही. मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब खरतर आजचा हा जो विषय होता हा विषय खुप चांगला आहे परंतु आतातर साहेब आपण हा धोरणाचा विषय दप्तरी दाखल करणार आहोत म्हणून हा विषय करणार नाहीत. धोरण आणताना आपण आताच्या रेडीरेकनेर प्रमाणे करआकारणी करणार होतात. नवीन गावाना रेडीरेकनेर कमी आहे, जुन्या गावामध्ये जास्त आहे मग तुम्ही काय केल सरसकट केलं. कस करु शकता साहेब आपण सरसकट. काय होतयना आमच दुर्दैव आहे म्हणजे तुम्ही अधिकारी म्हणून येता वाघ साहेबांना काय वाटत तुमचे थॉटस तुम्ही राबवणार, ढाकणे साहेबांना काय वाटत त्यांचे थॉटस ते राबवणार. आयुक्ताना काय वाटत त्यांचे थॉटस ते आमच्यावरती लादणार. अरे, पण जे पन्नास पन्नास हजार लोकांमधुन निवडून येतात ते पण काही मुर्खच नसतात हो. थोडीफार अक्कल देवानी आम्हांला पण दिलेली असते. आम्ही म्हणणार नाही आमचा थॉटस वापरा, तुमचाच थॉटस वापरा मग झालेल्या भ्रष्टाचाराची जबाबदारी पण तुम्हीच घ्या. काही तरी आमच ऐका. तुम्ही चांगल काम करत असाल अजीबात दुमत नाही. पण सुचना असतीलना त्या सुध्दा ग्राहय धरायला शिका. तुम्ही जो आणलाना आरआरचा मुद्दा तो अत्यंत चुकीचा आहे. नवीन जे गाव समाविष्ठ झालेत तीथला आरआर कमी आहे. आणि मग तुम्ही सरसकट सगळीकडे एकाचवेळेस धोरण लागू करता. कोटयावधी रुपयाचा महापालिकेचा महसूल बुडणार आहे. मग वाघ साहेबांच्या पगारातून आम्ही कट करायच का, का देशमुख साहेबांच्या करायचा, काय केल पाहीजे आम्ही याच्यामध्ये. तुमच फॉर्मेट केल असेलतर दया आम्हांला.

सांगा की हा फलक इतक्या वर्षापासून आहे तुमच्याकडे सगळी माहीती आहे साहेब. आमच्यासारखा कार्यकर्ता जर ती माहीती काढू शकतोतर तुम्ही अधिकारी म्हणून तुम्ही माहीती काढू शकत नाहीत. ही संस्था जगली पाहीजे साहेब. फलक काढताना सुध्दा आपला दुजाभाव आहे. कोण मसलपॉवर वाला आहे कोण ताकदीचा आहे त्याचा आपण फलक काढत नाहीत, त्याचे स्ट्रक्चर काढत नाहीत. जे बोलू शकत नाहीत त्यांचे तुम्ही लगेच काढता. मा.आयुक्त साहेब अत्यंत जबाबदारीन विधान करते अनेक अधिका-यांची त्याठिकाणी त्या होर्डींग मालका बरोबर पार्टनरशिप आहे. या सगळयावरती आपण खरतर बारीकपणे लक्ष दिल पाहीजे. या विभागाच उत्पन्न कमी कसं. ते काढण्यासाठी आपल्याला टेंडर काढण्याची पण गरज नव्हती. आपण परवाना निरीक्षक नेमतो, तो तीथ परवाना देतो जे परवाने दिले ते ऑथोराईज जे नाही दिले ते सगळे अनऑथोराईज आणि ते सगळे सरसकट काढायला पाहीजे होते आपण, नाही काढलेना. गल्ली बोळामध्ये सुध्दा ते फ्लेक्स लागलेले आहेत. रात्रीतून ते उभे राहतात. त्याठिकाणी आम्ही जर तक्रार केलीना तर आमच्या नावासहीत होर्डींग्ज वाल्यांना सांगीतल जातं. काही नगरसेवकांच्यात भांडण नको म्हणून आम्ही तीथ कम्पलेंट करत नाहीत. पण साहेब आपण त्या सुधारणा सुध्दा आणल्या पाहीजेत आणि आमची आपल्याला विनंती आहे की हे धोरण घेवून येताना मार्च महीन्यात आणा, पुढच्या महीन्यात आणा, जानेवारीत तुम्ही आणालना हे धोरण तर धोरण आणताना त्यामध्ये आतापर्यंतच्या त्रुटी किती आहेत, किती कोटी रुपये उत्पन्न यायला पाहीजे होतं, किती फ्लेक्स अनाधिकृत आहेत, किती फ्लेक्स काढलेत, किती किऑक्स काढलेत, किती अनाधिकृत होते, किती अधिकृत होते या सगळयांचा लेखाजोखा मांडा आणि मग धोरण आणा आणि मग सांगा आम्ही मंजूरी देतो की नाही ते. इथ काय झालय जे पाप केलेल आहे ते पाप तुम्ही झाकलेल आहे आणि म्हणून या धोरणाला आम्ही इथ दप्तरी दाखल करणार आहोत. मा.आयुक्त साहेब, आपण खुप चांगल काम करता अनेकांच्या तोंडून आलय, निश्चितपणे तुम्ही चांगल काम करत असाल आमची दृष्टि तशी नसेल तुम्ही चांगल करताय म्हणून, असू शकतना असं. पण या चांगल्या कामामध्ये साहेब काल मी आपल्याला एक पत्र दिलेल आहे, उत्पन्न वाढीच्या संदर्भामधल. गेले अनेक दिवस झाल केबलच्या संदर्भामध्ये भूमीगत केबल असतील किंवा ओव्हरहेड केबल असतील या संदर्भात आम्ही बोललो. पाठीमागे बसलेले मारुती भापकर आहेत २००७ ते २०१२ च्या दरम्यान याच सभागृहामध्ये ओव्हरहेड केबलच्या वरती अनेक भाषण केली, अनेकदा त्यांच अभिनंदन. पण साहेब यश नाही आल तेव्हापण. मागच्या महीन्यामध्ये पुणे महानगरपालिकेत त्या संदर्भात टेंडर झालं. दहा हजार कोटी रुपये त्यांच्याकडे येणार आहेत. भूमीगत अनाधिकृतपणे टाकलेल्या केबल असतील आणि पोलवर ज्या केबल सोडल्या जातात त्याच्या संदर्भातील असतील. त्यांनी एजन्सी नेमली. आपण का नाही करत साहेब तसं. केल पाहीजे साहेब आपण पण. आमच काही म्हणण नाही साहेब, जे व्यावसायीक आहेत त्यांनी व्यावसाय केलाच पाहीजे. त्याच्या शिवाय पर्याय नाही साहेब. त्यांच्या पोटावर पाय देण्याचा अजीबात हेतू नाही. परंतु महानगरपालिकेचा महसूल वाढला पाहीजे, महानगरपालिकेचा विद्रुपीकरण नाही झाल पाहीजे म्हणून जे काही चांगले पावल उचलायचे असतील ते निश्चितपणे आपण उचलले पाहीजे. ते जे भूमीगत टाकलेले केबल्स आहेत जे ओव्हरहेडस वायर आहेत यांना सुध्दा तुमच्या परवाना विभागाने डोळेझाक केल्यामुळे यांच्यावरती सुध्दा साहेब आपल्याला कारवाई करावी लागणार आहे. हे काम सुध्दा त्यांच्याकडेच येतं ओव्हरहेडस केबलच. त्यांनी सुध्दा त्याच्यावर आतापर्यंत कारवाई का केली नाही म्हणून त्यांच्यावर सुध्दा कारवाई केली पाहीजे. त्यांनी का कारवाई केली नाही, त्यांनी का उत्पन्न वाढीचे प्रयत्न केले नाहीत. मा.आयुक्त साहेब इतका गंभीर विषय आहे. त्यांनी दहा हजार कोटी रुपये येतील असं म्हणलेल आहे आपण पाच हजार कोटीची तरी अपेक्षा करु, आपल शहर त्यांच्यापेक्षा लहान असल्यामुळे. पाच हजार कोटीच

उदिष्ठ ठेवलतर आडीच हजार कोटी रुपये निश्चित मिळतील. आणि मग इतक्या मोठया उत्पन्नाकड आपण दुर्लक्ष केल म्हणून कोणाकोणा वरती कारवाई करणार. तुमचा हा हेतू जरी चांगला असलातरी साहेब परवाना विभागाचा आजचा जो विषय आहे तो आपण दप्तरी दाखल करणार आहोत. निश्चितपणे त्याला आपण मंजूरी पण देणार आहोत परंतु मंजूरी देत असताना याठिकाणी आयुक्तांना आपण खडया भाषेत बोल सुनावले पाहीजेत की संस्था जगली पाहीजे म्हणून आपण योग्य पावल उचलली पाहीजेत आणि योग्य पावल उचलण्याच काम एकच आहे की ज्यांनी अनाधिकृत फलक लावलेत आणि ज्यांनी पाठीशी घातल त्यांच्यावरती फौजदारी दाखल करा आणि त्याच बरोबर त्यामध्ये जे अधिकारी असतील वेगवेगळे लोक आहेत त्यांच्यावरती सुध्दा कारवाई करावी एवढच याठिकाणी सांगत आणि थांबते, धन्यवाद.

मा.अजीत गव्हाणे – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. खर म्हणजे आयुक्त साहेब हा विषय आणण्यामागे आपला, प्रशासनाचा खुप चांगला हेतू आहे आणि आता सिमाताईनी ज्या गोष्टीचा उल्लेख केला की आपले जे काही शहरभर बोर्डस लागलेले आहेत याच्यामुळे खुप मोठया प्रमाणात शहरामध्ये विद्रुपीकरण झालेल आहे आणि मग त्या अनुषंगाने आपली अशी इच्छा आहे की आपण प्रॉपर पॉलीसी करावी आणि संपुर्ण शहरामध्ये एक युनिफाय पॉलीसी असावी आणि प्रॉपरली सगळीकड ते बोर्डस लागावेत जेणेकरुन शहर विद्रूप होणार नाही. परंतु आयुक्त साहेब याच्यामध्ये दुसरी जी बाजू आम्ही आपल्या समोर मांडतो तर पहीला मुद्दा हा आहे की आमच्याकड अनेक लाक हा व्यावसाय करतात आणि त्यांच्या जागेमध्ये हा व्यवसाय करतात त्यांनाही त्यातून दोन पैसे मिळत असतात. एका बाजूला शहर विद्रूपीकरण होवू नये ही नगरसेवक म्हणून शंभर टक्के आमचीही भूमीका आहे. परंतु दुसरी बाजू जी आहे की ती पण आपण तपासली पाहीजे की मुळात हे धोरण ठरवत असताना जे लोक याच्यामध्ये पुर्वीपासून व्यावसायीक आहेत त्या लोकांनाही विश्वासात घ्याव हे आपण करत असताना आपला हेतू सरळ आहे की आपल्याला आपल्या शहराच आपल्या महापालिकेच उत्पन्न वाढवायच आहे. तर ते शंभर टक्के उत्पन्न वाढवल गेल पाहीजे त्याच्या बद्दल काही दुमत नाही. परंतु हे करत असताना जे कोणी घटक त्याच्यावरती अवलंबून आहेत या घटकाना याच्यामध्ये सामावून घेतल पाहीजे अशी आमची अपेक्षा आहे आणि आता स्थायी समितीने हा विषय ऑलरेडी दप्तरी दाखल केला आहे. पुढे हा विषय आणताना एकतर त्या लोकांना विश्वासात घ्या, दुसरी गोष्ट आमची भूमीका ही आहे की प्रत्येकवेळेस आपल्या शहरामध्ये पुर्वी आपण कच-याच्या संदर्भात सुध्दा निर्णय घेतला आणि तेव्हा निर्णय घेत असताना आपण आधुनिकीकरण करायच किंवा ऍटोमायझेशन करायच या भूमीकेतून आपण पुढे आलोत व ते अनेक कॉन्ट्रॅक्टर्स आपण अपॉईंट केलेत त्याच्या आदि काही स्वयंरोजगार संस्था आणि काही कॉन्ट्रॅक्टर्स त्याठिकाणी वेगवेगळया वॉर्डमध्ये काम करत आहेत. मग ते टप्याटप्याने तुम्ही त्याच्यात बदल करत गेलातर परंतु त्यातन झाल काय की याच्यात ठरावीक मोठी मंडळी सहभाग घेतात परंतु प्रत्येक्षात काम मात्र ते करत नाहीत. प्रत्येक कामामध्ये सब कॉन्ट्रॅक्टर्स नेमले जातात आणि ते सबकॉन्ट्रॅक्टर्स कोण असतात ते इथलेच लोक असतात. मुळ हेतू आपला हा होता की एखाद काम एखादया मोठया कॉन्ट्रॅक्टर्सला दिलतर त्याच्याकडन तशाच पध्दतीच चांगल काम व्हाव आणि ते महापालिकेला परवडाव अशा हेतून आपण ते करतो परंतु प्रत्येक्षात तसे होत नाही. मागच्या काही वर्षामध्ये ही जी प्रथा पडलेली आहे महापालिकेमध्ये मोठमोठी काम मोठमोठया कॉन्ट्रॅक्टर्सला दयायची आणि त्याच्यातन इथे जे पिंपरी चिंचवड शहरात राहणारे छोटे छोटे कॉन्ट्रॅक्टर्स आहेत जे गेली अनेक वर्ष काम करतात त्यांच्यावर कुठेतरी अन्याय होतो आणि मग हे सगळ जे मागच्या काही वर्षापासून चालू आहे ते थांबवण्याच काम तुम्हांला करायच आहे. आता सिमाताईनी ज्या मुद्दयावर विषय मांडला की महापालिकेच आपल्याला अनेक ठिकाणी उत्पन्न वाढवता येवू शकतं त्यातला जो आपला अंडरग्राऊंड

केबलींगचा विषय आहे की पुणे शहराची बातमी आम्ही मागच्या आठवडयात वाचली त्यामध्ये पुणे शहराला हजारो कोटी रुपये त्यातून मिळतात त्यांनी जी एजन्सी अपॉईंट केली आणि मा.महापौर साहेब, आपल्याकड सुध्दा तसच घडलेल आहे. अनेक लोकांचे याच्यामध्ये ठेके आहेत, व्यावसाय करायला आमचा कोणाचाही विरोध नाही व्यावसाय करणं हा ज्याचा त्याचा अधिकार आहे पण तो करत असताना महापालिकेची परवानगी न घेता महापालिकेला फसवून, महापालिकेच्या अधिका-यांवर दडपण आणून अस अनेक लोकांनी या शहरामध्ये अंडरग्राऊंड केबलींग केलेल आहे. किंवा अनेक ठिकाणी ओव्हरहेड आहेत ज्याचे पैसे आपल्याला मिळू शकले असते परंतु ते मिळाले नाहीत त्यामुळ आमची सभागृहाची ही मागणी आहे की हा जो आता सिमाताईनी विषय सांगीतला त्या विषयावरती ताबडतोब आपण चौकशी करावी आणि असे जे जे विषय आहेत शहराच्या उत्पन्न वाढीच्या दृष्टीने त्या त्या विषयात आपण लक्ष घालाव आणि त्या त्या विषयामध्ये महापालिकेच उत्पन्न कसं वाढेल या दृष्टिकोनातून तुम्ही प्रयत्न करावेत त्यासाठी आम्ही सगळे तुमच्या बरोबर आहोत. तुम्ही काही कामाना सध्या कात्री लावलेली आहे ते करत असताना जी आवश्यक काम आहेत ती आवश्यक काम व्हावीत अशी आमची अपेक्षा आहे. परंतु जी अनावश्यक काम आहेत ती शंभर टक्के थांबली पाहीजेत. परंतु येत्या काही दिवसामध्ये महापालिकेच्या निवडणूका आहेत त्या अनुषंगाने नगरसेवक म्हणून आमची काही मागणी आहे की आमच्या भागातली जी नागरीकांच्या दृष्टिने महत्वाची काम आहेत मग त्याच्या दारातला रस्ता असेल, त्याच्या दारातल कॉंक्रीटीकरण असेल, त्याच्या दारातल पेव्हींग ब्लॉक असेल ही काम व्हावीत आणि त्या दृष्टिकोनातून प्रशासनान सुध्दा आम्हांला सहकार्य कराव आणि या विषयाच्या संदर्भात हा जो निर्णय दप्तरी दाखल करायचा घेतला आहे तो चांगला निर्णय आहे येथून पुढच्या काळामध्ये आयुक्त साहेबांनी पुन्हा आणाव आणि तो आणताना या जुन्या व्यावसायीकांना त्याच्यामध्ये विश्वासात घ्या आणि त्यांच्यावर अन्याय होणार नाही अशाप्रकारची भूमीका घेवून तो विषय मांडावा, धन्यवाद.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल -७२ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

मा.राजेंद्र गावडे – मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ४ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

विषय क्रमांक – ४

दिनांक – २४/१२/२०२१ विभाग – मा.आयुक्त

संदर्भ – १) मा.वसंत बोराटे व मा.संगीता ताम्हाणे यांचा प्रस्ताव.
२) मा.विधी समितीकडील ठराव क्र.७ दि. ३/१२/२०२१

पि.एम.पी.एल. मधील पुर्व पीसीएमटी चे वर्कशॉप विभागातील ११४ सेवकांनी त्यांची सेवा पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमध्ये वर्ग करुन घेणेकामी विनंती केली आहे. या पुर्वी पीसीएमटी कडील सेवकांना पिंपरी चिंचवड महापालिका मध्ये वर्ग करुन घेणेत आले आहे. त्याच प्रमाणे सध्या पुणे महानगर परिवहन महामंडळातील एकुण १३ आगारामध्ये कार्यशाळेकडील विविध विभागामध्ये पुर्व पिसीएमटी चे कर्मचारी सध्या कार्यरत आहेत. अशा उर्वरित ११४ सेवकांना पुर्वीच्या कर्मचा-यांप्रमाणे पिंपरी चिंचवड महापालिकेच्या ४०% हिश्या मधून वेतन अदा करित असल्याने यापुर्वी करणेत आलेल्या कार्यवाहीच्या धर्तीवर

उर्वरित पुर्व पीसीएमटी कार्यशाळा सेवकांना त्याच हिश्यामधून वेतन होणे विषयी कोणतेही हरकत नाही. सबब सोबतचे प्रपत्र 'अ' प्रमाणे ११४ पुर्व पिसीएमटी कडील कार्यशाळा सेवकांचे कोणतेही आर्थिक नुकसान न होता महापालिकेमध्ये कायम स्वरुपी वर्ग करुन घेणेस मान्यता देणेत यावी.

मा.ज्ञानदेव थोरात- मा.महापौर साहेब ठरावास अनुमोदन देतो.

मा.उत्तम केंदळे- मा.महापौर साहेब मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो- पी.एम.पी.एम.एल. कडील पूर्व पी.सी.एम.टी.चे वर्कशॉप विभागातील सेवक, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेत वर्ग करुन घेणेच्या सेवकांच्या यादीत दत्तात्रय यशवंत लटांबळे क्लिनर, कर्मचारी क्र.३२५२ यांचा समावेश होता. परंतु त्यांचे निधन झाल्यामुळे त्यांचे नाव यादीतून कमी करणेत आलेले आहे.

कै.दत्तात्रय यशवंत लटांबळे, क्लिनर यांचे जागी त्यांचा मुलगा श्री.शुभम दत्तात्रय लटांबळे पद – क्लिनर कर्मचारी क्र.१११५ पी.एम.पी.एम.एल. मध्ये कामकाज करत असून त्यांचाही समावेश पिंपरी चिंचवड महानगरपालिकेत वर्ग करणेत येणा-या सेवकांच्या यादीत करणेत यावा व त्यांची सेवा महानगरपालिकेत वर्ग करणेस मान्यता देणेत यावी.

तसेच पी.एम.पी.एम.एल. मधील पुर्व पीसीएमटी कडील सेवकांना पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमध्ये वर्ग करुन घेण्यात आले आहे. त्याचप्रमाणे सध्या पुणे महानगर परिवहन मंडळातील पुर्व पीसीएमटीचे ११४ सेवकांना पुर्वीच्या कर्मचाऱ्यांप्रमाणे पिंपरी चिंचवड महापालिकेच्या ४०% हिस्यामधून वेतन अदा करीत असल्याने यापुर्वी करण्यात आलेल्या कार्यवाहीच्या धर्तीवर श्री. तुकाराम दत्तात्रय खानेकर, कायम वाहक ३१९१ (क्लिनर) यांची पिंपरी चिंचवड महापालिकेमध्ये कायम स्वरुपी सेवा वर्ग करुन घेणेस प्रशासकीय मान्यता देणेत यावी.

तसेच महाराष्ट्र शासन, राक्रीधो- २००२/प्र.क्र./६८/क्रीयुसे-२ दि. १ जुलै २०१६ च्या शासन निर्णयानुसार अत्युच्च गुणवत्ताधारक खेळांडुना शासकीय, निमशासकीय व इतर क्षेत्रात नोकरीसाठी ५% आरक्षण ठेवण्यात आलेले आहे. या शासन निर्णयानुसार श्रीमती संपदा शिवाजी बुचडे, रा. ए-४ आनंदा हाईटस, सैनिकवाडी, वडगावशेरी, पुणे यांनी सन २०१० पासून ते आजतागायत ॲथलेटीक्स या खेळामध्ये प्राविण्य मिळविले आहे. त्यानुसार उपसंचालक, क्रीड व युवक सेवा, पुणे विभाग, पुणे यांचेकडील जा.क्र./उपसं/खेआ/प्रमाणपत्र/२१-२२/यु.क्र.०३९५/का-१/५०५ दि. १५ डिसेंबर २०२१ चे पत्रा अन्वये श्रीमती संपदा शिवाजी बुचडे ह्या क्रीडा विषयक अर्हता पुर्ण करीत आहेत, त्यामुळे सदर उमेदवार ५% खेळाडू आरक्षणा अंतर्गत गट क व ड पदाकरीता पात्र होत आहे.

सबब महाराष्ट्र शासनाचे शासन निर्णयाप्रमाणे व उपसंचालक, क्रिडा व युवक सेवा, पुणे विभाग, पुणे यांचेकडील पत्रानुसार श्रीमती संपदा शिवाजी बुचडे, रा. ए-४ आनंदा हाईटस, सैनिकवाडी, वडगावशेरी, पुणे यांना पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतील गट क व ड पदाकरीता ५% खेळाडू आरक्षणा अंतर्गत पदस्थापना करणेकामी शासनाकडे शिफारस करणेस मान्यता देण्यात यावी.

तसेच पी.एम.पी.एम.एल. मधील पूर्व पी.सी.एम.टी.कडील सेवकांना पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमध्ये वर्ग करून घेण्यात आले आहे. त्याचप्रमाणे सध्या पुणे महानगर परिवहन मंडळातील पूर्व पी.सी.एम.टी.चे ११४ सेवकांना पूर्वीच्या कर्मचाऱ्याप्रमाणे पिंपरी चिंचवड महापालिकेच्या ४० % हिस्यामधून वेतन अदा करीत असल्याने यापूर्वी करण्यात आलेल्या कार्यवाहीच्या धर्तीवर श्री. राजू वसंत ढेरंगे, (हेल्पर नं.१), श्री. संभाजी नामदेव कापसे (शिपाई), श्री.सुधीर दामोदर कुदळे (शिपाई), श्री.संजय दशरथ कुटे (वाहक), श्री.चिंधा नरहरी कुटे (वाहक) व श्री.चिंतामण निवृत्ती गायकवाड (वाहक) श्री. आकाश बाजीराव लांडगे (क्लिनर) व श्री.सुनील शांताराम हांडे (चालक) यांची पिंपरी चिंचवड महापालिकेमध्ये कायमस्वरूपी सेवा वर्ग करून घेणेस प्रशासकीय मान्यता देणेत यावी.

तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वायसीएमएच (पी.जी.आय) मध्ये डॉ. सौ. कांचन पंकज वायकोळे ह्या मनपा आस्थापनेवर सर्जन या गट 'अ' च्या शासन मान्य पदावर सन नोव्हेंबर २०१६ पासून नियमीत आस्थापनेवर कार्यरत आहेत. सध्या त्या वायसीएमएच (पी.जी.आय) या संस्थेमध्ये सहाय्यक प्राध्यापक (शल्य चिकित्सा) या पदावर आदेश क्र. वायसीएमएच/८ ड/ कावि/३५५/२०१८ दि. २२/११/२०१८ पासून कार्यरत आहेत.

महानगरपालिका आस्थापनेवर वायसीएमएच (पी.जी.आय) संस्थेकरीता सहयोगी प्राध्यापक (शल्य चिकित्सा) अभिनामाचे एक पद माहे डिसेंबर २०२१ मध्ये रिक्त होणार आहे. या रिक्त होणा-या पदासाठी आवश्यक असणा-या सर्व शैक्षणिक पात्रता व अनुभवाची अर्हता डॉ. सौ. कांचन पंकज वायकोळे ह्या धारण करीत असल्याने त्यांना सहयोगी प्राध्यापक (शल्य चिकित्सा) या पदावर पदोन्नतीद्वारे नेमणूक देण्यास मान्यता देणेत यावी.

तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिका "सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम २०२०" व "आकृतीबंध यामध्ये सुधारणा / दुरुस्ती करणेस मान्यता देणेत यावी. पिंपरी चिंचवड महानगरपालिका आस्थापनेवरील अधिकारी / कर्मचारी यांना शासन मंजूर सेवा प्रवेश नियम व आकृतीबंधाच्या अनुषंगाने योग्य ते बदल / दुरुस्ती सुचवायची असल्यास त्याबाबत विभागप्रमुखांचे स्वंयस्पष्ट शिफारस व अभिप्रायसह विभागप्रमुखांच्या मार्फत माहिती सादर करणेबाबत उपरोक्त संदर्भिय परिपत्रकामध्ये नमूद आहे.

त्यानुसार माहिती व जनसंपर्क विभागाकरिता प्रशासकीय सेवा गट-ब मधील जनता संपर्क अधिकारी या पदाकरिता मंजूर करण्यात आलेल्या सेवा प्रवेश नियमामध्ये खाली नमूद प्रमाणे बदल करणेस मान्यता देणेत यावी.

| अ.क्र | संवर्ग | पदनाम | नेमणूकीची पध्दत व टक्केवारी | नेमणूकीकरिता अर्हता व नेमणुकीची पध्दत |
|---|---|---|---|---|
| १ | प्रशासकीय सेवा गट – ब | जनता संपर्क अधिकारी | पदोन्नती १०० % | १) मान्यताप्राप्त विद्यापीठाकडील कोणत्याही शाखेची पदवी आवश्यक.<br>२) पत्रकारीता व जनसंज्ञापन ( Journalisam & Mass Communication ) या विषयातील पदवी परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक.<br>३) पिं.चिं.मनपा मधील वर्ग -३ (प्रशासकीय सेवा) मधील कामाचा कमीत कमी ५ वर्षाचा अनुभव ( कर्मचा-याची सेवाज्येष्ठता व गुणवत्तेच्या आधारे पदोन्नती ) असणे आवश्यक. |

तरी उपरोक्त प्रमाणे सेवा प्रवेश नियमामध्ये बदल करणेस तसेच सदर पद रिक्त झाल्यानंतर वरील प्रमाणे आर्हता धारण करणारे श्री. प्रफुल्ल बाळकृष्ण पुराणिक, मुख्य लिपिक यांचा माहिती व जनसंपर्क विभागाकडील अनुभव विचारात घेऊन त्यांची “जनता संपर्क अधिकारी” या पदावर पदोन्नतीने नेमणूक करण्यास मान्यता देणेत यावी.

तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेत शहर अभियंता व सहशहर अभियंता (स्थापत्य) अशी पदे मंजूर आहेत. सदर पदावरील अधिकारी निवृत्त झाल्यानंतर/ पदोन्नत्ती झाल्यानंतर सदर पदे रिक्त होणार आहेत. सबब शहर अभियंता या रिक्त होणा-या पदावर, सहशहर अभियंता सवर्गतील सेवाज्येष्ठ सहशहर अभियंता श्री.मकरंद ज्ञानोबा निकम यांची नेमणूक करणेस तसेच सहशहर अभियंता (स्थापत्य) रिक्त होणा-या पदावर कार्यकारी अभियंता (स्थापत्य) सवर्गतील सेवाज्येष्ठ कार्यकारी अभियंता श्री.अजय दिनकरराव सूर्यवंशी व श्री. सुनिल भागवानी यांना पदोन्नती देणेस मान्यता देणेत यावी.
मा.संदिप कस्पटे - मा.महापौर साहेब उपसूचनेस अनुमोदन देतो.

मा.राजेंद्र गावडे – मा.महापौर साहेब, उपसूचना स्विकारली आहे.

मा.महापौर - विषय क्रमांक ४ उपसूचनेसह मंजूर करणेत येत आहे.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा दुरुस्त ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक- ७४५ विषय क्रमांक – ४
दिनांक – २४/१२/२०२१ विभाग – मा.आयुक्त

संदर्भ – १) मा.वसंत बोराटे व मा.संगीता ताम्हाणे यांचा प्रस्ताव.
२) मा.विधी समितीकडील ठराव क्र.७ दि. ३/१२/२०२१

पि.एम.पी.एल. मधील पुर्व पीसीएमटी चे वर्कशॉप विभागातील ११४ सेवकांनी त्यांची सेवा पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमध्ये वर्ग करुन घेणेकामी विनंती केली आहे. या पुर्वी पीसीएमटी कडील सेवकांना पिंपरी चिंचवड महापालिका मध्ये वर्ग करुन घेणेत आले आहे. त्याच प्रमाणे सध्या पुणे महानगर परिवहन महामंडळातील एकुण १३ आगारामध्ये कार्यशाळेकडील विविध विभागामध्ये पुर्व पिसीएमटी चे कर्मचारी सध्या कार्यरत आहेत. अशा उर्वरित ११४ सेवकांना पुर्वीच्या कर्मचा-यांप्रमाणे पिंपरी चिंचवड महापालिकेच्या ४०% हिश्या मधून वेतन अदा करित असल्याने यापुर्वी करणेत आलेल्या कार्यवाहीच्या धर्तीवर उर्वरित पुर्व पीसीएमटी कार्यशाळा सेवकांना त्याच हिश्यामधून वेतन होणे विषयी कोणतेही हरकत नाही. सबब सोबतचे प्रपत्र ‘अ’ प्रमाणे ११४ पुर्व पिसीएमटी कडील कार्यशाळा सेवकांचे कोणतेही आर्थिक नुकसान न होता महापालिकेमध्ये कायम स्वरुपी वर्ग करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच पी.एम.पी.एम.एल. कडील पूर्व पी.सी.एम.टी.चे वर्कशॉप विभागातील सेवक, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेत वर्ग करुन घेणेच्या सेवकांच्या यादीत दत्तात्रय यशवंत लटांबळे क्लिनर, कर्मचारी क्र.३२५२ यांचा समावेश होता. परंतु त्यांचे निधन झाल्यामुळे त्यांचे नाव यादीतून कमी करणेत आलेले आहे.

कै.दत्तात्रय यशवंत लटांबळे, क्लिनर यांचे जागी त्यांचा मुलगा श्री.शुभम दत्तात्रय लटांबळे पद – क्लिनर कर्मचारी क्र.१११५ पी.एम.पी.एम.एल. मध्ये कामकाज करत असून त्यांचाही समावेश पिंपरी चिंचवड महानगरपालिकेत वर्ग करणेत येणा-या सेवकांच्या यादीत करणेत यावा व त्यांची सेवा महानगरपालिकेत वर्ग करणेस मान्यता देणेत येत आहे.

तसेच पी.एम.पी.एम.एल. मधील पुर्व पीसीएमटी कडील सेवकांना पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमध्ये वर्ग करुन घेण्यात आले आहे. त्याचप्रमाणे सध्या पुणे महानगर परिवहन मंडळातील पुर्व पीसीएमटीचे ११४ सेवकांना पुर्वीच्या कर्मचाऱ्यांप्रमाणे पिंपरी चिंचवड महापालिकेच्या ४०% हिस्यामधून वेतन अदा करीत असल्याने यापुर्वी करण्यात आलेल्या कार्यवाहीच्या धर्तीवर श्री. तुकाराम दत्तात्रय खानेकर, कायम वाहक ३१९१ (क्लिनर) यांची पिंपरी चिंचवड महापालिकेमध्ये कायम स्वरुपी सेवा वर्ग करुन घेणेस प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

तसेच महाराष्ट्र शासन, राक्रीधो- २००२/प्र.क्र./६८/क्रीयुसे-२ दि. १ जुलै २०१६ च्या शासन निर्णयानुसार अत्युच्च गुणवत्ताधारक खेळांडुना शासकीय, निमशासकीय व इतर क्षेत्रात नोकरीसाठी ५% आरक्षण ठेवण्यात आलेले आहे. या शासन निर्णयानुसार श्रीमती संपदा शिवाजी बुचडे, रा. ए-४ आनंदा हाईटस, सैनिकवाडी, वडगावशेरी, पुणे यांनी सन २०१० पासून ते आजतागायत ॲथलेटीक्स या खेळामध्ये प्राविण्य मिळविले आहे. त्यानुसार उपसंचालक, क्रीड व युवक सेवा, पुणे विभाग, पुणे यांचेकडील जा.क्र./उपसं/खेआ/प्रमाणपत्र/२१-२२/यु.क्र.०३९५/का-१/५०५ दि. १५ डिसेंबर २०२१ चे पत्रा अन्वये श्रीमती संपदा शिवाजी बुचडे ह्या क्रीडा विषयक अर्हता पुर्ण करीत आहेत, त्यामुळे सदर उमेदवार ५% खेळाडू आरक्षणा अंतर्गत गट क व ड पदाकरीता पात्र होत आहे.

सबब महाराष्ट्र शासनाचे शासन निर्णयाप्रमाणे व उपसंचालक, क्रिडा व युवक सेवा, पुणे विभाग, पुणे यांचेकडील पत्रानुसार श्रीमती संपदा शिवाजी बुचडे, रा. ए-४ आनंदा हाईटस, सैनिकवाडी, वडगावशेरी, पुणे यांना पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतील गट क व ड पदाकरीता ५% खेळाडू आरक्षणा अंतर्गत पदस्थापना करणेकामी शासनाकडे शिफारस करणेस मान्यता देण्यात येत आहे.

तसेच पी.एम.पी.एम.एल. मधील पूर्व पी.सी.एम.टी.कडील सेवकांना पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमध्ये वर्ग करून घेण्यात आले आहे. त्याचप्रमाणे सध्या पुणे महानगर परिवहन मंडळातील पूर्व पी.सी.एम.टी.चे ११४ सेवकांना पूर्वीच्या कर्मचाऱ्याप्रमाणे पिंपरी चिंचवड महापालिकेच्या ४० % हिस्यामधून वेतन अदा करीत असल्याने यापूर्वी करण्यात आलेल्या कार्यवाहीच्या धर्तीवर श्री. राजू वसंत ढेरंगे, (हेल्पर नं.१), श्री. संभाजी नामदेव कापसे (शिपाई), श्री.सुधीर दामोदर कुदळे (शिपाई), श्री.संजय दशरथ कुटे (वाहक), श्री.चिंधा नरहरी कुटे (वाहक) व श्री.चिंतामण निवृत्ती गायकवाड (वाहक) श्री. आकाश बाजीराव लांडगे (क्लिनर) व श्री.सुनील शांताराम हांडे (चालक) यांची पिंपरी चिंचवड महापालिकेमध्ये कायमस्वरूपी सेवा वर्ग करून घेणेस प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वायसीएमएच (पी.जी.आय) मध्ये डॉ. सौ. कांचन पंकज वायकोळे ह्या मनपा आस्थापनेवर सर्जन या गट 'अ' च्या शासन मान्य पदावर

सन नोव्हेंबर २०१६ पासून नियमीत आस्थापनेवर कार्यरत आहेत. सध्या त्या वायसीएमएच (पी.जी.आय) या संस्थेमध्ये सहाय्यक प्राध्यापक (शल्य चिकित्सा) या पदावर आदेश क्र. वायसीएमएच/ ८ ड/ कावि/३५५/२०१८ दि. २२/११/२०१८ पासून कार्यरत आहेत.

महानगरपालिका आस्थापनेवर वायसीएमएच (पी.जी.आय) संस्थेकरीता सहयोगी प्राध्यापक (शल्य चिकित्सा) अभिनामाचे एक पद माहे डिसेंबर २०२१ मध्ये रिक्त होणार आहे. या रिक्त होणा-या पदासाठी आवश्यक असणा-या सर्व शैक्षणिक पात्रता व अनुभवाची अर्हता डॉ. सौ. कांचन पंकज वायकोळे ह्या धारण करीत असल्याने त्यांना सहयोगी प्राध्यापक (शल्य चिकित्सा) या पदावर पदोन्नतीद्वारे नेमणूक देण्यास मान्यता देणेत येत आहे.

तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिका "सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम २०२०" व "आकृतीबंध यामध्ये सुधारणा / दुरुस्ती करणेस मान्यता देणेत येत आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिका आस्थापनेवरील अधिकारी / कर्मचारी यांना शासन मंजूर सेवा प्रवेश नियम व आकृतीबंधाच्या अनुषंगाने योग्य ते बदल / दुरुस्ती सुचवायची असल्यास त्याबाबत विभागप्रमुखांचे स्वंयस्पष्ट शिफारस व अभिप्रायसह विभागप्रमुखांच्या मार्फत माहिती सादर करणेबाबत उपरोक्त संदर्भिय परिपत्रकामध्ये नमूद आहे.

त्यानुसार माहिती व जनसंपर्क विभागाकरिता प्रशासकीय सेवा गट-ब मधील जनता संपर्क अधिकारी या पदाकरिता मंजूर करण्यात आलेल्या सेवा प्रवेश नियमामध्ये खाली नमूद प्रमाणे बदल करणेस मान्यता देणेत येत आहे.

| अ.क्र | संवर्ग | पदनाम | नेमणूकीची पध्दत व टक्केवारी | नेमणूकीकरिता अर्हता व नेमणुकीची पध्दत |
|---|---|---|---|---|
| १ | प्रशासकीय सेवा गट – ब | जनता संपर्क अधिकारी | पदोन्नती १०० % | १) मान्यताप्राप्त विद्यापीठाकडील कोणत्याही शाखेची पदवी आवश्यक.<br>२) पत्रकारीता व जनसंज्ञापन ( Journalisam & Mass Communication ) या विषयातील पदवी परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक.<br>३) पिं.चिं.मनपा मधील वर्ग -३ (प्रशासकीय सेवा) मधील कामाचा कमीत कमी ५ वर्षाचा अनुभव ( कर्मचा-याची सेवाज्येष्ठता व गुणवत्तेच्या आधारे पदोन्नती ) असणे आवश्यक. |

तरी उपरोक्त प्रमाणे सेवा प्रवेश नियमामध्ये बदल करणेस तसेच सदर पद रिक्त झाल्यानंतर वरील प्रमाणे आर्हता धारण करणारे श्री. प्रफुल्ल बाळकृष्ण पुराणिक, मुख्य लिपिक यांचा माहिती व जनसंपर्क विभागाकडील अनुभव विचारात घेऊन त्यांची "जनता संपर्क अधिकारी" या पदावर पदोन्नतीने नेमणूक करण्यास मान्यता देणेत येत आहे.

तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेत शहर अभियंता व सहशहर अभियंता (स्थापत्य) अशी पदे मंजूर आहेत. सदर पदावरील अधिकारी निवृत्त झाल्यानंतर/ पदोन्नत्ती झाल्यानंतर सदर पदे रिक्त होणार आहेत. सबब शहर अभियंता या रिक्त होणा-या पदावर,

सहशहर अभियंता सवर्गतील सेवाज्येष्ठ सहशहर अभियंता श्री.मकरंद ज्ञानोबा निकम यांची नेमणूक करणेस तसेच सहशहर अभियंता (स्थापत्य) रिक्त होणा-या पदावर कार्यकारी अभियंता (स्थापत्य) सवर्गतील सेवाज्येष्ठ कार्यकारी अभियंता श्री.अजय दिनकरराव सूर्यवंशी व श्री. सुनिल भागवानी यांना पदोन्नती देणेस मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल - ७२ प्रतिकूल-०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------

मा.राजेंद्र गावडे – मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ५ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडतो.

विषय क्रमांक – ५

दिनांक – २४/१२/२०२१ विभाग – मा.आयुक्त

संदर्भ – १) मा.आयुक्त यांचेकडील पत्र क्र.नरवि/कावि/१५/१५०/२०२१, दि.११/१०/२०२१
२) मा.शहर सुधारणा समितीकडील ठराव क्र.३५ दि.२०/१०/२०२१अन्वये.
३) मा.महापालिका सभा ठराव क्र.४३१ दि.१८/११/२०२१ अन्वये.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची हद्दवाढ महाराष्ट्र शासनाचे आदेश क्र. पीसीसी/३०९६/१८०१/सीआर–२६१/नवि-२२, दिनांक–११/०९/१९९७ अन्वये करणेत आली आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वाढीव हद्दीची विकास योजना महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, अधिसुचना क्र. टीपीएस–१८०५/१०५०/सीआर–७९५/०७/नवि-१३, दि. ३०/०५/२००८ अन्वये मंजूर आहे. तसेच दि. १८/०८/२००९ रोजीच्या निर्णयान्वये पुनःप्रसिध्द केलेला भाग वगळता उर्वरित विकास योजना मंजूर असून शासन निर्णय क्र. टीपीएस/१८१२/प्र.क्र.५८/१२/पुर्नबांधणी क्र.२७/१२/ईपी मंजूरी/नवि-१३,दिनांक ०२/०३/२०१५ अन्वये उर्वरित भागाच्या विकास योजनेबाबत निर्णय घेणेत आलेला आहे. मौजे चिखली येथील पिपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मंजुर विकास योजनेमधील खालील तक्यात दर्शविलेल्या प्रस्तावित रस्ता / आरक्षणाचे भूसंपादन करणे आवश्यक आहे.

| अ.क्र. | आ. क्र. | आरक्षणाचे प्रयोजन | गट नं. | बाधित होणारे संपादन करावयाचे एकुण सुमारे क्षेत्र चौ.मी. |
|---|---|---|---|---|
| १. | - | मंजूर विकास योजनेतील १८.०० मी. रस्ता रुंदी. | मौजे चिखली येथील गट नं.२२१ ते २४३, ६८८ व ६९० | ५००० चौ.मी. |

तरी उपरोक्त प्रस्तावित प्रयोजनाखालील जमिन  महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम व नविन भूसंपादन अधिनियम २०१३ अन्वये संपादन करणेकामी सदर रस्त्याचा भूसंपादन प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी,पुणे यांचेकडे पाठविणेकरिता मा.महापालिका सभेची मान्यता घेणे आवश्यक आहे. तरी प्रस्तुत जमिनीचे महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२६ व भूमीसंपादन पुनर्वसन व पुनर्वसाहत करतांना वाजवी नुकसान भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकता राखण्याचा हक्क अधिनियम - २०१३(नविन भूसंपादन कायदा २०१३) अन्वये संपादन करणेस मान्यता देणेत यावी.

मा.ज्ञानदेव थोरात – मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

मा.उत्तम केंदळे - मा.महापौर साहेब मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो – चिंचवड स.नं.२६५ (पै) येथील जागा महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४२ मधील कलम २०५ अंतर्गत ताब्यात घेणेस मान्यता देणेत यावी. एम्पायर इस्टेट येथील मुख्य उड्डाण पुलावरुन चिंचवड बाजुकडे उतरणेस व पुलावर चढणेस लुप/रॅम्प बांधण्याचे काम महानगरपालिके मार्फत चालु आहे.  लुप साठी विकास आराखडया व्यतिरीक्त आवश्यक असणारी जागा या ठिकाणचे जागा मालकांनी मनपाच्या ताब्यात दिली आहे. तथापि सदर लुप साठी लागणा-या जागा व्यतिरीक्तची जागा बांधकाम अयोग्य (Non Built up) आहे.  सदरची (Non Built up) जागा ही त्या ठिकाणचे जागा मालक श्री.संताजी धोंडीबा गावडे, भगीरथी संताजी गावडे, राजेश संताजी गावडे व राकेश संताजी गावडे हे मनपाच्या ताब्यात खाजगी वाटाघाटीने /टीडीआर/एफएसआय च्या मोबदल्याने ताब्यात देण्यास तयार आहेत.

तरी चिंचवड लुप लगतची चिंचवड स.नं.२६५ (पै) येथील जागा महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४२ मधील कलम २०५ अंतर्गत ताब्यात घेणेबाबतची कार्यवाही करणेस मान्यता देणेत यावी.

तसेच चिंचवड येथील पॉवर हाऊस चौक येथे असलेले सुलभ शौचालय हे मुख्य वसाहतीत असल्याने तेथील नागरीकांना सदर शौचालयाचे ठिकाणी अस्वच्छतेचा त्रास होत आहे.  यामुळे सदर सुलभ शौचालय हे एल्प्रो पाण्याचे टाकी जवळ स्थलांतरीत करणेस मान्यता देणेत यावी.

तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या पिंपळे गुरव-सांगवी या शिवेवरील मंजुर विकास आराखड्यातील मौजे पिंपळे गुरव येथील स.नं.५१ ते ५६ व मौजे सांगवी येथील स.नं.७०, ७१ कृष्णा चौक ते एच.डी.एफ.सी. बँक (एम के हॉटेल चौक) या १८ मी. रस्त्याचे भूसंपादन करणेस मान्यता देणेत यावी. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या पिंपळे गुरव-सांगवी या शिवेवरील मंजुर विकास आराखड्यातील मौजे पिंपळे गुरव येथील स.नं.५१ ते ५६ व मौजे सांगवी येथील स.नं.७०,७१ कृष्णा चौक ते एच.डी.एफ.सी. बँक (एम के हॉटेल चौक) या १८ मी. रस्त्याची जागा भुसंपादन प्रस्तावाने मनपाच्या ताब्यात घेणेस मान्यता देणेत यावी.

उपरोक्त प्रस्तावित प्रयोजनाखालील जमिन  महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम व नविन भूसंपादन अधिनियम २०१३ अन्वये संपादन करणेकामी सदर रस्त्याचा भूसंपादन प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी,पुणे यांचेकडे पाठविणेस मान्यता देणेत यावी.

तरी प्रस्तुत जमिनीचे महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२६ व भूमीसंपादन पुनर्वसन व पुनर्वसाहत करतांना वाजवी नुकसान भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकता राखण्याचा हक्क अधिनियम - २०१३ (नविन भूसंपादन कायदा २०१३) अन्वये तातडीने संपादन करणेस मान्यता देणेत यावी.

तसेच मौजे गाव दापोडी येथील सर्वे नंबर ९, १० व ११ पैकी क्षेत्रामधील मंजूर विकास योजनेतील १२ मीटर रस्ता स्थलांतरित करून सदर रस्त्याला कै. सोपानराव श्रीपती काटे रस्ता असे नामकरण करणेस मान्यता देणेत यावी. मौजे दापोडी गाव येथील सर्व्हे नंबर ९, १० व ११ पैकी क्षेत्रामधील मंजूर विकास योजनेत आरक्षित असलेल्या १२ मीटर रस्ता सध्या असलेल्या ठिकाणाहून नदी किनारीच्या बाजूला म्हणजेच सर्व्हे नंबर ११,१० व ९ च्या पश्चिमेला स्थलांतरित करण्यात आलेला आहे व त्याप्रमाणे सदर ठरावाला मंजूर विकास योजनेचा आराखडा ( रंगीत प्रत ) सोबत माहितीसाठी देत आहे, तसेच सदरच्या १२ मीटर रस्त्याला कै.श्री. सोपानराव श्रीपती काटे रस्ता असे नामकरण करण्यास मान्यता देणेत यावी. व सदर प्रकरणी मूळ मिळकत धारकांची संमती आहे तरी सदर नमूद आरक्षण स्थलांतरित करण्यात येत आहे व महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ कलम चे कलम ३७ अन्वये फेरबदल करण्यात व फेरबदलाची वैधानिक कार्यवाही पूर्ण करून शासनास फेरबदलाचा प्रस्ताव सादर करणे आयुक्त पिंपरी - चिंचवड महानगरपालिका यांना प्राधिकृत करण्यास मान्यता देण्यात यावी.
मा.संदिप कस्पटे - मा.महापौर साहेब उपसूचनेस अनुमोदन देतो.

मा.राजेंद्र गावडे – मा.महापौर साहेब, उपसूचना स्विकारली आहे.

**मा.अश्विनी जाधव** - मा.महापौर, मा.आयुक्त, सन्मा.सभागृह, खरंतर गेली चार वर्षापासून मी या विषयासाठी विरोध करीत होते आणि सातत्याने पत्रव्यवहार करत होते. आज पुन्हा तोच विषय सभागृहात आलेला आहे, आणि या विषयाला मी विरोध करते, कारण गेल्या चार वर्षपासून माझ्या नागरीकांना हा विषय नको आहे. आज लोकप्रतिनिधी म्हणून मी त्या भागाचा नेतृत्व करते. ज्या भागातील नागरीकांना हा विषय नको आहे त्यामुळे मी या विषयाला विरोध करते, तुम्हांला पुढचा निर्णय काय तो घेऊ शकता. कारण महापौर आणि पक्षनेत्यांना मी वारंवारं सांगतीय, हा विषय दप्तरी दाखल करा किंवा तहकुब करा. तुम्हाला पण या विषयात काय इंट्रेस्ट आहे हे मला कळत नाहीये. त्यावर तो दप्तरी दाखल करावा ही विनंती करते, धन्यवाद.

मा.महापौर – अश्विनीताईच्या विरोधाची नोंद घेवून हा विषय उपसूचनेसह मंजूर करण्यात येत आहे.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा दुरुस्त ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक – ७४६ | विषय क्रमांक – ५

दिनांक – २४/१२/२०२१ | विभाग – मा.आयुक्त

संदर्भ – १) मा.आयुक्त यांचेकडील पत्र क्र.नरवि/कावि/१५/१५०/२०२१, दि.११/१०/२०२१

२) मा.शहर सुधारणा समितीकडील ठराव क्र.३५ दि.२०/१०/२०२१अन्वये.

३) मा.महापालिका सभा ठराव क्र.४३१ दि.१८/११/२०२१ अन्वये.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची हद्दवाढ महाराष्ट्र शासनाचे आदेश क्र. पीसीसी/३०९६/१८०१/सीआर–२६१/नवि-२२, दिनांक–११/०९/१९९७ अन्वये करणेत आली आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वाढीव हद्दीची विकास योजना महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, अधिसुचना क्र. टीपीएस–१८०५/१०५०/सीआर–७९५/०७/नवि-१३, दि. ३०/०५/२००८ अन्वये मंजूर आहे. तसेच दि. १८/०८/२००९ रोजीच्या निर्णयान्वये पुनःप्रसिध्द केलेला भाग वगळता उर्वरित विकास योजना मंजूर असून शासन निर्णय क्र. टीपीएस/१८१२/प्र.क्र.५८/१२/पुर्नबांधणी क्र.२७/१२/ईपी मंजूरी/नवि-१३,दिनांक ०२/०३/२०१५ अन्वये उर्वरित भागाच्या विकास योजनेबाबत निर्णय घेणेत आलेला आहे. मौजे चिखली येथील पिपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मंजुर विकास योजनेमधील खालील तक्यात दर्शविलेल्या प्रस्तावित रस्ता / आरक्षणाचे भूसंपादन करणे आवश्यक आहे.

| अ.क्र. | आ. क्र. | आरक्षणाचे प्रयोजन | गट नं. | बाधित होणारे संपादन करावयाचे एकुण सुमारे क्षेत्र चौ.मी. |
|---|---|---|---|---|
| १. | - | मंजूर विकास योजनेतील १८.०० मी. रस्ता रुंदी. | मौजे चिखली येथील गट नं.२२१ ते २४३, ६८८ व ६९० | ५००० चौ.मी. |

तरी उपरोक्त प्रस्तावित प्रयोजनाखालील जमिन महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम व नविन भूसंपादन अधिनियम २०१३ अन्वये संपादन करणेकामी सदर रस्त्याचा भूसंपादन प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी,पुणे यांचेकडे पाठविणेकरिता मा.महापालिका सभेची मान्यता घेणे आवश्यक आहे. तरी प्रस्तुत जमिनीचे महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२६ व भूमीसंपादन पुनर्वसन व पुनर्वसाहत करतांना वाजवी नुकसान भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकता राखण्याचा हक्क अधिनियम - २०१३(नविन भूसंपादन कायदा २०१३) अन्वये संपादन करणेस मान्यता देणेत येत आहे.

तसेच चिंचवड स.नं.२६५ (पै) येथील जागा महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४२ मधील कलम २०५ अंतर्गत ताब्यात घेणेस मान्यता देणेत येत आहे. एम्पायर इस्टेट येथील मुख्य उड्डाण पुलावरुन चिंचवड बाजुकडे उतरणेस व पुलावर चढणेस लुप/रॅम्प

बांधण्याचे काम महानगरपालिके मार्फत चालु आहे. लुप साठी विकास आराखडया व्यतिरीक्त आवश्यक असणारी जागा या ठिकाणचे जागा मालकांनी मनपाच्या ताब्यात दिली आहे. तथापि सदर लुप साठी लागणा-या जागा व्यतिरीक्तची जागा बांधकाम अयोग्य (Non Built up) आहे. सदरची (Non Built up) जागा ही त्या ठिकाणचे जागा मालक श्री.संताजी धोंडीबा गावडे, भगीरथी संताजी गावडे, राजेश संताजी गावडे व राकेश संताजी गावडे हे मनपाच्या ताब्यात खाजगी वाटाघाटीने /टीडीआर/एफएसआय च्या मोबदल्याने ताब्यात देण्यास तयार आहेत.

तरी चिंचवड लुप लगतची चिंचवड स.नं.२६५ (पै) येथील जागा महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४२ मधील कलम २०५ अंतर्गत ताब्यात घेणेबाबतची कार्यवाही करणेस मान्यता देणेत येत आहे.

तसेच चिंचवड येथील पॉवर हाऊस चौक येथे असलेले सुलभ शौचालय हे मुख्य वसाहतीत असल्याने तेथील नागरीकांना सदर शौचालयाचे ठिकाणी अस्वच्छतेचा त्रास होत आहे. यामुळे सदर सुलभ शौचालय हे एल्प्रो पाण्याचे टाकी जवळ स्थलांतरीत करणेस मान्यता देणेत येत आहे.

तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या पिंपळे गुरव-सांगवी या शिवेवरील मंजुर विकास आराखड्यातील मौजे पिंपळे गुरव येथील स.नं.५१ ते ५६ व मौजे सांगवी येथील स.नं.७०, ७१ कृष्णा चौक ते एच.डी.एफ.सी. बँक (एम के हॉटेल चौक) या १८ मी. रस्त्याचे भूसंपादन करणेस मान्यता देणेत येत आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या पिंपळे गुरव-सांगवी या शिवेवरील मंजुर विकास आराखड्यातील मौजे पिंपळे गुरव येथील स.नं.५१ ते ५६ व मौजे सांगवी येथील स.नं.७०,७१ कृष्णा चौक ते एच.डी.एफ.सी. बँक (एम के हॉटेल चौक) या १८ मी. रस्त्याची जागा भुसंपादन प्रस्तावाने मनपाच्या ताब्यात घेणेस मान्यता देणेत येत आहे.

उपरोक्त प्रस्तावित प्रयोजनाखालील जमिन महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम व नविन भूसंपादन अधिनियम २०१३ अन्वये संपादन करणेकामी सदर रस्त्याचा भूसंपादन प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी,पुणे यांचेकडे पाठविणेस मान्यता देणेत येत आहे.

तरी प्रस्तुत जमिनीचे महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२६ व भूमीसंपादन पुनर्वसन व पुनर्वसाहत करतांना वाजवी नुकसान भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकता राखण्याचा हक्क अधिनियम - २०१३ (नविन भूसंपादन कायदा २०१३) अन्वये तातडीने संपादन करणेस मान्यता देणेत येत आहे.

तसेच मौजे गाव दापोडी येथील सर्वे नंबर ९, १० व ११ पैकी क्षेत्रामधील मंजूर विकास योजनेतील १२ मीटर रस्ता स्थलांतरित करून सदर रस्त्याला कै. सोपानराव श्रीपती काटे रस्ता असे नामकरण करणेस मान्यता देणेत येत आहे. मौजे दापोडी गाव येथील सर्व्हे नंबर ९, १० व ११ पैकी क्षेत्रामधील मंजूर विकास योजनेत आरक्षित असलेल्या १२ मीटर रस्ता सध्या असलेल्या ठिकाणाहून नदी किनारीच्या बाजूला म्हणजेच सर्व्हे नंबर ११,१० व ९ च्या पश्चिमेला स्थलांतरित करण्यात आलेला आहे व त्याप्रमाणे सदर ठरावाला मंजूर विकास योजनेचा आराखडा ( रंगीत प्रत ) सोबत माहितीसाठी देत आहे, तसेच सदरच्या १२ मीटर रस्त्याला कै.श्री. सोपानराव श्रीपती काटे रस्ता असे नामकरण करण्यास मान्यता देणेत येत

आहे. व सदर प्रकरणी मूळ मिळकत धारकांची संमती आहे तरी सदर नमूद आरक्षण स्थलांतरित करण्यात येत आहे व महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ कलम चे कलम ३७ अन्वये फेरबदल करण्यात व फेरबदलाची वैधानिक कार्यवाही पूर्ण करून शासनास फेरबदलाचा प्रस्ताव सादर करणे आयुक्त पिंपरी - चिंचवड महानगरपालिका यांना प्राधिकृत करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

अनुकूल- ७१ प्रतिकूल – १

अशी मते पडली व सदर ठराव बहुमताने मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

----

मा.राजेंद्र गावडे – मा.महापौर साहेब, विषय क्र.६ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक – ७४७ विषय क्रमांक – ६

दिनांक – २४/१२/२०२१ विभाग – मा.आयुक्त

संदर्भ – १) मा.आयुक्त यांचेकडील पत्र क्र.नरवि/कावि/१५/१५२/२०२१, दि.११/१०/२०२१

२) मा.शहर सुधारणा समितीकडील ठराव क्र.३७ दि.२०/१०/२०२१अन्वये.

३) मा.महापालिका सभा ठराव क्र.७३३ दि.१८/११/२०२१ अन्वये.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची हद्दवाढ महाराष्ट्र शासनाचे आदेश क्र. पीसीसी/३०९६/१८०१/सीआर – २६१/ नवि -२२, दिनांक – ११/०९/१९९७ अन्वये करणेत आली आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वाढीव हद्दीची विकास योजना महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, अधिसुचना क्र. टीपीएस – १८०५/१०५०/सीआर – ७९५/०७/नवि-१३, दि.३०/०५/२००८ अन्वये मंजूर आहे. तसेच दि. १८/०८/२००९ रोजीच्या निर्णयान्वये पुनःप्रसिध्द केलेला भाग वगळता उर्वरित विकास योजना मंजूर असून शासन निर्णय क्र. टीपीएस/१८१२/प्र.क्र.५८/१२/पुर्नबांधणी क्र.२७/१२/ईपी मंजूरी/नवि-१३,दिनांक ०२/०३/२०१५ अन्वये उर्वरित भागाच्या विकास योजनेबाबत निर्णय घेणेत आलेला आहे. मौजे चिखली येथील पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मंजुर विकास योजनेमधील खालील तक्यात दर्शविलेल्या प्रस्तावित रस्ता / आरक्षणाचे भूसंपादन करणे आवश्यक आहे.

| अ.क्र. | आ. क्र. | आरक्षणाचे प्रयोजन | गट नं. | बाधित होणारे संपादन करावयाचे एकुण सुमारे क्षेत्र चौ.मी. |
|---|---|---|---|---|
| १. | - | मंजूर विकास योजनेतील ३०.०० मी. रुंद रस्ता | मौजे चिखली येथील गट नं. ६८०, ६८७, ६८८ व ६८९ | ६००० चौ.मी. |

तरी उपरोक्त प्रस्तावित प्रयोजनाखालील जमिन महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम व नविन भूसंपादन अधिनियम २०१३ अन्वये संपादन करणेकामी सदर रस्त्याचा भूसंपादन प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी, पुणे यांचेकडे पाठविणेकरिता मा.महापालिका सभेची मान्यता घेणे आवश्यक आहे. तरी प्रस्तुत जमिनीचे महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२६ व भूमीसंपादन पुनर्वसन व पुनर्वसाहत करतांना वाजवी नुकसान भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकता राखण्याचा हक्क अधिनियम – २०१३ (नविन भूसंपादन कायदा २०१३) अन्वये संपादन करणेस मान्यता देणेत येत आहे.

मा.ज्ञानदेव थोरात- मा.महापौर साहेब ठरावास अनुमोदन देतो.

मा.अश्विनी जाधव - मा.महापौर, विषय क्रमांक ६ ला माझा विरोध आहे.

मा.महापौर – अश्विनीताईच्या विरोधाची नोंद घेवून हा विषय मंजूर करण्यात येत आहे.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल- ७१ प्रतिकूल- १

अशी मते पडली व सदर ठराव बहुमताने मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

----

मा.राजेंद्र गावडे – मा.महापौर साहेब, विषय क्र. ७ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडतो.

विषय क्रमांक – ७

दिनांक – २४/१२/२०२१ विभाग – मा.आयुक्त

संदर्भ -१) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.अमुका/३/कावि/१७३/२०२१दि. ५/१०/२०२१
२) मा.महापालिका सभा ठराव क्र.७२१ दि.२०/१०/२०२१ अन्वये.
३) मा.महापालिका सभा ठराव क्र.७३५ दि.१८/११/२०२१ अन्वये.

मा.महापालिका सभा ठराव क्र. ६९६ दि.२०/०९/२०२१ अन्वये यांत्रिकीकरणाद्वारे साफसफाईचा विषय प्रशासकीय मान्यतेकामी माहे ऑक्टोबर महिन्याचे मा.महापालिका सभेपुढे सादर करणेस मान्यता देण्यात आलेली आहे. तसेच जुन्या आरएफपी मधील ४ पॅकेज ऐवजी २ पॅकेजमध्ये शहरातील रस्त्यांची विभागणी करुन सुधारित आरएफपी मसुदा तयार करण्यास व खर्चामध्ये कपात करुन यंत्रे आणि मनुष्यबळाची फेररचना करण्यात यावी असेही ठरावामध्ये नमूद करण्यात आलेले आहे.

त्यानुसार आरएफपी मसुद्यामध्ये बदल करुन सुधारित आरएफपी तयार करण्यात आलेला असून आरएफपी मध्ये असलेली रचना व खर्च यामध्ये बदल झालेला आहे. नविन आरएफपी मसुद्यामध्ये असलेल्या करण्यात आलेला बदलांबाबतचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

सदर कामकाजाकरिता नियुक्त सल्लागार संस्था मे.टंडन अर्बनन सोल्युशन्स प्रा.लि. यांचेमार्फत सुधारित आरएफपी मसुदा तयार करण्यात आलेला असून त्यानुसार शहरातील १८.०० मी. पेक्षा मोठ्या रस्त्यांची २ भागांमध्ये विभागणी करण्यात आलेली असून त्यामध्ये Southern side of head office व Northern side of head office चे प्रत्येकी १ पॅकेज अशा रितीने २ पॅकेज निश्चित करण्यात आलेले आहे.

पॅकेज क्र. १ करिता ३३१ किमी व पॅकेज क्र. २ करिता ३३९.१५ किमी, इतकी रस्त्याची लांबी निश्चित करण्यात आलेली आहे. त्यामुळे शहरातील एकत्रित रस्त्यांची अंदाजित लांबी (Sweeping Length)६७०.१५ गृहीत धरण्यात आलेली आहे. यामध्ये शहरातील महामार्ग, बीआरटी मार्ग व १८.०० मी. पेक्षा रस्त्यांची लांबी गृहीत धरण्यात आलेली आहे. यांत्रिकी पध्दतीने रस्ते साफसफाई कामकाजाकरिता आवश्यक असलेल्या वाहनांची व मनुष्यबळा बाबतची माहिती आरएफपी मध्ये समाविष्ट करण्यात आलेला असून त्याचा तपशिल खालीलप्रमाणे –

**Package 1: - Southern side of Head Office**

| Heavy Vehicle (5-6 M3) | Medium Vehicle (2.5-3.5 M3) | Gobbler / Litter Picker | Total Vehicles | Hook loader / Compactor | Water Tanker (10000 L) |
|---|---|---|---|---|---|
| 4 | 4 | 8 | 16 | 3 | 2 |

**Proposed Manpower Deployment**

| Sweeper | Driver | Operator | Helper | Total |
|---|---|---|---|---|
| 150 | 16 | 20 | 5 | 191 |

**Package 2: - Northern side of Head Office**

| Heavy Vehicle (5-6 M3) | Medium Vehicle (2.5-3.5 M3) | Gobbler / Litter Picker | Total Vehicles | Hook loader / Compactor | Water Tanker (10000 L) |
|---|---|---|---|---|---|
| 4 | 4 | 8 | 16 | 3 | 2 |

**Proposed Manpower Deployment**

| Sweeper | Driver | Operator | Helper | Total |
|---|---|---|---|---|
| 150 | 16 | 20 | 5 | 191 |

सदर निविदा कालावधी हा ७ वर्षांचा असून त्याकरिता अंदाजे र.रु.३६२.०४ कोटींचा खर्च अपेक्षित आहे. तथापि, निविदा प्रक्रिया राबविण्या करिता खालील बाबींची पूर्तता करुन कार्यवाही होणे आवश्यक आहे.

1. निविदा कालावधी हा ७ वर्षांचा असल्याने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ७२(ब) नुसार असे दायित्व पत्करण्यापूर्वी मा.महापालिका सभेची मंजूरी घेण्याचे प्रावधान आहे. त्यामुळे सदर निविदा प्रक्रिया राबविण्याकरिता अधिनियमातील कलम ७२(ब) नुसार मा.महापालिका सभेची अंदाजित र.रु. ३६२.०४ कोटी अथवा होणा-या प्रत्यक्ष खर्चास प्रशासकीय मान्यता घेणे आवश्यक आहे.
2. मा.महापालिका सभेमार्फत प्रशासकीय मान्यता घेण्यात आल्यानंतर आरएफपी मसुद्यामध्ये निविदा प्रक्रियेपूर्वी अथवा निविदा प्रक्रिये दरम्यान काही बदल करणे आवश्यक असल्यास उदा.मनुष्यबळ, वाहनसंख्या, अंदाजित / प्रत्यक्ष खर्च इ. सदर बदल करण्याचे अधिकार आयुक्तांना राहतील.
3. निविदा प्रक्रियेअंती निश्चित होणा-या दरास व संविदेस मा.स्थायी समिती सभेची मान्यता घेणे आवश्यक राहील.

सबब, शहरातील रस्ते, मंडई व इतर मोकळया जागा यांत्रिकी पध्दतीने साफसफाईचे कामकाजा करिता तयार करण्यात आलेल्या निविदा / आरएफपी नुसार ७ वर्षे कालावधीकरिता निविदा प्रक्रिया राबविणेकामी व त्यापोटी होणा-या अंदाजे र.रु.३६२.०४ कोटींच्या अथवा प्रत्यक्ष खर्चास प्रशासकीय मान्यतेकामी प्रस्तुतचा विषय महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ७२ (ब) नुसार मान्यता देणेत यावी.

मा.ज्ञानदेव थोरात- मा.महापौर साहेब ठरावास अनुमोदन देतो.

मा.उत्तम केंदळे – मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ७ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा अशी सूचना मी मांडतो.

मा.संदीप कस्पटे - मा.महापौर साहेब, सूचनेस अनुमोदन देतो.

यानंतर सूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक - ७४८ विषय क्रमांक – ७
दिनांक – २४/१२/२०२१ विभाग – मा.आयुक्त

संदर्भ -१) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.अमुका/३/कावि/१७३/२०२१दि. ५/१०/२०२१
२) मा.महापालिका सभा ठराव क्र.७२१ दि.२०/१०/२०२१ अन्वये.
३) मा.महापालिका सभा ठराव क्र.७३५ दि.१८/११/२०२१ अन्वये.

विषय क्रमांक ७ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

अनुकूल- ७२ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

----

मा.राजेंद्र गावडे – मा.महापौर साहेब, विषय क्र.८ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडतो.

विषय क्रमांक – ८

दिनांक – २४/१२/२०२१ विभाग – मा.आयुक्त

संदर्भ -१) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.शिक्षण/आस्था/ १अ/कावि/४१८/२०२१दि. २१/१०/२०२१
२) मा.महापालिका सभा ठराव क्र.७३६ दि.१८/११/२०२१ अन्वये.

नगर विकास विभाग, महाराष्ट्र राज्य यांचेकडील क्र. पीसीसी -२०२१ /प्र.क्र.५/ नवि-२२ दिनांक १४/०७/२०२१ अन्वये श्रीम. नीता नानासाहेब खैरे, उपशिक्षिका सातारा जिल्हा परिषद यांना पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमध्ये उपशिक्षिका या पदावर पती-पत्नी एकत्रीकरण नियमानुसार विशेष बाब म्हणून नियुक्ती करणेबाबत आदेश प्राप्त झालेले आहेत.

सदर आदेशामध्ये श्रीम. नीता नानासाहेब खैरे, उपशिक्षिका सातारा जिल्हा परिषद यांना पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमध्ये उपशिक्षिका या पदावर पती - पत्नी एकत्रीकरण नियमानुसार विशेष बाब म्हणून नियुक्ती करताना पिंपरी चिंचवड महानगरपालिका महासभेची मान्यता घेणे बंधनकारक असल्याचे आदेश दिले आहेत. सदर प्रकरणी प्रस्ताव सादर केला असता मा. उपआयुक्त प्राथमिक शिक्षण विभाग, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांनी नगर विकास विभाग, महाराष्ट्र राज्य यांचेकडील आदेशानुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिका महासभेची मान्यता घेणेकामी विषयपत्र सादर करणेबाबत आदेश दिले आहेत.

श्रीम. नीता नानासाहेब खैरे, उपशिक्षिका, सातारा जिल्हा परिषद यांची पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमध्ये उपशिक्षिका या पदावर पती-पत्नी एकत्रीकरण नियमानुसार विशेष बाब म्हणून नियुक्ती करणेस मान्यता देणेत यावी.

मा.ज्ञानदेव थोरात- मा.महापौर साहेब ठरावास अनुमोदन देतो.

मा.उत्तम केंदळे- मा.महापौर साहेब मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो – महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग शासन निर्णय क्र संकीर्ण-२०१८/प्र.क्र.३८९/नवि-२०, दि.१६/०२/२०२१ अन्वये श्रीमती नीता नानासाहेब खैरे, पद- उपशिक्षिका, जिल्हा परिषद, सातारा येथून पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेत नियुक्तीचे धर्तीवर १) श्रीमती सुषमा मारुती थोपटे, पद-उपशिक्षिका, जिल्हा परिषद, रायगड २) श्रीमती संपदा शशिकांत काळे, पद- उपशिक्षिका,

जिल्हा परिषद, रायगड यांचे पती-पत्नी एकत्रीकरण शासन निर्णयातील तरतुदीनुसार एकाच जिल्ह्यातील नागरी किंवा ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये सेवावर्ग करता येणार नाही या अटींचे अधीन जिल्हा परिषद, रायगड येथून पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमध्ये उपशिक्षिका या पदावर श्रीमती सुषमा मारुती थोपटे व श्रीमती संपदा शशिकांत काळे या दोन्ही उपशिक्षिकांचे पती-पत्नी एकत्रीकरण नियमानुसार जिल्हा परिषद, रायगड येथून पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेत नियुक्ती करण्यास मान्यता देणेत यावी.

उपरोक्त शिक्षक कर्मचा-यांमधील पति-पत्नी पैकी १ (एक) कर्मचारी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमध्ये कर्मचारी म्हणून कर्तव्यावर कार्यरत असल्याने शासन निर्णयानुसार पती-पत्नी एकत्रीकरणास मान्यता देणेत यावी.

विषय क्रमांक 8 मध्ये नमूद केलेप्रमाणे शासन निर्णय संकीर्ण 2018/प्र.क्र. / 389 / नवि / 20 दि. 16/02/2021 नगर विकास शासन निर्णय नगर विकास विभागानुसार 2 ) शासन प्रत दि. 15 जुलै 1972 शासन परिपत्र क्रमांक जिपब 0711 /प्रक्र 113 / 11 / आस्था 14 3) महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण अधिनियम क्र. एमई बी2012 / प्र.क्र.107 / प्रा शि 2 महाराष्ट्र शासनाच्या धोरणानुसार 1 ) श्रीमती सुषमा मारुती थोपटे उपशिक्षक रायगड जिल्हा परिषद २) श्रीमती संपदा शशिकांत काळे उपशिक्षका जिल्हापरिषद रायगड ३) श्रीम. वैशाली छगन सपकळ पुणे जिल्हा परिषद ४) श्री अरुण महादेव घोळवे, जिल्हापरिषद पुणे ५) सौ.माया सुभाष जावीर पुणे जिल्हापरिषद ६) अश्विनी दीनानाथ सावळकर पुणे जिल्हापरिषद ७) सौ.अंजली दीपक कन्हेरे पुणे जिल्हापरिषद ८) सौ.विभावरी अरुण दंडवते पुणे जिल्हापरिषद ९) श्री.अमोल संपत घेनंद पुणे जिल्हापरिषद १०) श्री विवेक पंडित वैरागे, पुणे जिल्हापरिषद ११) श्रीम. सुकेशनी चिंधू बुढे पुणे जिल्हापरिषद १२ ) श्रीम. शीतल राजाराम रासकर पुणे जिल्हापरिषद १३ ) श्रीम. हिरा केरु बुधलकर पुणे जिल्हा परिषद

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमधील उपशिक्षक या पदावर पती पत्नी एकत्रीकरण नियमानुसार महासभेची वरील विषय उपसूचनेसह मंजूर करून श्रीम. नीता खैरे यांच्या प्रमाणेच वरील प्राथमिक शिक्षकांना पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतील पती पत्नी एकत्रीकरण नियमानुसार नियुक्ती करण्यास मान्यता देणेत यावी.

तसेच श्रीम.माधवी माणसिंग शिंगटे, उपशिक्षिका, पती पत्नी एकत्रीकरण नियमानुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिकेकडे नियुक्ती करणेबाबत उपरोक्त श्रीम. माधवी माणसिंग शिंगटे, उपशिक्षिका जिल्हा परिषद सातारा यांना शिक्षण विभाग/ जिप अस्था ५६३६-१७/१०/२०१८ अन्वये नाहरकत प्रमाणपत्र सादर केले आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिका शिक्षण मंडळ यांचे कडे दि १०/०९/२०१८, तसेच मा.आयुक्त सो यांना दि. १४/१२/ २०२१ रोजी अर्ज सादर करणेत आलेले आहेत. यांचे पती श्री सचिन रामचंद्र भोसले खाजगी कंपनी मध्ये पिंपरी चिंचवड शहरात नोकरीला आहेत.

श्रीम. माधवी माणसिंग शिंगटे उपशिक्षिका, सातारा जिल्हा परिषद यांची पिंपरी चिंचवड महानगरपालिमध्ये उपशिक्षिका या पदावर पती-पत्नी एकत्रीकरण नियमानुसार या उपसुचनेद्वारे नियुक्ती करणेस मान्यता देणेत यावी.

तसेच श्री. अजय रमण वाळेकर राहणार- निसर्ग दर्शन, सेक्टर नं. २६ निगडी प्राधिकरण येथे राहत असून ते पुणे जिल्हा परिषद येथे पदवीधर शिक्षक म्हणून कार्यरत आहेत. पुणे जिल्हा परिषदेकडून पिंपरी चिंचवड महानगपालीकेकडे सेवा वर्ग करणे संदर्भात ते गेले १२ वर्ष प्रयत्न करीत आहेत. त्यांचे आई वडील वृद्ध व आजारी असल्या कारणाने त्यांची काळजी घेण्यासाठी सेवा वर्ग करणे अत्यावश्यक आहे.

तरी या उपसुचनेद्ववारे श्री. अजय रमण वाळेकर, पदवीधर शिक्षक यांची पिंपरी चिंचवड महानगरपालिमध्ये नियुक्ती करणेस मान्यता देणेत यावी.

तसेच श्रीमती सुकेशिनी चिंधू बुढे, पद-उपशिक्षिका, जिल्हा परिषद शाळा, बोरीवली, ता.मावळ.जि.पुणे येथे कार्यरत असून मुलांचे संगोपन व इतर कौटुंबिक अडचणीचे कारणास्तव पती-पत्नी एकत्रीकरण नियमानुसार पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेत नियुक्ती करण्यास मान्यता देणेत यावी. तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिका आस्थापनेवर “वैदयकीय अधिक्षक” अभिनामाचे एक पद पे लेवल एस-२५ वेतणश्रेणी र.रु. ७८८००-२०९२०० मध्ये शासन मंजूर आहे. पदोन्नती समितीने दि. २०/०८/२०२१ रोजी केलेली शिफारस विचारात घेवून “ वैदयकीय अधिक्षक” पदावरील अर्हताधारक सेवाजेष्ठ अधिकारी डॉ.जाधव शंकर बळवंत यांची ज्येष्ठतेनुसार पदोन्नतीने नेमणूक देण्यास मान्यता देणेत यावी. तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमध्ये कार्यरत असणारे शिक्षक किंवा शिक्षिका यांचे पती किंवा पत्नी जर जिल्हा अंतर्गत शिक्षक किंवा शिक्षिका या पदावर काम करीत असतीलतर त्या सर्वांना (साधारण ८०-१००) पती-पत्नी एकत्रीकरण नियमानुसार नियुक्त करण्यास मान्यता देणेत यावी.

मा.संदिप कस्पटे - मा.महापौर साहेब उपसूचनेस अनुमोदन देतो.
मा. सिमा सावळे- मा.महापौर, मा.आयुक्त, सन्मा.सभागृह, या विषयाला आम्ही विरोध करत नाही परंतु जिल्ह्या बाहेरच आणि जिल्ह्यातल्या जिल्ह्यात पुणे जिल्ह्याची हद्द पण काही छोटी नाहीये त्यामुळे या जिल्ह्यामध्ये सुध्दा चार-चार, पाच-पाच तास लागतात साहेब शिक्षकांना या शहरातून ग्रामीण भागात जाण्यासाठी. मा.महापौर साहेब अशा सर्व शिक्षकांची यादी मा.पक्षनेत्याकडे दिलेली आहे. हा विषय मंजूर करत असतांना त्या यादीतले जितके शिक्षक असतील जर त्यांच्या बदल्या झाल्या तरच हा विषय मंजूर करण्यात यावा अन्यथा हा विषय सुध्दा आपण तहकूब करावा, धन्यवाद.

**मा.सचिन चिखले-** मा.महापौर, मा.आयुक्त, सन्मा.सभागृह, आत्यंत महात्वाचा विषय आहे, गेल्या दोन ते आडीच वर्षापूर्वी या विषयावरती या सभागृहामध्ये खूप मोठा गदारोळ झाला होता. आणि आता सिमाताईनी माई तशी सूचना केली आहे. एक शिक्षक न घेता इतर सर्वच शिक्षक जर घेणार असाल तरच हा ठराव मंजूर करा, त्यास आमचा पाठींबा राहील, धन्यवाद.

मा.राजेंद्र गावडे – मा.महापौर साहेब, उपसूचना स्विकारली आहे.

मा.महापौर – शासनाच्या आदेशानुसार आपला मनपा कर्मचारी त्याचा जोडीदार पती-पत्नी जिल्हा बाहेर कर्मचारी असेलतर अशा शिक्षकांची उपसूचना मंजूर करणेत येत आहे. उपसूचनेसह हा विषय ८ मंजूर करण्यात येत आहे.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा दुरुस्त ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक- ७४९ विषय क्रमांक – ८

दिनांक – २४/१२/२०२१ विभाग – मा.आयुक्त

संदर्भ -१) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.शिक्षण/आस्था/
१अ/कावि/४१८/२०२१दि. २१/१०/२०२१
२) मा.महापालिका सभा ठराव क्र.७३६ दि.१८/११/२०२१ अन्वये.

नगरविकास विभाग, महाराष्ट्र राज्य यांचेकडील क्र. पीसीसी-२०२१/प्र.क्र.५/नवि-२२ दिनांक १४/०७/२०२१ अन्वये श्रीम.नीता नानासाहेब खैरे, उपशिक्षिका सातारा जिल्हा परिषद यांना पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमध्ये उपशिक्षिका या पदावर पती-पत्नी एकत्रीकरण नियमानुसार विशेष बाब म्हणून नियुक्ती करणेबाबत आदेश प्राप्त झालेले आहेत.

सदर आदेशामध्ये श्रीम.नीता नानासाहेब खैरे, उपशिक्षिका सातारा जिल्हा परिषद यांना पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमध्ये उपशिक्षिका या पदावर पती-पत्नी एकत्रीकरण नियमानुसार विशेष बाब म्हणून नियुक्ती करताना पिंपरी चिंचवड महानगरपालिका महासभेची मान्यता घेणे बंधनकारक असल्याचे आदेश दिले आहेत. सदर प्रकरणी प्रस्ताव सादर केला असता मा.उपआयुक्त प्राथमिक शिक्षण विभाग, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांनी नगर विकास विभाग, महाराष्ट्र राज्य यांचेकडील आदेशानुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिका महासभेची मान्यता घेणेकामी विषयपत्र सादर करणेबाबत आदेश दिले आहेत.

श्रीम.नीता नानासाहेब खैरे, उपशिक्षिका, सातारा जिल्हा परिषद यांची पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमध्ये उपशिक्षिका या पदावर पती-पत्नी एकत्रीकरण नियमानुसार विशेष बाब म्हणून नियुक्ती करणेस मान्यता देणेत येत आहे.

तसेच महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग शासन निर्णय क्र संकीर्ण-२०१८/प्र.क्र.३८९/नवि-२०, दि.१६/०२/२०२१ अन्वये श्रीमती नीता नानासाहेब खैरे, पद- उपशिक्षिका, जिल्हा परिषद, सातारा येथून पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेत नियुक्तीचे धर्तीवर १) श्रीमती सुषमा मारुती थोपटे, पद- उपशिक्षिका, जिल्हा परिषद, रायगड २) श्रीमती संपदा शशिकांत काळे, पद- उपशिक्षिका, जिल्हा परिषद, रायगड यांचे पती-पत्नी एकत्रीकरण शासन निर्णयातील तरतुदीनुसार एकाच जिल्ह्यातील नागरी किंवा ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये सेवावर्ग करता येणार नाही या अटींचे अधीन जिल्हा परिषद, रायगड येथून पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमध्ये उपशिक्षिका या पदावर श्रीमती सुषमा मारुती थोपटे व श्रीमती संपदा शशिकांत काळे या दोन्ही उपशिक्षिकांचे पती-पत्नी एकत्रीकरण नियमानुसार जिल्हा परिषद, रायगड येथून पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेत नियुक्ती करण्यास मान्यता देणेत येत आहे.

उपरोक्त शिक्षक कर्मचा-यांमधील पति-पत्नी पैकी १ (एक) कर्मचारी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमध्ये कर्मचारी म्हणून कर्तव्यावर कार्यरत असल्याने शासन निर्णयानुसार पती-पत्नी एकत्रीकरणास मान्यता देणेत येत आहे.

विषय क्रमांक 8 मध्ये नमूद केलेप्रमाणे शासन निर्णय संकीर्ण 2018/प्र.क्र. / 389 / नवि / 20 दि. 16/02/2021 नगर विकास शासन निर्णय नगर विकास विभागानुसार 2 ) शासन प्रत दि. 15 जुलै 1972 शासन परिपत्र क्रमांक जिपब 0711 /प्रक्र 113 / 11 / आस्था 14 3) महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण अधिनियम क्र. एमई बी2012 / प्र.क्र.107 / प्रा शि 2 महाराष्ट्र शासनाच्या धोरणानुसार १) श्रीमती सुषमा मारुती थोपटे उपशिक्षक रायगड जिल्हा परिषद २) श्रीमती संपदा शशिकांत काळे उपशिक्षका जिल्हापरिषद रायगड ३) श्रीम. वैशाली छगन सपकळ पुणे जिल्हा परिषद ४) श्री अरुण महादेव घोळवे, जिल्हापरिषद पुणे ५) सौ.माया सुभाष जावीर पुणे जिल्हापरिषद ६) अश्विनी दीनानाथ सावळकर पुणे जिल्हापरिषद ७) सौ.अंजली दीपक कन्हेरे पुणे जिल्हापरिषद ८) सौ.विभावरी अरुण दंडवते पुणे जिल्हापरिषद ९) श्री.अमोल संपत घेनंद पुणे जिल्हापरिषद १०) श्री विवेक पंडित वैरागे, पुणे जिल्हापरिषद ११) श्रीम. सुकेशनी चिंधू बुढे पुणे जिल्हापरिषद १२ ) श्रीम. शीतल राजाराम रासकर पुणे जिल्हापरिषद १३ ) श्रीम. हिरा केरु बुधलकर पुणे जिल्हा परिषद

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमधील उपशिक्षक या पदावर पती पत्नी एकत्रीकरण नियमानुसार महासभेची वरील विषय उपसूचनेसह मंजूर करून श्रीम. नीता खैरे यांच्या प्रमाणेच वरील प्राथमिक शिक्षकांना पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतील पती पत्नी एकत्रीकरण नियमानुसार नियुक्ती करण्यास मान्यता देणेत येत आहे.

तसेच श्रीम.माधवी माणसिंग शिंगटे, उपशिक्षिका, पती पत्नी एकत्रीकरण नियमानुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिकेकडे नियुक्ती करणेबाबत उपरोक्त श्रीम. माधवी माणसिंग शिंगटे, उपशिक्षिका जिल्हा परिषद सातारा यांना शिक्षण विभाग/ जिप अस्था ५६३६-१७/१०/२०१८ अन्वये नाहरकत प्रमाणपत्र सादर केले आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिका शिक्षण मंडळ यांचे कडे दि १०/०९/२०१८, तसेच मा.आयुक्त सो यांना दि. १४/१२/ २०२१ रोजी अर्ज सादर करणेत आलेले आहेत. यांचे पती श्री सचिन रामचंद्र भोसले खाजगी कंपनी मध्ये पिंपरी चिंचवड शहरात नोकरीला आहेत.

श्रीम. माधवी माणसिंग शिंगटे उपशिक्षिका, सातारा जिल्हा परिषद यांची पिंपरी चिंचवड महानगरपालिमध्ये उपशिक्षिका या पदावर पती-पत्नी एकत्रीकरण नियमानुसार या उपसुचनेद्ववारे नियुक्ती करणेस मान्यता देणेत येत आहे.

तसेच श्री. अजय रमण वाळेकर राहणार- निसर्ग दर्शन, सेक्टर नं. २६ निगडी प्राधिकरण येथे राहत असून ते पुणे जिल्हा परिषद येथे पदवीधर शिक्षक म्हणून कार्यरत आहेत. पुणे जिल्हा परिषदेकडून पिंपरी चिंचवड महानगपालीकेकडे सेवा वर्ग करणे संदर्भात ते गेले १२ वर्ष प्रयत्न करीत आहेत. त्यांचे आई वडील वृद्ध व आजारी असल्या कारणाने त्यांची काळजी घेण्यासाठी सेवा वर्ग करणे अत्यावश्यक आहे.

तरी या उपसुचनेद्ववारे श्री. अजय रमण वाळेकर, पदवीधर शिक्षक यांची पिंपरी चिंचवड महानगरपालिमध्ये नियुक्ती करणेस मान्यता देणेत येत आहे.

तसेच श्रीमती सुकेशिनी चिंधू बुढे, पद-उपशिक्षिका, जिल्हा परिषद शाळा, बोरीवली, ता.मावळ.जि.पुणे येथे कार्यरत असून मुलांचे संगोपन व इतर कौटुंबिक अडचणीचे कारणास्तव पती-पत्नी एकत्रीकरण नियमानुसार पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेत नियुक्ती करण्यास मान्यता देणेत येत आहे. तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिका आस्थापनेवर “वैदयकीय अधिक्षक” अभिनामाचे एक पद पे लेवल एस-२५ वेतणश्रेणी र.रु. ७८८००-२०९२०० मध्ये शासन मंजूर आहे. पदोन्नती समितीने दि. २०/०८/२०२१ रोजी केलेली शिफारस विचारात घेवून “ वैदयकीय अधिक्षक” पदावरील अर्हताधारक सेवाजेष्ठ अधिकारी डॉ.जाधव शंकर बळवंत यांची ज्येष्ठतेनुसार पदोन्नतीने नेमणूक देण्यास मान्यता देणेत येत आहे. तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमध्ये कार्यरत असणारे शिक्षक किंवा शिक्षिका यांचे पती किंवा पत्नी जर जिल्हा अंतर्गत शिक्षक किंवा शिक्षिका या पदावर काम करीत असतीलतर त्या सर्वांना (साधारण ८०-१००) पती-पत्नी एकत्रीकरण नियमानुसार नियुक्त करण्यास मान्यता देणेत येत आहे.

अनुकल - ७२ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

मा.राजेंद्र गावडे – मा.महापौर साहेब, विषय क्र.९ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडतो.

विषय क्रमांक – ९

दिनांक – २४/१२/२०२१ विभाग – मा.आयुक्त

संदर्भ -१) मा.अतिरिक्त आयुक्त (१) यांचेकडील पत्र जा.क्र.ग क्षेका/वि/कावि/ ९१/२०२१ दि.१० /११/२०२१

पिंपरी चिंचवड मनपाचे पिंपरी चिंचवड महानगरपालिका अंतर्गत ग क्षेत्रीय कार्यालय मधील प्रभाग क्र २१ पिंपरी येथे महानगरपालिकेमार्फत नविन जिजामाता रूग्णालय सुरु करण्यात आलेले आहे. सदर हॉस्पिटल मध्ये प्रसुतीगृह, लहान मुलांसाठी डेडीकेटेड कोविड विभाग, व्हेटिलेटर वॉर्ड, ऑक्सिजन वॉर्ड व अतिदक्षता विभाग इत्यादी समावेश आहे. तसेच सध्या सदर हॉस्पिटलमध्ये कोविड-१९ पेशंटवर उपचार करण्यात येतात. तसेच कोविड प्रतिबंधक लसीकरण केन्द्राचे कामकाज सुध्दा हॉस्पिटलमध्ये सुरु आहे. कोविड-१९ च्या संभाव्य तीस-या लाटेचा विचार करता सदर हॉस्पटिलमध्ये नविन ऑपरेशन थेटर सुरु करण्यासाठी जेष्ठ वैदकिय अधिकारी पिंपरी यांनी दिनांक /०९/२०२१ च्या पत्रान्वये इकडील विभागास कळविले आहे. सदर हॉस्पिटलमधील कोविड - १९ रुग्नालयातील विद्युत यंत्रणेच्या चालन व पर्यवेक्षण करणे, देखभाल दुरुस्तीची कामे, तसेच नविन ऑपरेशन ठेटर सुरु करण्यासाठी आवश्यक विद्युतविषयक व इतर कामे करणे या बाबींचा अंदाजपत्रकामधे समावेश करणेत आला आहे. तसेच सध्यस्थितीमध्ये ग क्षेत्रिय कार्यालय विद्युत विभागाकडील तांत्रिक कर्मचारी

कमी असलेने सदर कोविड केअर सेंटरमधील विद्युतविषयक यंत्रणेचे चालन देखभाल दुरुस्ती करणेकामी कंत्राटी पद्धतीने तांत्रिक कर्मचारी नेमण्याची आवश्यकता आहे.

राज्य शासनाने कोरोना विषाणुचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधक कायदा १९८७ व आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५, दि. १३/०३/२०२० पासुन लागू केलेला आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या परिसरात देखील कोरोना साथरोगाचा प्रादुर्भाव झाल्याने महानगरपालिका अधिनियम कलम ६३ (३) नुसार साथरोग नियंत्रणात ठेवणेकामी आवश्यक उपाययोजना तातडीने करणेकरीता वस्तू अथवा सेवांची आपत्कालीन परिस्थीतीत तातडीने खरेदी करणे आवश्यक आहे.

सदर कामासाठी र. रु. १,७८,५४,६७७/- इतका खर्च येणार आहे. सन २०२१-२२ च्या अंदाजपत्रकात सदर कामाचा समावेश नसल्याने सदर कामाचा खर्च महानगरपालिकेच्या सन २०२१-२२ या आर्थिक वर्षाच्या अंदाजपत्रकातील मध्यवर्ती भांडार विभागाकडील कोरोना निधी या लेखाशिर्षातून करणेस मान्यता देणेस तसेच प्रभाग क्र. २१ पिंपरी मधील नवीन जिजामाता रूग्णालयात ऑपरेशन थिएटर, वातानुकुलन यंत्रणा देखभाल दुरूस्ती, विद्युतविषयक कामे आणि कुशल व अर्धकुशल कामगार पुरवठा करणे. या कामास र.रू.१,७८,५४,६७७/- यास प्रशासकीय मान्यता देणेत यावी.

मा.ज्ञानदेव थोरात- मा.महापौर साहेब ठरावास अनुमोदन देतो.

मा.उत्तम केंदळे- मा.महापौर साहेब मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो – कोवीड १९ चे अनुषंगाने नविन भोसरी रुग्णालय पिंपरी चिंचवड महानगरपालिके मार्फत चालविणेस मान्यता देणेत यावी. पिंपरी चिंचवड महानगरपालिका कार्यक्षेत्रातील कोवींड १९ चे प्रादुर्भावाने बाधीत रुग्णांना चांगले व तातडीने उपचार मिळावेत या उद्देशाने नविन भोसरी रुग्णालय कोवीड १९ ने बाधीत रुग्णावर उपचार करणेकामी सुरु करणेत आलेले आहे.

मा. महापालिका सभा ठराव क्रमांक ३६५ दिनांक ०४/०२/२०१९ अन्वये सदर रुग्णालय खाजगी संस्थेस चालविणेस देणेकामी मान्यता दिलेली आहे. तथापि कोवीड १९ चे आपत्कालीन परिस्थीतीत बाधीत रुग्णांना तातडीने उपचार उपलब्ध व्हावेत तसेच ओमायक्रॉन विषाणुचा संसर्ग विचारात घेता मा. महापालिका सभा ठराव क्रमांक ३६५ दिनांक ०४/०२/२०१९ अन्वये सदर रुग्णालय खाजगी संस्थेस चालविणेस देणेबाबतचे ठरावास तात्पुरत्या स्वरुपात स्थगिती मिळुन सदरचे रुग्णालय महापालिकेमार्फत सुरु ठेवणेस मान्यता देणेत यावी.

तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिका नागरिक सार्वजनिक चॅरिटेबल ट्रस्ट, पिंपरी या ट्रस्टद्वारे शहरांतील ह्रदयरोग, कॅन्सर, किडनी, मेंदूचे विकार, गंभीर अपघातग्रस्त व दुर्धर आजारांनी ग्रासलेल्या रुग्णांना तसेच नैसर्गिक आपत्तीग्रस्त पीडीतांना अर्थसहाय्य करण्यात येत आहे. महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन निर्णय क्र. पीसीसी ३००६/ १९९७/ प्र.क्र.३९७/ नवि २२, दि.१८ डिसेंबर २००७ अन्वये ट्रस्टच्या माध्यमातून ट्रस्टची मुळ घटना व नियमावलीतील तरतुदींशी बांधिल राहून एका रुग्णास जास्तीत जास्त र.रु.५,०००/- अर्थसहाय्य धनादेशाव्दारे करण्यात येते. परंतु सध्या कोरोनासारखे नवनवीन विषाणूंव्दारे उद्भवणारे विविध आजार, असाध्य रोग, दुर्घटना, विविध प्रकारचे घडून येणारे वेगवेगळे

अपघात, त्यानुषंगाने कराव्या लागणा-या शस्त्रक्रिया यासंबंधी वाढता खर्च, औषधे, विविध तपासण्या, वैद्यकीय उपचारांचे वाढते दर लक्षात घेता गोरगरीब, सर्वसामान्य नागरिकांना विविध आजारांवरील वैद्यकीय उपचारांशी संबंधित आर्थिक खर्च परवडत नाही. त्यामुळे तत्कालीन परिस्थितीच्या अनुषंगाने महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन निर्णय क्र. पीसीसी ३००६/१९९७/ प्र.क्र.३९७/ नवि २२, दि.१८ डिसेंबर २००७ अन्वये मंजूर करणेत आलेल्या व सध्या पिंपरी चिंचवड महानगरपालिका नागरिक सार्वजनिक चॅरिटेबल ट्रस्टव्दारे देण्यात येणा-या प्रति रुग्ण र.रु.५,०००/- अर्थसहाय्य रक्कमेमध्ये वाढ करुन प्रति रुग्ण र.रु.१५,०००/- करणेस तसेच सदर ट्रस्टला पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्रीडा विभागाकडुन दरवर्षी देण्यात येणारे अनुदान र.रु. २५,००,०००/- या रकमेमध्ये वाढ करुन दरवर्षी र.रु. ५०,००,०००/- करणेस मा.महापालिका सभेची प्रशासकिय व वित्तीय मान्यता घेऊन शासनाकडे मान्यतेकरीता पाठविणेस मान्यता देणेत यावी.

तसेच पिंपरी चिंचवड मनपाचे पिंपरी चिंचवड महानगरपालिका अंतर्गत ग क्षेत्रीय कार्यालय मधील प्रभाग क्रमांक २१ पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमार्फत नवीन जिजामाता रुग्णालय सुरू करण्यात आलेले आहे. सदर हॉस्पिटलमध्ये प्रसूतिगृह, लहान मुलांसाठी डेडिकेटेड कोविड विभाग, व्हेंटिलेटर वार्ड, ऑक्सीजन वार्ड, व अतिदक्षता विभाग इत्यादी समावेश आहे. याच बरोबर 24 X 7 सी.एम.ओ, न्यूरोसर्जन, ओर्थोपेडिक सर्जन, जनरल सर्जरी, जनरल मेडिसीन, ई.एन.टी. सर्जन, एम.आर.आय. - 3 टेस्ला, सी.टी.स्कॅन 64 SLICES, डिजिटल एक्स रे (डी.आर.सिस्टिम), सी–आर्म (हाय फ्रिक्वेंसी) अल्ट्रा सोनोग्राफी, व एम.एल.सी. साठी एक पोलिस चौकी या बाबींचा समावेश करून एक अद्ययावत ट्रोमा सेंटर करणे बाबत विचार करून प्रशासकीय मान्यता देणेत यावी.

मा.संदिप कस्पटे - मा.महापौर साहेब उपसूचनेस अनुमोदन देतो.

मा.राजेंद्र गावडे – मा.महापौर साहेब, उपसूचना स्विकारली आहे.

मा.महापौर- उपसूचनेसह विषय क्रं. ९ मंजूर करण्यात येत आहे.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा दुरुस्त ठराव मतास टाकणेत आला असता—

ठराव क्रमांक- ७५० विषय क्रमांक – ९

दिनांक – २४/१२/२०२१ विभाग – मा.आयुक्त

संदर्भ -१) मा.अतिरिक्त आयुक्त (१) यांचेकडील पत्र जा.क्र.ग क्षेका/वि/कावि/ ९१/२०२१ दि.१० /११/२०२१

पिंपरी चिंचवड मनपाचे पिंपरी चिंचवड महानगरपालिका अंतर्गत ग क्षेत्रीय कार्यालय मधील प्रभाग क्र २१ पिंपरी येथे महानगरपालिकेमार्फत नविन जिजामाता रूग्णालय सुरु करण्यात आलेले आहे. सदर हॉस्पिटल मध्ये प्रसुतीगृह, लहान मुलांसाठी डेडीकेटेड कोविड विभाग, व्हेटिलेटर वॉर्ड, ऑक्सिजन वॉर्ड व अतिदक्षता विभाग इत्यादी समावेश आहे. तसेच सध्या सदर हॉस्पिटलमध्ये कोविड-१९ पेशंटवर उपचार करण्यात येतात. तसेच कोविड

प्रतिबंधक लसीकरण केन्द्राचे कामकाज सुध्दा हॉस्पिटलमध्ये सुरु आहे. कोविड-१९ च्या संभाव्य तीस-या लाटेचा विचार करता सदर हॉस्पटिलमध्ये नविन ऑपरेशन थेटर सुरु करण्यासाठी जेष्ठ वैदकिय अधिकारी पिंपरी यांनी दिनांक /०९/२०२१ च्या पत्रान्वये इकडील विभागास कळविले आहे. सदर हॉस्पिटलमधील कोविड - १९ रुग्नालयातील विद्युत यंत्रणेच्या चालन व पर्यवेक्षण करणे, देखभाल दुरुस्तीची कामे, तसेच नविन ऑपरेशन थिएटर सुरु करण्यासाठी आवश्यक विद्युतविषयक व इतर कामे करणे या बाबींचा अंदाजपत्रकामधे समावेश करणेत आला आहे. तसेच सध्यस्थितीमध्ये ग क्षेत्रिय कार्यालय विद्युत विभागाकडील तांत्रिक कर्मचारी कमी असलेने सदर कोविड केअर सेंटरमधील विद्युतविषयक यंत्रणेचे चालन देखभाल दुरुस्ती करणेकामी कंत्राटी पद्धतीने तांत्रिक कर्मचारी नेमण्याची आवश्यकता आहे.

राज्य शासनाने कोरोना विषाणुचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधक कायदा १९८७ व आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५, दि. १३/०३/२०२० पासुन लागू केलेला आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या परिसरात देखील कोरोना साथरोगाचा प्रादुर्भाव झाल्याने महानगरपालिका अधिनियम कलम ६३ (३) नुसार साथरोग नियंत्रणात ठेवणेकामी आवश्यक उपाययोजना तातडीने करणेकरीता वस्तू अथवा सेवांची आपत्कालीन परिस्थीतीत तातडीने खरेदी करणे आवश्यक आहे.

सदर कामासाठी र. रु. १,७८,५४,६७७/- इतका खर्च येणार आहे. सन २०२१-२२ च्या अंदाजपत्रकात सदर कामाचा समावेश नसल्याने सदर कामाचा खर्च महानगरपालिकेच्या सन २०२१-२२ या आर्थिक वर्षाच्या अंदाजपत्रकातील मध्यवर्ती भांडार विभागाकडील कोरोना निधी या लेखाशिर्षातून करणेस मान्यता देणेस तसेच प्रभाग क्र. २१ पिंपरी मधील नवीन जिजामाता रूग्णालयात ऑपरेशन थिएटर, वातानुकुलन यंत्रणा देखभाल दुरूस्ती, विद्युतविषयक कामे आणि कुशल व अर्धकुशल कामगार पुरवठा करणे. या कामास र.रू.१,७८,५४,६७७/- यास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

तसेच कोवीड १९ चे अनुषंगाने नविन भोसरी रुग्णालय पिंपरी चिंचवड महानगरपालिके मार्फत चालविणेस मान्यता देणेत येत आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिका कार्यक्षेत्रातील कोवींड १९ चे प्रादुर्भावाने बाधीत रुग्णांना चांगले व तातडीने उपचार मिळावेत या उद्देशाने नविन भोसरी रुग्णालय कोवीड १९ ने बाधीत रुग्णावर उपचार करणेकामी सुरु करणेत आलेले आहे.

मा. महापालिका सभा ठराव क्रमांक ३६५ दिनांक ०४/०२/२०१९ अन्वये सदर रुग्णालय खाजगी संस्थेस चालविणेस देणेकामी मान्यता दिलेली आहे. तथापि कोवीड १९ चे आपत्कालीन परिस्थीतीत बाधीत रुग्णांना तातडीने उपचार उपलब्ध व्हावेत तसेच ओमायक्रॉन विषाणुचा संसर्ग विचारात घेता मा. महापालिका सभा ठराव क्रमांक ३६५ दिनांक ०४/०२/२०१९ अन्वये सदर रुग्णालय खाजगी संस्थेस चालविणेस देणेबाबतचे ठरावास तात्पुरत्या स्वरुपात स्थगिती मिळुन सदरचे रुग्णालय महापालिकेमार्फत सुरु ठेवणेस मान्यता देणेत येत आहे.

तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिका नागरिक सार्वजनिक चॅरिटेबल ट्रस्ट, पिंपरी या ट्रस्टद्वारे शहरांतील हृदयरोग, कॅन्सर, किडनी, मेंदूचे विकार, गंभीर अपघातग्रस्त व दुर्धर

आजारांनी ग्रासलेल्या रुग्णांना तसेच नैसर्गिक आपत्तीग्रस्त पीडीतांना अर्थसहाय्य करण्यात येत आहे. महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन निर्णय क्र. पीसीसी ३००६/ १९९७/ प्र.क्र.३९७/ नवि २२, दि.१८ डिसेंबर २००७ अन्वये ट्रस्टच्या माध्यमातून ट्रस्टची मुळ घटना व नियमावलीतील तरतुदींशी बांधिल राहून एका रुग्णास जास्तीत जास्त र.रु.५,०००/- अर्थसहाय्य धनादेशाव्दारे करण्यात येते. परंतु सध्या कोरोनासारखे नवनवीन विषाणूंव्दारे उद्भवणारे विविध आजार, असाध्य रोग, दुर्घटना, विविध प्रकारचे घडून येणारे वेगवेगळे अपघात, त्यानुषंगाने कराव्या लागणा-या शस्त्रक्रिया यासंबंधी वाढता खर्च, औषधे, विविध तपासण्या, वैद्यकीय उपचारांचे वाढते दर लक्षात घेता गोरगरीब, सर्वसामान्य नागरिकांना विविध आजारांवरील वैद्यकीय उपचारांशी संबंधित आर्थिक खर्च परवडत नाही. त्यामुळे तत्कालीन परिस्थितीच्या अनुषंगाने महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन निर्णय क्र. पीसीसी ३००६/१९९७/ प्र.क्र.३९७/ नवि २२, दि.१८ डिसेंबर २००७ अन्वये मंजूर करणेत आलेल्या व सध्या पिंपरी चिंचवड महानगरपालिका नागरिक सार्वजनिक चॅरिटेबल ट्रस्टव्दारे देण्यात येणा-या प्रति रुग्ण र.रु.५,०००/- अर्थसहाय्य रक्कमेमध्ये वाढ करुन प्रति रुग्ण र.रु.१५,०००/- करणेस तसेच सदर ट्रस्टला पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्रीडा विभागाकडुन दरवर्षी देण्यात येणारे अनुदान र.रु. २५,००,०००/- या रकमेमध्ये वाढ करुन दरवर्षी र.रु. ५०,००,०००/- करणेस मा.महापालिका सभेची प्रशासकिय व वित्तीय मान्यता घेऊन शासनाकडे मान्यतेकरीता पाठविणेस मान्यता देणेत येत आहे.

तसेच पिंपरी चिंचवड मनपाचे पिंपरी चिंचवड महानगरपालिका अंतर्गत ग क्षेत्रीय कार्यालय मधील प्रभाग क्रमांक २१ पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमार्फत नवीन जिजामाता रुग्णालय सुरू करण्यात आलेले आहे. सदर हॉस्पिटलमध्ये प्रसूतिगृह, लहान मुलांसाठी डेडिकेटेड कोविड विभाग, व्हेंटिलेटर वार्ड, ऑक्सीजन वार्ड, व अतिदक्षता विभाग इत्यादी समावेश आहे. याच बरोबर 24 X 7 सी.एम.ओ, न्यूरोसर्जन, ओर्थोपेडिक सर्जन, जनरल सर्जरी, जनरल मेडिसीन, ई.एन.टी. सर्जन, एम.आर.आय. - 3 टेस्ला, सी.टी.स्कॅन 64 SLICES, डिजिटल एक्स रे (डी.आर.सिस्टिम), सी–आर्म (हाय फ्रिक्वेंसी) अल्ट्रा सोनोग्राफी, व एम.एल.सी. साठी एक पोलिस चौकी या बाबींचा समावेश करून एक अद्ययावत ट्रोमा सेंटर करणे बाबत विचार करून प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल - ७२ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

----

मा.राजेंद्र गावडे – मा.महापौर साहेब, विषय क्र.१० वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडतो.

विषय क्रमांक – १०

दिनांक – २४/१२/२०२१ विभाग – मा.आयुक्त

संदर्भ -१) मा.अतिरिक्त आयुक्त (१) यांचेकडील पत्र जा.क्र.वि/ गप्र/कावि/५४६/२०२१ दि.१० /११/२०२१

पिंपरी चिंचवड मनपाचे ग प्रभाग कार्यक्षेत्रात नव्याने थेरगाव येथे हॉस्पिटलचे काम जवळपास पुर्ण झाले असुन करोनाच्या रुग्णाचे अलगिकरण करणे करीता थेरगाव रुग्णालयाचा वापर करणेत येत आहे तसेच जुन्या थेरगाव हॉस्पीटल मधील बरेच विभाग नविन हॉस्पीटलमधे सुरु करण्यात आले आहे. सदरच्या नविन हॉस्पिटल करीता सध्या मनपाच्या धोरणा नुसार नविन कर्मचारी भरती बंद असल्याने, ठेकेदांर पध्दतीने कर्मचारी उपलब्ध करुन घेणे बाबत सुचविण्यात येत आहे. तसेच हॉस्पिटल नविन सुरु झाले असल्याने, रुग्णालय प्रशासनामार्फत विविध प्रकारच्या विदयुत, वातानुकुलन, टेलीफोन व इतर कामा विषयक वांरवार मागणी येत असल्याने त्या कामाचे अंदाजपत्रक तयार करणेत आले असुन त्यास रक्कम रु ३,२०,७४,५७९/- इतका खर्च आपेक्षीत आहे. सदर कामाकरीता सन २०२१-२०२२ चे अंदाजपत्रकीय तरतुद करणेत आलेली नसल्याने सदरचा खर्च मुख्यकार्यालय मध्यवर्ती भांडार विभागा कडील “कोरोना निधी” या लेखाशिर्षकातुन करण्यात येणार आहे. सदर कामास व र रु ३,२५,००,०००/- च्या खर्चास मा.आयुक्त सो. यांनी दि. २५/१०/२०२१ चा प्रस्तावानुसार मंजुरी दिली आहे. सबब, सदर कामास व र. रु ३,२५,००,०००/- च्या खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत यावी.

मा. ज्ञानदेव थोरात- मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

मा.निता पाडाळे - मा.महापौर साहेब मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो – काळेवाडी येथील एम. एम. स्कुल चौकात श्री. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवनावर आधारीत संकल्पचित्र व इतर पध्दतीने सुशोभिकरण करणे या कामाच्या सन २०२१-२२ चे अंदाजपत्रकामध्ये पान क्र. १४ अ.क्र. ११३ विशेष योजना या लेखाशिर्षावर समावेश आहे. सदर कामाचे नावात बदल करून काळेवाडी येथील एम. एम. स्कुल चौकात श्री. छत्रपती शिवाजी महाराज यांचे जीवनावर आधारीत, श्री. छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळा उभारणे इतर शिल्प व चौकाचे सुशोभिकरण करणे असे करणेस मान्यता देणेत यावी.

त्याचप्रमाणे राष्ट्रपुरुष / थोर व्यक्ती यांचे पुतळे उभारणेस परवानगी देणेसाठी महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग यांचे दिनांक ०२ मे २०१७ व दिनांक ०६ मे २०१७ चे शासन निर्णयानुसार वरील ठिकाणी श्री. छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळा उभारणेकामी, मा. जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली खालील प्रमाणे पुतळा समिती स्थायी स्वरूपात गठित करणेस मान्यता देणेत यावी.

१) मा. जिल्हाधिकारी , पुणे अध्यक्ष
२) मा.आयुक्त , पिंपरी चिंचवड महानगरपालिका, सदस्य
३) मा. अतिरिक्त आयुक्त २, सदस्य
४) मा. पोलिस आयुक्त, पिंपरी चिंचवड, सदस्य
५) मा.सहशहर अभियंता,बीआरटीएस, पिं.चि.मनपा सदस्य
६) कार्यकारी अभियंता, बीआरटीएस, पिं.चि.मनपा सदस्य सचिव

तरी काळेवाडी येथील एम.एम.स्कुल चौकात श्री. छत्रपती शिवाजी महाराज यांचे जीवनावर आधारीत, श्री. छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळा उभारणे, इतर शिल्प व चौकाचे सुशोभिकरण करणे याप्रमाणे कामाचे नावात बदल करणे व त्याअंतर्गत श्री. छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळा उभारणे व वरील प्रमाणे पुतळा समिती गठित करणेस मान्यता देणेत यावी.

तसेच निगडी टिळक चौक येथे लोकमान्य टिळक यांचा पुर्वीच्या जागेवर नविन पुतळा बसविणेस मान्यता देणेत यावी. निगडी टिळक चौक येथे लोकमान्य टिळक यांचा सुमारे ३० वर्षे जुना पुतळा अस्तित्वात आहे. सदर पुतळयाचा चौथरा व परिसर नैसर्गिक स्त्रोत व पर्यावरणातील बदलामुळे तुटफुट होऊन खराब अवस्थेत आहे. त्यामुळे सदर ठिकाणी लोकमान्य टिळक यांचा नविन पुतळा बसविणेस मान्यता देणेत यावी.

तरी निगडी टिळक चौक येथे लोकमान्य टिळक यांचा पुर्वीच्या जागेवर नविन पुतळा बसविणेस मान्यता देणेत यावी.

तसेच यमुनानगर येथील विरंगुळा केंद्राचे नामकरण करणेस मान्यता देणेत यावी. निगडी गावठाणलगत यमुनानगर येथे महानगरपालिकेच्या वतीने नवीन विरंगुळा केंद्र तयार करण्यात आले आहे. या विरंगुळा केंद्रात जेष्ठ नागरीकांना सर्व सोयींनी युक्त अशा सुविधा निर्माण करण्यात आल्या आहेत. तसेच समाजघटकातील विविध वयोगटातील नागरिकांनाही या केंद्राचा निश्चित फायदा होणार आहे. हया विरंगुळा केंद्राचे काम पूर्ण झाले असुन आता ते सामान्य नागरीकांना खुले झाले आहे. सदर विरंगुळा केंद्राचे " राजमाता जिजाऊ विरंगुळा केंद्र असे नामकरण करावे अशी येथील नागरिकांची मनोमन इच्छा आहे. तशी मागणी स्थानिक नागरीकांकडुन केली जात आहे. तरी या मागणीचा आणि लोकभावनेचा आदर करून उपरोक्त विरंगुळा केंद्राचे नाव " राजमाता जिजाऊ विरंगुळा केंद्र " असे करणेस मान्यता देणेत यावी.

तसेच चऱ्होली प्रभाग क्रमांक ३ मध्ये खालील प्रकल्प/चौक नव्याने विकसित झाला असून, नागरिकांना पत्ता माहित होण्याच्या दृष्टीने डूडूळगांव येथील देवस्थान श्री.अडबंगनाथ महाराज यांच्या नावे खालीलप्रमाणे चौकाचे नामकरण करण्यास मान्यता देणेत यावी.

| अ.क्र. | ठिकाणाचे/प्रकल्पाचे नाव | नामकरण |
|---|---|---|
| 1. | गट नं 241मधील डूडूळगांव शाळेसमोरील चौकास नाव देणे. | "श्री.अडबंगनाथ महाराज चौक" डूडूळगांव. |

तरी वरील प्रमाणे नामकरण करण्यास मान्यता देणेत यावी.

तसेच मोशी प्रभाग क्र. ३ मध्ये खालील प्रकल्प पूर्णत्वास असलेल्या प्रकल्पांचे नामकरण करणेस मान्यता देणेत यावी. पिं.चिं.मनपा हद्दीतील मोशी प्रभाग क्र. ३ मध्ये खालील प्रकल्प पूर्णत्वास असून तसेच काही नावांमध्ये नागरिकांना माहिती होण्याच्या दृष्टीने त्यांचे खालीलप्रमाणे नामकरण करण्यास मान्यता देणेत यावी.

| अ.क्र. | प्रकल्पाचे नाव | नामकरण |
|---|---|---|
| १ | भाजी मंडई , मोशी गावठाण | छत्रपती श्री . संभाजी महाराज भाजी मंडई |
| २ | अग्निशमन केंद्र , मोशी | श्री. नागेश्वर महाराज अग्निशमन केंद्र |
| ३ | विरंगुळा केंद्र, हवलदार वस्ती, मोशी | जिजामाता उदयान |
| ४ | स्मशानभूमी, मोशी | कै.नाना पिराजी गायकवाड |

तरी वरीलप्रमाणे नामकरण करण्यास मान्यता देणेत यावी.

तसेच प्रभाग क्र. ३२ जुनी सांगवी मधील सांगवी बॅटमिंटन हॉलचे “छत्रपती शिवाजी महाराज बॅटमिंटन हॉल, सांगवी” असे नामकरण करणेस मान्यता देणेत यावी. प्रभाग क्र.३२ जुनी सांगवी येथील पी.डब्लू.डी. मैदानावर पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचा बँटमिंटन हॉल अस्तित्वात आहे. सदर बँटमिंटन हॉलचे छत्रपती शिवाजी महाराज बँटमिंटन हॉल असे नामकरण करणेबाबत परिसरातील नागरिक, खेळाडू, सन्मा. पदाधिकारी, नगरसदस्य/ नगरसदस्यांची मागणी आहे. तरी जुनी सांगवी येथील पी.डब्लू.डी. मैदानावरील बॅटमिंटन हॉलचे “छत्रपती शिवाजी महाराज बॅटमिंटन हॉल, सांगवी” असे नामकरण करणेस मान्यता देणेत यावी. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता सदर ठरावाची तातडीने अंमलबजावणी करणेस प्रशासकिय मान्यता देणेत यावी.

तसेच प्रभाग क्र. ८ अंतर्गत उद्यानास भुमीपुत्रांची नावे देणेस मान्यता देणेत यावी. सेक्टर क्र.३ (भोसरी सर्व्हे न.९७) व सेक्टर क्र. ४ (बोऱ्हाडेवाडी मोशी गट न. ५०५/५१५/५१७) येथील नव्याने विकसित झालेल्या उद्यानास अनुक्रमे राज्य कुस्तीगीर नामदेव बाबूनाना लांडगे आणि कै.महादू धोंडीबा बनकर या भुमीपुत्रांची नावे देण्यास मान्यता देणेत यावी. विकासकामाना जागा उपलब्ध करून देणाऱ्या कृषी व क्रीडा क्षेत्रातील नामवंत भूमिपुत्रांची नावे देणे हा त्यांच्या योगदानाचा सन्मान ठरेल. तरी सदरच्या ठरावास मान्यता देणेत यावी.

तसेच प्रभाग क्र. ३० दापोडी येथील आरक्षण क्रमांक ३/१२ व सर्व्हे क्र. १२/१३ पैकी येथे वाहनतळ विकसित करण्यात आलेले आहे. त्यास कै. झुंबर भालचंद्र काटे वाहनतळ असे नामकरण करण्यास मान्यता देणेत यावी.

तसेच प्रभाग क्रमांक १७ येथे महापालिकेच्या वतीने बिजलीनगर ते आकुर्डी रेल्वेस्टेशन पर्यंत विकसीत करण्यात आलेल्या अंडरपास (भुयारी मार्ग) ला “स्व.सरसेनाध्यक्ष जनरल बिपिन रावत भुयारी मार्ग” असे नामकरण करणेस मान्यता देणेत यावी.

तसेच प्रभाग क्रमांक 21, पिंपरी मिलिंदनगर येथील, संतोषी माता मंदीरामागे सार्वजनिक वाचनालयाचे काम पूर्णत्वास आलेले आहे. सदर वाचनालयाला “ डॉ.बाबासाहेब

आंबेडकर वाचनालय व अभ्यासिका केंद्र " असे नामकरण करणेस मान्यता देणेत यावी. सभावृतांत कायम होण्याची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही त्वरित करण्यात यावी.

तसेच प्रभाग क्र. १ चिखली येथे मनपा मार्फत नजीकच्या काळात मंजूर विकास योजनेत समाविष्ठ आरक्षण क्र. १/११८ येथे वाहनतळाचे जागेस सीमाभिंत बांधून आरक्षण विकसित करणेत आले आहे. सदर आरक्षणाची जागा मनपाच्या ताब्यात (गट क्र. ११९३) देणेकरीता संबंधित जागामालक श्री.सुनील विश्वनाथ पिंगळे यांनी महत्वाची भूमिका बजावल्यामुळे सदर वाहनतळाचे "कै.सुनील विश्वनाथ पिंगळे वाहनतळ चिखली" असे नामकरण करणेस मान्यता देणेत यावी. तसेच प्रभाग क्र. ८ मध्ये सेक्टर ६ व ९ मधील रस्ता स्पाईन सिटी चौक पासून ते सेवाधरम हॉस्पिटल पर्यंत २४ मीटर रस्त्याला "त्रिवृक्ष संगम दत्त मंदिर पथ" असे नामकरण करणेस मान्यात देणेत यावी तसेच सदर विषय कायम होणेची वाट न पाहता अंमलबजावणी करणेस मान्यता देणेत यावी.

मा.उषा मुंढे - मा.महापौर साहेब उपसूचनेस अनुमोदन देते.

मा.राजेंद्र गावडे – मा.महापौर साहेब, उपसूचना स्विकारली आहे.

**मा.योगेश बहल-** मा.महापौर, मा.आयुक्त, सन्मा.सभागृह, या विषयामध्ये असं म्हणल आहे की सदरच्या नवीन हॉस्पीटल करीता सध्या मनपाच्या धोरणानुसार नवीन कर्मचारी भरती बंद असल्याने ठेकेदारी पध्दतीने कर्मचारी उपलबध करून घेणेबाबत सुचवण्यात येत आहे. आता हा अतिरिक्त आयुक्तांकडून आलेला विषय आहे. मा.महापौर साहेब मला आपल्या आयुक्तांना असं विचारायचं आहे की नुकतीच आता आठ – दहा दिवसापूर्वी आपल्याकडे जाहीरात आलेली आहे हॉस्पीटलची त्यामध्ये स्टॉफ नर्स पण भरती आहे, लॅब असिसटन्स आहेत, अशी विविध पद त्यामध्ये आहेत. आणि ती आपल्या प्रशासनामार्फतच आलेली आहे. हा विषय आणला तेव्हा बंदी होती आणि आता बंदी उठली आहे की बंदी आहे नेमकं काय समजायच आम्ही?

**डॉ.गोफणे-** मा.महापौर, मा.आयुक्त, सन्मा.सभागृह. सदर विषय हा वैद्यकीय विभागातला नाहीये. सदर विषय हा विद्युत विभागाने आणि स्थापत्य विभागाने आणलेला आहे. ही जी पदे आहेत ती वैद्यकीय विभागत कुठलीही भारलेली नाहीत आणि जी काही स्टॉफ नर्सची पदे भारलेली आहेत, ती प्रशासनाने सरळ सेवेने भरलेली आहेत. तर हा जो विषय आहे तरतूद वर्गीकरणाचा विषय आहे तो स्थापत्य आणि विद्युत विभागाचा आहे.

मा.योगेश बहल - मा.महापौर साहेब, म्हणजेच याचा अर्थ भरतीवर बंदी नाहीयेना.

मा.डॉ.गोफणे – मा.महापौर साहेब, हा विषय प्रशासनाचा आहे, प्रशासन विभागाचे इंगळे साहेब आहेत इथे.

मा.ढाकणे (अतिरिक्त आयुक्त १) - मा.महापौर, मा.आयुक्त, सन्मा.सभागृह, महापौर साहेब, हा जो विषय आहे, हा वैद्यकीय किंवा हॉस्पीटल मधून वैद्यकीय पदांविषयी नाहीये. हा आपल्या विद्युत विभागाला तेथे मेंटेनन्स करण्यासाठी जे कर्मचारी लागतात त्याच्याशी संबंधित विषय आहे हा. आणि ते जे कर्मचारी आहेत, त्याची पद आता आपल्याकडे मंजूर नाहीत कारण हे हॉस्पीटल नवीन आहे, आणि जो आपण वैद्यकीय विभागाशी संबंधित प्रश्न विचारलेला आहे. त्याची जाहीरात आपण काढलेली आहे कारण त्याला शासनाने मंजूरी दिलेली आहे.

**मा.योगेश बहल-** मा.महापौर साहेब मला हे उत्तर अपेक्षित होतं आणि हेच उत्तर हावं होतं. मला मा.आयुक्त साहेब अशी विनंती करायची आहे, की महापौर साहेब, आज आपल्या वायसीएम मध्ये स्टाफ नर्स, लॅब असिस्टन्स असे अनेक पदं आहेत की, ज्या पदावर ठेकेदारी पध्दतीने किंवा आपण कॉन्ट्रॅक्ट पध्दतीने नेमलेली आहेत. आज पधंरा-पंधरा वर्षे त्यांची सर्व्हीस झालेली आहे. आठरा-आठरा वर्षे सर्व्हीस झालेली आहे आणि आता ही जी पदे काढलेली आहेत आपण, त्या पदांमध्ये आधी त्यांची नोंद घ्यायला पाहिजे होती. आता विंनती करून जनरल बॉडीत ठराव केला मागच्या वेळेला मला वाटत राहुल दादा महापौर असतांना. आपण दूसरा एक ठराव केला आणि त्या ठरावामध्ये आस म्हटलेल आहे की जे काही कर्मचारी जे काय आपल्या निकषामध्ये बसतात, नियमांमध्ये बसतात त्यांना आपण समावून घ्याव. मा.आयुक्त साहेब आपणास विनंती अशी आहे की ते ज्यावेळेस आपल्याकडे लागलि आणि आता आपण जी जाहीरात दिली त्या मध्ये असे म्हटलेले आहे की, तुम्ही इतर कुठे सर्व्हीस करत असाल तर तुमची नेमणूकची जी तारीख आहे ती तारीख धरून तुमची जर निवड झाली तर तुम्हाला घेता येईल. मग मला आसे म्हणायचे की आपल्याकडे महापालिकेमध्ये आता कोवीड मध्ये काम केलेली लोकं वेगळी परंतु आपल्याकडे महापालिकेमध्ये गेल्या अनेक वर्ष की ज्याच्याकडे शैक्षणिक पात्रता जी पाहिजे ती आहे, स्टॉफ नर्स म्हणून काम करतात, लॅब असिस्टन्स म्हणून काम करतात, इतर पदावर ते काम करतात आणि ते कॉन्ट्रॅक्ट म्हणून आहेत आणि शेवटी त्यातील काही लोकं कोर्टामध्ये गेलेले आहेत महापौर साहेब. आणि असे असतांना शासनाने ज्यावेळेस मंजूरी दिली आहे, आज वायसीएम ची काय आवस्था आहे, आपण ऐवढे मोठमोठे हॉस्पीटल बांधतोय, दूसऱ्या बाजूला अपल्याकडे त्या स्टाफची कमतरता आहे, आणि अशा परिस्थितीमध्ये मग आपण ह्या लोकांना प्राधान्य का देत नाही महापौर साहेब? आपल्याकडे जी लोकं आहेत त्यांची शैक्षणिक अर्हता आहे, आणि जी आपल्याकडे इतक्या वर्षापासून काम करत आहेत, त्या नियमावली आपण बाकीचे जे काही निकष घातले आहेत, त्यामध्ये आपल्याकडे जी लोक कामाला आहेत त्यांना प्रायोरिटी म्हणून त्यांना का घेऊ शकत नाही ? किंवा त्यांनाही अशाच पदांसाठी जे काही त्यांच्या लेखीला ऐवढे मार्क आहेत, ओरलला ऐवढे मार्क आहेत तर जो आपल्या वायसीएम मध्ये आहे किंवा आपल्या महापालिकेमध्ये सर्व्हीस करतोय त्यामध्ये त्याला गुण क्रमांक जास्त दिले तर निदान कुठंतरी न्याय देता येईल त्यांना आपल्याला. आज त्यांचा एज बाद झालेले आहेत, आणि उद्या ते असेच कॉट्रॅक्टमध्ये आणि एका बाजूला परमानंट जे सिस्टर किंवा बाकीचे लोक आहेत त्यांना ४५-४८ हजार पगार आहेत, आणि ही मात्र आठरा-आठरा, पंधरा-पंधरा, हजारावर आज दहा-दहा, बारा-बारा वर्षे कामं करतात. मग आपण त्यांच्यावर अन्याय करतो की काय आणि अन्याय करतोच आहे. त्यामुळे माझी आपणास विंनती आहे महापौर साहेब की, आता जी जाहीरात काढलेली आहे किंवा तिथे जे काही स्टाफ लागणार आहे त्याठिकाणी आपण ज्या पदाला मंजूरी मिळाली -शासनाकडून मिळतेय, आज आपल्या रूग्णांचे जे हाल होत आहेत. आज ऑपरेशन थेटर मध्ये बघा महापौर साहेब तिथे ओटीची आवस्था खूप वाईट आहे. मी मागे पण आपल्याला मागचे जीबी मध्ये सुध्दा सांगितले होत की ज्या ठिकाणी ऑपरेशन टेबल वरन लाईटचा स्टॅंड सगळा पडला खाली. आणि एखाद पेशंट जर मेला, आज इथं डीन साहेब आले असतील तर आपण डॉक्टर वाबळे साहेबांना विचारू शकता की आम्हाला स्वत: डॉक्टरांना विनंती करावी लागते की याला तुम्ही प्रायोरिटीने घ्या. ऑपरेशन थेटरमध्ये नेतात आणि पुन्हा सांगतात दूसरी इमरजेंशी आहे तुला आठ दिवसाने घेऊ. म्हणजे आधी ओटी मध्ये नेलेला पेशंट, आता फक्त नसीब ऐवढेच आहे की

एखाद भूल दिलेलां पण परत काढतील की काय अशी वाईट परिस्थिती वायसीएम मध्ये आहे. मग आज या शहराच एक वेळेला नाव असलेलं, शहराच भूषण असलेले वायसीएम सारख हॉस्पीटल त्याची आज ऐवढी दूर्दशा होत आहे. दूसऱ्या बाजूस आपण कोट्यावधी रूपये खर्च करून फक्त टेंडर काढण्याची घाई करतोय. ही इमारत बांधा आणि ही मशीनरी घ्या, ती मशीनरी घ्या. मग वायसीएम मध्ये मशीनरी का घेत नाही, वायसीएमची दूरूस्ती आपण का करत नाही? वायसीएम मध्ये बाकी जी काय व्यवस्था व्हायला पाहिजे रुग्णांनसाठी ती आपण का करत नाही? माझ आपल्याला म्हणनं आहे आयुक्त साहेब आपण स्वत: माहिती घ्या, आपल्याकडचे डॉ.जॅक यांनी सुध्दा आपल्याला पत्र दिलेलं आहे की आम्हाला या या सगळया सुविधा पाहिजेत. तेथे लोकांना पंधरा-पंधरा दिवस आपला पेशंट ठेवावा लागतो आणि पंधरा दिवसामध्ये त्यांचा ऑपरेशनला नंबर लागत नाही. एवढी वाईट परिस्थिती आपल्याकडे आहे. तर माझी विनंती आहे महापौर साहेब आपल्याला की आपण स्वत: या मध्ये लक्ष घालाव, आपण इतक्या लोकांसाठी इतकी चांगली कामे केली अहेत, जो वायसीएम मध्ये स्टाफ आहे, लॅब असिस्टंट आहे, सिस्टर असेल, स्टाफनर्स असेल, या लोकांना आपण प्राधान्याने कसं समावून घेवू यासाठी आपण जो काही निर्णय घेऊ, निर्णय घेता येईल, आदेश देता येईल तो द्यावा अशी आपल्याला विंनती आहे.

**मा.सुजाता पालांडे-** मा.महापौर, मा.आयुक्त, सन्मा.सभागृह, खरोखर जेव्हा हा विषय वाचला गेला त्यावेळला ज्या पध्दतीने आता आमचे सहकारी म्हणाले त्याच पध्दतीने हा विचार डोक्यामध्ये आला नाही. ह्या कोविडच्या दोन वर्षाच्या काळामध्ये ह्या मानधनावरील नर्सेस असेल, लॅब टेक्नीशीयन असेल, स्टाफ असेल ह्या सगळयांची कैफीयत माई आम्ही पहीलेली आहे. आपल्याकडे परमनंन्ट कर्मचारी पहिल्यांदा जो वायसीएम चा आहे, त्याच्या पेक्षाही जास्ती काम हे मानधनावरील नर्सेसने तेथे केलेल आहे माई. त्यांना दोन दोन, तीन तीन डयूटी एकत्र अजूनही त्या करत आहेत. काल सुध्दा माझ्याकडे दोन तीन नर्सेस बसल्या होत्या त्या सेकंड आणि थर्ड अस दोन्ही करून आलेल्या होत्या, त्यांच्या डोळयातली झोप जात नव्हती, त्यांच्या डोळयात इतकी झोप होती त्या जर ऐवढ्या मेहनतीने काम करीत असतील तर माई आपण त्यांच्यासाठी काही गोष्टी का करू शकत नाही? आज मला साधा एक प्रश्न नेहमी डोक्यामध्ये येतो, आकृतीबंधामध्ये ठीक हे पदे नाहीयेत आहे, आपण दुसरी पदे घेतो, कॉन्ट्राक्ट पध्दतीने घेतो, पण कॉन्ट्राक्ट पध्दतीने घेतल्यावर माई आपली स्वत:ची काय आवस्था होते आपल्याला नेहमी कळत. कोवीड मध्ये काम करणारे जेवढे कर्मचारी होते, त्या कर्मचाऱ्यांना आपण कॉन्ट्राक्ट पध्दतीनेच घेतल होतं. पण आज जेव्हा आपण त्यांची कैफीयत ऐकतो तेव्हा आपल्यालाही असं वाटत की जरी तो पण कधीतरी लायक नसेल तरी त्याने कोविड मध्ये काम केलेले आहे. त्याला आपल्याला परमनंन्ट कराव लागेल, किंवा मानधनावर घ्याव लागेल. आता ह्या नर्सेसची कैफीयत इतकी विचीत्र आहे, जे पहिले मानधनावर होते आयुक्त साहेब त्याना आपण कॉन्ट्राक्टदारावर टाकल. कॉन्ट्राक्टदारावर टाकल्यानंतर तेव्हा हा जो कॉन्ट्राक्टदार आहे ना तो त्यांना मनमानी पध्दतीने वागवतो, याच काय करणार आपण? ज्या पध्दतीने त्या काम करत आहेत, आम्ही पण बघितलं आहे, एका एका वॉर्डात ५०-५० पेशंट साठी तेथे फक्त एक-एक नर्सेसने काम केलेल आहे. परमनंन्ट केलेल्या नर्सेस असतील, परमनंन्ट असलेला कर्मचारी असेल हा स्वत: म्हणत होता की मी आज काम करू शकत नाही, पण याना आपण कुठेही मुभा

दिली नव्हती. त्या कोविडच्या काळात जर ह्या पध्दतीने काम केले असेल तर मला वाटत त्या लोकांना आपण परमनंन्ट का कारायच नाही? माई आपण ह्या नर्सेसला परत काय सांगतोय, मी काल साहेबांशी पण चर्चा केली, नर्सेसला आपण काय सांगतो की तुम्ही पुन्हा परिक्षा द्या. माई १२ वर्षे काम केलेल्या नर्सेस आहेत या, लॅब टेक्नीशियन आहेत या. यांचे आत्ताच वयाच जर आपण अनुमान लावलं तर किती वर्षामध्ये कुठल्या पध्दतीन काम करणार त्या. आज प्रत्येक वायसीएम मधल्या नर्सेस मला बाकीच्या रुग्नालयाबद्दल बोलायचे नाही. कारण सगळयात जास्त माझा सबंध हा यशवंतराव चव्हाण रुग्णालयशी येतो. आज इथल्या जर नर्सेस बघितल्या तर एकाही नर्सेसला मला वाटतं घरी जाऊन काम करण्याची पण परिस्थिती तिची राहत नाही, एवढा वेळ उभं राहिल्यानंतर. आज वायसीएम मध्ये अपण आयसीयूची आवस्था बघितली, आज ऑपरेशन थिएटरची आवस्था बघितली तर आज तिथे काम करणारा कर्मचारी आज कुठल्या पध्दतीने काम करतो, कमीश्नर राहेब आपल्याकडे जर एखादा डेक्स खराब असेल, एक टेबल खराब असेल तर मला नाही वाटत आपल्या इथला पीसीएमसी मधील हेड ऑफिस चा कर्मचारी त्याच्यावर काम करेल. आज तेथे रिसेप्शनमधले डेस्क बघा जाऊन, तिकडची सगळी समुग्री जाऊन बघा, ज्या पध्दतीने हा कर्मचारी काम करतो त्यांना कुठतर आता जी नवीन पोस्ट तुम्ही आता सांगितल्या, की आपण स्टाफ नर्सेस घेतल्या, लॅब टेक्नीशियन त्यामध्ये कुठेंतरी त्यांचा विचार कमीश्नर साहेब व्हायला पाहिजे होतो. आज त्यांना त्याच्या पध्दतीने तुम्हाला कुठल्या पध्दतीने मुभा देता येते? कुठल्या फॅशीलीटीने त्यांना आत घेता येईल, आज जिजामाता मध्ये कॉन्ट्राक्ट पधतीने जे लोकं काम करीत आहेत त्या सगळया महिलांच्या शोषणाची तुम्हाला एक तक्रार येणार आहे दोन दिवसांमध्ये कमीश्नर साहेब. कॉन्ट्राक्टदार त्यांना कुठल्या पध्दतीन वागवतोय, कुठल्या पध्दतीने त्यांच्याकडे बिहेविअर होतोय याची तक्रार दोन दिवसांमध्ये तुमच्याकडे कमीश्नर साहेब येणार आहे. मला आता या गोष्टीवर सभागृहामध्ये बोलायच नाहीये, पण ज्यावेळेला कॉन्ट्राक्टदारांना तुम्ही घेता, तो कॉन्ट्राक्टदार कुठला असतो, कुठल्या पध्दतीने आतमध्ये बिहेविअर करीत असतो, तो कुठल्या पध्दतीन कर्मचाऱ्यांना वागणूक देत असतो याकडे लक्ष देण्याच, त्याच्यासाठी आपला जो मेन माणूस असेल त्याच्यासाठी तुम्ही कुठल्या पध्दतीची उपाययोजना केलेली आहे हे आयुक्त साहेब आपणाला बघाव लागेल. फक्त कॉन्ट्राक्टदारीत नाहीये, आकृतीबंधामध्ये पोस्ट नाहीत म्हणून कॉन्ट्राक्टर नेमणे आणि कॉन्ट्राक्टदाराकडून माणसे घेणे, पण त्याच्यानंतर त्या माणसांवर होणारा परिणाम असेल, त्याची वागणूक असेल ही कुठल्या पध्दतीने होते हे आयुक्त साहेब तुम्हाला बघाव लागेल. आज माझी विनंती आहे आयुक्त साहेब जे १२ वर्षे आपणांकडे काम करताहेत त्या कर्मचा-यांवर अन्याय न होता, ठीक आहे, मलाही साहेब वाटत माझ्यावर अन्याय होत असेल तर मी कोर्टाचे दरवाजे ठकठकावले पाहिजे, त्या पध्दतीन कोणी कोर्टात गेलं असेल पण ह्यामध्ये नाहक काही लोकांचा जो बळी जातोय मला वाटतं ते थांबल पाहिजे आणि ह्या लोकांना कुठल्या पध्दतीने सामावून घेता येईल, आपण शासनाकडे पाठवलेलच आहे, आपणही त्यामध्ये कुठल फॉलोप घेता येईल तो घ्याव एवढीच नम्र विनंती आहे.

**मा.संगिता (नाणी) ताम्हाणे -** मा.महापौर, मा.आयुक्त, सन्मा.सभागृह, आज ताईंनी जो विषय मांडला तो योग्यच विषय आहे. माझ्या प्रभागातल्या तीन मूली आहेत, कोविड काळामध्ये पूर्ण काम केलं त्यांनी तिथं पण त्यांना न्याय मिळालेलं नाहीय. आज त्या एका-एका वार्डामध्ये आपले जे परमनंन्ट असतात ते कुणीही न जाता त्या एक-एक लेडीजने काम केलेलं

आहे. त्या बऱ्याच वेळा अशा मला म्हटल्या की, ताई तुम्ही थोडंस लक्ष द्या. पण कोविड काळामध्ये जी कामे केलीत आता ताईंनी जे सांगितलय त्यांना तुम्ही कायम स्वरूपी लावून घेतल पाहिजे. आज त्या महिलांच्या घरची परिस्थिती ऐवढी वाईट होती. लहाण लहाण मुलं घरी होती आणि आज त्या तिथून आल्या त्यांच्या पतीला देखील कोरोना झाला होता. मग आज आपल्या त्या लोकांचा सभागृहामध्ये विचार केला पाहिजे. माझं आस म्हणनं आहे की त्या लोकांनी कोविड काळामध्ये जे काम केलेलं आहे आणि आपल्या परमनंन्ट लोकांनी जेवढं काम केलेल नाही तेवढ तेथे जे मानधनावर लोक होते त्यांनी काम केलेलं आहे. त्यामुळे माझं एवढच म्हणनं आहे की त्या लोकांना कायम करून घेण्यात यावे, ऐवढेच बोलते आणि थांबते.

**मा.मंगला कदम:** मा.महापौर, मा.आयुक्त, सन्मा.सभागृह, मा.महापौर हा विषय जसा आता नर्सींगचा आहे अशाच पध्दतीचा विषय डॉक्टर लोकांचे पण आहेत. पूर्वी आपल्याकडे बाहेरून डॉक्टर लोकं ऑपरेशनसाठी यायचे सिनीयर. पुण्यामध्ये सिनीअर डॉक्टर जेवढे आहेत ते काम करतात. तर ही लोकं ससून मध्ये किंवा पुणे कार्पोरेशनचे जे हॉस्पीटल्स आहेत तेथे ऑपरेशनसाठी जातात. आपले इथे पूर्वी लोक येत होते. परंतु नंतर आसा नियम काढला गेला की फक्त पिंपरी चिंचवडच्याच डॉक्टरांना इथं येवून ऑपरेशन करण्याची परमीशन देण्यात यावी. कमीशनर साहेब बघून घ्या की पिंपरी चिंचवड मधलेच हे डॉक्टर असले पाहिजेत आणि त्यांनी वायसीएममध्ये यायच किंवा कुठलेही आपल्याकडे जिथं थेटर आहेत तेथे जाऊन ऑपरेशन्स करायचे. परंतु पुण्यामधले राहणारे परंतु पिंपरी चिंचवड वर सुध्दा काही लोकांच प्रेम आहे. अशी काही डॉक्टरर्स आहेत. आता मी मागच्या वेळेस साधारण एक महिन्यापूर्वी पूणतांबेकर सरांकडे गेले होते, ते पोटाच्या कॅन्सरसाठी खूप प्रसिध्द आहेत. पुण्यामध्ये, ऑल वर्डमध्ये त्यांची प्रॅक्टीस चालू असते. ऑपरेशनसाठी ते जातात, पूर्वी ते आपल्याकडे येत होते. मग मी त्यांना विनंती केली की सर आमच्याकडून एवढे पेशंट पुण्यामध्ये तुमच्याकडे येतात तुम्ही पूर्वी जसे वायसीएम मध्ये येत होते आता का येत नाहीत? तर त्यांनी सांगितल की मागच्या कमीशनरांनी हे लावलं की फक्त पिंपरी चिंचवड मधील डॉक्टरांनीच वायसीएम मध्ये याव आणि ते कोणत्याही पध्दतीच मानधन घेत नव्हते. पुणतांबेकर सर, आणि आज महिलांसाठी असेल, गतीमंद मूलींसाठी असेल, महिलांच्या यूट्रसच्या ऑपरेशनच्या बाबतीत असेल, एवढ्या टॉपरचे ते पुण्यामधले आणि महत्वाचे पोटाच्या कॅन्सरसाठी ते प्रसिध्द आहेत, आणि आपल्या लोकांना जर वायसीएम मध्ये ते आले आणि त्यांनी जर ऑपरेशन केले तर आपल्याला काय हरकत आहे. आपल्या इथल्या लोकांना फॅसिलिटी सुध्दा मिळणार आहेत, पूर्वीची त्यांनी मला नावं सुध्दा सांगितली की किती व्हीआयपी होती, आणि त्या व्हीआयपी लोकांच्या फॅमीलीमधल्या सुध्दा लोकांचे मी तेथे येवून ऑपरेशन केलेली आहेत. असे बरेचशे डॉक्टर पण आहेत की या डॉक्टर्सना आपण सामावून घेतल पाहिजे. मागे एकदा मी वाबळे सरांना फोन केला होता पिंपरी चिंचवड शहरामध्ये आपल्याकडे असा डाटा आहे का की ज्याच्या ओपीडी चालतात. किती ठिकाणी किती डॉक्टरांचे क्लीनीकल आहेत, त्याचा डाटा आपल्याकडे आहे का? मला एका डॉक्टरांचा नंबर पाहिजे होता म्हणून मी त्यांना फोन केला. त्याना लक्षात आलं नाही किंवा येवू शकत नव्हत कारण आपल्याकडे ओपीडी करणारे खूप डॉक्टर आहेत. मग आपल्याकडे त्यांच्या इंट्रॅ असल्या पाहिजेत. आपण परमीशन देतो त्यांना सर, योगायोगाने त्यादिवशी डॉ. पवन साळवे सरांचा फोन लागला नाही, डॉ. रॉय सरांचा लागला, त्यांनी मला डॉक्टरांचे डिटेल दिले कुठं असतात, कोणत्या विभागात आणि कुठल्या

एरीयामध्ये आहेत, आणि मग त्यांचे डिटेल आम्ही काढले. परंतु आपल्याकडे हा चार्ट असला पाहिजे की, पिंपरी चिंचवड शहरामध्ये किती लोकं येवून हे काम करतात. मग तो डेंटलच्या डॉक्टरांनी सुध्दा क्लीनीकल टाकले असलेतरी त्याची एंट्री ही असली पाहिजे. जसा मघाशी फ्लेक्सचा विषय झाला की कितीतरी अनधिकृत गोष्टी फ्लेक्सच्या बाबतीत चालतात. सहज आता हत्ती गेलेला आहे शेपूट काय आता दोन महिने राहिले आहेत, त्यामुळे किती ओरडायच किती काय करायचं हा पण प्रश्नच आहे. म्हणून जस फ्लेक्सचा विषय झाला बाकीचे काही विषय असतील तशाच पध्दतीचा हा विषय आहे. मग आपल्याकडे किती ओपीडी करतात या सगळयांचा डाटा असला पाहिजे. आणि तो आपल्याकडे ऑनलाईन ज्यांना कुणाला पाहिजे त्यांना डॉक्टरांचा तो ऑनलाईन डाटा आपल्याला बघायला मिळाला पाहिजे. जसा नर्सेसच्या बाबतीत हा विषय आता मांडला मी त्यांच्या पाठीशीच आहे, परंतु शिक्षणमंडळामध्ये सुध्दा असे कितीतरी लोकं आहेत की वयाच्या पंचीसाव्या वर्षी, सव्वीसाव्या वर्षी कॉन्ट्राक्ट मध्ये कामाला लागले आज त्यांच वय पन्नास आहे. आता त्यांनी आपल्या नियमानुसार वयाच्या पन्नासाव्या वर्षी सिक्यूरीटी मध्ये काम करता येत नाही, आणि त्यांनी कार्पोरेशनवर डोळे बांधून विश्वास ठेवला की आम्ही कोर्टात नाही जायच, त्यावेळेसची परिस्थिती अशी होती की तुम्ही कोर्टात जाऊ नका, सगळे लोकं आस म्हणायचे की कोर्टात जाऊ नका आणि मग तुमचा विषयी काम होईल, परंतु आता सध्या परिस्थिती अशी आहे की, तुम्हाला भेटले असतील उच्च शिक्षण मंडळातले काही शिपाई. ते आज आमचे वय पन्नास आहे आम्ही आता कुठं जाणार या वयामध्ये आम्हाला कोण काम देणार. आज काम होणार घंटा गाडीच झालं म्हणून आमचही होईल अशी करणारी मंडळी खूप आहेत, काम करणारी, आणि म्हणून ही परिस्थिती नूसती नर्सेसच्या बाबतीत नाहीये. तर सर तुम्ही असे कोणकोणत्या डीपार्टमेंटमध्ये कामं केलेली आहेत आणि कार्पोरेशनवर विश्वास ठेवून, म्हणेज बारा-बारा तास पंधरा-पंधरा तास कोरोनाच्या काळात तुम्ही कोणतेही काम असूदे कुठलेही ऑपरेशन असूदे, पेशंट कोणत्याही भागाचा असूदे तरी सुध्दा नर्सेस काम करतातच. ज्या मुलांनी असतील महिलांनी असतील जास्त करून शिपाई पुरूष आहेत, या पुरूषांनी खूप काम केलेलं आहे आणि वयाच्या पन्नासाव्या वर्षी आता तिथला कॉन्ट्राक्टर आस सांगतो, की वयाच्या पन्नासाव्या वर्षाची अट आहे, आता तू काय कामाला येऊ नको. कार्पोरेशनवर विश्वास ठेवला म्हणून कोर्टात नाही गेले, आता कोर्टात गेले नाही म्हणून त्यांना समावून घेतले पाहिजेना? कोर्टाने नाही घेतले म्हणून कार्पोरेशनने कामावर घेतल पाहिजे. जर तो माणूस तेव्हापासून तुमच्या कार्पोरेशनचा जर पगार घेत असेल तर आपण कार्पोरेशनने सुध्दा लक्षात घेतल पाहिजे, आणि अशा दृष्टिकोणातून सगळयांचा विचार करा. हे एकच विषय असे नाहीये की कॉन्ट्राक्ट मध्ये घेतल्यानंतर सुध्दा खूप फायदा कार्पोरेशनला झालेला आहे. आता सुध्दा जी भरती चालू आहे आपल्याकडे तिथे सुध्दा फार मोठी लॉबी चालू आहे. नाव घेऊन सुध्दा मी सांगू शकते. मी फोन करते नेहमी वाबळे सरांना की एखाद्या मानसाला किंवा एखाद्या डॉक्टराला परत घ्यायचं असेल त्यात काही ओळखीचे असतील तर दूसरे-तीसरे दिवशीच घेतलं जातं आणि टॉपरचा मुलगा जरी असेल चांगल काम करणारा जरी असेल परंतु त्याच ओळखीच कोणी जर नसेल तर त्याला सांगणार तुझ पंधरा दिवसांनी होईल. किंवा जी आपली मंडळी आहे, वाईट वाटत थेरगावामध्ये कारवाई झाली त्या दिवशी मुलांवर, काय तीन तीन हजारासाठी काय कशासाठी बुध्दी भ्रष्ट होते आपल्या कर्मचाऱ्याची हेच कळत नाही. तीन तीन हजारासाठी त्यांना नोकरी जायची वेळ येते त्यांची. अशी परिस्थिती डोळयांवर पट्टी बांधून सगळया डिपार्टमेंटमध्ये आहे सर. जर त्या डॉक्टरचा वशीला असेल तर

त्याला लगेच ऑर्डर मिळणार, नाही त्या डॉक्टराकडे वशीला तर त्याला सांगणार पंधरा दिवस लागतील, आठरा दिवस लागतील. ही सत्य परिस्थिती आख्या शहरात आहे. टपऱ्यांच्या बातबीत सगळे मघाशी बोलले, सगळीकडे तेच आहे, ओळखीच असेल तर ती टपरी राहते. नगरसेवकांनी फोन केला तर राहते. आम्ही शंभर वेळा सांगितल, मी सांगितले सगळयांना काय बोलायच आयुक्तांना तरी, ते काय त्यांच्या खालच्यांनी कामे करतांना कसे काम करतात त्यांना काय वाटते आयुक्त थोडीच लक्ष घालणार आहेत. पण जिथे गर्दीचा रस्ता असेल, जिथ दवाखाना असेल, जिथं क्लासेस असतील, तिथला रस्ता तरी सुखद असला पहिजे साहेब. म्हणजे ज्या ठिकाणी मेन चौक असतील तिथे तरी कमीत कमी टपऱ्या, क्रेन किंवा कितीतरी गोष्टी आता तर सुकाळ सुटलेला आहे. बसेस लावून ठेवतात, चांगल्या एरीयामध्ये लावलीनां म्हणजे तिथे ती तोडफोड होत नाही. म्हणून लोक काय करतात बाहेरच्या सुध्दा गाड्या या एरीयात लावून रात्रीचे निघून जातात, ट्रेलर सुध्दा लागतात. काहीतरी केलं पाहिजे सर म्हणून म्हटल हत्ती गेलेला आहे, शेवटचे दोन महीने म्हणून किती बोलायचे कोणाच काय बोलायच, आयुक्त साहेब ह्या सगळया गोष्टी ज्या चाललेल्या आहेत शहरामध्ये हे उघडे डोळे करून तुम्हाला बघावच लागेल, आणि तुमची जी टीमवर्क आहे, आता मघाशी सांगितल, मघाशी खुलासा करतांना प्रशासनाला बोलवा. प्रशासनाचा विषय कोणता आहे, त्याला नाव दिलंय, कोण आलय तिथे? बोर्डावर त्यांना लिहीलं प्रशासन, त्यांचेकडे विभाग कुठला, उद्यान विभाग, प्रशासन कशाला दिलयं त्यांना? उद्यान विभाग लिहा, उद्यान अधिक्षक द्या, कोणीतरी आहेत त्यांच्या बरोबर आणखी दूसरे प्रशासनाचं काम बघणारे. म्हणजे दिशाभूल होती सर. त्यांना उद्यान विभागासाठी आणलं असेल तर त्याना उद्यान विभागाची पाटी टाकून द्या. पण आस होत नाही, आम्हाला काय वाटत, प्रशासन विभाग आहे, त्यांच्याशी चूकून बोललं जात ना? त्या व्यक्तीचा पण तो अपमान आहे. प्रशासन विभागातल्या व्यक्तीला आम्ही जर फोन केला हे काम आमचं होतं तुमच्याकडे आम्ही या या पध्दतीने तुम्हांला सांगतो, ते म्हणतात ते विभाग माझ्याकडे नाही. त्यांना पण उत्तरे द्यायला चांगले नाही वाटत. मघाशी त्यांच नाव घेतलं आणि ढाकणे साहेबांनी खुलासा केला. म्हणेज प्रशासन विभागाच महापौर साहेबांनी नाव घेतल आणि खुलास दुसऱ्याने केला. हे दिसायला चीत्र आहे, हे सर्व भाऊ बंदकी बाहेरून आलेली आहेत. म्हणून तुम्ही वाटप करतांना त्यांचे नावाप्रमाणे नीट वाटप करा. आम्हाला काही त्यांचा अपमान करायचा नाही, बाहेरून आले तरी त्यांना सामावूनच घेणार आहोत. आणि कामकाज कशा पध्दतीन करून घेणारच आहे परंतु हे करीत असतांना त्यांचाही कुठे अपमान होता कामा नये. मागे एकदा उदाहरण झालं त्यांना मी फोन केला, प्रशासन विभाग तुमच्याकडे आहे मला या या गोष्टीचा खुलासा पाहिजे, मला ही माहिती पाहिजे, त्यांनी म्हणले नाही, माझ्याकडे हे काही नाही. तर त्या दृष्टीकोनातून सुध्दा सर, काय होत आम्ही त्यांना फोन करायच, त्यांनी आम्हाला आस सांगायच चुकीच वाटत, त्यांचे विभाग त्यांचे नावाखाली टाकून द्या, ते पण सांगते तुम्हाला आयुक्त साहेब, आणि ह्या सगळया गोष्टीचा पर्याय काढायला पाहिजे तुम्हाला. म्हणजे वेगळ विषयांतर करून पहिल्या विषयाबद्दल नाही. या विषयाला मी असेच सांगते, नर्सेस असतील, शिक्षण मंडळातले लोक असतील, कॉट्राक्ट मधले वर्षानुवर्षे आपल्याकडे डोळयावर पट्टी बांधून आपल्यावर विश्वास ठेवला, नाही आमच कार्पोरेशन आहे, आमचं पिंपरी चिंचवड आहे, आम्ही नाही कोर्टात जाणार. अशा लोकांना सर कामावर सामावून घ्यावं लागेल असे मी आपल्याला सांगते आणि थांबते, धन्यवाद.

**मा.आशा धायगुडे-शेंडगे** : मा.महापौर, मा.आयुक्त, सन्मा.सभागृह, आता जो विषय आहे की, कॉन्ट्राक्टवर काम करणाऱ्या डॉक्टरांना सामावून घ्यायचं तर त्यांना निश्चितपणे माई घेतल पाहिजे. पण त्याच बरोबर सन्मा.आयुक्त साहेब मी अनेक वेळा प्रभागातच्या मीटींगमध्ये कॉन्ट्राक्टचा विषय येत नाही चर्चेसाठी पण आम्ही प्रभागाच्या मीटींग मध्ये नेहमी सांगत असतो आणि आज संधी आहे म्हणून तुमच्याही कानावर टाकल पाहिजे की आपण सगळे जण ज्या वेळेला एखाद टेंडर काढतो, साहेब, आम्ही सगळे नगरसेवक हे पाच वर्षाचे असतो. पुढचे पाच वर्ष आम्ही येणार की नाही हे आमचे नागरीक ठरवतील की आम्ही सभागृहात यायचं की नाही यायच. काही आमचे जुने नगरसेवक आहेत, सहा-सहा टर्म म्हणजे साधारणत: ते ३०-३० वर्षे ते सभागृहात आहेत. काही पाच दहा पंधरा वर्षे, परंतु अधिकारी म्हणून तुम्ही प्रशासकीय आहात, परंतु तुम्ही ह्या पालिकेतून त्या पालीकेत, या ठिकाणाहून त्या ठिकाणी प्रशासकीय तुमचा अनुभव असतो, बाकीचे आमचे अधिकारी वर्षानुवर्षे काम करतात. आपण मीनीमम वेजेस ऍक्ट वरती टेंडर्स फ्लोट करतो, आणि तुम्ही म्हणता की मीनीमम रेट नुसार ऐवढा होणार आहे, त्या मध्ये त्या संदर्भातल जे काही सर्व्हीस चार्ज असेल, सर्व्हीस चार्जेस वर ठेकेदार काय गृहीत धरतो, एक टक्क्याने टाकायचे, दोन टक्क्याने टाकायचे की पाच टक्क्याने टाकायचे आणि मग ते टेंडर्स फ्लोट होतात, ते टेंडर भरतात आणि तिथून पुढे आपल्याला टेंडर मिळत. सर शहराच चित्र जर तुम्ही पाहिल, म्हणजे आम्ही अनेकदा तुमच्या नजरेसमोर आणण्याचा प्रयत्न करतो परंतु तुम्ही देखील धृतराष्ट्र आसण ठिक आहे की निसर्गाने त्यांना डोळे दिले नव्हते. परंतु जर तुम्ही गांधारी व्हायच ठरवलं असेल तर दुर्देवाने आम्हाला देखील सभागृहामध्ये येवून बोलल्याशिवाय पर्याय नसेल ते तुमच्या समोर येवून बोलायच, सांगायच अनेकदा पत्रव्यवहार करायचा. शिक्षा देतांना किंवा शिक्षेस कोण पात्र त्यानुसार आज आपल्याकडे खूप विषय झाले. अनधिकृत बांधकामावर बोलले, अनधिकृत फ्लेक्सवर बोलले, आता आम्ही कॉन्ट्राक्ट पध्दतीवर बोलतोय, मी तुम्हाला नेहमीच सांगते, आम्ही १२८ काहीच करत नाहीत. तुम्ही काहीही म्हणा साहेब. तुम्हीच टेंडर काढता, तुम्हीच सहया करता, मग टेंडर चुकत कसं? आज शहरामध्ये तुम्ही झाडू करतात त्या लोकांना विचारा, तुमच्याकडे अनेक सामाजिक लोक आले असतील, त्यांना पगार कमी मिळतो, वेळेवर मिळत नाही, त्यांना युनिफार्म मिळत नाही, कपडे मिळत नाही, बूट मिळत नाही, त्यांना झाडू मिळत नाही. साहेब ऐकल्या असतील या गोष्टी अनेकदा. एवढेच नसेलतर जो काही पगार असेल त्याच्या पेक्षा कमी पगार त्यांना दिला जातो. मग त्यावरती एखादा पर्याय, माई दहा वर्षे झाले आपण या सभागृहात आहेत, आपले नउ वर्षे संपले, दहा वर्ष संपले, अता दोन-चार महिन्याचा विषय राहिला. पुन्हा येणं, न येणं आपल्या शहरातील नागरीक ठरवतील, आणि आपलं येण शक्य होईल. परंतु याठिकाणी मा.आयुक्त साहेब आपण टेंडर कसं काढल पाहिजे? मिनीमम वेजेस ऍक्ट प्रमाणे जिथे XYZ जे लोक कामाला येतील त्यांची यादी, त्यांचा खाते क्रमांक, त्यांचे खात्यावरती पगार आपण दिला पाहिजे आणि जो काही सर्व्हीस टॅक्स आहे तो संबंधित ठेकेदाराच्या खात्यावर गेला पाहिजे. का होत नाही हे? अनेकदा या सभागृहामधले नगरसेवक असतील, आम्ही अनेक पत्रं तुमच्या पर्यंत पोहोचवलेत. मागचे आयुक्त असतील, अनेकांनी तुमच्याकडे जे ATM कार्ड आहेत ते कसे वापरले जातात, कसे तुमच्या खात्यावर पैसे टाकतात, आणि तुमच्याकडचे पैसे लगेच निघतात. आपण फक्त दाखवतो की तुमच्या ATM वर पैसे गेलेत, सगळे ATM कार्ड माझ्याकडेच असतात आणि पुन्हा तुमच्या खात्यातून पैसे काढलेले असतात, ट्रँजेक्शन दाखवल जातं. परंतु वास्तविक

तसं होत नाही. सन २०१२-१३ ला एक मोठा विषय या महानगरपालिकेतील अनेक ठेकेदारांनी ज्यावेळेस स्मशानभूमीमधील पैसे बघितले तर माई त्या वेळेला एका संबंधित ठेकेदारांनी पीएफ चे पोटी दोन कोटी रुपये या शहरातील नागरीकांसाठी भरले होते, आणि हे जर माझ्यासारख्या सामान्य नगरसेवकाला सांगाव लागत असेल तर वर्षानुवर्षे काम करणारे तुमचे अधिकारी जे तुम्ही काय करतात हे सांगा ? आणि त्यांना शिक्षा काय? आज सभागृहात बोलतांना आपण सांगितलं की अनधिकृत बांधकाम होतात, त्याला कारणीभूत आमचे नागरीक असतील अस तुम्ही गृहीत धरता, आमच्या नागरीकांचे घरावर तुम्ही हातोडा टाकताय, काय अधिकार आहे तुम्हाला? तुमचे बीट निरीक्षक असेल, तुमचे संबंधित अधिकारी असेल तो पगार घेतो ना? मग तो पण गांधारी, त्यांनी पण डोळे बंद करून घ्यायचे स्वत:चे? शिक्षा माई नागरीकांना मिळाली, अजिबात नाही तुम्ही शहर बकाल होउ नये म्हणून खूप प्रयत्न करता, तुमच मनापासून याठिकाणी आभार, तुमचं कौतुक केलं पाहिजे. परंतु त्याच बरोबर संबंधित अधिका-यावर तुम्ही काय शासन केल? संबंधित विभागाला तुम्ही काय शिक्षा देता? साहेब होर्डींग काढले, होर्डींग काढले, परवा दिवशी तुम्ही सभागृहात नव्हते, तुमची तब्येत खराब झाली होती म्हणून तुम्ही घरी गेला अस काही तरी निरोप मिळाला होता. ढाकणे साहेब तुमच्या ऐवजी तुमची जबाबदारी सांभाळत होते. त्यावेळी मी सांगितल साहेब, कोप-यावरती लागलेला हायवेला लावतात, बिनधास्त इतकी डेरींग साहेब ठेकेदारांची होते? नाशिक फाट्याच्या पुलापासी काही होर्डींग लावत होते त्यावेळी आम्ही खूप मागे लागलो तत्कालीन आयुक्तांच्या, तेव्हा तो काढला गेला. त्यावेळी आम्हाला खूप प्रेशर असायचा, आम्हाला कोणाचा तरी फोन येणार, कोणीतरी सिनीअर नगरसेवक फोन करणार, कोणीतरी अधिकारी करणार, कोणीतरी नेता फोन करणार. साहेब ज्यावेळेस मी तुम्हाला काम सांगितल असेल, जर अधिकारी म्हणून कोणत्याही अधिकाऱ्याशी बोलेले असेल तर तुमच्याशी बोलले असेल पण विषय तीसऱ्या माणसाला माहीतीच कसा होतो. त्यावेळी तुम्ही काय शिक्षा देता कोणाला, समोरच्या माणसाला, तर काहीच नाही. साहेब कुठंतरी जागरूकपणे बघण्याची वेळ आहे, इथून पुढचे टेंडर काढतांना ज्या-ज्या वेळेस आपण ठेकेदारी पध्दतीने काढणार आहोत त्या-त्या वेळेला ठेकेदारांनी तुमच्याकडे यादी दिली पाहिजे, की ही ही माणसे मी कामावर घेतली, ह्या हया लोकांचे थम होतात, त्यांच्या सह्या होतात, त्यानंतर महिन्यानंतर त्यांचे अकाउंटवर पेमेंट टाकले पाहिजे आणि सर्व्हीस चार्जेस जो आहे तो सबंधित ठेकेदाराचे खात्यावर गेलेनंतर बघुयात किती लोक इथे एक आणि दोन टक्कयावर काम घ्यायला येतात. बिनधास्तपणे पंधरा पंधरा, वीस-वीस हजार रुपये जो काही, मिनीमम वेजेस ॲक्ट असतो त्यापैकी दहा आणि अकरा हजार सुध्दा त्या लोकांचे खात्यावर दिले जात नाहीत. नुसतं त्यांना तोंडाला पाने पुसण्याचे काम केलं जात साहेब. आता सुध्दा ठेकेदाराच नाव सांगू शकेल. व्हीडीओ रेकॉर्डींग पाहिजे तर व्हीडीओ रेकॉर्डींग पण देतो. आठरा हजार पगार आहे तुमच्या खात्यात आठरा हजार टाकायच्या आधी तुमच्याकडून तीन हजार आगोदर घ्यायचे. म्हणजे तुमच्या खात्यावर संध्याकाळी पैसे येतील. आणि मग तुमच्या खात्यावर आठरा हजार येतात, मिनीमम वेजेस ॲक्टप्रमाणेचे. कस हो साहेब हे सगळं. आम्हाला कळतं साहेब, आम्ही तर खूप साधी माणसे आहोत, सगळे नगरसेवक आहोत, आम्ही आमच्या लेवलवर खेळतो. तुम्ही तर अनेक वर्षे त्याच, त्याच पदावर काम करीत असतात पण तुमच्या लक्षात या गोष्टी येतच नाहीत. की आल्यातरी बघायच्या नाही. कुठंतरी वायसीएम मधून एखादी महिला येते आणि आम्हाला पत्र

देते ताई आम्ही सुरक्षा कर्मचारी म्हणून काम करतो आणि आमचं सिनीअर आमच शोषण करतो. त्या येवून रडतात ढसाढसा आमच्याकडे, आम्ही अधिकाऱ्यांकडे फोन लावतो, साहेब काय विषय आहे बघता का जरा या विषयाकडे. ताई कोणाकडे बोलू नका हा विषय, सोडून द्या ना, आपण तो सॉल्व्ह करू. काहो साहेब, सुरक्षा रक्षक म्हणून काम करणाऱ्या महिलेवर जर अत्याचार होत असतील, अन्याय हात असतील तर तिने सुध्दा बोलायच नाही. तिला भिती वाटणार नाही तुमच्या बरोबर यायची? किंबहूना तिने आमच्याकडे येण्याऐवजी तुमच्याकडे यायला पाहिजे. आणि डेअरींग कसं करतात या महापालिकेमध्ये? सगळयात मोठा प्रश्न आहे साहेब आपल्या महानगरपालिकेत काम करत असतांना देखील रिटायर होतात कर्मचारी आणि परत तिथं येतात कामावर त्याच पोस्टवर. फक्त पालिकेच्या पोस्टवर न येता मानधनावर येतात. आणि पुन्हा त्याच त्याच गोष्टी साहेब करतात. सगळयाला माहीत आहे ह्या चुका कोण करतात, हा विषय का, हा ताई, दोन मीनीट ताई, बोलतो ताई. आता माझ्याकडे शेख म्हणून पोरगा आहे, त्याचा पीएफ दिला गेला नाही. मी फोन केला, दूसऱ्या दिवशी पीएफ गेला. साहेब आता मी पण खूप काळजी घेते. मी म्हणते बाबा तू लेखी दे तक्रार काय आहे ती. कारण काय होतं, आशाताई उगाच बोलल्या. किंवा पुन्हा माझ्या एकटीवरती शंका येणार, त्यापेक्षा मी म्हणते की नको. माई तुम्हाला शंका आहे का? अडचणी आहे का? आशा ताई धायगुडे तुमची समस्या लिहा आणि मगच मी संबंधित अधिकाऱ्याशी बोलायची डेरींग करते. कारण काय आहे ? काय हेतू आहे आमच? फक्त ह्या ठिकाणी साहेब न्याय देण्यसासाठी शंभर टक्के कटीबध्द आहोत आम्ही. तुम्ही कुणी काहीही केलं आम्ही पण काही थांबणाऱ्यापैकी नक्की नाही. परंतु ह्या चुका कधीतरी सुधारल्या पाहिजेत. कधीतरी ह्या करदात्या नागरीकांना न्याय देण्याची जबाबदारी साहेब ही आपली आहे. साहेब तुम्हांला माझ्या वार्डातील एक विषय सांगीतला होता ३० मीटर रस्ता. सर, दापोडी मध्ये खरंच घ्या. त्या चौकात उभा रहा, तुमची एखादे वेळी सकाळी ९ वाजता येऊन तुमची गाडी काढण्याचा प्रयत्न करा, गाडी निघाली तर म्हणाल ते चालेंज. ३० मीटर रस्ता करा माई, हे मी पहिल्या वर्षी टेंडर सुध्दा काढल, उपसूचना या आपल्या सभागृहामध्ये मंजूर करून घेतली. संबंधित नागरीकांची व्यवस्थित व्यवस्था कशी करायची याच नियोजन केलं, टेंडर काढल परंतु अधिकाऱ्यांची अनस्था त्याच्यामध्ये इच्छाशक्तीच नाही. करण्याच सकारात्मक दृष्टीकोणच नाही. काय करायच मग नगरसेवकांनी तुमच्या दरवाजामध्ये येवून डोक आपटायच, मग तुम्हाला बरं वाटेल. काय त्या ३० मीटर रस्त्याऐवजी १८ मीटर रस्ता करा हे पण आपण सोल्यूशन काढलं. साहेब, काय हेतू आहे माझा तीथ की तिथले जे काही, गणेशनगर माई इतका सुंदर परिसर आहे दापोडीतला, चांगला वस्तीचा परीसर आहे, त्या लोकांना रस्ता होईल ॲप्रोच होईल, शहरातील जेवढी हायवेने येणारी आहे, तीच लोकं दापोडीचा तो रस्ता देखील वापरतात. साहेब मयतीला/ दहावा जर असलेना सकाळच्या वेळेला, कधीच तुम्ही दहाव्याला वेळेवर पोहचू शकत नाही वेळेवर फोर व्हीलर नेली तर, टू व्हीलर वरच गेलो तर तुम्हाला दशक्रिया विधी सापडते. अशी आवस्था त्या रस्त्याची आहे. आणि जर आम्ही त्याठिकाणी नियोजन करत असू की आपण त्या ठिकाणी काम केलं पाहिजे, तर मग प्रशासनाकडून जर आम्हाला मदत मिळाली नाही, त्याच्यावरती सकारात्मक दृष्टीकोण नाही मिळाला साहेब, आणि शेवटी आता माई तो टेंडरच गायब करून टाकल. आता किती दिवस खेळणार मी तरी विषयाशी? काय साहेब हेतू आहे याठिकाणी की ३० मीटर रस्ता झाला तर तिथ हजारो, लाखो रुपयाला नागरीकांनी तिथे फ्लॅट

घेतलेले आहेत, त्या लोकांना रस्ता होईल. रस्ता म्हणजे आपल्या शहराची जस रक्तवाहीनी म्हणतो तसंच विकासाच धोरण आहे ते, आणि तो रस्ता जर आपण चांगला केला तर नागरीकांचा वेळ वाचेल अपघाताच्या गोष्टी टाळता येतील. या सगळया दृष्टीकोणातून आपण हा विषय करतो. तुम्ही मागच्या वेळी मी म्हटल तुम्ही म्हणाले ताई आपण मीटींग लावू. मीटींगही तुमच्याकडे आहे आणि सगळच तुमच्याकडे आहे. परत त्या विषयावर आपण पॉझीटीवली विचार करा, आणि साहेब आता मी जो विषय मांडला कॉन्ट्रॅक्ट कामचे जे आपण टेंडर काढतो त्याच्यामुळे साहेब खरच पुढच्या काळामध्ये जर तुम्ही अट टाकली तर तुमच्या हेतुबद्दल आम्हाला निश्चितपणे कौतुक वाटेल आणि आनंद देखील होईल तुम्ही संबंधितांकडून यादी घ्यायची आणि महानगरपालिकेने त्यांच्या खात्यावर पैसे टाकायचे, बाकी सगळया अटी तशाच ठेवायच्या. मग कळत तुम्ही किती सर्व्हिस टॅक्सवर काम करतो ते आपणही बघुयात, मा.महापौर तुम्ही मला बोलायला संधी दिली, धन्यवाद.

**मा.महापौर -**विषय क्र. १० उपसूचनेसह मंजूर करण्यात येत आहे.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा दुरुस्त ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक – ७५१ विषय क्रमांक – १०
दिनांक – २४/१२/२०२१ विभाग – मा.आयुक्त

संदर्भ -१) मा.अतिरिक्त आयुक्त (१) यांचेकडील पत्र जा.क्र.वि/
गप्र/कावि/५४६/२०२१ दि.१० /११/२०२१

पिंपरी चिंचवड मनपाचे ग प्रभाग कार्यक्षेत्रात नव्याने थेरगाव येथे हॉस्पिटलचे काम जवळपास पुर्ण झाले असुन कोरोनाच्या रुग्णाचे अलगिकरण करणे करीता थेरगाव रुग्णालयाचा वापर करणेत येत आहे तसेच जुन्या थेरगाव हॉस्पीटल मधील बरेच विभाग नविन हॉस्पीटलमधे सुरु करण्यात आले आहे. सदरच्या नविन हॉस्पिटल करीता सध्या मनपाच्या धोरणा नुसार नविन कर्मचारी भरती बंद असल्याने, ठेकेदांर पध्दतीने कर्मचारी उपलब्ध करुन घेणे बाबत सुचविण्यात येत आहे. तसेच हॉस्पिटल नविन सुरु झाले असल्याने, रुग्णालय प्रशासनामार्फत विविध प्रकारच्या विदयुत, वातानुकुलन, टेलीफोन व इतर कामा विषयक वांरवार मागणी येत असल्याने त्या कामाचे अंदाजपत्रक तयार करणेत आले असुन त्यास रक्कम रु ३,२०,७४,५७९/- इतका खर्च आपेक्षीत आहे. सदर कामाकरीता सन २०२१-२०२२ चे अंदाजपत्रकीय तरतुद करणेत आलेली नसल्याने सदरचा खर्च मुख्यकार्यालय मध्यवर्ती भांडार विभागा कडील “कोरोना निधी” या लेखाशिर्षकातुन करण्यात येणार आहे. सदर कामास व र रु ३,२५,००,०००/- च्या खर्चास मा.आयुक्त सो. यांनी दि. २५/१०/२०२१ चा प्रस्तावानुसार मंजुरी दिली आहे. सबब, सदर कामास व र. रु ३,२५,००,०००/- च्या खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

तसेच काळेवाडी येथील एम. एम. स्कुल चौकात श्री. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवनावर आधारीत संकल्पचित्र व इतर पध्दतीने सुशोभिकरण करणे या कामाच्या सन २०२१-२२ चे अंदाजपत्रकामध्ये पान क्र. १४ अ.क्र. ११३ विशेष योजना या लेखाशिर्षावर समावेश आहे. सदर कामाचे नावात बदल करून काळेवाडी येथील एम. एम. स्कुल चौकात श्री. छत्रपती

शिवाजी महाराज यांचे जीवनावर आधारीत, श्री. छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळा उभारणे इतर शिल्प व चौकाचे सुशोभिकरण करणे असे करणेस मान्यता देणेत येत आहे.

त्याचप्रमाणे राष्ट्रपुरुष / थोर व्यक्ती यांचे पुतळे उभारणेस परवानगी देणेसाठी महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग यांचे दिनांक ०२ मे २०१७ व दिनांक ०६ मे २०१७ चे शासन निर्णयानुसार वरील ठिकाणी श्री. छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळा उभारणेकामी, मा. जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली खालील प्रमाणे पुतळा समिती स्थायी स्वरूपात गठित करणेस मान्यता देणेत येत आहे.

| | |
|---|---|
| १) मा. जिल्हाधिकारी , पुणे | अध्यक्ष |
| २) मा.आयुक्त , पिंपरी चिंचवड महानगरपालिका, | सदस्य |
| ३) मा. अतिरिक्त आयुक्त २, | सदस्य |
| ४) मा. पोलिस आयुक्त, पिंपरी चिंचवड, | सदस्य |
| ५) मा.सहशहर अभियंता,बीआरटीएस, पिं.चि.मनपा | सदस्य |
| ६) कार्यकारी अभियंता, बीआरटीएस, पिं.चि.मनपा | सदस्य सचिव |

तरी काळेवाडी येथील एम.एम.स्कुल चौकात श्री. छत्रपती शिवाजी महाराज यांचे जीवनावर आधारीत, श्री. छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळा उभारणे, इतर शिल्प व चौकाचे सुशोभिकरण करणे याप्रमाणे कामाचे नावात बदल करणे व त्याअंतर्गत श्री. छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळा उभारणे व वरील प्रमाणे पुतळा समिती गठित करणेस मान्यता देणेत येत आहे.

तसेच निगडी टिळक चौक येथे लोकमान्य टिळक यांचा पुर्वीच्या जागेवर नविन पुतळा बसविणेस मान्यता देणेत येत आहे. निगडी टिळक चौक येथे लोकमान्य टिळक यांचा सुमारे ३० वर्षे जुना पुतळा अस्तित्वात आहे. सदर पुतळयाचा चौथरा व परिसर नैसर्गिक स्त्रोत व पर्यावरणातील बदलामुळे तुटफुट होऊन खराब अवस्थेत आहे. त्यामुळे सदर ठिकाणी लोकमान्य टिळक यांचा नविन पुतळा बसविणेस मान्यता देणेत येत आहे.

तरी निगडी टिळक चौक येथे लोकमान्य टिळक यांचा पुर्वीच्या जागेवर नविन पुतळा बसविणेस मान्यता देणेत येत आहे.

| 7 | भांडवली खर्च - दगडी फरशी व फुटपाथ | प्रभाग क्र.२० येथील तुळजाभवानी मंदिरच्या आजूबाजूच्या परिसरात पेव्हींग ब्लॉक विषयक कामे करणे. | 267 | 103 | 1500000 | 0 | 1500000 | 0 |
| 8 | भांडवली खर्च - दगडी फरशी व फुटपाथ | प्रभाग क्र.२० महात्मा फुलेनगरच्या आजूबाजूंच्या रस्त्यांचे फुटपाथची कामे करणे. | 267 | 104 | 1500000 | 0 | 1500000 | 0 |
| 9 | भांडवली खर्च - दगडी फरशी व फुटपाथ | प्रभाग क्र.२० एम.आय.डी.सी. येथील विविध रस्त्यांवर फुटपाथची कामे करणे. | 267 | 105 | 1500000 | 0 | 1500000 | 0 |
| 10 | भांडवली खर्च - दगडी फरशी व फुटपाथ | प्रभाग क्र.२० एम.आय.डी.सी. येथील नुतन टिंबर समोरील रस्त्यावर पेव्हींग ब्लॉक विषयक कामे करणे. | 267 | 106 | 1500000 | 0 | 1500000 | 0 |
| 11 | भांडवली खर्च - दगडी फरशी व फुटपाथ | प्रभाग क्र.२० एम.आय.डी.सी. येथील ओम चेंबर च्या मागील भागातील रस्त्यांवर पेव्हींग ब्लॉक विषयक | 267 | 107 | 1500000 | 0 | 1500000 | 0 |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | कामे करणे. | | | | | | |
| 12 | भांडवली खर्च - सरफेस गटर्स | प्रभाग क्र.२० येथील एम.आय.डी.सी. परिसरातील फोरएशिया कंपनी समोरील भागात स्टॉर्म वॉटर लाईन विषयक व इतर अनुषंगिक कामे करणे. | 254 | 28 | 1500000 | 0 | 1500000 | 0 |
| 13 | भांडवली खर्च - सरफेस गटर्स | प्रभाग क्र.२० येथील एम.आय.डी.सी. पोस्ट ऑफीस समोरील व मागील रस्त्यांवर स्टॉर्म वॉटर लाईन विषयक कामे करणे. | 254 | 29 | 1000000 | 0 | 1000000 | 0 |
| 14 | भांडवली खर्च - सरफेस गटर्स | प्रभाग क्र.२० येथील एम.आय.डी.सी. परिसरातील भागात स्टॉर्म वॉटर लाईन विषयक कामे करणे. | 254 | 30 | 1000000 | 0 | 1000000 | 0 |
| 15 | भांडवली खर्च - सरफेस गटर्स | प्रभाग क्र.२० येथील कासारवाडी शितळादेवी समोरील भागात स्टॉर्म वॉटर लाईन विषयक | 254 | 31 | 1000000 | 0 | 1000000 | 0 |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | कामे करणे. | | | | | | |
| 16 | भांडवली खर्च - सरफेस गटर्स | प्रभाग क्र.२० येथील गंगानगर भागात स्टॉर्म वॉटर लाईन विषयक कामे करणे. | 254 | 32 | 1000000 | 0 | 1000000 | 0 |
| 17 | भांडवली खर्च - डांबरी रस्ते | प्रभाग क्र.२० हॉकी स्टेडीयमच्या अंतर्गत परिसरातील रस्त्यांचे डांबरीकरण करणे. | 159 | 70 | 2500000 | 0 | 2500000 | 0 |
| 18 | भांडवली खर्च - स्थापत्य विषयक कामे | प्रभाग क्र. २० येथील वैशालीनगर व आजूबाजूच्या परिसरात स्थापत्य विषयक कामे करणे. | 280 | 151 | 1500000 | 0 | 1500000 | 0 |
| 19 | भांडवली खर्च - स्थापत्य विषयक कामे | प्रभाग क्र. २० येथील दक्षिणमुखी मारूती मंदिर परिसरात स्थापत्य विषयक कामे करणे. | 280 | 153 | 1500000 | 0 | 1500000 | 0 |
| 20 | भांडवली खर्च - स्थापत्य विषयक कामे | प्रभाग क्र. २० येथील स्वामी समर्थ महाराज मंदिराच्या परिसरात स्थापत्य विषयक | 280 | 155 | 1500000 | 0 | 1500000 | 0 |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | कामे करणे. | | | | | | |
| 21 | भांडवली खर्च - स्थापत्य विषयक कामे | प्रभाग क्र. २० येथील सुजाता फ्लोअर मिल परिसरात स्थापत्य विषयक कामे करणे. | 280 | 156 | 1500000 | 0 | 1500000 | 0 |
| 22 | भांडवली खर्च - स्थापत्य विषयक कामे | प्रभाग क्र. २० येथील एकता विकास मंडळाच्या परिसरात स्थापत्य विषयक कामे करणे. | 280 | 157 | 1500000 | 0 | 1500000 | 0 |
| 23 | भांडवली खर्च - स्थापत्य विषयक कामे | प्रभाग क्र. २० येथील अहिल्यादेवी मैदानाच्या व आजूबाजूच्या परिसरात स्थापत्य विषयक कामे करणे. | 280 | 158 | 1500000 | 0 | 1500000 | 0 |
| | | एकूण | | | 30005000 | 30000000 | 30000000 | 30005000 |

तरी वरील कामासाठी सन २०२१-२२ साठीचे अंदाजपत्रकात वरीलप्रमाणे आवश्यक तरतूद करणेस मान्यता देणेत येत आहे.

तसेच स्थापत्य बीआरटीएस विभागामार्फत राजमाता जिजाऊ उड्डाणपुलाखालील सेवा रस्ते अर्बन स्ट्रीट डिझाईननुसार विकसित करणेचे कामाची निविदा नो.क्र. ३२/०१/२०१९ -२० अन्वये काढणेत आलेली असून सदरचे काम प्रगतीपथावर आहे. सदर निविदे अंतर्गत नाशिक फाटा येथील जे.आर.डी. टाटा उड्डाणपुलाखाली निगडी दापोडी रस्त्यालगतचे मोकळया जागेत सुशोभिकरणाचे काम करणे व तसेच उड्डाणपुलाखालील नदीच्या बाजुला वाहतुक बेटाचे सुशोभिकरण करणे ही कामे करणे शक्य आहे. तरी राजमाता जिजाऊ उड्डाणपुलाखालील सेवा रस्ते अर्बन स्ट्रीट डिझाईननुसार विकसित करणे नि.नो.क्र.३२/०१/२०१९ -२० या कामाच्या अंतर्गत नाशिक फाटा येथील जे.आर.डी. टाटा उड्डाणपुलाखाली मोकळया जागेत सुशोभिकरणाचे काम करणे व उड्डाणपुलाखालील नदीच्या बाजुला वाहतुक बेटाचे सुशोभिकरण करणेस मान्यता देणेत येत आहे.

तसेच मनपा अंदाजपत्रक सन २०२१-२२ मध्ये नविन कामाचा समावेश करणेस मान्यता देणेत येत आहे.

अ क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत मनपा सार्वत्रिक निवडणूक २०२२ साठी मंडप विषयक व स्थापत्य विषयक कामे करणे गरजेचे आहे त्यासाठी खालील नमूद कामांचा अंदाजपत्रकामध्ये समावेश करणेस मान्यता देणेत येत आहे.

| पान क्र. | अनु. क्र. | कामाचे नाव | लेखाशिर्ष | कामाची अंदाजपत्रकीय रक्कम | सन २०२१-२२ चा मुळ अंदाज | वाढ | घट | आवश्यक तरतूद |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| नविन काम | | प्रभाग क्र. १९ अंतर्गत मनपा सार्वत्रिक निवडणूक २०२२ साठी मंडप व्यवस्था करणे | भांडवली | ५०००००० | - | ५००००० | ० | ५००००० |
| नविन काम | | अ क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत मनपा सार्वत्रिक निवडणूक २०२२ साठी मंडप व्यवस्था व स्थापत्य विषयक काम करणे. | भांडवली | ७०००००० | - | ५००००० | ० | ५००००० |
| ८५ | ५९ | प्रभाग क्र. १९ भाटनगर व इतर परिसरात पेव्हिंग ब्लॉक बसविणे व काँक्रिट पेव्हींग विषयक करणे (सन २०२१-२२ साठी) | भांडवली | ८०००००० | १५००००० | ० | १०००००० | ५००००० |

तरी उपरोक्त नमुद कामाचा मनपाचे सन २०२१-२२ च्या अंदाजपत्रकामध्ये समावेश करणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे अंमलबजावणी करणेत यावी.

अनुकूल -७२ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

----

**मा. राजेंद्र गावडे** - मा.महापौर साहेब, विषय क्र.१२ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक - ७५३ विषय क्रमांक – १२

दिनांक – २४/१२/२०२१ विभाग – मा.आयुक्त

संदर्भ -१) मा. आयुक्त यांचेकडील पत्र जा.क्र.स्था/बीआरटीएस/१६९७ /२०२१ दि. ६/१२/२०२१

मा. महापालिका सभा ठराव क्र. ६८५ दि. २०/०८/२०२१ अन्वये पशुसंवर्धन प्रक्षेत्राच्या जागेच्या बदल्यात पशुसंवर्धन प्रक्षेत्राच्या कार्यक्षेत्रात विविध विकास कामे करणे याकरीता र.रु. ३० कोटी रक्कमेस प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे. सदर बाबत मा. आयुक्त, पशुसंवर्धन यांना क्रं.स्था/बीआरटीएस/१०६५/२०२१दि.३/९/२०२१अन्वये कळविण्यात आलेले आहे. तथापि, क्र. एफवायबी-२०(२१) तांत्रिक क्र.४१/२९०९/२०२१

दि.१/१२/२०२१ अन्वये मा.आयुक्त, पशुसंवर्धन यांनी खालील प्रमाणे कामांमध्ये अंशतः बदल सुचविलेला आहे.

५अ) आयुक्त पशुसंवर्धन यांचेसाठी वरिष्ठ भाप्रसे दर्जाच्या अनुषंगाने औंध येथील पशुसंवर्धन विभागाच्या जागेवर निवासस्थान, बगीचा, गॅरेज, सर्व्हंट निवास व सरंक्षक भिंत बांधणे.

५ब) पशुसंवर्धन विभागाच्या औंध येथील जागेवर विश्रामगृह बांधणे. (२ VIP Suite, २ General Suite, वाहनचालक, सर्व्हंट व खानसमा यांचे व्यवस्थेसह)

५क) प्रक्षेत्रावरील अधिकारी व कर्मचा-यांकरीता ४७ ऐवजी २७ निवासस्थानाचे बांधकाम करणे.

उपरोक्त बाबींमध्ये नव्याने सुचविलेली कामे यापुर्वी मान्यता दिलेल्या र.रू.२२.०३ कोटी इतक्या रक्कमेस अधिन राहुन करणेत येतील. सदर नव्याने मागणी केलेल्या मुद्दा क्र. ५ अ व ५ब मधील कामे ही पिंपरी चिंचवड मनपा हद्दीच्या बाहेर करावयाची असल्याने त्यास मान्यता देणेत येत आहे.

सबब, पशुसंवर्धन विभागाने उपरोक्त मागणी केल्यानुसार बाब क्र. ५अ, ५ब व ५क अन्वये सदरची कामे अंशतः बदलासह करणेचा तसेच ५अ व ५ब मधील कामे पिंपरी चिंचवड मनपा हद्दीच्या बाहेर करणेस मान्यता देणेत येत आहे.
मा. सुरेश भोईर - मा.महापौर साहेब ठरावास अनुमोदन देतो.

मा. ज्ञानदेव थोरात – मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. विषय क्रमांक १२ हा निधीचा विषय आहे, आणि या विषयात शेवटी असं म्हणलेलं आहे की उपरोक्त बाबीमध्ये नव्याने सूचवलेली कामे करण्यासाठी मान्यता दिलेल्या २२.३ कोटी इतक्या रकमेस अधिन राहून करण्यात येतील. सदर नव्याने मागणी केलेल्या मुद्दा क्र.५ अ व मुद्दा क्र.५ ब वर मधील काही कामे पिंपरी चिंचवड मनपा हद्दीच्या बाहेर करावयाचे असल्याने त्याला सभागृहाची मान्यता आहे. पण माई मला एक विषय करायचा आहे संत तुकाराम नगर प्रभाग क्रमांक २० या मध्ये मी आणि सुजाता ताई वारंवार शिवाजी महाराजांच्या पूतळयाला निधी मागतोय, तर तो निधी नाही म्हणतात, कोरोनाच्या काळापासून त्या कामाला पैसे नाहीत आसं आम्हाला मी आणि ताईंनी आयुक्तांची पण भेट घेतली पण त्याला कुठेही प्रोत्साहन मिळालं नाही. हा छत्रपती शिवाजी महाराजांचा विषय आहे, चांगला विषय आहे. आम्ही वारंवार निधी मागीतलातर कारण म्हणून नाही सांगतात, आणि आता शहराबाहेर हा निधी कसा काय देऊ शकता तुम्ही? जर तुम्हाला शहराबाहेर द्यायला तीस-तीस कोटी रुपये आहेत तर आमच्या पुतळयाला छत्रपती शिवाजी महाराजांच्या पूतळयाला का पैसे देत नाही तुम्ही? परत सगळया मंजू-या पण झालेल्या आहेत. कुठलीही मंजूरी राहिलेली नाही. मग तुमचे का टेंडर निघत नाही, का मान्यता मिळत नाही, मला याचा खुलासा पाहिजे आयुक्त साहेब.

**मा.सुजाता पलांडे-** मा.महापौर, मा.आयुक्त, सन्मा.सभागृह, मला आस वाटत नाही की सलग्न विषयाला माउलींनी प्रश्न केला, त्या प्रश्नाच्या अनुषंगाने बोलते. माझ्या वॉर्डामध्ये प्रभाग क्र.

२० मध्ये महेशनगर चौकामध्ये, छत्रपती शिवाजी महाराज चौकामध्ये आयुक्त साहेब १०९० ला एक ठराव झाला होता, त्यानुसार या पंचवार्षीकला त्याचा फॉलोप घेतेय मी. तीन वर्षे झाली या तीन वर्षामध्ये छत्रपती शिवाजी महाराजांच्या पूतळयासाठी काही तरतूद करायची आणि आपण तदतूदीला फक्त निरोपण केलं, पण विशेष योजना मध्ये कोविड मध्ये आपल्याला तरतूद द्यायची नाही म्हणून तुम्ही ठरवलं, ते ठरवल्यानंतर त्याला फक्त शून्य तरतूद असल्यामुळे हे काही मला करता आल नाही त्या वेळेला सुध्दा, पण जवळ जवळ तीन वर्षे झाले माई, मला आश्चर्य वाटतं की, प्रत्येक ठिकाणी कुठून ना कुठून पैसा जातो, एकतर मी अनपढ असेल, गावंढळ असेल, मला तुमचे विषय समजत नसतील, असेही असू शकेल किंवा मी एवढी जेष्ठ आणि श्रेष्ठ नसेल की आम्ही आमच्या पध्दतीने तेवढे पैसे आणू शकतो आमच्या वॉर्डामध्ये. कारण काय झालंय, आता जी स्थापत्याची कामे आहेत ना आयुक्त साहेब माझ्या वार्डामध्ये फक्त पंधरा लाखाची चार कामे आली आहेत. त्याच्यामध्ये तीस लाखाची कामे डांबरीकरणाची आहेत आणि पंचेचाळीस लाखाची कामे पेव्हींग ब्लॉकची आणि बाकीची आहेत. साहेब कामे कशी करायची आम्ही. महापौर साहेब मी आज याठिकाणी आयुक्तांना एक शेवटची विनंती करत आहे, आता तुम्ही वर्गीकरण माझ्या वॉर्डातलेच केलं आहे, मला जर शिवाजी महाराजांच्या पुतळयासाठी तरतूद नाही मिळाली तर मी वेगळया पध्दतीचे जन आंदोलन शंभर टक्के आयुक्त साहेब पीसीएमसीच्या दरवाज्यात करेल. आणि तुम्हाला जर द्यायचे नसेल तर मला त्या पदध्दतीने सांगा. कारण मी पीसीएमसी चा अभ्यास करते तर कुठून कुठे पैसे वर्ग होतात ते मला बोलायला लावू नका साहेब. मला माझ्या शिवाजी महाराज पुतळयासाठी मला फक्त तरतुद मिळाली पाहिजे. पुतळयासाठी परमीशन सुध्दा आलेली आहे आणि त्यासाठी जर मला मदत होत नसेल, महापौर तर मी वेगळया पध्दतीने जनआंदोलन उभं करेल एवढी सूचना तुम्हाला मी इथे देते.

**मा.राहुल कलाटे –** सन्मा.महापौर, सन्मा.आयुक्त, सन्मा.सभागृह, हा विषय तसा माझ्या प्रभागात येतो आणि महापालिकेला आपल्याला जाग आली की इथे रोड करायचे, एसटीपी करायचे, आयुक्त साहेब मला आपल्याला आठवण करून द्यायची की रोड पेक्षा याठिकाणी आपल्याला एसटीपीची जास्त गरज आहे. मोठया प्रमाणात त्या ठिकाणी बिल्डींग उभ्या राहील्यात, सगळ बे-भरोशाच आहे. सगळया लाईन आतून भरल्यात आणि त्या कुठेही जोडल्या गेलेल्या नाहीत. आता आपण दोन चार वर्षापासून या गोष्टीचा फॉलोप घेतोय, मागच्या सरकारमध्ये जाणकर साहेबांसोबत मिटींग झाल्या, या सरकारमध्ये पण झाल्या. पण ते सवणे तुम्हाला काहीतरी सांगतात आणि तुम्ही पण त्यांच्याच मागे फरपटत जातात, अस मला आज याठिकाणी आपल्याला सांगावस वाटत. साहेब तुम्ही या ठिकाणी हे सगळ करताय, हे सगळ करत असतांना आपल्याला प्राधान्य द्यायचं होतं आपल्याला एसटीपीला, आता तुम्ही रोडला प्राधान्य देताय, सगळयात मोठं टेंडर निघालं पाहिजे. तुम्हाला त्यादिवशी पण सांगितल, आजही सांगतोय माझ्या प्रभागात जो रोड येतोय, मी काल रात्री आलो, औंध पासून साई चौकापर्यंत पर्यंत एकदम चांगला रस्ता आहे, माझ्या प्रभागात डांगे चौकापासून नदीपर्यंत एकदम चांगला रस्ता आहे, तुम्ही त्या ठिकाणी सात-सात कोटीचे टेंडर काढलेत. आस असतांनाही तुम्ही त्यांच्या विरूध्द ओरडताहेत, साहेब आमचे कामं करीत नाहीत. काढलेत ना शंभर कोटीचे टेंडर, साहेब आमचे कामं करीत नाहीत, हे तुमच्या डेप्यूटेशन पर्यंत जाताय, म्हणजे कुठंतरी तुमच्याही लक्षात आले पाहिजे की, कुठल्याही आयएएस अधिकाऱ्याला आपल्या राज्यात यायच असेलतर त्याच्यसाठी डीओपीडी मार्फत अर्ज करावा लागतो, एक जातो असेल

त्या स्टेटला आणि एक जातो पाहिजे त्या स्टेटला, आणि त्यानंतर दोन्ही स्टेटची एनओसी आल्यानंतर त्याला पंतप्रधानांची सही झाल्यावर ते कॅबीनेटमध्ये जाते, कुठल्या? देशाच्या. एका बाजूला तुम्ही पंतप्रधानाबद्दल एवढेसे बोलण ऐकूण घेत नाही आणि दुसऱ्या बाजुने तुम्ही, दहा लाख लोकं बसतात एका वर्षात त्या परिक्षेला त्यातील पाचशे जण पास होतात. त्यांनंतर तुम्ही त्यांच्या डेप्यूटेशन बद्दल बोलायच ? संदिपने चांगल सांगितल, तुमच्या कामाचा मोटीव्ह आहेना तो मोटीव्ह काय आहे, कधी-कधी आमचीही कामे होत नाहीत, वॉर्ड रचनेत मागच्या वेळेस पेपरला वॉर्ड रचना आली. हयावेळेस मागे लागून लागून देखील साहेबांनी आम्हाला पण गंध नाही लागू दिला. आम्ही म्हणल आम्हाला तरी सांगा, आम्ही शेतकरी आहेत. तुम्ही नाच केला शहरात याच्यावर प्रत्येक प्रभागाची रचना न्यूजवर होती, असं असतांना देखील आपण फक्त आपली कामे झाली नाही, आपल्या नेत्याच काहीच ऐकल नाही, म्हणून आपण अस काही तरी या ठिकाणी बोलत आसल तर भारतीय जनता पार्टीने कुठं तरी आत्मपरिक्षण करण्याची गरज आहे. तुम्ही सांगताना सुपारी घेवून काम करता का? सुपारी घेवून काम करीत असतांना, संदिपने पुतळयाच काम सांगितलं आमचीही काही कामे सांगतो, आमचीही काही कामे होत नाही म्हणून मी काय म्हणायच? माझी तर कामे तुम्ही फेटाळली स्टँडींगला, हार्डीकर साहेबांना आम्हीही सुरूवातीला आसंच म्हटल, पण कालांतराने ज्या वेळेस काम करत असतील त्यांच्याही लक्षात आले की कुठली कामे करायची अन कुठली नाही. आणि त्यानंतर ते त्याठिकाणी काम करतात, आणि मला वाटत आयुक्त साहेबांच तस धन्यवाद दिल पाहिजे, की त्यांनी कुठंतरी स्टॉप नाही दिला. कारण तुम्ही आज इंदौर सारखा पॅटर्न इथे आणला. तुम्ही सही घ्यायचा कुठ जाता का? कुठेतरी ते काम करीत असतांना थोडीथोडी तू-तू मै-मै होणार. पण तुम्ही डायरेक्ट तुम्ही डेप्यूटेशन वर आलेत, तुम्ही कसे काय आले, म्हणजे कुठंतरी याचा विचार माई तुम्ही पण हे असे वाक्य वगळा ते वगळा सांगता आणि अशी वाक्ये अशीच ठेवणार पटलावर. मी सुपारी घेवून आले, आम्ही सुपारी हा शब्द नाही वापरला दहा वर्षात. अवघड शब्द वापरला पण सुपारी नाही वापरला. म्हणजे कुठेतरी आपण काम करत असतांना आपली चार कामातून दोन कामे होणार नाहीत. आपण स्वत:ला जर इंट्रेस्ट ठेवून कामे करायची असेलतर निश्चित आहे. आज खूप विषय झाले, टॅबचा झाला, शिक्षणावर झाला, ब-याच विषयावर झाला पण साहेब कुणीच बोलत नाहीये. जर पन्नास हजार पटसंख्या होती आता पसतीस वर आली, याच्यावर कोण बोललं का? माझ्या मनासारख नाही झालं, माझी खरेदी नाही झाली तर मी ओरडायच, म्हणजे कुठेतरी आपले आता दोन आडीच महीने राहिलेत, दोन आडीच महिन्यात तरी चांगल्या प्रकारे काम खरं तर करून दाखवल पाहिजे, आता कुठंतरी मला वाटतं इलेक्शनचा विषय काढला. खरं तर योगेशजी किंवा कोणी त्याच्यावर बोलतील. आयुक्त साहेब हा विषय मंजूर करत असतांना माझी आपल्याला एक विनंती आहे औंध मार्गे जो रस्ता आहे, ज्याठिकाणी आपण शंभर कोटीचे टेंडर काढलं आहे, साहेब माझी अशी विंनती आहे की दोन्ही बाजूंनी सात-सात मिटरचे फुटपाथ नको, सभागृहांनी पण लक्षात घ्या जर आज तो रस्ता ४५ मिटर आहे त्याच्या मध्ये बीआरटी आहे. दोन्ही बाजून सात-सात मिटर जर तुम्ही आर्बन स्ट्रीट डिझाइन केलतर आहे तो रस्ता कशावर ४५ मीटर केला. आणि तो ४५ मीटर करीत असतांना साहेब आजही रावेत मध्ये तो ३० मीटरच आहे. थेरगावमध्ये तो ४५ मीटर नाहीये, आणि फक्त मिल्ट्री हद्दीत ज्या ठिकाणी लोक नाहीत त्याठिकाणी तुम्हाला स्टेस करायचे असेल तर तुम्ही मला काय उत्तर देता साहेब की सँपल टेस्ट आहे. सँपल टेस्ट कुठले वापरत असतांना, कुठलेही

लेखी काही नसतांना जीबी ला एखादा ठराव होतो, आणि त्याच्यावर तुम्ही काम इम्प्लीमेंट करता ३० कोटीचे काम, म्हणेज साहेब मी अजूनही सांगतो तुम्ही याला सीरीयस घ्या नाहीतर मी या विषयात कोर्टात जाईल. माझ्या प्रभागातल आहे, मला काही अडचण नाही, मला लोकांची काम होत आहेत पण तो रस्ता पाहिला तर सगळयात चांगला आहे, आणि तुम्ही त्याची टेस्ट कधी करताय टेंडर काढल्यानंतर? आणि साहेब तुम्हाला ऐवढे वेळा सांगून पण ते पूढेच चाललेत. त्याची मूदत संपली, सगळ संपल. म्हणजे कुठंतरी शहराच सुशोभीकरण करतांना, चेंबर समतलीकरण करतांना इलेक्शनच्या तोंडावर जर शंभर- शंभर कोटीचे टेंडर जर पक्षनेते निघताहेत तर आत्मपरिक्षण तरी करा. दूसऱ्या कडे बोट करत असताना शंभर लोक तुमच्याकडे येणार आहेत. म्हणजे कुठंतरी साहेब ही कामे करीत असतांना सवने सारखे जे अधिकारी आहेत, मला माहित नाही, मी जर त्यांना विचारल मला तर साहेब नाही म्हणले होते. मी त्यांना विचारलं हे काम कोणाच आहे, ते म्हणाले माझ नाही स्मार्ट सिटीच आहे, भालकर साहेबांना विचारल, ते म्हणाल माझ नाही, मग आपल्याला विचारल तेव्हा ते कबूल झाले की माझं हे आणि जीबीच्या एका ठरावावर सँपल टेस्टच काम करत असतील तर साहेब आस मला वाटत नाही का, अशी अथोरिटी आहे का माई, अधिकाऱ्यांच्या मनात आल की त्यांनी काम सूरू केल, त्याला कुठली मान्यता नाही काय नाही. साहेब तुम्ही याच्यात सिरीअसली लक्ष द्या या प्रकरणात, मला तर आस वाटतं मी मागेच सांगितल होत, मागच्या जीबी ला सांगितल होत इलेक्शन फंडसाठीतर काम काढल नाही, आता सगळयांची इच्छा आहे दोन महीन्यात नाही बोलाव म्हणून परंतु या कामात आयुक्त साहेब ही जागा ताब्यात घेत असतांना आयुक्त साहेब पशुसंवर्धनाची जागा ताब्यात घेण्या करिता एसटीपीला जास्त महत्व द्या. रोडला तर द्यावच लागेल पण त्या भागात एसटीपी नाही झालं तर सगळी ड्रेनेज फुटून वरती येतील. पुनावळयाच पण भूसंपादन प्रक्रियेत आहे, शेतकरी ऐवढी जागा द्यायला तयार नाहीयेत आणि आपण जो आवार्ड आणला की त्यात असं आल की ऐवढी जागा गरजेची आहे. म्हणजे तेही वादात, ह्या जागा देतांना आपण पहिले प्राधान्य एसटीपी ला द्यावी. हे सगळं होतच राहील, आणि आता बीआरटी विभागात काय चाललंय जरा डोळे उघडे ठेवून तुम्ही पहा. काय होतय हा नाराज नको, तो नाराज नको इथे जीबीला जे काही बोलणार ते बोलणारच आहे, ते काही थांबणार नाही, त्यांना आता दोन महिने तुम्हाला बोलायचेच आहे. कुठंतर अपयश तुमच्या नावानेच वाजवायच आहे, बोलावच लागणार हे ना, काय केलं, काय केलं साहेबांनी, आणि आम्ही उठलो तर आम्हीही बोलणारच आहे, साडेतीन वर्षात काय झालंय? असो मी जास्त न बोलता माई आपल्याला विनंती करतो की हा विषय मंजूर करावा, हा तसा गरजेचा आहे. आयुक्त साहेब तुम्ही प्राधान्य एसटीपीला द्यावी अशी आपणास विनंती करतो.

**मा.योगेश बहल-** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. आताच राहुल कलाटे यांनी सांगितले की विषय मंजूर करायचा त्याबद्दल मला काही बोलायच नाही. फक्त या अनुषंगाने मी मा.आयुक्त साहेबांच लक्ष वेधू इच्छितो की हा विषय पशु वैद्यकीयचा असल्या कारणाने मी मागच्या वेळेला कुत्र्याच्या नसबंदीवर आपल्या सभागृहासमोर विषय आणला होता. त्या लॉकडाउन मध्ये ७१२५ कुत्र्यांची नसबंदी झाली. नेहरूनगरला स्वत: मी गोलो, माझ्याबरोबर पत्रकार आले. तीथे डॉक्टरांचा पत्ता नाही, तीथे लोकांचा पत्ता नाही, तेथे कुत्रेही नाही, तीथं काही नाही, सर्व पळून गेले होते, सगळ बंद होतं. त्याचा तपास कुठपर्यंत आलाय

महापौर साहेब, हे एक विचारायच होत, आणि दूसरी एक माहिती माझ्याकडं जी आलीय मा.आयुक्त साहेब मला नगरसचिवांना सांगायचय की आपण आपले जे काही मिनीटस लिहीता त्यांना माझी विनंती आहे की आता हे वृतमानपत्रातून छापून आलतरी काही होत नाही, आम्ही लेखी पत्र दिल तरी काही होत नाही किमान आता जे काही टीपण करतात ना हा प्यारा काढून मात्र त्याची प्रत अतिरिक्त आयुक्त, आयुक्त, महापौर यांना एक-एक प्रत लवकर दयावी अशी जगताप साहेब तुम्हांला विनंती आहे. कारण आता मी जी माहिती देतोय ती पत्र दिल्यानंतर पण वाचत नाहीत, बघत नाहीत, त्याच्यावर काही होत नाही. जीव रक्षक ऍनिमल ग्लोबल ट्रस्ट जी आहे, मा.महापौर साहेब या ट्रस्टला थेट काम दिलेले आहे. थेट पध्दतीने मे महिन्यामध्ये २०२० मध्ये दिलेले आहे. मग त्या वेळेला पण लॉकडाऊन होता. दुसरी गोष्ट या ट्रस्टला काम देत असतांना त्या टेंडरमधल्या अटी आहेत, त्या टेंडरमधली महत्वाची अट आहे दोन नंबरची ती अट अशी आहे की त्याच डीजीकरण कराव म्हणजे डिजीटल डेट येईन आणि टाईम येईल तेवढेच कट करून, म्हणजेच ती अट शिथील करून या ट्रस्टला थेट काम दिलेलं आहे. मा.आयुक्त साहेब दूसरी माह्तिी आपणास देऊ इच्छितो की या पाच वर्षामध्ये एकूण चार संस्थानी मिळून एकूण ७१५३७ कुत्र्यांची नसबंदी करण्यात आलेली आहे. मा.महापौर साहेब, या माहितीच्या अधिकारामधल्या फिगर तुम्हाला देतोय. या पाच वर्षामध्ये ७१५३७ कुत्र्यांची नसबंदी करण्यात आलेली आहे आणि त्यासाठी महानगरपालिकेनी ६,२८,५६,००९/- (सहा कोटी आठ्ठाविस लाख छपन्न हजार नऊ रूपये) खर्च केलेले आहेत म्हणजे किती कुत्रे आपल्या शहरामध्ये आहेत. आपल्या कारकिर्दीमध्ये महापौर साहेब हे चांगल काम झालं आहे. म्हणजे आपल्या भारतीय जनता पार्टीच्या कारकिर्दी मध्ये एक काम चांगल झाल. एवढया कुत्र्याची नसबंदी मात्र आपल्याला करता आलेली आहे. ६,२८,५६,००९/- रूपयाची नसबंदी आपण केलेली आहे, आणि त्याची जी ट्रस्ट आहे ती मी तुम्हाला सांगीतली. मा.महापौर साहेब, या ट्रस्टचे सर्व कागदपत्र बोगस आहेत. मा.आयुक्त साहेब आपण नोंद घ्या याची ही जीव रक्षक ट्रस्ट आहे ना या ट्रस्टचे सर्व कागदपत्र बोगस आहेत. त्यानीं पॅनकार्ड दिलाय ना तो आजही तुम्ही पॅनकार्ड ऑनलाईन नेटवर टाकून बघा त्या पॅनकार्डवर तुम्हाला स्वर्गीय परुळेकर ज्या होत्याना सकाळच्या त्यांच कार्ड जोडल आहे, त्यांच्या संस्थेच आणि ते कार्ड जोडून काम दिलेले आहे. मा.महापौर साहेब तुम्ही विचार करा की किती महानगरपालिकेची फसवणूक होतेय. मी पुन्हा सांगतो आपल्याला की तुम्हाला जर हवा असेल तर मा.महापौर साहेब मी आपल्याला पॅनकार्ड देऊ शकतो, पॅनकार्डचा नंबर पण सांगू शकतो आणि त्यांच्या पॅन कार्डाचा नंबर आहे AVDPB6963S हा पॅनकार्ड आहे. हा पॅनकार्ड आपण ऑनलाईन बघा हा पॅनकार्ड तुम्हाला लीला परुळेकर यांचा दिसेल, म्हणजे स्वर्गवासी आहेत त्या. त्यांच कार्ड वापरलेल आहे आणि या संस्थेचे बोगस पेपर आहेत आणि दूसरी गोष्ट अजून महत्वाची अशी आहे की, मी मागे तुम्हाला एकदा म्हटल होत की या संस्थेने बोगस कागदपत्र दिलेली आहेत. टेंडर आहे ना यांना डायरेक्ट देणेत आलेल आहे, त्यामधील कंडीशन ही डीलीट झालेली आहे. आपण चेक करू शकता की २०२० मध्ये आपण याला मे महीन्यामध्ये टेंडर दिलेलं आहे. मा.आयुक्त साहेब टेंडर कंडीशनमधले दोन नंबरचा जो क्लॉज आहे त्या दोन नंबरच्या क्लॉजमध्ये ती अटच डिलीट करुन विशेष म्हणजे हे थेट पध्दतीने काम दिलेल आहे आणि म्हणून मागच्या वेळेला मी बोललो होतो, याच्यावर एक व्हीडीओ क्लीप पण आपण शहरवासीयांनी ऐकली असेल, किती तांडव करावा लागला आणि अशा पध्दतीने या महानगरपालिकेची लूट केलेली आहे. त्यामध्ये त्याच बील होत, मा.आयुक्त साहेब त्याच्यामध्ये जे पत्र मिळाल आम्हाला त्या पत्रामध्ये जी माहिती

दिलेली आहे, त्या माहितीच्या अनुषंगाने या पास्कोला त्यानी बायोमेडीकल वेष्ट दिलेलच नाही, ते पत्र सुध्दा माझ्याकडे आहे. पण एवढा गंभीर स्वरूपाचा आरोप असतांना किंवा ही गंभीर स्वरूपाची लूट असतांना प्रशासनाने याच्यावर अजून काहीही केलेल नाही. मग सहा-सहा कोट रू. जर जात असतील नसबंदीवर तर मला सांगा या शहरामध्ये नेमकी कुत्रे आहेत तरी किती आणि एवढया कुत्र्यांची नसबंदी केल्यानंतर अजून हा धंदा चालूच आहे आणि त्याच्यावरती कळस म्हणजे मा.महापौर साहेब हा कागद तुम्हाला आयुक्त साहेबांना मी आता देतो. मा.सिमाताई हे पेपर बघा तुम्ही, सभागृहांनी सुध्दा बघा. एकाच माणसांनी सह्या केलेल्या आहेत, माहितीच्या अधिकारात घेतलेल पत्र आहे. आता आयुक्त साहेब आपल्याला देणार आहे मी. याच्यामध्ये काय लिहीलय ५/१/२०१८ मध्ये सर्जरी ऍ़ण्ड पोस्ट ऑपरेटीव्ह कार्ड केन डेली रेफर्ड आणि याच्यामधल रेकॉर्ड जे दिलेल आहे, ऍ़नीमल रेफर्ड असोसिएशन मुंबई यांनी त्यामध्ये काय लिहीलय, एरीया ऑफ पीटी नॉब भोसरी-भोसरी, भोसरी बस स्टॉप, शिवाजीवाडी नंतर डॉगच वजन तीथ टाकल १९ किलो, २० किलो, १५ किलो टाकायचय, डॉगचा कलर व्हॉइट-हॉइट, ब्लॅक-ब्लॅक, ब्राउन-ब्राउन, मेल-फिमेल बाकी त्याच जे मेल फिमेल दिलेले आहे, डे-वन, डे-टू, डे-थ्री, डे-फोर आणि विशेष म्हणजे ऍ़न्टी रेबीज व्हॅक्सीन जे देतो आपण, त्याच्या नियमामध्ये कस आहे, त्याचा जो मार्क आसतो तो तीथ जोडाव लागतो. आता आपण पाहू शकता की यामध्ये रेबीजचे इंजेक्शन कधी दिले ते २०१८ आणि इंजेक्शनचा जो मार्क आहेना तो लीहीलेला आहे मे-२०२०. माहिती अधिकारात मागविलेले सर्व पेपर्स आहेत, असे आठ आहेत आणि पास्कोला हे पाच महिन्या मध्ये दिलेलच नाही हे सगळे पेपर्स देतो तुम्हाला. माझी विनंती आहे की तुम्ही याच्यामध्ये पण गांभीर्याने लक्ष घाला.

मा.महापौर – बहल साहेबांनी जो विषय मांडला, आयुक्त साहेब त्याची चौकशी करणे गरजेचे आहे, चौकशी लावा आयुक्त साहेब.

**मा.योगेश बहल-** मा.महापौर साहेब एक विनंती आहे कुत्र्यांच्या नसबंदी मधील जो घोटाळा आहे तो उघडकीस यायलाच पाहिजे. या व्यतीरिक्त आयुक्त साहेबांना मी एक पत्र दिलेल आहे, आयुक्त साहेबांनी ते व्हीजीलन्स डिपार्टमेंटला मार्क केलेल आहे, साईकृपा बद्दल ते साईकृपाचे पण सगळे पेपर्स बोगस आहेत. ते हॉस्पीटल पण जागेवर नाही. मी त्यांना विनंती केली होती की, तुम्ही त्यांचे सर्व ऑडीटर बॅलेन्सशीट मागवा, त्यांनी जी काही जीएसटी भरली ते पण मागवा, त्याचे डिटेल्स मागवा ते फक्त मेल पाठवतात तीथ आणि एका वर्तमानपत्रात पण बातमी देखील आली होती की आयुक्त साहेबांनी त्यांना क्लीनचीट दिली. आता दिली की नाही दिली ते आम्हाला काय माहित. परंतु मी एक हजार टक्के सांगू शकतो की जे दिलेले सगळे कागदपत्र बोगस आहेत, आणि ते मी प्रु करून दाखवणार आहे आणि ती जर आता मला प्रशासनाकडून मदत मिळाली नाही तर मी १५६/३ ची प्रायव्हेट केस दाखल करणार आहे. त्याच्याशिवाय मला पर्याय नाही. मी जे म्हणतोय ते १०० टक्के खात्रीने म्हातोय. कोणावर आरोप करायचे म्हणून नाही, कोणाचा बदला घ्यायचा म्हणून नाही, कोणाचा सूड घ्यायचा म्हणून नाही, हे जे दिलेले आहे ते शंभर टक्के बोगस आहे, बोगस आहे, बोगस आहे. मा.महापौर साहेब तेही तुम्ही आदेश द्या, मघाशी तुम्ही आदेश दिले की आठ दिवसामध्ये, दहा दिवसामध्ये करा. माझी आयुक्त साहेबांना देखील विनंती आहे, प्लीज टेक इट सीरीअस, प्लीज टेक इट सीरीअस, इटस हंबल रिक्वेस्ट टू यू. कारण जे मी म्हणतोय ना ते आय वॉन्ट टू प्रु इट, दॅट हॉट

आर यू डन, दॅट इज द फ्रॉडन्ट ऍन्ड दॅट फ्रॉडन्ट शुड बी ओपन बिफोर द इलेक्शन, आय वॉन्ट टु प्रुव्ह दॅट, थँक यू.

मा.महापौर – आयुक्त साहेब त्यांनी जी आपल्याकडे माहीती सांगायला सांगीतली आहे, त्याची चौकशी करण्यात यावी वि.क्र. १२ मंजूर करणेत येत आहे.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल - ७२ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

मा.राजेंद्र गावडे – मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १३ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक – ७५४ विषय क्रमांक – १३

दिनांक – २४/१२/२०२१ विभाग – मा.आयुक्त

संदर्भ -१) मा. आयुक्त यांचेकडील पत्र क्र. प्रशा/१७/कावि/
२९६/२०२१ दि. ७/१२/२०२१

बॅटरी इलेक्ट्रिक व्हेईकल (BEV's) धोरण – २०२१" अंतर्गत उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाकडील दि. ८ ऑगस्ट २०२१ च्या शुद्धिपत्रकान्वये राज्य शासनाकडून प्रोत्साहने दिली जात आहे. त्याच धर्तीवर, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतील अधिकारी व कर्मचारी यांना बॅटरी इलेक्ट्रिक व्हेईकल (BEV's) खरेदी करण्यासाठी प्रोत्साहने (अनुदाने) देणेकामी सोबतचे "प्रपत्र – अ" प्रमाणे "पिंपरी चिंचवड महानगरपालिका बॅटरी इलेक्ट्रिक व्हेईकल (BEV's) धोरण – २०२१" प्रमाणे धोरण निश्चित करणे.

**"प्रपत्र – अ"**

(१) सदरचे धोरण सिरि धोरण हे "पिंपरी चिंचवड महानगरपालिका बॅटरी इलेक्ट्रिक व्हेईकल (BEV's) धोरण – २०२१" धोरण म्हणून ओळखले जाईल व ते केवळ बॅटरी इलेक्ट्रिक व्हेईकल (BEV's) खरेदी करण्यासाठीच लागू राहिल.

(२) सदरचे धोरण हे मा. महापालिका आयुक्त यांचे आदेश निर्गमनाच्या दिनांकापासून पाच वर्षाकरीता वैध राहील.

(३) सदर धोरणांतर्गत प्रत्येक वर्गवारीतील बॅटरी इलेक्ट्रिक व्हेईकल (BEV's) खरेदी करण्यासाठी सदरचे बॅटरी इलेक्ट्रिक व्हेईकल (BEV's) हे महाराष्ट्र राज्यात विक्री झालेले व प्रथमच नवीन बॅटरी इलेक्ट्रिक व्हेईकल (BEV's) म्हणून महाराष्ट्र राज्यातील आर.टी.ओ. कार्यालयाकडे नोंदणीकृत असणे आवश्यक राहील.

(४) सदर धोरणांतर्गत बॅटरी इलेक्ट्रिक व्हेईकल (BEV’s) खरेदी करण्यासाठीच प्रोत्साहने देय राहतील. या धोरणांतर्गत Mild Hybrid, Strong Hybrid, Plug-in Hybrid इलेक्ट्रिक वाहने समाविष्ट असणार नाहीत.

(५) सद्यस्थितीत, वित्त विभागाकडील शासन निर्णय क्रमांक:अग्रीम (व्याजदर)- २०१६/प्र.क्र.५२/२०१६/विनियम, दिनांक २७ एप्रिल, २०१७ अन्वये महापालिकेतील अधिकारी व कर्मचारी यांना खालील तक्त्यात नमूद केल्याप्रमाणे वाहन खरेदी अग्रीम दिले जाते व व्याजाची आकारणी केली जाते.

| वर्ष | मोटार कार करिता | मोटार–सायकल स्कूटर, मोपेड, तीनचाकी स्वयंचलित सायकल करिता | दुचाकी सायकल | शेरा |
|---|---|---|---|---|
| दि. १ एप्रिल, २०१५ ते दि. ३१ मार्च, २०१६ ते आजतागायत (पुढील शासन निर्णय प्राप्त होईपर्यंत) | ११.५ % | ९% | व्याजरहित | प्रदूषण करणारी व पेट्रोल व डिझेल या पारंपरिक इंधन पद्धतीवर चालणारी वाहने खरेदी करण्यासाठी दिले जाणारे वाहन अग्रीम |

(६) बॅटरी इलेक्ट्रिक व्हेईकल (BEV’s) धोरण – २०२१” अंतर्गत उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाकडील दि. ८ ऑगस्ट २०२१ च्या शुद्धिपत्रकान्वये राज्य शासनाकडून दिले जाणारे महत्तम प्रोत्साहने मर्यादा खालील तक्त्यात नमूद केल्याप्रमाणे आहे.

| Sr. No. | Vehicle Segment | Maximum incentive per vehicle (INR) |
|---|---|---|
| 1 | e-2W (L1&L2) | 10,000/- |
| 2 | e-4W cars (M1) | 1,50,000/- |

| अ.क्र. | वाहन प्रकार | प्रति वाहन महत्तम प्रोत्साहन (र.रुपये) |
|---|---|---|
| 1 | ई-दोन चाकी (एल १ व एल २) | १०,०००/- |
| 2 | ई-चारचाकी कार वाहन (एम १) | १,५०,०००/- |

(७) राज्य शासनाच्या धर्तीवर, महापालिकेमार्फतही पात्रतेनुसार वाहन अग्रीम देय असलेल्या महापालिका अधिकारी व कर्मचारी यांना त्यांचे स्वत:चे नावाने बॅटरी इलेक्ट्रिक व्हेईकल

(BEV’s) खरेदी करण्यासाठी खालील तक्त्यात नमूद करण्यात आल्याप्रमाणे प्रोत्साहने (अनुदाने) देय असतील.

| Sr. No. | Vehicle Segment | Maximum incentive per vehicle (INR) | Remarks |
|---|---|---|---|
| 1 | e-2W (L1&L2) | 10% of the original cost (base price) of the vehicle (except registration & other charges) | The incentives to be paid for the purchase environmentally friendly & pollution free battery electric vehicles (BEV’s) |
| 2 | e-4W cars (M1) | 10% of the original cost (base price) of the vehicle (except registration & other charges) | The incentives to be paid for the purchase environmentally friendly & pollution free battery electric vehicles (BEV’s) |

| अ.क्र. | वाहन प्रकार | प्रति वाहन महत्तम प्रोत्साहन (र.रुपये) | प्रति वाहन महत्तम प्रोत्साहन (र.रुपये) |
|---|---|---|---|
| 1 | ई-दोन चाकी (एल १ व एल २) | वाहनाच्या मूळ किंमतीच्या १०% (नोंदणी व इतर शुल्क वगळता) | पर्यावरणपूरक व प्रदूषणमुक्त बॅटरी इलेक्ट्रिक व्हेईकलची (BEV’s) खरेदी करण्यासाठी द्यावयाची प्रोत्साहने |
| 2 | ई-चारचाकी कार वाहन (एम १) | वाहनाच्या मूळ किंमतीच्या १०% (नोंदणी व इतर शुल्क वगळता) | पर्यावरणपूरक व प्रदूषणमुक्त बॅटरी इलेक्ट्रिक व्हेईकलची (BEV’s) खरेदी करण्यासाठी द्यावयाची प्रोत्साहने |

(८) महापालिका अधिकारी व कर्मचारी यांच्या कौटुंबिक सदस्यांच्या नावे खरेदी केलेल्या / खरेदी करावयाच्या बॅटरी इलेक्ट्रिक व्हेईकलकरीता (BEV’s) कोणत्याही परिस्थितीत वाहन अग्रीम प्रोत्साहने देय असणार नाहीत अथवा त्यासाठी वाहन अग्रीम मंजूर केले जाणार नाही.

(९) सदरची प्रोत्साहने ही बॅटरी इलेक्ट्रिक व्हेईकलच्या (BEV’s) मूळ किंमतीवर आधारित असतील व त्यामध्ये नोंदणी शुल्क व इतर शुल्काच्या किंमती समाविष्ट नसतील. बॅटरी

इलेक्ट्रिक व्हेईकल (BEV's) खरेदी करण्यासाठी केंद्र व राज्य शासनाचे प्रोत्साहने प्राप्त झालेले असल्यास, महापालिकेचे प्रोत्साहने देय असणार नाहीत.

(१०) महापालिकेमार्फत पात्रतेनुसार वाहन अग्रीम देय असलेल्या महापालिका अधिकारी व कर्मचारी यांना बॅटरी इलेक्ट्रिक व्हेईकलची (BEV's) खरेदी करण्यासाठी वरील तक्त्यात नमूद करण्यात आल्याप्रमाणे प्रोत्साहने देण्याऐवजी आवश्यकतेनुसार परिस्थितीनिहाय वाहन अग्रीम व्याजदरात सवलत देणेबाबतही विचार केला जाईल. त्याबाबत आवश्यकतेनुसार वेळोवेळी सर्वसंबंधितांना परिपत्रक / आदेशाद्वारे सूचित केले जाईल.

(११) सदर धोरणात अंशतः अथवा पूर्णतः फेरबदल / दुरुस्ती करण्याचे वा ते कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्याचे सर्वाधिकार हे मा. महापालिका आयुक्त सो. यांचेकडे राखीव असतील यास मान्यता देणेत येत आहे.

मा.ज्ञानदेव थोरात - मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल- ७२ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा. महापौर यांनी प्रकट केले.

----

मा.राजेंद्र गावडे – मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १४ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक – ७५५ विषय क्रमांक – १४

दिनांक – २४/१२/२०२१ विभाग – मा.नगरसचिव

**<u>मा.विधी समिती</u>**

अ) कार्यपत्रिका क्र.२२ दि.१८ /१०/२०२१ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

ब) कार्यपत्रिका क्र.१ दि.१८ /११/२०२१ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

मा.सुरेश भोईर- मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल- ७२ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा. महापौर यांनी प्रकट केले.

----

मा.राजेंद्र गावडे – मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १५ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक – ७५६ विषय क्रमांक – १५

दिनांक – २४/१२/२०२१ विभाग – मा.नगरसचिव

**<u>मा.महीला व बालकल्याण समिती</u>**

अ) कार्यपत्रिका क्र.१८ दि.१४/१०/२०२१ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

ब) कार्यपत्रिका क्र.१ दि.१८ /११/२०२१ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

मा.सुरेश भोईर- मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल- ७२ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा. महापौर यांनी प्रकट केले.

----

मा.राजेंद्र गावडे – मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १६ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक – ७५७ विषय क्रमांक – १६

दिनांक – २४/१२/२०२१ विभाग – मा.नगरसचिव

**<u>मा.शहर सुधारणा समिती</u>**

अ) कार्यपत्रिका क्र.२०दि.१४/१०/२०२१ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

ब) कार्यपत्रिका क्र.1 दि.१८ /११/२०२१ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

मा.सुरेश भोईर- मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल- ७२ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा. महापौर यांनी प्रकट केले.

----

मा.राजेंद्र गावडे – मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १७ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक – ७५८ विषय क्रमांक – १७

दिनांक – २४/१२/२०२१ विभाग – मा.नगरसचिव

**<u>मा.क्रीडा, कला साहित्य व सांस्कृतिक समिती</u>**

अ) कार्यपत्रिका क्र.१२दि. ८/१०/२०२१ व दि.१२/१०/२०२१ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

ब) कार्यपत्रिका क्र.1दि.१८/११/२०२१ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

मा.सुरेश भोईर- मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल- ७२ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा. महापौर यांनी प्रकट केले.

----

मा.राजेंद्र गावडे – मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १८ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक – ७५९ विषय क्रमांक – १८

दिनांक – २४/१२/२०२१ विभाग – मा.नगरसचिव

**मा.शिक्षण समिती**

अ) कार्यपत्रिका क्र.१५दि.१८ /१०/२०२१ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

ब) कार्यपत्रिका क्र.१ दि.१८ /११/२०२१ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

मा.सुरेश भोईर- मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देतो.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल- ७२ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा. महापौर यांनी प्रकट केले.

----

मा.राजेंद्र गावडे – मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १९ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक – ७६० विषय क्रमांक – १९

दिनांक – २४/१२/२०२१ विभाग – मा.आयुक्त

संदर्भ – १) मा.आयुक्त यांचेकडील जा.क्र./कर/मुख्य/९/कावि/३८३/२०२१ दिनांक १५/१२/२०२१

२) मा.आयुक्त यांचेकडील जा.क्र./कर/मुख्य/९/कावि/३७५/२०२१ दिनांक १४/१२/२०२१

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम १२७ व १२९ मधील तरतूदीनुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिका कार्यक्षेत्रातील इमारती व जमिनी यावर मिळकतकराची आकारणी करणेत येते. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम १४० ब नुसार परिस्थितीकीय दृष्ट्या लाभदायक योजनेची अंमलबजावणी करण्याकरिता मालमत्ता करातून सूट किंवा परतावा देणेबाबत तरतूद आहे.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रामध्ये मोठ्या प्रमाणात कचरा उत्पन्न करणाऱ्या (Bulk Waste Generator) आस्थापनांना “घनकचरा व्यवस्थापन नियम, २०१६” अन्वये ओला कचरा जिरविण्यासाठी ऑनसाईट कंपोस्टींग यंत्रणा एसटीपी प्लांट, तसेच झिरो वेस्ट संकल्पना राबविणाऱ्या आस्थापनांना सामान्य करात सवलत देणेकामी आरोग्य विभागामार्फत सादर केलेल्या प्रस्तावास मा.आयुक्त यांनी दिनांक ०९/१०/२०२१ रोजी मान्यता दिलेली आहे. त्यामुळे महापालिकेच्या दैनंदिन कचरा संकलनामध्ये घट होऊन कचऱ्याची विल्हेवाट लावण्याकरिता होणाऱ्या खर्चामध्ये कपात होणार आहे. याबाबत महानगरपालिकेच्या स्वच्छता अभियानाच्या “स्वच्छाग्रह” कार्यक्रमामध्ये याची घोषणा करण्यात आलेली आहे.

पिंपरी चिंचवड शहरातील Bulk Waste Generator (महाराष्ट्र शासन राजपत्र,असाधारण क्रमांक २०४ दिनांक १ जुलै २०१९ नुसार प्रसिद्ध उपविधीनुसार)

असलेल्या आस्थापनांना सामान्य करामध्ये सवलत दिल्यास कंपोस्टींग करणाऱ्या सोसायट्यांच्या संख्येमध्ये वाढ होणार असल्याने, तसेच अशा अस्थापनांचा/मिळकतींचा मिळकतकर वसूलात येणार आहे.

सबब, पिंपरी चिंचवड शहरातील Bulk Waste Generator आस्थापनांमार्फत ऑनसाईट कंपोस्टींग यंत्रणा उभारणाऱ्या, एसटीपी उभारणाऱ्या व झिरो वेस्ट ही संकल्पना राबविणाऱ्या आस्थापनांना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम १४० मधील तरतूदीनुसार, तसेच ३० जूनपूर्वी थकबाकीसह मिळकतकराचा एकरकमी व संपूर्ण भरणा करणाऱ्या मिळकतधारकांना मिळकतकर बिलाचे चालू मागणीतील सामान्य करामध्ये खालील प्रमाणे सवलत निश्चित करण्यात आलेली आहे.

| क्र. | निकष | साफसफाई करात सवलत |
|---|---|---|
| १ | ऑनसाईट कंपोस्टींग यंत्रणा कार्यान्वीत असलेल्या निवासी आस्थापना (ओला कचरा पूर्णत: जिरविणाऱ्या आस्थापना) | २०% |
| २ | ऑनसाईट कंपोस्टींग यंत्रणा व एसटीपी कार्यान्वीत असलेल्या निवासी आस्थापना | ३०% |
| ३ | झिरो वेस्ट संकल्पना राबविणारी निवासी आस्थापना (ओला व सुका कचरा पूर्णत: जिरविणाऱ्या आस्थापना) व एसटीपी कार्यान्वीत असलेल्या निवासी आस्थापना | ५०% |

वरीलप्रमाणे विषयपत्र तातडीचे असलेमुळे मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील अनुसूची प्रकरण २, नियम १ (के) मधील तरतुदीनुसार मान्यता देणेत येत आहे.

मा.ज्ञानदेव थोरात – मा.महापौर साहेब ठरावास अनुमोदन देतो.

मा.महापौर - विषय क्रमांक १९ मंजूर करणेत येत आहे.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल- ७२ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

मा.राजेंद्र गावडे – मा.महापौर साहेब, विषय क्रमांक २० वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडतो.

ठराव क्रमांक – ७६१ विषय क्रमांक – २०

दिनांक – २४/१२/२०२१ विभाग – मा.आयुक्त

संदर्भ – १) मा.आयुक्त यांचेकडील जा.क्र./स्था/बीआरटीएस/१७४१/२०२१
दिनांक १६/१२/२०२१
२) मा.आयुक्त यांचेकडील जा.क्र./स्था/बीआरटीएस/१७४०/२०२१
दिनांक १६/१२/२०२१

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे कार्यक्षेत्र सुमारे १८१ चौमी. आहे. शहरात सुमारे १२०० किमी. लांबीचे रस्ते व १८४ उद्याने विकसीत करणेत आलेली आहेत. पिंपरी चिचवड शहराचे सौंदर्यात भर घालणेसाठी मुख्य रस्त्यावर व मुख्य चौकांचे तसेच उद्यानाचे ठिकाणी विविध विषयावरील FRP Sculptures Selfie point, (Photo Booth) तसेच मुख्य चौकाचे ठिकाणी मानांकित लोकांचे माहिती फलक इत्यादी उभारणे प्रस्तावित आहे.

शहरामध्ये एकुण ८ क्षेत्रीय कार्यालये आणि ३२ प्रभाग आहेत. शहरामध्ये बरेचसे मुख्य चौक आहेत. अशा ठिकाणी एफ. आर. पी.मध्ये शिल्प तयार करून सेल्फी पॉइंट तयार केलेस शहराच्या सौंदर्यात भर पडेल. तसेच शहराची एक वेगळी ओळख निर्माण होईल. त्याप्रमाणे खाली नमुद केलेले Sculptures बसविणे प्रस्तावीत आहे.

| Sr.No. | Category |
|---|---|
| 1 | Selfie Booth |
| 2 | Information Board |
| 3 | Garden Information Board |
| 4 | Women Empowerment Sculpture |
| 5 | Legends Information Board and portraits |
| 6 | Social Messages Sculpture |
| 7 | Artistic Sculpture |
| 8 | Historic Sculpture |
| 9 | Contemporary Sculpture |
| 10 | Environment awareness Sculpture |
| 11 | Animals Sculpture |
| 12 | Painting on ESRS and Wall painting on piers and Bridges |

त्यासाठी खालील कामांचा सन २०२१/२२ च्या अंदाजपत्रकात समावेश करणे, अंदाजपत्रकास प्रशासकिय मान्यता देणे व वाढ /घट करून तरतुद करणेस मान्यता देणेत येत आहे.

| अक्र | कामाचे नाव | अंदाज पत्रकीय रक्कम | लेखाशिर्ष | पान क्र. अ.क्र | सन २०२१-२२ ची तरतूद | वाढ | घट | सन २०२१-२२ चा अंदाजपत्रक |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | पिंपरी चिचंवड शहरातील रस्ते चौक व उद्याने या ठिकाणी FRP Selfie Booth, माहिती फलक व इतर शिल्प उभारणे. | ५.०० कोटी | विशेष योजना | नविन काम | - | ५०.०० लाख | - | २५.०० लाख |
| २ | पिंपरी चिंचवड शहरातील रस्ते चौक व उद्याने या ठिकाणी महिला सक्षमीकरण विषयी FRP Sculptures व Portrait करणे. | ५.०० कोटी | विशेष योजना | नविन काम | - | ५०.०० लाख | - | २५.०० लाख |
| ३ | पिंपरी चिचंवड शहरातील रस्ते चौक व उद्याने या ठिकाणी सामाजिक विषयावर आधारीत एफआरपी शिल्प उभारणे | ५.०० कोटी | विशेष योजना | नविन काम | - | ५०.०० लाख | - | २५.०० लाख |
| ४ | पिंपरी चिचंवड शहरातील रस्ते चौक व उद्याने या ठिकाणी कलात्मक व ऐतिहासीक एफआरपी शिल्प उभारणे | ५.०० कोटी | विशेष योजना | नविन काम | - | ५०.०० लाख | - | २५.०० लाख |
| ५ | पिंपरी चिचंवड शहरातील रस्ते चौक व सांस्कृतिक व पर्यावरण विषयक एफआरपी शिल्प उभारणे . | ५.०० कोटी | विशेष योजना | नविन काम | - | ५०.०० लाख | - | २५.०० लाख |
| ६ | पिंपरी चिचंवड शहरातील प्राणी विषयक एफआरपी शिल्प उभारणे व विविध ठिकाणी विविध विषयावर आधारित कलात्मक पेंटींग करणे | ५.०० कोटी | विशेष योजना | नविन काम | - | ५०.०० लाख | - | २५.०० लाख |
| ७ | पिंपरी चिंचवड शहरामध्ये समाज सहभागातून शहरातील विकसीत केलेल्या विविध इमारतीच्या वर व घरकुल योजना/झोपडपट्टी पुर्नवसन योजनेच्या ठिकाणी विविध कलात्मक रंगरंगोटी , शिल्पे, सुशोभिकरण इ. कामे करणे. | ५.०० कोटी | विशेष योजना | नविन काम | - | ५०.०० लाख | - | ५०.०० लाख |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ८ | पिंपरी चिंचवड शहरात शुशोभिकरण करणे व इतर कामासाठी विविध तज्ञ सल्लगारांचे दौरे आयोजीत करणेसाठी वाहतुक, निवास व इतर व्यवस्था करणेसाठी अनुषंगीक खर्च करणे. | १०.०० लाख | विशेष योजना | नविन काम | - | ५.०० लाख | | ५.०० लाख |
| ९ | एम्पायर इस्टेट उड्डाणपुलास चिंचवड बाजुकडे उतरणेस व चढणेस लूप/रॅम्प बांधणे | ४०.०० कोटी | विशेष योजना | १३/९ | ५.०४ कोटी | - | १.१८ कोटी | ३.८६ कोटी |
| १० | चिंचवड लिंकरोड बाजूकडील यशोपुरम, संत गार्डन व साई ग्रेस सोसायटी समोरील व एम्पायर ईस्टेट येथे उड्डाणपुलाखाली स्थापत्य विषयक कामे करणे. | १५.०० कोटी | विशेष योजना | ४१/४१ | ४.३३ कोटी | - | १.१८ कोटी | ३.१५ कोटी |
| ११ | के.एस.बी. चौक ते स्पाईन रोड पर्यंतच्या बीआरटी मार्गावरील फुटपाथ व सायकल ट्रॅक अत्याधुनिक पध्दतीने विकसित करणे | १७.०० कोटी | विशेष योजना | ४२/४९ | ५.४४ कोटी | - | १.१९ कोटी | ४.२५ कोटी |
| | **एकूण** | | | | **१४.८१ कोटी** | **३.५५ कोटी** | **३.५५ कोटी** | **१४.८१ कोटी** |

तरी वरील प्रमाणे नविन कामांचा समावेश करून त्यास प्रशासकिय मान्यता देणे व वाढ /घट करून तरतुद करणेस मान्यता देणेत येत आहे.

मा.ज्ञानदेव थोरात – मा.महापौर साहेब ठरावास अनुमोदन देतो.

मा.महापौर - विषय क्रमांक २० मंजूर करणेत येत आहे.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल- ७२ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-----

मा.योगेश बहल - सन्मा.महापौर साहेब, आपण आता चार पाच दिवसात नवीन वर्षात पदार्पण करणार आहोत. सभागृहातील सर्व सन्मा.सदस्य, अधिकारी वर्ग, आयुक्त, महापौर साहेब आपणा सर्वांना नवीन वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा देतो. नवीन वर्ष आपणा सर्वांना सुखाचे, समाधानाचे जावो, अशी इश्वरचरणी प्रार्थना करतो.

मा.महापौर - नवीन वर्षाच्या सर्वाना शुभेच्छा देवून, सर्वांचे आभार मानून सभा संपल्याचे जाहीर करणेत येत आहे.

----

**(**उषा उर्फ माई मनोहर ढोरे**)**
**महापौर**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी -४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी-४११ ०१८.
नगरसचिव कार्यालय
क्रमांक-नस/५/कावि/९४८/२०२२
दिनांक - २/२/२०२२



**(उल्हास बबनराव जगताप)**
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी-४११ ०१८.

प्रत – सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांजकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.

**(विषय क्र. ४ चे लगत)**

**पि.एम.पी.एम.एल. कर्मचारी माहिती तक्ता**

**प्रपत्र 'अ'**

| अ.क्र. | सेवकांचे नाव | पदनाम | कर्मचारी क्रमांक |
|---|---|---|---|
| 1 | हनुमंत शेलार | फिटर | 3103 |
| 2 | बाळु भिलारी | हेल्पर | 3128 |
| 3 | गुंडाभाऊ ओतारी | हेल्पर | 3362 |
| 4 | अंकुश कापसे | हेल्पर | 3368 |
| 5 | योगेंद्र सिंग | हेल्पर | 3371 |
| 6 | विजय शेळके | हेल्पर | 3386 |
| 7 | भगवान मांजरे | हेल्पर | 3417 |
| 8 | अरुण बोत्रे | फिटर | 3422 |
| 9 | लक्ष्मण तापकीर | फिटर | 3444 |
| 10 | विलास चिंचवडे | हेल्पर | 3116 |
| 11 | जिजाबा पाटील | हेल्पर | 3122 |
| 12 | विलास पालांडे | हेल्पर | 3131 |
| 13 | सुधीर साठे | हेल्पर | 3135 |
| 14 | दिलीप डांगे | हेल्पर | 3136 |
| 15 | अशोक ससाणे | हेल्पर | 3149 |
| 16 | ज्ञानेश्वर येवले | हेल्पर | 3152 |
| 17 | शाम शिंदे | हेल्पर | 3154 |
| 18 | भानुदास लांडगे | हेल्पर | 3375 |
| 19 | सुनिल मिर्झापुरे | हेल्पर | 3376 |
| 20 | सुरेश टकुराणी | हेल्पर | 3378 |
| 21 | रावसाहेब जाधव | हेल्पर | 3379 |
| 22 | विजय काटे | हेल्पर | 3392 |
| 23 | शिवाजी दळवी | हेल्पर | 3394 |
| 24 | लक्ष्मण डोंगरे | हेल्पर | 3433 |
| 25 | चंद्रकांत जाधव | हेल्पर | 3130 |
| 26 | श्रीकांत गावडे | हेल्पर | 3387 |
| 27 | दिपक कुंभार | हेल्पर | 3391 |
| 28 | किशिन लुल्ला | हेल्पर | 3407 |
| 29 | गोविंद देवकर | हेल्पर | 3434 |

| | | | |
|---|---|---|---|
| 30 | नानासाहेब सोनावणे | हेल्पर | 3119 |
| 31 | ज्ञानेश्वर शिवले | हेल्पर | 3401 |
| 32 | मुरलीधर गव्हाणे | हेल्पर | 3439 |
| 33 | हनुमंत लांडगे | हेल्पर | 3405 |
| 34 | मोहन जाधव | हेल्पर | |
| 35 | सिद्धार्थ ओव्हाळ | हेल्पर | 3138 |
| 36 | दिपक जागळेकर | हेल्पर | 3139 |
| 37 | गणेश लवांडे | हेल्पर | |
| 38 | राजू लोंढे | हेल्पर | 3143 |
| 39 | संजय डोळस | हेल्पर | |
| 40 | बाळू गोटे | हेल्पर | 3043 |
| 41 | अशोक शिवरकर | हेल्पर | |
| 42 | सोपान दिघे | हेल्पर | 3153 |
| 43 | तुकाराम कोल्हे | हेल्पर | 3147 |
| 44 | गणेश फुगे | हेल्पर | 3143 |
| 45 | सदाशिव चव्हाण | हेल्पर | 3018 |
| 46 | बाळु कांबळे | हेल्पर | 3037 |
| 47 | देविदास बालवडकर | हेल्पर | 3072 |
| 48 | संजय कोंडे | हेल्पर | 3466 |
| 49 | बबुशा गाडे | हेल्पर | 3423 |
| 50 | विनायक लांडगे | हेल्पर | 3159 |
| 51 | तानाजी खंडागळे | हेल्पर | 3369 |
| 52 | संजय पिसाळ | हेल्पर | 3045 |
| 53 | बाळु कांबळे | हेल्पर | 3037 |
| 54 | प्रेनायर. | हेल्पर | 3474 |
| 55 | राजाराम नथु लोंढे | फिटर | 3062 |
| 56 | पंडीत भंडारे | हेल्पर | 3060 |
| 57 | विलास तांगडे | हेल्पर | 3085 |
| 58 | हरिष छाब्रिया | हेल्पर | 3075 |
| 59 | राजू मुलानी | हेल्पर | 3081 |
| 60 | संजय मोहिते | हेल्पर | 3054 |
| 61 | भिमराव कांबळे | हेल्पर | 3055 |
| 62 | शिवाजी घुले | हेल्पर | 3069 |
| 63 | राजु तापकिर | हेल्पर | 3066 |
| 64 | रमेश राऊत | हेल्पर | 3014 |

| | | | |
|---|---|---|---|
| 65 | रशिकांत टींगरे | हेल्पर | 3124 |
| 66 | उत्तम काळे | हेल्पर | 3071 |
| 67 | अंकुश दवणे | हेल्पर | 3073 |
| 68 | लक्ष्मण ननावरे | क्लिनर | 3096 |
| 69 | सुहास दाभाडे | क्लिनर | 3088 |
| 70 | कैलास गव्हाणे | क्लिनर | 3093 |
| 71 | सुभाष बटवाल | क्लिनर | 3429 |
| 72 | अनिल लांडगे | क्लिनर | 3070 |
| 73 | सुनिल काटे | हेल्पर | 61023 |
| 74 | राजेंद्र लांडे | हेल्पर | 3001 |
| 75 | इंद्रजित मिनीकर | क्लिनर | 3007 |
| 76 | अनिल गवळी | हेल्पर | 3462 |
| 77 | दिगंबर मेंगडे | हेल्पर | 3013 |
| 78 | विजय किंडरे | हेल्पर | 3015 |
| 79 | सयद काझी | हेल्पर | 3017 |
| 80 | विठ्ठल साखरे | हेल्पर | 3019 |
| 81 | खंडेराव धुमाळ | हेल्पर | 3020 |
| 82 | संजीवकुमार गायकवाड | हेल्पर | 3021 |
| 83 | गुलाब आढाव | हेल्पर | 3026 |
| 84 | राजेंद्र आल्हाट | हेल्पर | 3027 |
| 85 | अरुण श्रीवास्तव | हेल्पर | 3029 |
| 86 | रमेश भाताडे | हेल्पर | 3030 |
| 87 | निळकंठ निमगावकर | हेल्पर | 3032 |
| 88 | सन्मानसिंग ठाकूर | क्लिनर | 3040 |
| 89 | सतिश चव्हाण | क्लिनर | 3042 |
| 90 | रमाकांत शिंदे | क्लिनर | 3044 |
| 91 | सुरेंद्र ठकार | हेल्पर | 3047 |
| 92 | हिरामण अल्हाट | हेल्पर | 3057 |
| 93 | राजाराम गव्हाणे | हेल्पर | 3059 |
| 94 | सुहास कदम | क्लिनर | 3100 |
| 95 | बाबसाहेब मुलाणी | क्लिनर | 3121 |
| 96 | बुराण शेख | क्लिनर | 3129 |
| 97 | तुकाराम बवले | क्लिनर | 3181 |
| 98 | रामचंद्र भाट | हेल्पर | 3187 |
| 99 | रसुल मुंडे | क्लिनर | 3287 |

| | | | |
|---|---|---|---|
| 100 | लक्ष्मण नखाते | क्लिनर | 3409 |
| 101 | शंकर काळभोर | क्लिनर | 3416 |
| 102 | विजय जाधव | हेल्पर | 3421 |
| 103 | अशोक नामदे | क्लिनर | 3425 |
| 104 | अर्जुन चौघुले | क्लिनर | 3427 |
| 105 | नंदकुमार यादव | क्लिनर | 3449 |
| 106 | राधाकृष्ण नायर | फिटर | 3462 |
| 107 | नारायण पांचाळ | क्लिनर | 3077 |
| 108 | श्रीमती सविता शंकर कर्पे | सफाई कर्मचारी | |
| 109 | श्रीमती लिलाबाई रत्नाकर लंघे | सफाई कर्मचारी | |
| 110 | श्रीमती गिता सासवडकर | सफाई कर्मचारी | |
| 111 | श्रीमती सुरेखा शिंदे | सफाई कर्मचारी | |
| 112 | मंदाकिनी भोईर | सफाई कर्मचारी | |
| 113 | लक्ष्मीबाई गाढवे | सफाई कर्मचारी | |
| 114 | अलका वंजारे | सफाई कर्मचारी | |

सही/-
**(उषा उर्फ माई मनोहर ढोरे)**
महापौर
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.